

# पडझडीच्या नोंदी

## सोलापूरचे उद्यमजगत १९९३-२००४

विलास बेत

# पडझडीच्या नोंदी

## सोलापूरचे उद्यमजगत १९९३-२००४

विलास बेत

परिवर्तन अकादमी
प्रकाशन,
सोलापूर

पडझडीच्या नोंदी
Padzhadichya Nondi

विलास बेत
Vilas Bet

सौ. साधना विलास बेत
मो. ९८२२९६९६२९
१३३६, भद्रावती पेठ,
चन्ना बिल्डींग तिसरा मजला
सोलापूर - ४१३००५
मो. ९८२२६०६३२२ । vilas.bet@gmail.com

प्रकाशक
रवींद्र मोकाशी, परिवर्तन अकादमी प्रकाशन
शॉप क्र. १०, युनायटेड रेसिडेन्सी
१५९, रेल्वे लाइन्स सोलापूर - ४१३००१
मो. ९४२२६४५०५५ । mokashi1234@gmail.com

मुद्रक : महावीर प्रिंटर्स, पुणे

अक्षरजुळणी : सुहास जाधव

मुखपृष्ठ : शिरीष घाटे

मूल्य : २४० रु.

ISBN No. : 978-81-926776-7-5

जिच्या अथक प्रयत्नामुळे आमचा संसार यशस्वी झाला,
जिच्या प्रोत्साहनामुळे मी समाजकार्य करू शकलो
सलग बारा वर्षे साप्ताहिक सदर लिहू शकलो
माझ्या लेखनाची पहिली वाचक बनून
जिने सतत प्रेरणा दिली,
त्या माझ्या सहचारिणी साधनास,

# थोडं मनातलं...

विसाव्या शतकातील शेवटच्या दशकात आपण मिश्र अर्थव्यवस्था बदलून मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली तेव्हापासून खासगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरणाचे नवे पर्व सुरु झाले.योगायोगाने त्याच सुमारास १९९३ मध्ये सोलापुरात दैनिक 'लोकमत'ची स्थानिक आवृत्ती प्रसिद्ध व्हायला सुरुवात झाली. अगदी पहिल्या दिवसापासून सलग दहा वर्षे 'औद्योगिक आघाडीवर' या साप्ताहिक सदराच्या लेखनाची संधी मला मिळाली. माझे मित्र कै. सुभाष कोरे यांनी 'सोलापूर दै.लोकमत'च्या पहिल्या संपादकपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर ते जेंव्हा माझ्या घरी आले तेंव्हा सोलापुरच्या वाचकांची नेमकी गरज काय याविषयी आमची प्रदीर्घ चर्चा झाली. त्यानंतर सोलापुरातील उद्योग, व्यापार, रोजगार, कामगार अशा विविध गोष्टींचा आढावा घेणारे साप्ताहिक सदर लिहिण्यासाठी त्यांनी माझ्याकडे आग्रह धरला. खरेतर त्यापूर्वी मला सदरलेखनाचा अनुभव नव्हता. परंतु सोलापुरमधील रंगा वैद्य,व्ही आर कुलकर्णी,बाबूरावजी जक्कल,विवेक घळसासी यासारख्या पत्रकारितेतील अनेक महनीयांच्या मार्गदर्शनामुळे प्रासंगिक लेखन केले होते.केवळ त्या अनुभवाच्या आधारे दै.लोकमत मधून १९९३ ते २००२ 'औद्योगिक आघाडीवर'हे साप्ताहिक सदर लिहू शकलो. इथल्या उद्योगातील घडामोडी, प्रामुख्याने कापड गिरण्या, सुत गिरण्या, औद्योगिक वसाहती,यंत्रमाग,बिडी उद्योग तसेच इतर उद्योग, व्यापार आणि कामगार चळवळीविषयी लिहिलं.दै. लोकमत' नेच मला लिहीत केलं हे मी नम्रपणे नमूद करू इच्छितो.अरुण खोरे,सुधीर महाजन,श्रीकांत न्याहालकर अशा 'लोकमत'च्या संपादकांपासून ते विद्यमान सचिन जवळकोटे पर्यंत प्रत्येकानी तसेच पत्रकार आणि कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याची नोंद

करणे मी कर्तव्याचे मानतो.

'लोकमत'मधील सदरलेखनाची दशकपूर्ती केली. त्यानंतर दै. केसरी गर्जने मधून वर्षभर 'ऐरणीचे देव' तसेच दै सकाळ मधून 'बदलते प्रवाह' ह्या साप्ताहिक सदरलेखनातून वर्षभर लेखन केले.त्यामुळे एकंदरीत १९९३ ते २००४ ह्या प्रचंड उलथापालथी घडलेल्या कालावधीतल्या सोलापुरातील उद्योग, व्यापार, कामगार अशा विविध क्षेत्रातील ठळक घडामोडींची नोंद माझ्या हातून झाली याचे समाधान आहे.

विसाव्या शतकातील शेवटचे दशक भारतासाठी व्यवस्था परिवर्तनाचे होते. ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून होरपळलेला भारत देश अद्याप सावरलेला नव्हता. लोकसंख्येने मोठ्या देशातील रोजगार आणि कष्टकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्यात अनेक अडचणी होत्या. मिश्र अर्थव्यवस्था इथल्या मातीत पूर्णपणे रुजण्याआधीच तिला मुळासकट उखडून काढीत मुक्त अर्थव्यवस्था स्विकारली गेली. त्यासाठी फारशी तयारीही केली नव्हती. परिणामी इथल्या पारंपरिक लघुउद्योग, आणि विविध जाती, धर्मातील विविधता, शेतीवर आधारित ग्रामीण अर्थकारण, दिडशे वर्षांच्या ब्रिटीशांच्या लुटीमुळे अर्थकारण पार कोलमडून गेले होते. त्याला विकासाभिमुख करण्यासाठी वेळच मिळाला नाही. ह्या पार्श्वभूमीवर जागतिक दबावाखाली मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली गेली. त्यामुळे तो काळ प्रचंड उलथापालथीचा होता. ग्रामीण कष्टकरी आणि अशिक्षित जनता ह्या सर्व गोष्टींच्या परिणामाविषयी पूर्णपणे अनभिज्ञ होती. व्यवस्थापरिवर्तन त्यांना कळलेच नाही,

उद्योग आणि कामगारांच्या समस्यांना भिडल्यामुळे माझाही एकांगी दृष्टीकोन बदलला. अभ्यास वाढला. विविध क्षेत्रातील जबाबदार घटकांशी प्रत्यक्ष संवाद घडला. नरसिंग गिरजी मिल सोडल्यानंतर प्राध्यापक म्हणून एम एस डब्लू आणि एम बी ए सारख्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मानव्य व्यवस्थापन, कामगार कल्याण,मानव संसाधन विकास ह्यासारखे विषय शिकविताना प्रत्यक्ष अनुभवलेल्या घटना आणि केस स्टडीजच्या आधारे शिकविता आले. माझेही अनुभव तात्विक पातळीवर तपासण्याची संधी मिळाली. जनसामान्यांच्या जिव्हाळ्याच्या विविध विषयांची यथार्थ माहिती सदरलेखनातून दिल्यामुळे माझे सदर नियमितपणे वाचणारा मोठा वर्ग तयार झाला. त्यतील अनेक लोक

आवर्जून भेटून माझ्या लेखनाची चिकित्सा करीत असत. कामगार चळवळीचा आढावा घेता आला. औद्योगिक विश्वातील उत्तम योजना, चांगले उपक्रम, त्याचे उद्योग आणि कामगारांवर होणारे परिणाम, व्यवस्था परिवर्तनामुळे झालेले बदल अशा सर्व विषयावर जनतेला सकारात्मक बनविण्यात यश मिळाले. लोकसंपर्क वाढला. लोकांनीच अनेक सदरलेखनाचे विषय दिले. जनमानस अभ्यासता आला. मीही घडलो. गिरणगाव आणि उद्योग विश्वाशी कायमचा जोडला गेलो.वृत्तपत्र आणि माध्यमांचा थेट अनुभव मिळाला. शहराच्या विकासासाठी योगदान देता आले. ही माझ्या दृष्टीने मोलाची गोष्ट आहे.

सोलापुरातील औद्योगिक परिस्थिती गंभीर बनली होती.सोलापूरची ओळख असणाऱ्या कापड गिरण्या बंद पडल्या. सहकारी सुत गिरण्या संपुष्टात आल्या. जागतिक स्पर्धेत टिकू न शकल्यामुळे यंत्रमाग व्यवसाय मोडकळीस आला. महिलांना उपलब्ध असलेला बिडी उद्योग तसेच इतर,छोटे उद्योग अडचणीत आले. शहरातील निम्याहून अधिक कामगारांची सुरक्षितता संपविणारे मुक्त धोरण आल्यामुळे रोजगार अडचणीत आला. आर्थिक अडचणीमुळे अनेक व्यवसाय बंद पडले. एकंदरीत गिरणगाव उद्ध्वस्त झालं. ही सर्वांगीण पडझड विविध लेखांमधून नोंदविली गेली. म्हणूनच मुक्त आर्थिक धोरण स्वीकारल्यामुळे झालेल्या विस्थापन, उच्चाटन आणि उद्ध्वस्त जनजीवनाविषयीच्या निवडक लेखांच्या पुस्तकाला 'पडझडीच्या नोंदी' (सोलापूर उद्योगजगत १९९३-२००४) हे नाव देणे उचित वाटते. त्या दशकातील सदरलेखनातून जी मांडणी झाली, त्यातून प्रामुख्याने इथल्या औद्योगिक विश्वाची झालेली पडझड, त्यांचा घटनाक्रम अधोरेखित झाला. त्या सर्वांची निवड करण्याऐवजी निवडक लेखांचे पुस्तक 'पडझडीच्या नोंदी' या नावाने प्रसिद्ध होत आहे. हा दस्तावेज अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी तसेच उद्याच्या पिढीसाठी उपयोगी ठरेल. गिरणगाव नाकारणाऱ्या आजच्या नवशिक्षित स्थलांतरित पिढीला आपला ऐतिहासिक वारसा समजून घेता येईल. ही पडझड विनाशकारी आणि दाहक होती तशीच स्पर्धा न करू शकणाऱ्या कष्टकऱ्यांना हद्दपार करणारी होती हे स्पष्ट करणाऱ्या लेखांची प्रामुख्याने निवड केली. उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक, कामगार सर्वांचे उल्लेखनीय योगदान असणाऱ्या लेखांची आवर्जून निवड केली. शिवाय पडझडीसाठी कारणीभूत ठरलेल्या चुकाही वाचकांना कळाव्यात आणि पुढील

दिशा ठरविताना कोणत्या आवश्यक गोष्टींची खबरदारी घ्यावी लागेल अशाच दिशादर्शक लेखांचा समावेश करण्यात आला.

या दोन्ही पुस्तकांच्या निर्मितीसाठी हा उत्साह दाखविणारे परिवर्तन प्रकाशनाचे रवींद्र मोकाशी दै. लोकमतमधील लेखांचे पुनर्मुद्रण करण्याची अनुमती दिल्याबद्दल मा.श्री. विजयबाबू दर्डा, चेअरमन एडिटोरियल बोर्ड, दै.लोकमत यांचे आभार. भाई छन्नुसिंग चंदेले स्मृती केंद्राचे हेमू चंदेले, पुस्तकांची मांडणी, मुखपृष्ठाचे करणारे माझे मित्र शिरीष घाटे याशिवाय अनेक जणांच्या सहभागाने हे काम झाले त्यांचेही मी आभार मानतो.

अर्थात सलग दहा वर्षाहून अधिक कालावधीमध्ये साप्ताहिक सदर लिहिले त्यातून निवडलेल्या लेखांमधून संपूर्ण पडझडींची नोंद होणे शक्य नाही. म्हणून आवश्यक तेवढ्या दखलपात्र लेखांची निवड केली. शिवाय सोलापुरातील कापड गिरण्याविषयी माझे ‘गिरणीतले दिवस’ हे स्वतंत्र पुस्तक देखील याबरोबरच प्रसिद्ध होत असल्यामुळे गिरण्याविषयीचे लेख कटाक्षाने टाळले. एकंदरीत दोन्ही पुस्तके वाचून गिरणगावची पडझड समजायला मदत होईल. त्यांचा घटनाक्रम लक्षात येईल. लेखांची संख्या सीमित केली. तथापि ज्या कोणाला अधिक माहिती हवी असेल त्यांच्यासाठी माझ्या वैयक्तिक संग्रहातून निश्चित मदत दिली जाईल. खरेतर ह्या पुस्तकाची निर्मितीच अशा गरजेतूनच पुढे आली. माझे सदरलेखन चालू झाल्यापासून इथल्या गिरण्या, उद्योग, आणि कामगाराविषयीची माहिती हवी असणारे पत्रकार, अभ्यासक, संशोधक, माध्यमातील लोक आणि राजकारण समाजकारणातील मंडळी आजही माझ्याशीच संपर्क करतात. माहिती घेतात. अशा सर्वांची गरज भागविण्यासाठी पडझडीच्या काळातील घडामोडीं अधोरेखित करणाऱ्या निवडक लेखांचे पुस्तक प्रकाशित करताना मनापासून आनंद होतो. त्याचा गरजूंना उपयोग व्हावा हीच इच्छा.

प्रा विलास बेत

औद्योगिक वाढीसाठी 'सोलापूर विकास परिषद' । १
सोलापुरातील उद्योग करवाढीमुळे संकटात । ५
उद्योजकांच्या कामगिरीची दखल घेतली जात नाही । ८
लोकप्रतिनिधींच्या दहशतीविरुद्ध
उद्योजकांमध्ये संतप्त प्रतिक्रिया । ११
वस्त्रोद्योगाचे प्रमुख केंद्र आणि कोट्यवधीची निर्यात... । १५
सोलापूरचे औद्योगिक गतवैभव परत
मिळविण्याचा संकल्प करू या ! । २०
वस्त्रोद्योगापुढील आव्हाने । २४
उद्योगमंत्री गिरणगावची व्यथा जाणून घेतील काय? । २८
राजकीय इच्छाशक्तीचा अभाव । ३२
उद्योजकांचे आत्मचिंतन, लोकप्रतिनिधींचे आश्वासन । ३४
वस्त्रोद्योग नामशेष होण्याच्या मार्गावर ! । ३८
औद्योगिक वसाहतींच्या समस्यांकडे दुर्लक्ष करणे घातक ठरेल । ४०
नवीन औद्योगिक वसाहती उभारणार, पण जुन्यांचे काय ? । ४५
पंचतारांकित औद्योगिक वसाहती । ४९
औद्योगिक वसाहतींना जाचक भुईभाडेवाढ । ५२
चिंचोली औद्योगिक वसाहतीच्या समस्यांचा अभ्यास । ५६
चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील समस्यांचा अभ्यास अहवाल । ६०
चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील समस्यांचा अभ्यास अहवाल । ६४
चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील समस्यांचा अभ्यास अहवाल । ६८
औषधनिर्मिती क्षेत्रातील 'स्मृती ऑरगॅनिक्स'ची विस्तार योजना । ७२
राष्ट्रीय औद्योगिक नकाशावर 'लक्ष्मी हैड्रॉलिक्स' झळकले ! । ७६
प्रिसिझन कॅमशाफ्टस्‌मधील शुभ वर्तमान । ८०
'इन्फोटेक पार्क'मुळे सोलापूर
जागतिक नकाशावर झळकणार । ८४
सांगोले सूत गिरणीला देशातील
सर्वोत्कृष्ट गिरणीचे सुवर्णपदक । ८८
सोलापूर सहकारी सूत गिरणी
कथित भ्रष्टाचाराच्या निमित्ताने । ९४

'सोलापूर', 'यशवंत' सूतगिरण्या;
अर्थसहाय्य मिळाले, नियोजनाचे काय? । ९८
सहकारी उद्योग चालवण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? । १०२
'यशवंत' 'सोलापूर'ची कोंडी कशी फुटणार? । १०६
दोन्ही सूतगिरण्या त्वरित सुरू झाल्या तरच
पालकमंत्र्यांची 'प्रतिष्ठा' वाढेल ! । ११०
'यशवंत' 'सोलापूर' गिरण्यांमध्ये पुन:श्च अंधार ! । ११४
चक्रव्युहात अडकलेली 'इंटक' संघटना । ११७
लढाऊ कामगारांची समंजस चळवळ । १२०
एकविसाव्या शतकाची हाक । १२५
प्रतिनिधित्त्व 'इंटक' चे तर
लढा लालबावट्याचा ! । १२९
कामगारांची मान्यता नसलेल्या मान्यताप्राप्त कामगार संघटना । १३३
यंत्रमागावरील उत्पादनाचा दर्जा
सुधारण्यासाठी 'बिट्रा' ची सेवा । १३७
राज्यातील यंत्रमागासाठी किमान वेतनाची पुनर्रचना । १४६
यंत्रमागाच्या विकासासाठी 'टेक्सटाईल कमिटी' कटिबद्ध । १४९
परिस्थितीच्या रेट्याने यंत्रमागधारक संघटित । १५३
'सिमको स्पिनर्स' मधील कामगारांचे आंदोलन । १५७
कोण जिंकलं, कोण हरलं ! । १६०
.......... शेवटची संधी संपणार.....? । १६४
'शिवाजी वर्क्स' ला आंतरराष्ट्रीय दर्जाचे
आय.एस.ओ. ९००२ प्रमाणपत्र । १६८
शिवशाहीतील 'गुप्त मतदान' । १७२
'शिवशाही' वाचविण्यासाठी राज्यातील 'शिवशाही'ला श्रमिकांचे साकडे । १७६
शिवशाही वाचविणारे समंजस कामगार । १८०
अखेरीस 'शिवशाही'चे विलिनीकरण । १८४
'शिवशाही'मध्ये परस्पर सामंजस्याचे नवे पर्व । १८८
फायनल जवाब... ताला लगा दिया जाय ! । १९१
'चेतन'चा प्रश्न सोडविण्यासाठी कृति समिती हवी । १९५
चेतन फौंड्रीतील नव्या प्रयोगाची दिशा । १९८

# औद्योगिक वाढीसाठी 'सोलापूर विकास परिषद'

सोलापूर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या कुशल नेतृत्वाखाली महानगरपालिकेतील पदाधिकारी, उद्योजक, व्यापारी तसेच शहराच्या औद्योगिक विकासाविषयी आस्था बाळगणाऱ्या सृजनशील नागरिकांची नुकतीच बैठक होऊन उद्योगांच्या समस्या व त्यावरील उपाययोजनेविषयी गंभीर चर्चा झाली. सोलापूर शहराची हद्दवाढ झाल्यामुळे लादण्यात आलेल्या करवाढीमुळे अनेक उद्योग आर्थिकदृष्ट्या संकटात आले. त्यापैकी बहुतेक उद्योजक हद्दवाढीनंतर उद्भवलेल्या परिस्थितीमुळे उद्योगांचे स्थलांतर करण्याच्या तयारीत आहोत. आधीच उद्योगांची संख्या कमी असल्याने रोजगारीची समस्या असणाऱ्या शहराला यामुळे नवीन संकटांना सामोरे जावे लागेल. जुनी गिरणी, लक्ष्मी-विष्णु या गिरण्या बंद पडल्यानंतर शिवाजी वर्क्स लि. देखील त्याच मार्गाने जात असून नरसिंग गिरजी मिल केवळ शासकीय वरदहस्तामुळे कशीबशी चालू आहे. गेल्या दहा-बारा वर्षात काही अपवाद वगळता फारसे नाविण्यपूर्ण काही घडले नाही. नवीन औद्योगिक धोरण अंमलात येऊन सहा वर्षे उलटली तरीही सोलापुरातील औद्योगिक क्षेत्र अद्यापही मागासलेलेच आहे. याउलट प्रचलित उद्योग महानगरपालिकेच्या जाचक करामुळे बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत. ही गंभीर परिस्थिती बदलण्यासाठी बैठकीतील सर्वांगीण चर्चेनंतर माजी खासदार धर्मण्णा सादूल यांनी सोलापुरातील सर्व समस्यांचा नीट अभ्यास करून शास्त्रशुद्ध उपाययोजना करण्यासाठी व्यापक 'विकास परिषद' बोलाविण्याची विधायक सूचना केली. सोलापूर विकास परिषदेच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी महानगरपालिकेने घ्यावी. मा. महापौरांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ उद्योजक असलेले, महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी सदैव

प्रयत्नशील असलेले मुख्यमंत्री मा.मनोहर जोशी यांना या महत्त्वपूर्ण परिषदेसाठी खास करून आमंत्रित करावे. विविध क्षेत्रातील तज्ञ, शासकीय अधिकारी, गुंतवणूकदार, उद्योजकांना आमंत्रित करून सोलापुरातील औद्योगिक विकासाविषयी सर्वांगीण चर्चा घडवून आणावी ही कल्पना खरोखरीच स्तुत्य आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील औद्योगिक विकासासाठी देशाविदेशातील उद्योजकांची 'ॲडव्हान्टेज महाराष्ट्र' ही परिषद १७ ते १९ फेब्रुवारी १९९७ दरम्यान मा. मुख्यमंत्री व शासनाच्या नेतृत्वाखाली पार पाडली. परिषदेसाठी सुमारे नऊशे प्रतिनिधी देशविदेशतून उपस्थित होते. या निमित्ताने महाराष्ट्रातील औद्योगिक स्थिती, उपलब्ध पायाभूत सुविधा, त्यामध्ये कराव्या लागणाऱ्या सुधारणा, शासनाचे सहकार्य व धोरण या सर्व गोष्टींची स्पष्ट कल्पना उपस्थितांना झाली. अनेक अनिवासी भारतीयांना यामुळे महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याची प्रेरणा मिळाली. शासन, लोकप्रतिनिधी व समव्यावसायिकांची प्रत्यक्ष हजेरी व सहभाग पाहून अनेक उद्योजकांना आत्मविश्वास मिळाला. 'ॲडव्हॉन्टे'च्या निमित्ताने मध्यम आणि खालच्या स्तरावरील नोकरदारांना औद्योगिकवाढीचे महत्त्व कळण्यास बरीच मदत झाली. त्यांचा दृष्टिकोन सकारात्मक बनल्याने नव्याने निर्माण झालेल्या पोषक वातावरणांमध्ये त्यांनाही औद्योगिक विकासांमध्ये योगदान देता येईल. त्याच पद्धतीने 'सोलापूर विकास परिषदे'चे आयोजन करून सोलापूरच्या औद्योगिक आघाडीवर पोषक वातावरण तयार करणे शक्य आहे.

### करवाढ झाली पण सुविधा नाहीत

सोलापूर शहराच्या तीनही दिशांना विकसित होणाऱ्या अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी., होटगी रस्त्यावरील इंडस्ट्रीयल इस्टेट व कोंडी-चिंचोळी एम.आय.डी.सी. मधील सर्व उद्योगांना हद्दवाढीनंतर नव्याने जकातीचा त्रास सुरू झाला. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेने सर्वाधिक ३ टक्क्याइतकी जकात, त्याशिवाय इतर कर भरावे लागल्यामुळे शहरातील व परिसरातील उद्योग डबघाईला येत आहेत. या जाचक करवाढीविरुद्ध अनेकदा ओरड करूनही काहीच न झाल्याने एम.आय.डी.सी. व औद्योगिक वसाहतीतील चालू उद्योगधंदे सद्यस्थितीत इतरत्र हलवले जात आहेत. कोट्यवधी रुपयांचा

कर घेऊन देखील महानगरपालिकेमार्फत रस्ते, पथदीप, पाण्याची व्यवस्था, जलनिस्सारणासारख्या मुलभूत सोयी पुरविल्या जात नाहीत. वास्तविक हद्दवाढीपूर्वी, महानगरपालिकेला मिळणाऱ्या एकूण महसूलीच्या प्रमाणात औद्योगिक क्षेत्रातील निधी राखीव ठेवून तो रस्ते, पाणी इ.साठी करावा असे करारान्वये ठरले असतानाही एकही पैसा त्याप्रमाणे खर्च केला जात नाही. महानगरपालिकेच्या गलथान कारभारामुळे शहराच्या आर्थिक विकासाची जबाबदारी असणारे उद्योग नुकसानीत चालत आहेत. महानगरपालिकेने शहराच्या हद्दवाढीनंतर, नव्याने अखत्यारीत आलेले क्षेत्र, विशेषतः औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी आवश्यक निधीबाबत राज्य शासनाकडे मागणी केली असल्याचे कळते. परंतु त्याविषयी राज्य शासनाकडे योग्य पाठपुरावा न झाल्याने वा अन्य कारणाने हा प्रस्तावित निधी उपलब्ध न झाल्याने महानगरपालिका या उद्योगासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरविण्यास असमर्थ आहे. मात्र कर वसूल करण्याचे काम चोख बजावत आहे. आजतागायत कोट्यवधीचा कर भरूनही अक्कलकोट रोडवरील एम.आय.डी.सी. मधील उद्योगांना पाणी टँकरने विकत घ्यावे लागते. त्या परिसरातील रस्ते दुरुस्ती नाही. पथदीपांची अवस्था अवर्णनीय आहे. कोंडी-चिंचोळी भागातील उद्योगातून काम करणाऱ्या परिवहन व्यवस्था नाही. बहुतेक उद्योजकांना स्वतःची व्यवस्था करून ही वाहतुकीची गरज परक्या मालाच्या ने-आण करण्याची देखील योग्य व्यवस्था नसल्याने देखील नुकसानी सोसावी लागते. सद्या अस्तित्वात असलेल्या इथल्या उद्योगांची ही दुरवस्था पाहून कोणता नवउद्योजक इकडे येण्याचे धाडस करेल.

### सोलापूर 'उद्योगनगरी' म्हणून विकसित व्हावे

सोलापूर मॅन्युफॅक्चर्स असोसिएशनने आपली कैफियत मांडताना एकीकडे राज्यातील तुलनेने विकसित अशा कोल्हापूर, औरंगाबाद, अहमदनगर, पिंपरी-चिंचवड व नासिकसारख्या महानगरपालिकांची करआकारणी व तुलनेने पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधा स्पष्ट केल्या तर दुसरीकडे महानगरपालिकेच्या महसुलीतील तुटीवरील उपायही सुचविले आहेत. सोलापूर शहर एकेकाळी महाराष्ट्रातील चौथ्या क्रमांकावरचे औद्योगिक शहर समजले जात असे. परंतु गेल्या दहा वर्षातील पिछेहाटीमुळे दहाव्या क्रमांकावर येऊन पोचले. आपल्यानंतर

सुधारणेचा ध्यास घेतल्या वरील सर्व शहरांनी तुलनेने आघाडी मारली आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे तिथल्या लोकप्रतिनिधी व सुजाण नागरिकांची ठायी असलेली विधायक इच्छाशक्ती व त्यांचे द्रष्टे नेतृत्व.

नवीन औद्योगिक धोरणानंतर ही परिस्थिती बदलेल अशी आशा वाटत होतो. दुर्दैवाने प्रचलित उद्योग बंद पाडताहेत. नव्यासाठी कसलेही आकर्षण नाही. अशी दुर्दैवी परिस्थिती आहे. यावर मात करून शहराचा औद्योगिक व आर्थिक विकास करण्याची सार्वजनिक जबाबदारी आहे. केवळ याचा परिणाम भोगणाऱ्या उत्पादकांनी, उद्योजकांनी याविषयी ओरड करून भागणार नाही तर लोकप्रतिनिधींनी समर्थ साथ दिली पाहिजे. महाराष्ट्र शासनाकडे आपल्या मागण्यांविषयी सतत पाठपुरावा करण्याची गरज आहे. महानगरपालिकेकडून कर कपातीबरोबरच मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने भारतीय घटनेच्या ७४ व्या दुरुस्तीनुसार व महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार ‘उद्योगनगर’ (इंडस्ट्रीयल टाऊनशिप) म्हणून शहराचा विकास करण्याचा प्रस्ताव दिला. ज्यायोगे मोठ्या नव्या उद्योगांना पुढील काळात सोलापूरचे आकर्षण वाढेल. हा प्रस्ताव देखील उपयुक्त असून त्याचाही विधायक भूमिकेतून विचार करण्यास हरकत नाही.

सोलापूर विकास परिषदेच्या आयोजनातून इथल्या उद्योगांचे खरे प्रश्न अभ्यासले जातील. इथल्या उद्योगांविषयी, कामगारांविषयीचे तथाकथित गैरसमज दूर होण्यास मदत होईल. औद्योगिक विकासासाठी नेमक्या कोणत्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याची अद्यापही गरज आहे हे स्पष्ट होईल. ‘ॲडव्हान्टेज महाराष्ट्र’च्या निमित्ताने आपली कल्पकता सिद्ध करणारे कुशल मुख्यमंत्री ह्या परिषदेच्या निमित्ताने येतील. शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, उद्योजक, व्यापारी व गुंतवणुकदारांना एकत्रित येऊन या शहराच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टिने विचार करता येईल, योजना आखता येईल. त्याची कार्यवाही होईल. त्यासाठी विकासाच्या भूमिकेतून साऱ्यांनीच पक्ष वा तत्सम भेद विसरून सोलापूरच्या विकासासाठी निकोप भावनेतून एकत्रित येण्याची गरज आहे.

दै. लोकमत – २४/६/१९९७

# सोलापुरातील उद्योग करवाढीमुळे संकटात

सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील उद्योगधंद्यांना आयातीच्या मालावर लादलेल्या जाचक करामुळे त्यांच्यापुढे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यांचे संपूर्ण अर्थकारण धोकायात आले असून ह्या न परवडणाऱ्या जकातीमुळे उद्योजक स्थलांतराच्या मनःस्थितीत आहेत. विशेषतः छोट्या व मध्यम आकाराच्या उद्योगांवर मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला दिसतो. चादरी व टॉवेल्सचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांवर जकातीच्या परिणामांबरोबर १०० टक्के पाणीपट्टी वाढल्यामुळे उत्पादनखर्चात मोठी वाढ झाल्याने मोठे संकट उभे आहे. एकंदरीत नवीन जकात कर, वाढीव पाणीपट्टी, तुलनेने औद्योगिक विकासासाठी अत्यावश्यक रस्ते, वीज, पाणी यासारख्या मूलभूत पायाभूत सुविधा नसलेने सोलापुरातील उद्योग अडचणीत आलेला आहे. त्यासाठी सामूहिक कृती करण्याची वेळ येऊन ठेवली आहे.

वास्तविक १९९१ मध्ये केंद्र सरकारने घेतलेल्या उदारीकरणाच्या धोरणानंतर इतरांप्रमाणे इथेही नवनवे उद्योग उभारण्याची संधी निर्माण झाली होती, परंतु दुर्दैवाने मे १९९२ मध्ये सोलापूर शहराची हद्दवाढ झाली. त्यामुळे एम.आय.डी.सी. अक्कलकोट रोड, होटगी रोडवरील औद्योगिक वसाहती महानगरपालिकेच्या हद्दीत आल्या. हद्दवाढीमुळे नव्याने लागू झालेल्या जकात करामुळे उद्योगधंद्याच्या उत्पादन खर्चात वाढ झाली त्यामध्ये यंदाच्या करविषयक नियम १९६६ साली तत्कालीन परिस्थितीवर आधारित बनविलेल्या आहेत. त्यानंतर बदलत्या परिस्थितीनुसार करपद्धतीमध्ये योग्य त्या सुधारणा झालेल्या नाहीत. त्याविषयी उद्योजकांनी वारंवार मागणी करूनही दुर्लक्ष झाले.

### महानगरपालिकेकडून कराराचा भंग

सोलापूर महानगरपालिका, औद्योगिक विकास महामंडळ व उद्योजक यांच्यामध्ये १९९२ साली करार झालेला असून त्यानुसार या हद्दवाढीतील उद्योजकांकडून जकातीच्या रूपाने जेवढे उत्पन्न मिळेल त्याच्या २० टक्के रक्कम पालिकेने या ठिकाणच्या मूलभूत सुविधांवर कराव्यात असे ठरले. आजपर्यंत महानगरपालिकेने कोट्यावधी रूपयांची करवसुली करून देखील सुधारणा बाजूलाच राहिल्या. आज उपलब्ध रस्ते, दिवाबत्तीसारख्या गोष्टींकडे देखील पुरेसे लक्ष नाही. पाण्याचा पुरवठा पुरेसा व नियमितपणे नसल्यामुळे उद्योजकांना दररोज हजारो रुपये खर्चून टँकरने पाणी आणावे लागते. खंडित वीजपुरवठ्यामुळे देखील अनेकदा कारखाने बंद ठेवावी लागतात. मध्यंतरी सोलापुरातील तीनही औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांनी सामूहिकरित्या लोकप्रतिनिधींमार्फत आवाज उठविल्यामुळे राज्याचे उद्योगमंत्री यांनी याविषयी अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी समिती नियुक्त केली. सदर समितीने आपला अहवाल देखील शासनाकडे सादर केला. परंतु पुढे नेमकी ... काय झाली हे अद्याप कळू शकले नाही. शेजारच्या अनेक नवविकसित औद्योगिक शहरांनी सिद्ध केलेली आहे. अलिकडे विकसित झालेल्या नासिक, औरंगाबाद व कोल्हापूरसारख्या उद्यमशील शहरांनी केलेल्या औद्योगिक प्रगतीच्या तुलनेने आम्ही मात्र खूप मागे आहोत. यासाठी सामूहिकतेचा जसा अभाव आहे. तसे द्रष्टे नेतृत्वही नाही. सत्ताधाऱ्यांकडे इच्छाशक्ती नाही. संघटित प्रयत्न नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

### वाढते औद्योगिक क्षेत्र

नवीन अर्थ व औद्योगिक वातावरणाच्या परिणाम संपूर्ण जग बदलते आहे. साहजिकच एकेकाळी जगाच्या नकाशावर आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलेल्या सोलापूर शहर त्याला अपवाद राहू शकत नाही. हळूहळू इथेही नवनवीन कारखाने उभारले जात असून मोठे उद्योगसमूह सोलापूरकडे आशेने पाहत आहेत. संपूर्ण जिल्ह्यामध्ये लहान-मोठे उद्योगधंदे झपाट्याने वाढत आहेत. सध्या सोलापूर शहरामध्ये २१६ हेक्टर, कोंडी चिंचोळी येथे १०२२, टेंभुर्णी ३२१, अतिरिक्त टेंभुर्णी येथे १५६, अतिरिक्त कोंडी-

चिंचोळी येथे ७००, मंगळवेढा ९५, कुर्डूवाडी २६, बार्शी २५०, असे एकंदरीत ३०० हेक्टर क्षेत्रामध्ये औद्योगिक वसाहती आहेत. याशिवाय कारंबा १२५, पंढरपूर २५०, बोरामणी ९००, नितांत गरज आहे. त्यामुळे कार्यात सुलभता येईल. याबरोबर सध्या कार्यरत असणाऱ्या तीनही औद्योगिक वसाहतीतील उद्योगांच्या करविषयक, रस्ते, पाणी, वीज पुरवठा यासारख्या सुविधांविषयक अडचणी सोडविण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. मजुरी पद्धतीने काम करणाऱ्या छोट्या कारखान्यांना मालाची ने-आण करण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर 'फॉर्म वाय'ची सोय व्हावी. फाऊंड्रीजसारख्या छोट्या उद्योगांसाठी, नागपूर महानगरपालिकेच्या धर्तीवर कच्च्यामालावर जकात कर आकारणी करण्याची उद्योजकांच्या मागणीचा विचार व्हावा. घरपट्टीसंदर्भातम देखील सरधोपट पद्धतीने आकारणी न करता औद्योगिक वसाहतीतील प्लॉटधारकांसाठी 'व्यवहार्य' करपद्धती आणावी. अन्य मोठ्या शहरातून जकातीचा दर एक ते दीड टक्का असून सोलापुरात केवळ तीन ते चार टक्के जकात भरावी लागते. त्यामुळे इथे उद्योग उभारण्यास उद्योजक नाखूष असतो. याचाही नीटपणे विचार व्हावा. केवळ शासकीय फतवा काढून हद्दवाढ व करवाढीसारखे आत्मघातकी प्रकार थांबले पाहिजेत. इथल्या उद्योजकांचे सर्वांगीण प्रश्न शास्त्रशुद्ध व्यवहार्य पातळीवर अभ्यासून नियोजनबद्ध उपाययोजना व्हावी. त्यासाठी उद्योजकांनी एकत्रित येऊन सामूहिक आवाज उठविण्याची वेळ आलेली आहे. कामगार संघटनांनी परिस्थितीनुरूप ह्या प्रयत्नांमध्ये सहभागी होण्याची गरज आहे. एका अर्थाने हा त्यांचाही जीवन -मरणाचाच प्रश्न आहे.

दै. लोकमत - ६/५/१९९७

# उद्योजकांच्या कामगिरीची दखल घेतली जात नाही

सोलापुरातील औद्योगिक क्षेत्रामध्ये, विशेषत: लघुउद्योगातून, उद्योजक व श्रमिकांनी केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कामगिरीची दखल घेतली जात नाही, अशी रास्त खंत प्रसिध्द उद्योगपती प्रेमरतन दमाणींनी व्यक्त केली. यंत्रमाग उद्योजकांच्या टेक्स्टाईल डेव्हलपमेंट फाऊंडेशनतर्फे आयोजित टेक्स्टाईल डिरेक्टरीच्या प्रकाशन समारंभाप्रसंगी ते बोलत होते. यंत्रमागसारख्या असंघटित विकेंद्रित उद्योगातील तरुण उद्योजकांनी पुढाकार घेऊन सोलापुरात प्रथमत: स्वतंत्र टेक्स्टाईल डिरेक्टरी तयार केली. ज्यामध्ये वस्त्रोद्योगाशी संलग्न असलेल्या सर्व उद्योजक, व्यापारी आणि व्यावसायिकामधील कम्युनिकेशन गॅप कमी होऊन येथील उद्योगवाढीस, व्यापारवृध्दीस मदत होईल. नवनवीन बाजारपेठ उपलब्ध होऊन व्यावसायिक विकासाची संधी मिळेल, ही अपेक्षा आहे. एका अर्थाने, यंत्रमाग उद्योजक आपला पारंपरिक दृष्टीकोन बदलून खुल्या बाजारपेठेतील स्पर्धेला सामोरे जाण्याचा हा प्रयत्न आहे. ह्याची योग्य दखल घेवून औद्योगिक विकासाची भूमिका असणाऱ्या सर्वांनीच अशा उपक्रमांना सहकार्य करायला हवे. नव्या उद्योजकांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

**गिरणगावाची प्रतिमा**

सोलापूरची गिरणगाव म्हणून असलेली प्रतिमादेखील हळूहळू डागाळत चालली आहे. जुनी, लक्ष्मी–विष्णू, वेस्ट कॉटनसारख्या गिरण्या बंद पडल्यानंतर सध्या कार्यरत असणाऱ्या सूतगिरण्या, नरसिंग गिरजी मिल तोट्यात आहे, यंत्रमागांवर प्रचंड मंदीचे सावट आहे. हातमाग जवळजवळ नाहीसे होत आहेत. एकंदरीत या शहरातील वस्त्रोद्योग संपत चालला आहे. ही विदारक

परिस्थिती पुन्हा पुन्हा समोर येत असल्याने एकूणच सोलापूरची औद्योगिक स्थिती निराशाजनक वाटते. परिणामी नवीन उद्योगांची गुंतवणूक होत नाही. ही बदनामीची परिस्थिती बदलावी लागणार आहे, तरच या शहराचा औद्योगिक विकास शक्य आहे.

एकीकडे ही परिस्थिती असूनही सोलापूरच्या औद्योगिक आघाडीवर चांगले अभिमानास्पद काहीच घडत नाही काय? निश्चितच अनेक चांगल्या विधायक गोष्टी घडत आहेत. सिमको स्पिनर्ससारखा निर्याताभिमुख उद्योग कार्यान्वित झाला. यंत्रामागामध्ये टेरीटॉवेल्सची निर्यात वाढली आहे. इथल्या वॉल हँगिंगवर आकर्षक वॉल पिसेस तयार होतात. ती युरोपीय राष्ट्रांमधील भव्य दालनांची शोभा वाढवित आहेत. छोट्या उद्योजकांपैकी लक्ष्मी हैड्रोलिक्ससारख्या फाऊंड्रीजना राष्ट्रीय स्तरावरील राजीव गांधी पारितोषिक मिळते. विजेचा वापर कमीत-कमी करुन दर्जेदार उत्पादन केल्याबद्दल यशवंत सहकारी गिरणीस पारितोषिक मिळते.

थेट निर्यात करण्यामधील इष्टांकपूर्तीबद्दल इथल्या टॉवेल्स कारखानदारांची पाठ थोपटली जाते. ह्यासारख्या अनेक गोष्टींचा एकत्रित परिणाम होण्यासाठी वृत्तपत्र व अन्य प्रसारमाध्यमांनी अशा गोष्टींनी विशेष दखल घेतली पाहिजे, तरच सोलापूरच्या औद्योगिक विश्वाची काळवंडलेली प्रतिमा उजळून निघेल. अर्थात् ज्या दुर्दैवी घटना घडत आहेत, त्यांचे समर्थन न करता योग्य वास्तविक विश्लेषणासह त्यावर टीकाही हवीच. या अर्थाने प्रेमरतन दमाणींची खंत महत्त्वाची वाटते.

.

**सोलापूरातील उद्योगावर भर**

'औद्योगिक आघाडीवर' हे सदर गेली तीन वर्षे सातत्याने चालू आहे. त्यामध्ये मुख्यत्वे औद्योगिक, व्यवस्थापकीय तसेच संलग्न कायदेविषयक गोष्टींचा उहापोह करण्याचा प्रयत्न केला. इथल्या उद्योगांचे, श्रमिकांचे प्रश्न मांडून त्याविषयी ठोस उपायांची गरज प्रतिपादात केली. त्याला योग्य प्रतिसादही मिळाला. परंतु एवढेच करुन चालणार नाही तर सोलापूरच्या तीनही दिशांना विकसित होत असलेल्या औद्योगिक वसाहतींमधून अनेक अभिमानास्पद गोष्टी घडताहेत. उद्योजक व श्रमिक आपापल्या कर्तृत्वामधून अनेक नवीन क्षेत्र

विकसित करीत आहेत. विशेष म्हणजे कोणत्याही प्रकारची शास्त्रीय तंत्रज्ञानाविषयक सुविधा नसताना, आपले अनुभव व कष्टाच्या बळावर नवनवीन उत्पादने करण्याची इथल्या श्रमिकांची व उद्योजकांची परंपरा आहे. तिला उजाळा मिळायला हवा. प्रामुख्याने ही प्रकाशाची बेटं जनतेसमोर आणायला हवीत. ह्या भूमिकेतून सोलापुरातील विविध उद्योगांतून घडणाऱ्या विधायक, उल्लेखनीय तसेच इतरांना मार्गदर्शक ठरणाऱ्या उद्यमशील गोष्टींवर भर देण्याचा प्रयत्न राहणार आहे.

अर्थात् राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील औद्योगिक व्यवस्थापकीय विषयांवरील चर्चा होईलच. प्राधान्यक्रमाने सोलापूर औद्योगिक आघाडीवरील विशेष घटनांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न राहणार आहे. त्यासाठी उद्योजक, व्यापारी व श्रमिक कष्टकऱ्यांच्या नेतृत्वाकडून अशा उल्लेखनीय गोष्टींविषयी आग्रह राहिला पाहिजे. औद्योगिक विकासासाठी आवश्यक सोयीसुविधांविषयीचे अभ्यासपूर्ण विवेचन शासन वा तत्सम संस्थांसमोर प्रतिनिधीक स्वरुपात मांडण्यासाठी हे व्यासपीठ बनावे, अशी आमची इच्छा आहे. इथला कामगार गैरहजेरी व व्यसनाधीनता तसेच अनुत्पादकतेसाठी जसा हेतुपुरस्सरपणे बदनाम केला गेला, त्यावरील कलंक पुसण्यासाठी आम्हीच पुढे आले पाहिजे. आमच्या श्रमिकांची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करणारे प्रबोधनही करायला हवे. औद्योगिक व्यवस्थापनातील दोष दाखवित असताना, उल्लेखनीय तंत्रकौशल्याचा वापरही जनतेसमोर आणायला हवा.

एकंदरीत सोलापुरातील औद्योगिक क्षेत्रामध्ये घडणाऱ्या विशेष मार्गदर्शक प्रोत्साहनपर घटनांचा आढावा सातत्याने ह्या व्यासपीठावरून घेण्याचा मानस असून हे कार्य पूर्ण करण्यासाठी इथल्या अभ्यासू, तज्ञ, उद्योजक तसेच श्रमिक नेतृत्वांनी सहकार्याचा हात पुढे केला पाहिजे. परस्परऔद्योगिक व्यासपीठ बनेल ह्यावर आमचा विश्वास आहे. ह्या टप्प्यावर मागे वळून पाहताना नव्या विधायक भूमिकेतून इथल्या उद्योगाचे सकारात्मक चित्रण करून आपली प्रतिमा उजळण्याचा संकल्प करू या !

दै. लोकमत – ८.५.१९९८

## लोकप्रतिनिधींच्या दहशतीविरुद्ध उद्योजकांमध्ये संतप्त प्रतिक्रिया

मंगळवेढ्याचे आमदार लक्ष्मणराव ढोबळे यांनी ६० ते ७० ग्रामस्थ कार्यकर्त्यांच्या जमावासह चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील स्मृती ऑरगॅनिक्स या औषधी निर्मितीच्या कारखान्यामध्ये घुसून कंपनीचे संचालक ई. निरंजनराव यांना कंपनीचे दूषित पाणी शेजारील शेतजमिनीत जात असल्याने शेतकऱ्याचे नुकसान होत असल्याचे कारण दाखवून, मारहाण केल्याची घटना शनिवार, दि. ५ डिसेंबर रोजी घडली. त्याआधी त्याच परिसरातील श्री हॅण्ड प्रोसेस या फॅक्टरीत आमदारांनी असाच जमाव घेवून, मालकांच्या गैरहजेरीमध्ये, कंपनीतील वीजपुरवठा करणाऱ्या बोर्डामधून फ्युज व कटआऊट काढून नेल्यामुळे तेथील उत्पादन २४ तास खंडित झाले. लोकप्रतिनिधीने कायदा हातात घेवून अशा प्रकारे दहशतीचे वातवरण निर्माण केल्याने चिंचोळी औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांकडून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

सोलापुरातील उद्योग एकामागून एक बंद पडत आहेत. यंत्रमागावर मंदीचे सावट पसरले आहे. नवीन उद्योग येत नाहीत. इथल्या कामगार व उद्यमशीलतेविषयी बाहेरील उद्योजकांमध्ये प्रचंड गैरसमजुती असल्याने नजिकच्या काळात आहे त्या उद्योगांचे स्थलांतर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. एकूणच औद्योगिक विकासाच्या दृष्टीने निराशाजनक वातावरण असताना ही घटना घडली. त्यातून लोकप्रतिनिधींकडून उद्योजकांना अशा प्रकारची वाईट वागणूक मिळाल्याने समस्त उद्योजकांमध्ये याविरुद्ध संघटितरित्या प्रत्त्युत्तर कसे देता येईल याविषयी चर्चा होत आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांची बैठक

चिंचोली औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांच्या दूषित पाण्याविषयी व अन्य प्रश्नांविषयी उपापयोजना करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी १६ नोव्हेंबर रोजी बैठक बोलविली होती. त्यावेळी आमदार ढोबळे व ग्रामस्थांसह उद्योजक उपस्थित होते. ह्या बैठकीमध्येदेखील आमदार महोदयांनी उद्योजकांबद्दल अशोभनीय वक्तव्य केल्याचे समजते. त्या बैठकीमध्येच जिल्हाधिकारी यांनी कारखान्यातील दूषित पाण्याचा प्रश्न प्रत्यक्ष तपासून योग्य ती कार्यवाही करण्याविषयीचे आदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिले होते त्याप्रमाणे अगदी उपरोक्त मारहाणीची घटना घडण्याच्या आदल्यादिवशी एम.आय.डी.सी. अधिकारी, शेतजमिनीचे मालकांसह प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी स्मृती ऑरगॅनिक्समध्ये जावून पाहणी केली. त्यावेळी कारखान्यातील दूषित पाणी शेतजमिनीत जात नसल्याची खात्री करून घेतली. पावसाचे पाणी देखील योग्य पद्धतीने कंपनीच्याच आवारात राहील अशा पद्धतीची उपाययोजना एक महिन्याच्या मुदतीत करण्याविषयी कंपनीला आदेशही दिले होते. त्याप्रमाणे कंपनीकडून कार्यवाही चालू असतानास दुसरेच दिवशी अशा प्रकारची दुर्दैवी घटना घडली. लोकप्रतिनिधी या नात्याने आमदारांनी उद्योजकांना उपाय करण्याची संधीही न देता, संचालकांना ६० ते ७० लोकांच्या जमावासमोर मारहाण करावी यातून सर्वसामान्य जनता व परिसरातील ग्रामस्थांनी काय आदर्श घ्यावा ! ह्याचे परिणामी चिंचोळी औद्योगिक वसाहतीमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण होऊन आहे ते उद्योग बंद पडू लागले तर त्याला जबाबदार कोण? उद्योजकांच्या व औद्योगिक विकासासाठी सतत प्रयत्नशील राहणारे नेते शरद पवार यांच्या खंदे समर्थक समजल्या जाणाऱ्या आपल्या वक्तृत्वशैलीतून विधानसभा गाजवणाऱ्या आमदार ढोबळेंकडून हे अपेक्षित नव्हते अशी उद्योजकांची प्रतिक्रिया आहे.

## कंपनीच्या संचालकांचे मत

स्मृती ऑरगॅनिक्समधून दूषित पाणी गेल्याने खरोखरीच शेतजमिनींची नुकसानी होत आहे. काय या विषयी विचारणा केली असता संचालक ई-निरंजराव यांनी सांगितले की, आमच्या कारखान्यातील प्रक्रियाद्वारे दूषित

होणारे पाणी शुद्ध करण्यासाठी स्वतंत्र अद्ययावत एफ्लुएंट ट्रीटमेंट प्लँट जमिनीच्यावर सिमेंट काँक्रीटने बांधलेले असून संपूर्ण पाणी तेथे शुद्ध केले जाते. त्यातील एक थेंबही बाहेर जात नाही. तसे असते तर आमच्या कारखान्यामध्ये फळे, फुले इ. ची ४०० झाडे फुलली नसती. एम.आय.डी.सी.च्या शेवटी असल्याने व तो भाग उतारावर असल्याने पावसाचे पाणी वाहून जाते. पावसाच्या पाण्याचा उपद्रव आम्हालाही होतो. आमच्या कारखान्यातील दूषित पाणी शेतजमिनीमध्ये जात नाही. ही गोष्ट ऐकूनही न घेता, शिवीगाळी करून मला मारहाण केली हे अशोभनीय आहे. चिंचोळी औद्योगिक वसाहतींमध्ये पावसाचे पाणी जाण्यासाठी देखील ड्रेनेज नाहीत. कायदेशीर तरतूद असूनही कॉमन एफ्लुएंट ट्रीटमेंट प्लँट नाही असे उद्योगांचे देखील महत्त्वाचे प्रश्न आहेत. वास्तविक लोकप्रतिनिधी या नात्याने, उद्योजकांचे प्रश्न सोडविण्याची त्यांची जबाबदारी असून त्यासाठी आमच्याशी, आमच्या असोसिएशनची चर्चा करून ग्रामस्थांच्या सहकार्याने सामोपचाराने सोडवायला हवेत. त्याऐवजी एकांगी पद्धतीने उद्योजक म्हणजे कोणीतरी भयंकर शत्रू असल्याच्या अविर्भावात चप्पल दाखविणे, शिवीगाळ करणे, मारहाण करणे हे निषेधार्ह आहे. अशी भावना त्यांची व्यक्त केली.

**याची गंभीर दखल घ्यावी**

या संपूर्ण घटनाक्रमांवरुन, एक गोष्ट स्पष्ट आहे की, उद्योगांतून दूषित पाणी शेजारील शेतजमिनींमध्ये गेल्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांचे नुकसान होऊ नये म्हणून आक्रस्ताळी भूमिकेतून वागणारे लोकप्रतिनिधी, उद्योग विकासासाठी देखील बांधील आहेत हे विसरून चालणार नाही. उद्योजकांचेही ते प्रतिनिधी म्हणूनच वागायला हवेत तरच औद्योगिक शांतता राहील, उद्योग विकसित होतील, जागतिकीकरणाच्या व उदारीकरणाच्या पार्श्वभूमीवर औद्योगिक विकासाशिवाय पर्याय नाही. त्यातून रोजगार उपलब्ध होऊन परिसरातील असंख्य कुटुंबाचे पालनपोषण होते. किंबहुना रोजगारवृद्धितून सामाजिक विकास हीच खरी भूमिका असली पाहिजे.

त्याउलट औद्योगिक विकासाला खीळ घालणाऱ्या घटना घडत असतील तर सोलापूरच्या विकासाची भूमिका असणाऱ्या समस्त सुजाण

नागरिकांनी त्याची गंभीर दखल घ्यायला हवी. जागतिक बाजारपेठेतील जीवघेणी स्पर्धा, आर्थिक मंदी यामुळे आधीच त्रस्त असलेल्या उद्योगांना अशा दहशतीला सामोरे जावे लागले तर त्यांचे भवितव्य काय? याचा विचार केवळ उद्योजकांनी करून चालणार नाही तर जनसामान्यांनीही करण्याची वेळ आलेली आहे. असे प्रकार जर थांबले नाहीत, उद्योजक व त्यावर अवलंबून राहणाऱ्या श्रमजीवी कुटुंबाना संरक्षण मिळाले नाही तर ते आत्मघातकी ठरेल. जुन्या गिरणीचा इतिहास, लक्ष्मी-विष्णुची क्रूर हत्या, वेस्ट कॉटनच्या गिरण्यांची पडझड, यंत्रमाग, हातमाग व्यवसायातील दूषित वातावरण, नरसिंग गिरजीची सद्यःस्थिती, शहराच्या तीनही दिशांवरील औद्योगिक वसाहतीतील उद्योगांची निराशाजनक परिस्थिती यावरून आपण व आपल्या लोकप्रतिनिधींनी काहीच बोध घ्यावयाचा नाही असे ठरविले तर मग सोलापूरकरांचे रक्षण कोण करणार? हा खरा प्रश्न आहे.

दै. लोकमत - ६/५/१९९७

## वस्त्रोद्योगाचे प्रमुख केंद्र आणि कोट्यवधीची निर्यात...

सात वाजता सकाळी । भोंगा वाजवी भुपाळी ।
सुरू पहिली पाळी । मोठ्या डौलात ।
चाक फिरे गरागरा । सूत निघे भराभरा ।
नटवाया वसुंधरा । आमच्या घामातून ।

कविवर्य नारायण सुर्वे यांची ही 'गिरणीची लावणी' आमच्या सोलापूर बाबतीतही सार्थ ठरते. अगदी एकविसाव्या शतकाच्या मध्यापासून इथे वस्त्रोद्योगाची उज्ज्वल परंपरा आहे. १८७६ साली अशिया खंडातील सर्वात मोठी कापड गिरणी जुनी गिरणी म्हणजेच दि सोलापूर स्पिनिंग विव्हिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि., सोलापुरात सुरू करण्यात आली. साधारणपणे १८५० ते १८६० या दशकामध्ये आंध्रातील भयंकर दुष्काळामुळे आणि रझाकराच्या दशहतीमुळे उदरनिर्वाहासाठी स्थलांतरित झालेल्या तेलुगु भाषिक विणकर समाजाने इथे पारंपरिक पद्धतीचा हातमाग व्यवसाय सुरू केला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच घरगुती हातमागाबरोबरच जुनी गिरणी, लक्ष्मी-विष्णु, नरसिंग गिरजी व जाम यासारखे वस्त्रोद्योग तसेच बार्शी सारख्या ठिकाणी जयशंकर, लोकमान्य ह्या सूतगिरण्या अस्तित्वात होत्या. जिल्ह्यातील १०-१२ ठिकाणी हातमागावर पारंपरिक कापडाचे उत्पादन व्हायचे त्यामुळे तेव्हापासूनच मुंबई, अहमदाबादच्या खालोखाल सोलापूर हे वस्त्रोद्योगाचे प्रमुख केंद्र गणले जात असे.

तेलुगु भाषिक विणकरांच्या उपजत हस्तकौशल्य, कष्ट करण्याची तयारी व सचोटीने कुटुंबातील लहान मुले, महिला व पुरुष सर्वाच्या सामूहिक श्रमावर आधारलेला हातमागाचा घरगुती व्यवसाय हळूहळू वाढला. सुरुवातीला ग्रामीण महिलांच्या गरजेनुसार जाड्या भरड्या साड्यांचे उत्पादन व्हायचे. पुढे

शहरी तसेच देशातील अन्य राज्यातून मनमोहक हातमाग साड्यांची मागणी वाढू लागली. त्यामुळे इरकल पद्धतीच्या, कोंडी त्रिकसाडी, फरासपेटी अशा विविध १९ जातींच्या साड्यांचे सोलापुरात उत्पादन होवू लागले. भरपूर मागणीमुळे हातमाग व्यवसाय स्थिरावू लागला परंतु त्यांना भांडवलासाठी स्थानिक सावकरांवर अवलंबून रहावे लागत असे. साहजिकच कामगार तसेच छोटेखानी हातमाग व्यावसायिकांचे आर्थिक शोषण वाढले.

**सहकारी पर्व सुरू आहे**

त्याच सुमारास देशभर सहकाराचे वारे वहायला सुरुवात झालेली होती. १९०४ च्या सहकारी कायद्यानंतर महाराष्ट्रामध्ये तत्कालीन मुंबई राज्याने पुढाकार घेवून १९२५ साली स्वतंत्र सहकारी कायदा केला त्यामुळे सहकारी चळवळीचे नवे पर्व सुरू झाले. साहजिकच इथल्या विणकरांना सावकारी पाशातून वाचविण्यासाठी सहकारी सोसायट्यांचा जन्म झाला. उद्योगासाठी भांडवल पुरवठा. योग्य भावात कच्च्या मालाचा पुरवठा व पक्क्या मालाचे विक्री केंद्र अशा तिहेरी फायद्यासाठी सहकारी सोसायट्या सहाय्यभूत ठरू लागल्या. सबसिडी, रिबेट इ. गोष्टी हळूहळू येऊ लागल्या. खादी ग्रामोद्योगाचे राष्ट्रीय धोरण पोषक ठरले. अर्थात स्वातंत्र्योत्तर काळात स्वकीयांच्या भक्कम पाठबळांमुळे सहकारी क्षेत्र वाढले. कापड उत्पादन करणाऱ्या विणकरांना मागणी वाढल्यामुळे सुताचा पुरवठा कमी पडू लागला त्यामुळे विणकरांच्या सहकारी सोसायट्या वाढल्या त्यातून १९४९ साली सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेची स्थापना झाली आणि आर्थिक स्वावलंबित्व निर्माण झाले.

सहकाराच्या माध्यमातून विणकर मार्ग संघटित होवू लागला. हातमाग कापडापर प्रक्रिया करण्यासाठी १९६२ साली सोलापूर जिल्हा विणकर सहकारी फेडरेशनची निर्मिती झाली. पुढे हातमाग विणकरांना स्वस्त दरात नियमितपणे सूतपुरवठा करण्यासाठी सहकारी तत्वावर १९६४ साली सोलापूर सहकारी सूत गिरणी व १९६७ मध्ये यशवंत सहकारी सूतगिरणी उदयाला आल्या. अशा एका पाठोपाठ अनेक सहकारी संस्था, उद्योग यांचे जाळे निर्माण झाले. बँका, सहकारी सोसायट्या, सूतगिरण्या इ.मुळे सरकारी अनुदान, रिबेटसारख्या गोष्टींची आवक वाढली. साहजिकच सहकारी क्षेत्रातील अपप्रवृत्तीची लागण इथेही व्हायला सुरूवात झाली. कष्टकरी विणकर ऐदी बनला. कष्टाने पैसे करण्याऐवजी

सरकारकडून 'इजीमनी' मिळविण्याकडे त्यांचा कल वाढला. नफ्याचा वापर करून उद्योग विकसित कमविण्याऐवजी अनुत्पादक खर्चाकडे झुकला त्यामुळे केवळ सरकारी रिबेटपुरतेच हळूहळू हातमागाचे अस्तित्व उरले.

**यंत्रमागाची सुरूवात**

दरम्यानच्या काळात एक चांगली गोष्ट घडली म्हणजे हातमाग व सहकारी सोसाट्यांच्या फायद्यातून बनलेल्या नवश्रीमंत वर्गापैकी काहीनी यंत्रमाग सुरू केले. १९६४ साली जुनी गिरणी बंद पडली. त्यातील जुने यंत्रमाग विकत घेऊन बहुतेकजण हातमागापासून परावृत्त होवून यंत्रमागाकडे वळले. प्लेन कापड, बेडशीटस् याबरोबरीने जेकॉर्ड चादरीचे उत्पादन सोलापूरच्या हवामानामध्ये उत्तम प्रकारे होऊ शकते हे लक्षात येताच मोठ्या प्रमाणात यंत्रमागाची संख्य वाढली. जेकॉर्ड चादरीने सोलापूरचे नाव केवळ भारतातच नव्हे तर जागतिक नकाशावर नेले. मनमोहक डिझाईन्स, उत्कृष्ट रंगसंगती, टिकाऊ तसेच बहुविध उपयोगी अशी चादर देशविदेशात पोचली. जाड्या भरड्या सूताची मागणी म्हणून १९६० ते १९८० सोलापुरमध्ये ८ वेस्ट कॉटनच्या निर्माण झाल्या. त्याच सुमारास १९५९ मध्ये अक्कलकोट विकास महामंडळाची म्हणजे शहरातल्या पहिल्या विकसित औद्योगिक वसाहतीची निर्मिती झाली. त्यामध्ये २०० हून अधिक चादरीचे कारखाने, औषधी, फाऊंड्रीज, द्राक्ष मद्यार्क, वेस्ट कॉटन गिरण्या इ. लघुउद्योग सुरू झाले तर शहराच्या दुसऱ्या बाजूस म्हणजे होटगी रस्त्यावर १९६१ मध्ये सहकारी तत्वावर इंडस्ट्रीयल इस्टेट उभी राहिली. १८९ प्लॉटमधून मुख्यत्वे इंजिनिअरिंग, प्लॅस्टिक, केमिकल, इलेक्ट्रिकल वस्त्रोद्योगापेक्षा वेगळ्या प्रकारच्या उत्पादनाला सुरूवात झाली. सुप्रसिद्ध किर्लोस्कर उद्योग समूहांची शिवाजी वर्क्स लि. म्हणजेच शिवशाही हा गिरणगावचा आणखीन एक मानबिंदू समजला जातो. हा कारखाना त्याच रस्त्यावर असल्याने, त्यावर आधारित छोट्या छोटे फाऊंड्रीजही सुरू झाल्या. १९७० पर्यंत हे दोन्हीही औद्योगिक वसाहती, सहकारी सूतगिरण्या, इतर वस्त्रोद्योग उभे होते. एक लाखापर्यंत श्रमजीवींना रोजगार मिळायचा, कष्टकऱ्यांचे गिरणगाव म्हणून ओळखले जाणाऱ्या या शहरांचे राज्यातील औद्योगिक स्थान चौथ्या क्रमांकावर होते.

**घरगुती विडी उद्योग**

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच इथे घरगुती स्वरूपाचा विडी उद्योग होता.

आंध्र, गुजराथ व मध्य प्रदेशातून विडीसाठी लागणारी तेंदूची पाने व तंबाखू इकडे आणणे सोयीचे वाटल्याने विडी कारखानदारी वाढू लागली. सोलापूर हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने व कमी पैशात इथल्या विणकरांच्या बायका मुलांकडून विड्या वळून घेणे सोयीचे वाटल्याने हा उद्योग वाढला. घरोघरी विड्या वळणे सुरू झाले. १९८५ अखेरीस सोलापूर शहरामधून ३०,००० हून अधिक लोकांना विड्या वळण्याचा रोजगार मिळू लागला. प्रत्यक्ष कारखान्यात न जाता घरगुती पद्धतीने आपापल्या घरी महिलांना लहान मुलांच्या सहाय्याने हे करणे शक्य होऊ लागले. त्यामुळे घरातली सगळी मंडळी राबू लागली. उदरनिर्वाहास सर्वांचा हातभार लागू लागला. कुटुंबातील पुरुष व मुले यंत्रमाग अथवा वस्त्रोद्योगातून तर महिला व मुली विडी उद्योगातून राबू लागली.

### टॉवेल्सची निर्यात

एव्हाना हातमाग जवळजवळ नाहीसे झालेले होते. यंत्रमागांनी जेकॉर्ड चादरीच्या उत्पादनांतून बऱ्यापैकी नफा केला. यंत्रमागांचीही संख्या वाढली. १९६५-६६ दरम्यान सोलापुरातील यंत्रमागांची संख्या अंदाजे १२,००० इतकी होती तर दोन दशकामध्ये म्हणजे १९८५ च्या सुमारास ती दुप्पट झाली. बॉम्बे डाईंग, मफतलाल, कॅलिको यासारख्या सुप्रसिद्ध वस्त्रोद्योगांशी स्पर्धा होऊ लागल्याने इथल्या बेडशीटस्, चादरींबरोबरच टॉवेल्सचे उत्पादन वाढले. हातमागापासून यंत्रमागाचा प्रवास फारसा सुखदायक नव्हता. पुढे मात्र टॉवेल्सची मागणी वाढल्याने शहरातील २५००० यंत्रमागापैकी ७० टक्के यंत्रमागावर टॉवेल्सचे उत्पादन होवू लागले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून टॉवेल्सची मागणी होऊ लागली त्यामुळे मागील दशकात वर्षाकाठी २०० कोटींहून अधिक रुपयांची निर्यात व्हायची. दरम्यानच्या काळात रशियाचा पाडाव आणि एकंदरीत जागतिक अर्थकारणातील बदलामुळे निर्यात घटली. एकूणच वस्त्रोद्योग जागतिक मंदीच्या फेऱ्यात अडकल्यामुळे गेल्या दशकांमध्ये गिरणगाव, बंद पडलेल्या गिरण्यांचे शहर बनलंय.

### नवी दिशा देणारी चिंचोळी एम.आय.डी.सी.

१९९२ च्या सुमारास उद्यमशील सोलापूरला नवीन औद्योगिक दिशा देण्याचा प्रयत्न झाला. शहरापासून १६ कि.मी. अंतरावर राष्ट्रीय महमार्गावरील

चिंचोळी परिसरात १०२२ हेक्टर जमिनीवर अत्यंत अद्ययावत सोयीसुविधांसह नवी औद्योगिक वसाहत निर्माण झाली. त्यामध्ये ६०० उद्योगांची सोय करण्यात आली त्यामध्ये सिमको स्पिनर्ससारख्या पूर्णपणे निर्याताभिमुख सूतगिरणींसह अनेक नवनवीन उद्योग आले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी गुणवत्ताप्रधान 'आयएसओ' प्रमाणपत्रप्राप्त उद्योग त्या ठिकाणी कार्यरत आहेत. एकीकडे वस्त्रोद्योगांची वाताहत होत असलेल्या उद्यमशील गिरणगावाला ही एक पर्वणीच म्हणावी लागेल.

## शहराच्या तीन दिशांना वसाहती

गिरणगाव समजल्या जाणाऱ्या या शहराच्या तीनही दिशाना औद्योगिक वसाहती उभ्या राहिल्या. अक्कलकोट रोडवरील औद्योगिक वसाहत अक्षरशः गजबजून गेली आहे. धनमान, प्रेसिकास्ट, प्रिसिजन कॅमशाफ्ट. स्मृती ऑरगॅनिक्ससारखे आदर्श उद्योग या वसाहतीत आहेत. प्रिसिजनमध्ये गुणवत्ता वाढीसाठी जे प्रयत्न झाले ते पाहून जपानी तंत्रज्ञान प्रभावित झाले. चिंचोळी एम.आय.डी.सी.मध्ये वामसी लॅब्समध्ये मूलभूत औषधी, तसेच चंद्रवर्धनसारख्या औषधी उद्योगांनी सोलापुरातही वस्त्रोत्पादनाबरोबरच अन्य निर्याताभिमुख उत्पादन करता येते हे सिद्ध केले आहे. वेंकीज हॅचरीज, नवकॉम ऑईल मिलमधून गोल्ड अमृतचा, कसन शेंगा व सूर्यफूल तेल, सुत्रावे इंजिनिअरिंगतर्फे आय.एस.आय. मार्कचे कोयना शिलाई यंत्र, पास्कल व्हॅक्युम, धर्मावेअर प्रा.लि. तर्फे स्टील थर्मास प्लास्क अशा विविध वस्तूंचे दर्जेदार उत्पादन होत आहे. होटगी रस्त्यावरील इंडस्ट्रीयल इस्टेटमधील फाऊंड्रीजनी विशेषतः चेतन फाऊंड्रीने आपल्या उत्पादनातून राष्ट्रीय बाजारपेठ काबीज केली. इलेक्ट्रीकल मोटारींच्या धंद्यात निर्यातीला पुरेसा वाव नसतानाही लक्ष्मी उद्योग समूहाने सर्व अडचणींवर मात करून निर्यातीची नवनवी क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत. त्यामुळे वस्त्रोद्योगाची वाताहत झाल्याने गिरणगावाला बसलेला धक्का काही प्रमाणात कमी करण्यामध्ये त्याचा हातभार लागतो. गेल्या शतकामध्ये एकांगी प्रकारची वस्त्रोद्योगाशी निगडीत औद्योगिक वाढ, त्यातील चढउतार, ही जशी चिकित्सेची बाब आहे. तशीच इतर क्षेत्रातील उत्पादक प्रयत्न ही जमेची बाजू आहे हे मान्य करावे लागेल.

दै. लोकमत – २०/१२/१९९९

# सोलापूरचे औद्योगिक गतवैभव परत मिळविण्याचा संकल्प करू या !

नव्या सहस्त्रकाची पहिली रम्य पहाट नवचेतना देणारी ठरली. नव्या आशांना पालवी फुटली, नवे संकल्प निश्चित झाले. साऱ्यांनीच मरगळ झटकून नवोन्मेषांनी पुन:श्च कामाला लागण्यासाठी उत्साहवर्धक असं वातावरण होतं. तेज:पुंज सूर्यकिरणं जेंव्हा सोलापूरच्या उद्यमनगरीवर पडली, तेव्हा ही श्रमनगरीदेखील अंगांगानी पुलकीत झाली. परंतु इथलं वातावरण तेवढं आशादायी नव्हतं. एकूण उद्योगांपैकी चालू स्थितीत कमी तर बंद गिरण्यांचीच संख्या अधिक. रोजगारच उपलब्ध नसल्याने श्रमजिवी बेकार. विवंचनेच्या गर्तेतली ही कष्टकरी कुटूंबं, ओशाळलेल्या नजरा, भविष्याची चिंता वाहणारे निराश चेहरे त्यांची सोबत करीत होती. बंद सूत गिरण्या व असंख्य लघुउद्योग ह्या शतकातली पहिली पहाट आम्ही अशी अनुभवली.

विसाव्या शतकातली वैभवशाली औद्योगिक परंपरा असणारं हे गिरणगाव. जुन्या गिरणीच्या बदामी कोटींग कापड व चादरीने हे शतक गाजवलं तर पुढे इथल्या यंत्रमागांनी सुबक कलात्मक रंगीबेरंगी टॉवेल्समुळे जगभर निर्यात केली. लक्ष्मी–विष्णूच्या साड्या, हातमागांवरील विविध प्रकारच्या साड्या, बेडशीटस्, तलम कपड्यांची सोलापूरचे नाव औद्योगिक नकाशावर उंचावण्याची कामगिरी केली. उद्योगांबरोबरच इथल्या कामगारांनी मार्शल लॉचा इतिहास घडविला. ब्रिटिश काळापासून कामगार चळवळ जिवंत ठेवणारं हे हुतात्म्यांचं शहर शतकाच्या अखेरीस मात्र मरणासन्न अवस्थेत गेलं. एका पाठोपाठ उद्योग बंद पडले. निम्म्याहून अधिक लोकसंख्या श्रमजिवींची असल्यानं संपूर्ण गिरणगावी अर्थव्यवस्था कोलमडू लागली.

## ''उद्योग'' बंद पडलेल्या वसाहती

सुदैवाने शहराच्या तिन्ही बाजूस औद्योगिक वसाहती वसलेल्या आहेत. मुख्यत्वे वस्त्रोद्योगासाठी परिचित असूनदेखील अलीकडच्या काळात औषधी, इंजिनिअरिंग, ऑईलसारखे अन्य प्रकारचे उद्योगही स्थिरावले. त्यातून रोजगाराची संधी निर्माण झाली. परंतु जागतिकीकरणाचा प्रभाव, विशेषत: आर्थिक उदारीकरणाच्या धोरणामुळे इथला उद्योग रसातळाला गेला. कष्टकरी वर्ग विस्थापित होवू लागला. त्यामुळे एकंदरीत नव्या शतकाच्या सुरुवातीला औद्योगिक आघाडीवर चिंताजनक अशीच परिस्थिती अनुभवायला मिळते. सोलापूरची शान समजली जाणारी 'लक्ष्मी-विष्णू' बंद पडली. शिवाजी वर्क्स लिमिटेड म्हणजे 'शिवशाही' बंद पडून नव्या रुपात निम्म्या संख्येवर उभी राहिली. जवळजवळ ८ वेस्टकॉटन गिरण्या बंद पडल्या. शेकडो हातमाग बंद पडले. यंत्रमागांपैकी निम्म्याहून अधिक बंद अवस्थेत आहेत. दोन सहकारी सूत गिरण्या चार महिन्यांपासून बंद आहेत. अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी., होटगी रस्त्यावरील इंडस्ट्रीयल इस्टेट, तसेच चिंचोली परिसरातील एम.आय.डी.सी. मधील निम्म्याहून अधिक उद्योग पूर्णपणे बंद आहेत किंवा आजारी आहेत. त्यामुळे इथला उद्योग जवळजवळ संपत आलेला आहे, असे गंभीर चित्र दिसते.

## खरे प्रश्न असे आहेत

या पार्श्वभूमीवर गिरणगावचे गतवैभव परत मिळविण्याचा संकल्प आम्ही सोलापूरकर शतकाच्या आरंभी करणार आहोत की नाही? हा प्रश्न आहे. हा संकल्प करण्यामध्ये इथल्या लोकप्रतिनिधींचा नुसता सहभाग नको, तर पुढाकार असणार आहे काय? उद्योग संघटना व कामगार संघटना परस्परविरोधी भूमिका घेऊन उभारल्यामुळे एकूण शहराचा औद्योगिक विकास थंडावतो. याकडे दोघेही लक्ष देणार आहेत काय? कामगार संघटनांमधील अंतर्गत बंडाळी शमवून निकोप कामगार तसेच औद्योगिक हितासाठी संघटित प्रयत्न होणार आहेत काय? मुख्य म्हणजे सोलापूरचा कामगार आळशी, कामचुकार, अल्पसंतोषी, गैरहजर राहणारा, लो-प्रोफाईल पद्धतीचा असल्याने नवीन उद्योजक इकडे गुंतवणूक करू धजत नाहीत. ही वदंता खोटी ठरविण्यासाठी जबाबदारी आपण स्वीकारणार आहोत काय? असल्यास त्या दिशेने कोणते प्रयत्न करणार आहोत? त्याविषयीचा

कृतीकार्यक्रम तयार आहे काय? त्यामध्ये कामगारांसह तमाम लोकसहभाग कसा मिळविणार आहोत? यासारखे औद्योगिक विकासाविषयीचे असंख्य प्रश्न आपणाला उत्तरीत करावे लागणार आहेत. खरंतर नव्या शतकाची हीच हाक आहे.

### लोप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा

सोलापूर शहराचे औद्योगिक गतवैभव परत मिळविण्यासाठी लोकप्रतिनिधींनी आपले पक्षीय मतभेद व वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून केवळ शहरासाठी, इथल्या उद्योगांना सक्षम करण्यासाठी एकत्रित आले पाहिजे, तर सोलापूरकर निश्चितपणे त्यांच्या पाठिशी उभे राहतील. राजकीय शक्तीप्रदर्शन असे अधिकार मिळविण्यासाठी करायला हवे. सरकार दरबारी आपली पत वापरावी. प्रशासनावर प्रभाव ठेवून उद्योजकांच्या अडचणी सोडवाव्यात, तरच येत्या शतकामध्ये सोलापूर शहर औद्योगिक नकाशावर आपले स्थान निर्माण करू शकेल. सोलापूरच्या तुलनेने नवोदयी अहमदनगर, औरंगाबाद, सांगली, कोल्हापूर, नाशिक सारख्या शहरांची भरभराट होण्यामध्ये तेथील राज्यकर्त्यांचे, लोकप्रतिनिधींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. सोलापूरचे इंजिनिअरिंग कॉलेज कराडला ऐनवेळी नेण्याचा विक्रम आजही सोलापूरकरांच्या मनात सलतोय. औद्योगिक वसाहतींना मिळणाऱ्या सुविधा, निधी व एकंदरीत राजाश्रय तुलनेने सोलापूरला कमी मिळण्याची अनेक उदाहरणे सांगता येतील. मुंबई, हैद्राबादच्या राष्ट्रीय महामार्गावर वसलेल्या अतिशय पोषक वातावरण असणाऱ्या सोलापूर शहराला निर्यात केंद्राच्या यादीतून वगळले. सोलापुरात निर्यातगृहास मोठी बाजारपेठ टॉवेल्स, नॅपकिन, शेतीमाल, फाऊंड्रीचे उत्पादन, औषधी इ. मुळे सहजपणे मिळू शकेल असे असताना आम्हाला का वगळावे?

चिंचोळी एमआयडीसी परिसरामध्ये 'इन्फोटेक' म्हणजे इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे पार्क सुरू करण्यासाठी सर्व बाबी तयार आहेत. उद्योजकांनी पुढाकार घेवून त्याचा पाठपुरावाही केला आहे. तथापि, इथल्या राज्यकर्त्यांचा, लोकप्रतिनिधींचा पुरेसा रेटा नसल्याने हे पार्क उद्घाटनाच्या मुहूर्तासाठी रखडले आहे. अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसराचा 'इंडस्ट्रीयल टाऊनशिप' योजनेत समावेश करण्याची मागणी उद्योजकांनी केली. परंतु त्याची कार्यवाही नाही. होटगी रस्त्यावरील औद्योगिक सह. वसाहतीच्या भाडेपट्ट्याची मुदत संपली

आहे. आता आता तेथील भूखंड संबंधित कारखानदाराच्या भाडेपट्ट्याची न देता मालकी तत्त्वावर देण्याची मागणी उद्योजकांनी केली. तरीही त्यांना भरमसाठ किमती लावून नोटिसा पाठविल्या. उद्योजक आता कोर्टाची लढाई लढत आहेत. याशिवाय तिन्ही औद्योगिक वसाहतींमध्ये रस्ते, वीज, पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, वाहतुकीची साधने यांसारख्या मुलभूत गरजादेखील कर व इतर निधी देवूनसुद्धा उद्योजकांना मिळत नाहीत. यावर दुर्दैवाने असेही प्रकरण झाले की, तिन्ही औद्योगिक वसाहतींना विविध कामे करण्यासाठी तरतूद केलेले पन्नास लाख रुपये महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी अन्य कामासाठी वर्ग केले. यंत्रमाग विक्रीकरातून सुटका करण्यासाठी सर्वच लोकप्रतिनिधींना बरोबर घेवून प्रयत्नशील राहिला. तरीही प्रश्न अधांतरी ठेवावा. भिवंडीला वीज दरात सूट मिळते. इचलकरंजीला सूतासाठी सवलती मिळतात. आम्हाला सापत्नभाव कशासाठी? असा प्रश्न विचारण्याची धमक लोकप्रतिनिधींनी दाखवायला हवी. दुर्दैवाने तसे घडत नाही. शिष्टमंडळे, निवेदने, मोर्चे घडतात. पक्षीय पातळीवर नेते मंडळींना साकडे घालून आता हे प्रश्न सुटणार नाहीत, तर प्रत्यक्ष लोकप्रितिनिधींच्या नेतृत्वाखाली कृती कार्यक्रम आखून कार्यवाही होण्याची गरज आहे.

**नव्या शतकासाठी संकल्प**

जागतिकीकरणामुळे नवीन विकासाची संधी सर्वांनाच उपलब्ध होणार आहे. इतर औद्योगिक शहरातील राज्यकर्ते व लोकप्रतिनिधी जशी उद्योगासाठी आग्रही भूमिका घेतात किंबहुना त्याहीपेक्षा अधिक आक्रमकतेने कंबर कसली पाहिजे. उदारीकरणाची दहा वर्षे गेली, त्याचा फायदा झाला नाही. येत्या काळात उद्योग, कामगार, लोकप्रतिनिधी व सोलापूरकर सर्वांनी मिळून ह्या खुल्या वातावरणाचा फायदा घेण्यासाठी प्रयत्नशील राहायला हवे. आभाळ खुलं आहे. त्यातले फायदे घेण्यासाठी आव्हानं पेलायला हवीत. ही आव्हानं प्रशासन, शासन, राज्य व केंद्रातील सरकारे, राजकीय पक्ष ह्या सर्व आघाड्यावर राहतील. म्हणूनच इथल्या उद्योजकांनी, श्रमिकांच्या सहभागातून, राज्यकर्ता लोकप्रतिनिधींच्या ठोस नेतृत्वाखाली आव्हानं स्वीकारण्याचा संकल्प केला पाहिजे, तरच नव्या शतकामध्ये सोलापूरचे औद्योगिक गतवैभव परत मिळविता येईल.

दै. लोकमत - ४/१/२००१

# वस्त्रोद्योगापुढील आव्हाने

उद्योजकाचा अर्थसंकल्प अशा शब्दांत उद्योजकांनी केंद्रीय अर्थसंकल्पाचे जोरदार स्वागत केले. अनेक करसुविधांबरोबरच औद्योगिक विकासासाठी आवश्यक सोयीसुविधा यावर भर असलेल्या या अर्थसंकल्पाने वस्त्रोद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी चांगल्या गोष्टी केल्या आहेत. येत्या वीस वर्षांमध्ये होत असलेली वस्त्रोद्योगाची पडझड रोखण्याची इच्छाशक्ती त्यात दिसते. आपल्या देशात शेतीखालोखाल रोजगार पुरविणारा व्यवसाय म्हणजे वस्त्रोद्योग. देशाच्या एकूण औद्योगिक उत्पादनापैकी १५ टक्के उत्पादन या क्षेत्रातून होते, तर एकूण निर्यातीपैकी ३० टक्के वस्त्रोद्योगाकडून निर्यात होते. जागतिकीकरण व उदारीकरणाच्या प्रक्रियेनंतर स्पर्धेमुळे हा व्यवसाय अडचणीत आला. एकीकडे स्वस्त दरातील आयात, तर दुसरीकडे मालाच्या दर्जामुळे बाजारपेठेत मागणी नाही, अशी दुहेरी कोंडी झाल्याने वस्त्रोद्योगाला आधुनिकीकरणाशिवाय पर्याय नाही. या भूमिकेतून नव्या अर्थसंकल्पामधून काही योग्य पाऊले उचलली गेली आहेत, असे म्हणावे लागेल.

## टेक्नॉलॉजी अपग्रेडेशन फंड

टेक्नॉलॉजी अपग्रेडेशन फंड (टीयूएफ) च्या माध्यमातून ५०,००० नवीन 'शटललेस' पद्धतीच्या आधुनिक यंत्रमागांची तरतूद आहे. तर इ.स. २००४ पर्यंत देशातील अडीच लाख प्लेन साच्यांना आधुनिकीकरणाद्वारे स्वयंचलित बनिवण्यात येणार आहे. त्यामुळे उत्पादनाबरोबरच गुणवत्ता वाढेल. जागतिक बाजारपेठेतील ग्राहकांच्या पसंतीस उतरणारे कलात्मक व आकर्षक उत्पादन करणे शक्य होईल. अर्थमंत्र्यांची ही संजीवनी देणारी योजना कार्यान्वित

होण्यासाठी अन्य प्रशासकीय, तसेच धोरणात्मक बदल होण्याची गरज आहे. कारण टीयूएफ ची योजना अस्तित्वात आल्यापासून उद्योजकांकडून फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. तीस सप्टेंबर २००० ला 'टीयूएफ'साठी असलेल्या २५००० कोटींपैकी २५८६ कोटी आधुनिकीकरणासाठी प्रत्यक्ष वापरण्यात आले. ७९० उद्योजकांनी ६५०० कोटींच्या प्रस्तावांनी मागणी केली. त्यापैकी ३७३५ कोटींच्या ५८८ प्रस्तावना मंजुरी मिळाली. त्यापैकी फक्त २५८६ कोटी वापरण्यात आले. चीनमध्ये दीड लाख 'शटललेस' पद्धतीचे यंत्रमाग असून, वस्त्रोद्योगांसाठी सुपरिचित भारताकडे अवघे १०,००० 'शटललेस' यंत्रमाग आहेत. शिवाय बांगलादेश, तैवान, सिंगापूरसारख्या छोट्या देशांमध्येही अत्याधुनिक यंत्रसामग्री असल्याने गुणवत्ताप्रधान उत्पादनांमध्ये त्यांच्याशी आपली स्पर्धा होऊ शकत नाही. त्यामुळे भारतीय उद्योजकांनी या जागतिक परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी आधुनिकीरणावर भर दिला पाहिजे.

### इंटेग्रेटेड ॲपरल पार्क्स

नव्या अर्थसंकल्पात 'इंटेग्रेटेड ॲपरल पार्कस्'ची योजना आखण्यात आली. ज्यायोगे तयार कपड्यांचे उत्पादन करणाऱ्यांसाठी एकत्रितपणे सर्व सोयीसुविधा आधुनिक पद्धतीने आणता येतील. त्यासाठी १० कोटींचा निधी राखून ठेवण्यात आला आहे. तयार कपड्यांच्या निर्यातीला भरपूर वाव आहे. भारतीय हस्तकला व आकर्षक डिझाईन्स यांच वापर करून जागतिक बाजारपेठ मिळू शकते. जागतिक निर्यातीमध्ये भारतीय तयार कपड्यांची निर्यात अवघ्या २ टक्क्यांइतकी असून, तुलनेने चीनसारख्या देशांनी आधुनिकीकरणाद्वारे सर्व सोयीसुविधा दिल्यामुळे निर्यात १७ टक्के आहे. शेजारच्या श्रीलंकेतील प्रेमदासा पार्कमधील ला लॅगुना टेक्सटाईल पार्कचे उदाहरण म्हणजे एकत्रितपणे तयार कपड्यांची कटींग, स्टिचिंग, लेबलिंग, लाँड्री व विक्री व्यवस्था असून, त्या ठिकाणी दर आठवड्याला ५० लाख डेनिम जीन्सच्या जोड्याचे उत्पादन होते. अंदाजे ७० हजार लोकांना रोजगार मिळतो. याउलट भारतात तयार कपड्यांच्या निर्मितीमधील कटींग, स्टिचिंग यासारख्या गोष्टी वेगवेगळ्या ठिकाणी झाल्याने, वेळ, पैसा, नियोजन खर्च वाढतो. यावर उपाय म्हणून 'इंटेग्रेटेड ॲपरल पार्क'ची योजना खूप चांगली आहे.

याशिवाय 'कॉटन टेक्नॉलॉजी मिशन'ची परिणामकारकता वाढण्यासाठी अर्थसंकल्पातील निधी २५ कोटींपर्यंत वाढविण्यात आला. स्टँडर्ड ड्यूटी ही सर्वांना सारखी करून वस्त्रोद्योगासाठी नवीन यंत्रसामग्री आणताना उत्पादन शुल्क ५ टक्क्यांपर्यंत उतरविण्यात आले. सीमा शुल्क अधिभारही रद्द केल्याने व मॅनमेड फायबर व सुतासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या आयातीसाठी करसवलत देऊन उत्पादनवाढीची संधी देण्यात आली आहे. मात्र १६ टक्के उत्पादनशुल्क आकारण्याचे जाहीर केल्यामुळे वस्त्रोद्योग व्यवसाय अडचणीत येणार असल्याचे बोलले जाते. त्यामुळे ती रद्द करण्याची मागणी प्रक्रिया करणाऱ्या कापड उद्योजकांकडून केली जात आहे. एकंदरीत यंदाच्या अर्थसंकल्पातून वस्त्रोद्योगांसाठी निधी वाढवून देण्यात आला आहे. २०००-२००१ मध्ये ४५७ कोटींचा असलेला निधी २००१-२००२ साठी वाढवून ३५० कोटी इतका करण्यात आलेला आहे.

## पराभूत मनस्थिती सोडून द्यावी

एकंदरीत मरगळलेल्या अवस्थेत असणाऱ्या वस्त्रोद्योगाला पुनरुज्जीवित करण्यासाठी अर्थसंकल्पाने दाखविलेली इच्छाशक्ती आशादायी ठरेल, परंतु भारतातील हातमाग, यंत्रमाग, वस्त्रोद्योग, सूतगिरण्या, प्रक्रिया करणारे उद्योग, तयार कपड्यांचे उत्पादक अशा विविध क्षेत्रांमध्ये विखुरलेला हा व्यवसाय ज्या प्रकारच्या समस्यांना तोंड देत आहे, त्यांचा परिणाम म्हणून उद्योजकांना वस्त्रोद्योग नकोसा झाला आहे. पराभूत मनस्थितीतला हा उद्योजक नव्या भांडवल गुंतवणुकीचा धोका पत्करण्यास तयार नाही. आज देशामध्ये ४०० हून अधिक उद्योग बंद आहेत. मुख्यत्वे हातमाग व विकेंद्रित पद्धतीचे रोजगारप्रधान यंत्रमाग निम्म्याहून अधिक बंद आहेत. त्यांना स्वयंपूर्ण करण्यासाठी गरज आहे. त्याचबरोबरीने हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग परस्परांशी स्पर्धा न करतां, परस्पर पूरक कसे बनतील, याचा विचार झाला पाहिजे.

## वस्त्रोद्योगांचे सक्षमीकरण व्हायला हवे

एकतीस डिसेंबर २००४ ला संपूर्ण जग व्यापारासाठी खुले होईल. त्याला अद्यापही तीन वर्षांचा काळ आहे. या कलावधीत वस्त्रोद्योगाचे

सक्षमीकरण झाले नाही, तर सर्वांत मोठा रोजगार पुरविणारा हा उद्योग संपुष्टात येईल. त्यामुळे नियोजनविरहीत वस्त्र उत्पादन थांबविण्यासाठी अर्थसंकल्पाद्वारे उपाययोजना अपेक्षित होती. करांचे सुसूत्रीकरण करून निर्याताभिमुख उत्पादनांवर भर देण्यासाठी काही सवलती उपस्थित होत्या. दोन नोव्हेंबर २००० ला केंद्र सरकारने नवे वस्त्रोद्योग धोरण जाहीर करून निर्यात वाढविण्याची घोषणा केली. इ.स. २०१० पर्यंत २५ अब्ज डॉलरची वस्त्रोद्योगांचे निर्यातीचे लक्ष्य ठरेल. त्यासाठी 'एक्स्पोर्ट प्रमोशन सेंटर्स' कार्यान्वित करण्याचे ठरले. गेल्या डिसेंबरमध्ये महाराष्ट्र शासनाने नवे वस्त्रोद्योग धोरण जाहीर करून बंद गिरण्यांच्या अतिरिक्त जमिन विक्रीतून आधुनिकीकरणाची योजना जाहीर केली. त्याचीही सुरवात अद्याप झालेली नाही. दहाव्या योजनेअंतर्गत आराखडा बनविताना वस्त्रोद्योगाशी निगडित सर्वंकष धोरण राज्य व केंद्राच्या परस्पर सापेक्षाने होण्याची गरज आहे.

येत्या काळात स्पर्धा वाढेल, स्वस्त दरातील आयात वाढेल, बाजारपेठेवरचे नियंत्रण संपेल. संरक्षित पद्धतीच्या वातावरणात मुक्त विहार करणाऱ्या वस्त्रोद्योगात व्यावसायिकांनी नव्या शतकाची आव्हाने पेलण्यासाठी स्वयंपूर्णतेवर भर द्यायला हवा. त्या दृष्टीने अर्थसंकल्पाद्वारे दिलेला 'बूस्टर डोस' योग्य असून, आधुनिकीकरणासाठी उद्योजकांनी त्याचा वापर करावा. लेबर ओरिएंटेड पद्धतीच्या या उद्योगाला 'ह्युमन ओरिएंटेड' करण्याचाही प्रयत्न व्हायला हवा. तरच श्रमिकांचे श्रम, उद्योजकांचे परिश्रम व अर्थमंत्र्यांची इच्छा फलद्रूप होईल. केवळ सरकारवर अवलंबून न राहता, धोका पत्करून, प्रवाहाविरुद्ध जाऊन जागतिक स्पर्धा करण्याची गरज आहे. वस्त्रोद्योगांकडून हे अपेक्षित आहे.

दै. सकाळ - २८/३/२००१

## उद्योगमंत्री गिरणगावची व्यथा जाणून घेतील काय?

महाराष्ट्राचे उद्योगमंत्री पतंगराव कदम यांचे आज (शुक्रवार) गिरणगावात आगमन होत आहे. काही महिन्यापूर्वी चिंचोळी परिसरातील औद्योगिक वसाहतीत 'इन्फोटेक पार्क' च्या उद्‌घाटनप्रसंगी उद्योगमंत्री सोलापुरात आले होते. एकविसाव्या शतकाची आव्हाने पेलण्यासाठी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील संधी उद्योजकांनी 'इन्फोटेक'च्या माध्यमातून द्यावी, असे आवाहनदेखील त्यांनी केले होते, परंतू अवघ्या कांही दिवसातच पुनश्चः उद्योगमंत्र्यांचे उद्यमशील गिरणगावात आगमन करत असताना इथली औद्योगिक स्थिती अधिकच खालावली असल्याचे दिसते. यामुळे नामदार पतंगराव कदमांनी इथल्या उद्योगांची स्थिती सुधारण्यासाठी संबंधितांशी विचारविनिमय करून शासकीय सहकार्य करण्याविषयी ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी इथल्या उद्योजक व कामगार घटनांकडून केली जात आहे.

बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात आर्थिक मंदी असल्याने व कामगारांच्या असहकार्यामुळे चेतन फौंड्रीजच्या मालकांनी २१ मे पासून एकतर्फी टाळेबंदी जाहीर केली त्यामुळे ७०० कामगारांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. आर्थिक अडचणीमुळे कच्चा माल आणणे अशक्य झाल्याने व ट्रॅक्टर उद्योगांनी उत्पादनात घट केल्यामुळे चेतन फौंड्रीमध्ये उत्पादन करणे शक्य नाही, असे कारण दाखवून व्यवस्थापकांनी ले-ऑफ देण्यास सुरुवात केली. 'नो-वर्क पे' ह्या हिशोबाने पगार नाकारले कामगारांनी त्यास विरोध केला. मालकांनी टाळेबंदी सुरू केली. फौंड्रीतील मान्यताप्राप्त भारतीय मजदूर संघाने व्यवस्थापनाने संघटनेशी चर्चा न करता टाळेबंदी जाहीर केली असून ती बेकायदेशीर आहे. या काळातील शंभर टक्के वेतन मिळाले पाहिजे, अशी

रितसर नोटीस पाठवून मागणी केली आहे. तर फौंड्रीतील बहुसंख्य कामगारांचा पाठिंबा असणाऱ्या 'सिटू'ने आज जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेऊन टाळेबंदी उठविण्याची मागणी केली आहे. काही महिन्यांपूर्वी अशीच टाळेबंदी व्यवस्थापनाने लागू केली असता तत्कालीन जिल्हधिकाऱ्यांच्या पुढाकाराने फौंड्री पुनश्च सुरू झाली होती. आज पुन्हा तीच अवस्था आली आहे. सततच्या अस्थिरतेमुळे भविष्य निश्चित नसल्याने आमचे पूर्ण पैसे आम्हाला द्या मग क्लोजर करा अशा मानसिकतेपर्यंत कामगार येऊन ठेपले आहेत, परंतु पैशाअभावी तसे करणे शक्य नसल्याचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात येते. अशा परिस्थितीत 'चेतन'चा तिढा कसा सुटणार याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

**बंद पडलेल्या सूतगिरण्या**

गेल्या नऊ महिन्यापासून बंद पडलेल्या यशवंत व सोलापूर सहकारी सूत गिरण्यांची स्थितीदेखील 'जैसे थे' अशीच आहे. दोन्ही गिरण्यांमधील ३२०० कामगारांची ११ लाख रुपये देय रक्कम अनिर्णित स्थितीत पडून आहे. राज्य शिखर बँकेने कर्जाची रक्कम देवून सुद्धा गिरणी व्यवस्थापन व प्रातिनिधीक कामगार संघटनेमध्ये रितसर करार न होऊ शकल्याने कामगारांना पैसे मिळत नाहीत. राष्ट्रीय गिरणी कामगार संघांमध्ये दरम्यान झालेल्या सत्तांतरामुळे 'नवीन विट्टी नवीन खेळ' अशी स्थिती निर्माण झाली आहे तर दुसरीकडे कृती समितीचे नेते मूग गिळून गप्प आहेत. कामगारांची अक्षरशः उपासमार चालू आहे. तरीही नेतेमंडळी व संचालक मंडळाची किम कर्तव्याची भूमिका आहे. संचालक मंडळाला बरखास्तीच्या नोटीसा देण्यात आल्या. प्रशासक मंडळ नेमण्याची तयारी सुरू आहे. परंतु गिरण्या पूर्ववत चालू होतील. या शंकेचे वातावरण आहे. १ मेच्या कामगारदिनी गिरण्यांचे भोंगे वाजणार अशी घोषणाही करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षत कोणतीही हालचाल झालेली नाही. त्यामुळे कामगार हवालदिल झाले आहेत.

**सरकारी कुबड्या घेतलेली नरसिंगगिरजी**

काही दिवसांपूर्वी वीजपुरवठा खंडित झाल्याने बंद पडलेली नरसिंगगिरजी

मिल सरकारी मदतीमुळे पुन्हा सुरू झाली असली तरी उत्पादन अत्यल्प आहे. निम्म्यहून अधिक यंत्रसामुग्री बंद अवस्थेत आहे. १४०० कमगार हजेरीपटावर असले तरीही कच्च्या मालाचा पुरवठा होत नसल्याने त्यांना काम नाही. ४ कोटीचे अर्थसहाय्य थकबाकी देण्यात गेली आहे. पहिले पाढे पंचावन, अशी अवस्था आहे. गेल्या पाच वर्षापासून अशीच बंदसदृश्य अवस्था असल्याने कामगारही बेजार झाले आहेत त्यांचीही मानसिकता पैसे द्या आम्ही राजीनामे देतो अशीच बनत चालली आहे. सकारतर्फे ठोस काहीच सांगितले जात नाही. त्यामुळे ह्या एकमेव शासनाच्या मालकीची अवस्था देखील दयनीय आहे. केवळ शासनाच्या अर्थसहाय्यामुळे कसेबसे पगार मिळते. परंतु भविष्यचे काय? हा प्रश्न कामगारांसमोर आहे, त्यांना योग्य मार्गदर्शन व नेतृत्व देणारे कोणीच उरले नाहीत. सरकार सवंग राजकारणासाठी धरसोडीचे धोरण घेताना दिसते.

**ना खंत ना खेद**

लक्ष्मी-विष्णू बंद होऊन वर्षे लोटली. तरीही त्यातील कामगारांची देणी मिळाली नाही. कामगार देशोधडीला लागले बहुतेकांनी आपले पैसे मिळतील याची आशा सोडली आहे. हळुहळू सोलापूरकरांना ह्या प्रश्नांचा विसर पडत चालला आहे. ह्याच गतीने अन्य बंद गिरण्यांच्याही बाबतीत देखील घडेल अशी राज्यकर्ते व सत्ताधाऱ्यांची धारणा असावी. त्याशिवाय इतक्या उदासीनतेने ही मंडळी वागली नसती असेच म्हणावे लागेल. ना खंत ना खेद या पद्धतीने सर्वच जबाबदार घटक वागू लागले तर कामगारांनी कोणाची अपेक्षा करायची. कोणाकडे दाद मागायची हा प्रश्न आहे.

**उद्योगमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घ्यावी**

'गिरणगाव'चे अस्तित्व जागतिक औद्योगिक नकाशावर झळकविणाऱ्या यंत्रमाग धंद्याची देखील आज दुर्दशा झालेली आहे. निम्याहून अधिक यंत्रमाग बंद आहेत. हजारो कामगार बेकार आहेत. छोटेखानी मालक वर्ग कर्जबाजारी झाल्याने, भविष्यातही ही परिस्थिती सुधारण्याची कोणतीही आशा वाटत नसल्याने आत्महत्या करीत आहेत. शहराच्या तीनही दिशांना

वसलेली औद्योगिक वसाहतीतील बहुतांशी उद्योग बंद अथवा आजारी अवस्थेत आहेत. मालक वर्ग चिंतित आहे तर श्रमिकांना रोजगार नाही. एकंदरीत गिरणगावच्या औद्योगिक आघाडीवर चिंतेचे सावट पसरले आहे. एकेकाळी राज्याच्या नव्हे तर देशाच्या औद्योगिक योगदानासाठी सुपरिचित असणारे हे गिरणगाव नामशेष होऊ पहात आहे. त्याचे पुनरुज्जीवन करणे. नवीन उद्योग या ठिकाणी येण्यासाठी शासन सहकार्य कसे देता येईल. याविषयी कृतीशील उपाययोजना करण्याची गरज आहे. उद्योगमंत्र्यांकडून सोलापूरकरांच्या ह्याच अपेक्षा आहेत. स्थानिक नेतृत्वाकडे इच्छा शक्तीचा अभाव आहे. प्रशासन व्यवस्था उदासीन आहे. श्रमिकांना योग्य नेतृत्वाची जशी गरज आहे तशी हातांना पुरेसे काम मिळण्याची आवश्यकता आहे. उद्योजकांच्या देखील अनंत अडचणी आहेत. त्यातून मार्ग काढून पुढे नेण्याची क्षमता असणाऱ्या उद्यमशील नेतृत्वाची त्यांनाही गरज आहे. राज्याचे उद्योगमंत्री या नात्याने गिरणगावची व्यथा समजून घेऊन हे वैभवशाली शहर पुनश्च उद्यमशील बनविण्यासाठी प्रयत्न करावेत, हीच अपेक्षा !

दै. लोकमत - २५/५/२००१

# राजकीय इच्छाशक्तीचा अभाव

जागतिकीकरणामुळे वाढत्या स्पर्धेची भीती पुढे करून आता गप्प बसून चालणार नाही. इथल्या बंद तसेच आजारी गिरण्या कारखान्यांचे नेमके प्रश्न अभ्यासून त्यांच्या पुनरुज्जीवनासाठी सर्वांनी कंबर कसली पाहिजे. त्यांना सक्षम करण्यासाठी योग्य सोयीसुविधा, सक्षम करण्यासाठी योग्य सोयीसुविधा, अर्थसहाय्य, करसवलती तसेच नवीन बाजारपेठा मिळवून देण्यासाठी राज्यकर्ते, शासन, कामगार पुढाऱ्यांनी युद्ध पातळीवर झटले पाहिजे. त्यासाठी प्रसंगी संघर्षही करायला हवा. औरंगाबाद, नाशिकसारख्या तुलनेने नंतर उदयास आलेल्या औद्योगिक शहरातील नेत्यांचा आदर्श घ्यायला काय हरकत आहे? आपले पक्षीय संघटनात्मक मतभेद व वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून उद्योग व श्रमिकांच्या तसेच गिरणगावच्या पुनःस्थापनेसाठी झटले पाहिजे.

भरमसाठ कर, अपुऱ्या सुविधा व उदासीन नेतृत्वामुळे गेल्या चाळीस वर्षात मोठे उद्योग सोलापुरात येऊ शकले नाहीत. इथल्या कष्टकऱ्यांना विनाकारण बदनाम करण्यात आले. बहूराष्ट्रीय कंपन्यांनी सुधारित कार्यप्रणाली, गुणवत्ताप्रधान उत्पादनासाठी लागणारे कौशल्य व व्यवस्थापकीय तंत्राचा विकास करण्यासाठी आपणच प्रयत्न करायला ह्या आहे. आपले पक्षीय संघटनात्मक मतभेद व वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून उद्योग व श्रमिकांच्या तसेच गिरणगावच्या पुनस्थापनेसाठी झटले पाहिजे.

भरमसाठ कर, अपुऱ्या सुविधा व उदासीन नेतृत्वामुळे गेल्या चाळीस वर्षात मोठे उद्योग सोलापुरात येऊ शकले नाही. इथल्या कष्टकऱ्यांना विनाकारण बदनाम करण्यात आले. बहुराष्ट्रीय कंपन्यांची सुधारित कार्यप्रणाली, गुणवत्ताप्रधान उत्पादनासाठी लागणारे कौशल्य व व्यवस्थापकीय तंत्राचा विकास करण्यासाठी आपणच प्रयत्न करायला हवेत. हद्दवाढीनंतर झालेली उद्योगांची परवड संपविण्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घ्यायला हवा. पाणी, ड्रेनेज, रस्ते,

दिवाबत्ती व कराच्या सुविधा न पुरविता उद्योगांकडून भरमसाठ करांची अपेक्षा करणे चुकीचे ठरेल. त्यामुळे उद्योग संकटात येत आहेत. निर्याताभिमुख उद्योग बंद पडल्यामुळे रोजगाराबरोबर परकीय चलनाचे उत्पन्नही बुडेल.

वस्त्रोद्योगावरील संकट सार्वत्रिक आहे. आधुनिकीकरणाबरोबरच नवीन उत्पादने व त्यांना योग्य बाजारपेठेची गरज आहे. उत्पादन बदल करून नव्या बाजारपेठा शोधण्यासाठी विशेष प्रयत्न इथल्या यंत्रमागधारकांनी केले नाहीत. त्यांना योग्य मार्गदर्शन देणारी यंत्रणा निर्माण केली पाहिजे. नफा कमविणारे उद्योग बदलत्या परिस्थितीत कोणत्या क्लृप्त्या व तंत्रकौशल्यांचा वापर करतात याविषयी बहुतेक छोट्या उद्योगांना माहिती नसते त्यामुळे कॉस्ट ॲनालिसीस न झाल्याने संकटात येतात. खरे तर व्यावसायिक कार्यपद्धतीशिवाय तरणोपाय नाही. मनुष्यबळ विकासासाठी सक्रीय परिश्रम हवेत त्याची गरज स्पष्ट करणारे मार्गदर्शनच त्यांची पारंपरिक मानसिकता बदलू शकेल.

सहकार क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने व्यावसायिक पद्धतीचा अवलंब करण्यासाठी विशेष प्रयत्न व्हायला हवेत. सहकार म्हणजे स्वाहाकार या स्वार्थी वृत्तीला पायबंद घालण्यासाठी झटले पाहिजे. आपला जिल्हा बोर, डाळिंब, द्राक्षांसाठीदेखील परिचित आहे. फळ प्रक्रिया करून निर्यातवृद्धी तसेच दुग्धजन्य पदार्थाबरोबरच पोल्ट्रीच्या माध्यमातून नवे व्यवसाय उद्योग यायला हवेत. बदलत्या परिस्थितीची आव्हाने ओळखून कामगार संघटनांनी दृष्टिकोन बदलला पाहिजे. उद्योग टिकण्यासाठी व्यवहार्य भूमिका घेतली पाहिजे तरच किर्लोस्कर, आपटेंसारखे उद्योगपती पुनःश्च गिरणगावाकडे परततील. 'इन्फोटेक पार्क'चा शुभारंभ झाला. मात्र उद्योजकांची प्रतीक्षा आहे. त्यासाठी उद्योगपती, राज्यकर्ते, शासकीय अधिकाऱ्यांनी प्रयत्न करायला हवेत. उद्योग टिकले नाहीत. नवीन कारखाने आले नाहीत तर आपलेही अस्तित्व शिल्लक राहणार नाही याची जाणीव लोकप्रतिनिधींनी ठेवली पाहिजे. इथला उद्योजक परिस्थितीला कंटाळून स्थलांतराची भाषा करीत आहे. गिरणगाव वाचविण्याची प्रमाणिक इच्छा असणाऱ्या सुजाण जनतेचा रेटाच ही अधोगती थांबवू शकेल. त्यासाठी जबाबदार असणाऱ्यांना जाब विचारायला हवा. उद्योजकांनी देखील आपल्या समस्या स्पष्टपणे जनतेसमोर आपल्या पाहिजेत. राज्यकर्त्यांची इच्छाशक्ती प्रबळ करण्याची शक्ती जनआंदोलनातच असते. तरच गिरणगाव विकसित होईल. एकविसाव्या शतकाकडे खरी वाटचाल होईल.

दै. लोकमत – २७/५/२००१

# उद्योजकांचे आत्मचिंतन, लोकप्रतिनिधींचे आश्वासन

सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने इथल्या औद्योगिक वसाहतींना उद्यमनगरीचा दर्जा मिळावा या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी नुकतेच सर्वपक्षीय पातळीवर बैठक घेण्यात आली. बैठकीला उद्योगपती, व्यापारी, संघटनेचे प्रतिनिधी, राजकीय नेते व नगरसेवक देखील उपस्थित होते. दोन विद्यमान आमदारांसह महापौरांनी उद्योजकांच्या संघटित प्रयत्नास संपूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. सोलापूर जिल्ह्याचे मंत्री मात्र या बैठकीस अनुपस्थित होते. आपल्या मागण्यांसाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळासह मुख्यमंत्र्यांना भेटून पाठपुरावा करण्याचा एकमताने निर्णय झाला. प्रसंगी याप्रश्नी रस्त्यावर येण्याची तयारी देखील असल्याचे उपस्थित उद्योजकांनी व लोकप्रतिनिधींनी ठामपणे सांगितले. एका अर्थाने ही सुरुवात चांगली झाली. आपसातले पक्षीय मतभेद विसरून गिरणगावच्या पुनरुज्जीवनासाठी लोकप्रतिनिधी आता सज्ज होत आहेत. उद्योजक देखील आत्मचिंतन करीत आहेत ही सकारात्मक गोष्ट आहे. जिल्ह्यातील अन्य लोकप्रतिनिधी व मंत्र्यांनी ह्या प्रश्नांचे महत्त्व ओळखून विशेष प्राथमिकतेने लक्ष घालण्याची गरज आहे.

**लोकप्रतिनिधींना जाब विचारा**

सोलापूर शहराच्या चारही दिशेने वसलेल्या औद्योगिक वसाहतीतील सद्यस्थितीची संपूर्ण कारणमीमांसा करून स्वतंत्रपणे प्रत्येक औद्योगिक क्षेत्राचे व वसाहतीचे प्रश्न हाताळण्याची गरज आहे. मतभेद विसरून एकत्रित येण्यासाठी सर्वपक्षीय विकास परिषद झाली. परंतु आपल्या औद्योगिक विकासातील अडथळे समजून घ्यायला हवेत. शासन, उद्योजक, इथली महानगरपालिका, कामगार

तसेच औद्योगिक संस्थांची याप्रश्नी जबाबदारी नेमकेपणाने ठरवायला हवी. मुख्यमंत्र्यांना औद्योगिक नगरी वा इंडस्ट्रीयल टाऊनशिपसाठी सोलापूरला का वगळण्यात आले, असे विचारले असता खाजगी चर्चेत ते बोलल्याचे समजते की, स्वतंत्र टाऊनशिपचा दर्जा दिल्यामुळे कर व जकातीसारख्या इतर सर्व महसुलीला सोलापूर महानगरपालिकेला मुकावे लागेल. त्यामुळे महानगरपालिकेच्या कामकाजासाठी सरकारला निधी उपलब्ध करून द्यावा लागेल, तो देण्याची क्षमता आज सरकारकडे नाही. जर ही परिस्थिती नीटपणे अभ्यासून, सर्व नगरसेवकांनी, महानगरपालिकेची बाजू उद्योगांना मदत करण्याच्या भूमिकेतून सरकारपुढे मांडण्याची गरज असेल तर त्यासाठी नगरसेवकांनी सर्व पक्षीय मतभेद विसरून एकत्रित आले पाहिजे. त्याचे मतभेद काढून टाकून विधायक भूमिका घेण्याविषयी सत्ताधारी व विरोधी पक्षांचे आमदार, खासदार मंत्र्यांनी पुढाकार घ्यायला हवा. हे झाल्यशिवाय प्रत्यक्ष कृती होणे शक्य नाही. सत्ताधारी आमदार, नगरसेवक, मंत्री व खासदारांनी विशेष करून आपली राजकीय शक्ती पणाला लावली पाहिजे. विरोधी पक्षीय आमदार व अन्य लोकप्रतिनिधींनी काळाची गरज ओळखून विधायक भूमिका घ्यायला हवी. असे होता जर 'सरकार' ला दिसेल. लोक संघटन वाढताना दिसेल तरच सरकार नमेल. त्यामुळे चेंबरने घेतलेल्या पुढकारातून अश्या कृतीची कार्यवाही होण्याची अपेक्षा आहे. याशिवाय स्थानिक नेते, कार्यकर्ते व सर्वसामान्य जनतेने रेटावयाला हवा. कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था व अन्य समाजधुरिणीचा मिळून एकत्रित आवाज हाच प्राप्त परिस्थिती बदलायला सहाय्यकारी ठरणार आहे.

**विडी उद्योग बचाव... पण कोणापासून ?**

दुर्दैवाने आज तरी तशी परिस्थिती दिसत नाही. सर्व क्षेत्रातील उद्योजक, व्यापारी, तसेच त्यावर आधारीत बँका, संघटना अजूनही एकत्रित येत नाहीत. एकेका क्षेत्रातील विविध संघटनांचे पदाधिकाऱ्यांचे मनोमिलन अद्याप होताना दिसत नाही. त्यामुळे विडी उद्योगासारख्या क्षेत्रातील आज चाललेली सुंदोपसुंदा चिंताजनक वाटते. कामगारांची असहाय्यता व बाजारपेठेची परिस्थितीचा फायदा घेत मालक वर्गांनी स्थलांतरांची धमकी द्यायला सुरूवात केली आहे. कोणत्याही परिस्थितीत किमान वेतन देता येणार नाही. जर

सरकारने ते आमच्यावर लादले तर आम्ही उद्योग बंद करू, असे विडी उद्योजक उघडपणे बोलतात. तर दुसरीकडे विडी कामगारांची किमान वेतनाबाबत कुठलीही मागणी नसताना केवळ उद्योगाचा विचार न करणाऱ्या हटवादी पुढाऱ्यांचे ऐकून राज्य सरकार उपसमितीचा चुकीच्या अहवालावरून किमान वेतन निश्चित करण्याचा विचार करीत आहे, अशी भूमिका घेत तथाकथित विडी उद्योग बचाव संघर्ष समितीने चक्क किमान वेतनविरोधी मोर्चा काढावा. त्यासाठी जनमत तयार करावे, हे कशाचे द्योतक आहे? याचा फायदा नेमका कुणाला होणार आहे. किंबहुना आपसातल्या राजकारणापायी आपण नेमकी कोणाच्या हिताची बाजू घेत आहोत याचे भानही कामगार पुढाऱ्यांना राहू नये, याची खंत वाटते. समजा किमान वेतन दिल्यामुळे खरोखरीच विडी उद्योग संकटात येणार असेल व कामगारांना रोजीरोटीला मुकावे लागणारअसेल तर तशी वस्तुस्थिती कामगार पुढाऱ्यांनी मालकांच्या भाषेतून पटवून देण्याऐवजी सर्व संघटनांनी एकत्रित येवून इथला विडी उद्योग सक्षमपणाने रोजगार देय ठरविण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. याउलट आपसातली सुंदोपसुंदी गिरणगावातल्या विडीच्या रुपात असलेल्या एकमेव रोजगार क्षेत्राला वेगळे वळण लावण्याचा जर कोणी प्रयत्न करीत असतील तर त्यांना जाब कोण विचारणार त्यामध्ये लोकप्रतिनिधींची व इतर उद्योजकांची भूमिक काय? ज्यांचे चुकत असेल त्यांचे कान पकडून गिरणगाव सक्षम करण्यासाठी व्यासपीठ नसल्यामुळे पुढारी बेताल झाले आहेत. कामगार मात्र 'मुकी विचारी कुणीही हाका' च्या अवस्थेत जगण्याची भीक मागत आहेत.

**हा शुभसंकेत समजू या !**

लक्ष्मी-विष्णू कामगारांची देणी, सहकारी सूत गिरण्यांमधील कामगारांचे भवितव्य, यंत्रमाग व्यवसायातील जकात व अन्य समस्या, लघुउद्योगांच्या औद्योगिक समस्या, एम.आय.डी.सी. महानगरपालिका तसेच शासकीय खात्याकडून होत असलेले दुर्लक्ष ह्या स्थानिक प्रश्नांवर आपण म्हणजेच सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी एकत्रित येवून सोडविण्याची गरज आहे. तर राज्य, केंद्र तसेच जागतिक पातळीवरील औद्योगिक व व्यावसायिक समस्यांवर उद्योजकांना वैयक्तिक तसेच सामूहिक पातळीवर सहकार्य व मार्गदर्शनाची

गरज आहे. अशा रितीने दुहेरी पातळीवर ठोस प्रयत्नांची आवश्यकता आहे. लोकप्रतिनिधींची ही जबाबदारी आहे. त्यांना जबाबदारीची जाणीव देणारा लोकशाही अधिकार राज्य घटनेने सर्वसामान्य श्रमजीवी जनतेला दिलेला आहे. जनतेची ही दूरवस्था दूर करण्यासाठी लोकप्रतिनिधी सज्ज होत आहेत व उद्योजक आत्मचिंतनासाठी तयार आहेत हा शुभसंकेत म्हणावा लागेल.

दै. लोकमत - १३/९/२००९

# वस्त्रोद्योग नामशेष होण्याच्या मार्गावर !

विसाव्या शतकाच्या अखेरीस गिरणगावची ग्रहणावस्था सुरू झाली. १९४८ मध्ये जुनी गिरणी तर १९५९ मध्ये नरसिंग गिरजी बंद पडली. जुन्या गिरणीतील यंत्रमागांच्या माध्यमातून यंत्रमाग व्यवसायाच्या कामगारांच्या त्यागातून न.गि. मिल पुनश्च उभी राहिली. परंतु जागतिकीकरणाची पूर्वतयारी सुरू झाल्यापासून जुना रोजगारप्रधान वस्त्रोद्योग संकटात आला. १९८० च्या दशकात वेस्टकॉटन गिरण्या बंद पडल्या. १९९४ पासून लक्ष्मी-विष्णु बंद पडली. यंत्रमाग कारखाने संकटात आले. सहकारी सूत गिरण्या बंद आहेत. जामश्रीने उत्पादन निम्म्याहून कमी केले. हातमाग नगण्य उरले. एकंदरीत वस्त्रोद्योग नाहीसा होण्याच्या मार्गावर आहे.

तर दुसरीकडे १९९७ मध्ये शिवशाही बंद पडली. साहजिकच त्यावर आधारित होटगी रस्त्यावरील फाऊंड्री उद्योग संपला. अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. तील मोजके अपवाद वगळता निम्मे कारखाने बंद आहेत तर बाकीचे कर्जाच्या ओझ्याखाली शेवटच्या घटिका मोजीत आहेत. इंडस्ट्रीज उरल्या नाहीत. अद्ययावत समजल्या जाणाऱ्या चिंचोली एम.आय.डी.सी. मध्ये सुरुवातीलाच, निम्म्या जागांवर उद्योग उभारले. त्यांना आवश्यक सुविधा व शासन, राज्यकर्ते व स्थानिक पुढाऱ्यांच्या सहकार्याच्याअभावी उद्योग कसेबसे चालू आहेत. अजूनही निम्म्याहून अधिक जागेत नवीन उद्योगांना संधी मिळू शकेल अशी अवस्थ आहे.

एवढ्या पडझडीनंतर देखील कष्टकरी जनतेला एकवेळीची का होईना भाकर देणारा घरगुती स्वरूपाचा विडी उद्योग जिवंत असल्यामुळेच केवळ उद्रेक होण्याचे थांबले आहे. लक्ष्मी-विष्णुतील दहा हजार कामगार,

नरसिंग गिरणी, जामश्री, यशवंत, सोलापूर, शिवशाहीसारख्या मोठ्या उद्योगातून विस्थापित झालेले श्रमजीवी आज कशावर जगत आहेत ? हा अभ्यासाचा विषय आहे. कित्येक मुलांचे शिक्षण अर्धवट राहिले. लग्ने मोडली. तरुण मुले-मुली वाममार्गाला लागली तर काही गुन्हेगारीकडे वळली. उतारवयातल्या धक्क्यामुळे काही मनोरुग्ण बनली तर काहींनी आत्महत्या केली. घरातल्या महिलांनी लहान मुलींच्या सहाय्याने विड्या वळून व कुणाची धुणीभांडी करून रोजीरोटी कमवायची, घरधनीला मार्ग नसल्याने अन्य रोजगारांची संधी नसल्याने व्यसनाधिनता वाढली. कौटुंबिक विस्थापन, वाढती गुन्हेगारी व मनोरुग्णांचे वाढते प्रमाण ही गिरणगावची आजची अवस्था आहे.

गतशतकांचे अवशेष जपणारे हे गिरणगाव इथल्या उद्ध्वस्त उद्योगांच्या जखमा वागवत उभे आहे. राज्यकर्त्यांनी नेतेमंडळींनी आश्वासनापलीकडे तर कामगार पुढाऱ्यांनी बंद, मोर्चे, धरणे यासारख्या आंदोलीनापलीकडे इथल्या उद्योगांना व कामगारांना भरीव असे काहीच दिले नाही. एकेकाळी राज्यातील चौथ्या क्रमांकावर असलेले औद्योगिक शहर आज दहाव्या क्रमांकावर गणले जात आहे. निगरण्यांच्या भोंग्याने सुरू होणारी ह्या शहरातील रम्य पहाट केव्हाच इतिहास जमा झाली आहे. वालचंद, किर्लोस्कर, आपटेंसारखे उद्योगपती गिरणगावाकडे पाठ फिरवून निघून गेले. गेल्या ५० वर्षात एकही मोठा रोजगारप्रधान नवीन उद्योग इथे येऊ शकलेला नाही. किंबहुना तसे ठोस प्रयत्नही झालेले नाहीत. कामगारांबरोबरच उद्ध्वस्त उद्योजक (यंत्रमाग कारखानदार) आत्महत्या करीत आहेत. चालू उद्योग केव्हाही बंद पडणार अशी अवस्था असल्याने निवृत्तीनंतरचे फायदे म्हणजेच आपली आयुष्यभरची कमाई मिळेल की नाही या चिंतेने कामगार स्वेच्छानिवृत्तीच्या मानसिकतेत आहेत. नवीन पिढीला उद्योग व्यवसायाची संधीच नाकारणारी, एकंदरीत 'सर्वहारा' परिस्थिती आहे. यातून त्वरित बाहेर पडण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न हवेत तरच रुग्णशय्येवरील गिरणगाव पुनश्च उभे राहील.

दै. लोकमत - २६/६/२००१

# औद्योगिक वसाहतींच्या समस्यांकडे दुर्लक्ष करणे घातक ठरेल

सोलापूर शहराच्या औद्योगिक विकासाच्या संदर्भात चाळीस वर्षापूर्वी जे नकारार्थी बोलले जायचे त्यामध्ये काही अपवाद वगळता फारसा फरक पडलेला नाही असेच म्हणावे लागले. कापड गिरण्या, सूत गिरण्या, यंत्रमाग, हातमाग वा तत्सम उद्योगांव्यतिरिक्त नवे उद्योग इथे उभारण्याचे खास प्रयत्नच झाले नाहीत. महाराष्ट्रातील अलीकडे विकसित झालेल्या नासिक, औरंगाबाद, नागपूर व कोल्हापूर सारख्या शहरांच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहराचा औद्योगिक विकास तपासला असता काय दिसते, तर या शहराचा औद्योगिक विकास हा सुरूवातीपासूनच एकांगी राहिलेला आहे. या उद्यमशील शहरवासियांची कार्यकुशलता लक्षात घेऊन औद्योगिक धोरण राबविणारे दृष्टे नेतृत्वच या शहराला लाभले नाही हेच खरे. या पार्श्वभूमिवर पस्तीस वर्षांपूर्वी सोलापूरच्या तरुण होतकरू लघु उद्योजकांना स्वतंत्र उद्योग विकसित करण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सहकारी तत्त्वावर 'इंडस्ट्रियल इस्टेट' उभारण्याचा काही समाजधुरीणांनी विचार केला, त्याप्रमाणे योजना आखली आणि ती कार्यान्वित केली हे विशेष म्हणावे लागेल. चाळीस वर्षांपूर्वी या गिरणगावात सूत, कापड गिरण्यांव्यतिरिक्त छोटेखानी यंत्रमागाशिवाय फक्त किर्लोस्करांचा शिवाजी वर्क्स लि., हा एकमेव उद्योग होता. ही औद्योगिक कोंडी फोडली पाहिजे. नवनवे उद्योग सुरू करण्यासाठी होतकरू उद्योजकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. या भूमिकेतून सहकारी तत्वावर १९६० साली दि सोलापूर इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., ही संस्था सुरू करण्यात आली. संस्थेची रितसर नोंदणी करून भागभांडवल गोळा करण्यात आले. अतिशय विपरीत अशा औद्योगिक परिस्थितीत काही धाडसी मंडळींनी हा प्रयत्न केला.

सुरूवातीला प्रतिसाद तसा माफकच होता. परंतु गेल्या पस्तीस वर्षांतील आपल्या अथक प्रयत्नातून होटगी रस्त्यावरील वैशिष्ट्यपूर्ण इंडस्ट्रियल इस्टेट त्यांनी उभारल्याबद्दल संस्थेच्या सदस्यांना, विश्वस्तांना शतशः धन्यवाद दिले पाहिजेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अक्कलकोट रोडवरील एम.आय.डी.सी. व कोंडी-चिंचोळी भागांमध्ये, पुणे रस्त्यावरील नव्याने उभारली जाणारी एम.आय.डी.सी. या दोन्हीही शासन पुरस्कृत औद्योगिक वसाहतींच्या तुलनेमध्ये होटगी रस्त्यांवरील इंडस्ट्रियल इस्टेटीचे वैशिष्ट्य असे की, पस्तीस वर्षांपूर्वी ज्यावेळी औद्योगिक परिस्थिती पूरक नसताना, सहकारी तत्त्वावर हा प्रयत्न करण्यात आला. आज संस्थेच्या पूर्ण मालकीच्या एकूण ६५.१७ एकर जागेमधील, १८९ प्लॉटपैकी, १६५ प्लॉट्समधून १५७ शेडसमध्ये ११५ विविध प्रकारचे कारखाने प्रत्यक्षात चालू आहेत. या कारखान्यांमधून हजारो कुटुंबियांचे पालन पोषण केले जात असून कित्येक होतकरू उद्योजकांना आपले औद्योगिक कौशल्य दाखविण्याची संधी मिळालेली आहे. संस्थेचे अधिकृत भाग भांडवल २५ लाख रुपयांचे असून एकूण ३९५ सभासद आहेत. या शिवाय नवीन दोन कारखान्यांच्या उभारणीचे काम चालू आहे. मार्च ९३ अखेर या वसाहतीमध्ये ३८ विविध प्रकारचे कारखाने चालू असून प्रामुख्याने २३ इंजिनिअरिंग, १२ यंत्रमाग, ११ फॅब्रिकेशन, १० प्लॅस्टिक, ८ ॲल्युमिनियम हे उद्योग आहेत. याशिवाय टाईल्स, टायरट्यूब्ज, मोनोब्लॉक हायड्रोलिक पंपस्, आयुर्वेदिक औषधे, पेपरकोन्स, एअरकंडीशन्स सर्व्हिसिंग, ऑटो अन्सिलिरीज, पल्व्हरायजर्स, फेटलिंग, तूरदाळ, इलेक्ट्रोप्लेटिंग व पॅकेजिंगसारखे विविध प्रकारचे उद्योग सुरू आहेत.

सहकारी तत्वावर उभारण्यात आलेल्या या औद्योगिक वसाहतीतील इतर सहकारी संस्था आजही यशस्वीपणे कार्यरत आहेत. संस्थेच्या पहिल्या योजनेमध्ये फक्त ३५ शेड्सचे काम १९६४ ते १९७१ पर्यंत पूर्ण झाले. मात्र दुसऱ्या योजनेतील ३१ शेड्सचे काम मात्र अल्पावधीतच १९७७ पर्यंत पूर्ण करण्यात आले. परंतु अद्यापही काही काम अपूर्ण असलेल्या शेड्स/प्लॉटस्धारकाच्या अडचणींमुळे व औद्योगिक 'इंडस्ट्रियल इस्टेट'चे स्वप्न पूर्ण अर्थाने साकार झाले असे म्हणता येणार नाही ते पूर्णत्वाला नेण्याची अखंड धडपड मात्र संस्था कार्यकारीणीची चालू आहे. ग्रामीण भागासाठी रोजगाराच्या

जास्ती जास्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी मागासलेल्या भागांच्या सर्वांगीण विकासासाठी व मुंबईसारख्या मोठ्या शहरातून होत असलेल्या औद्योगिक केंद्रीकरणाला पायबंद घालण्यासाठी तालुका व जिल्हास्तरावर औद्योगिक वसाहती निर्माण करण्याचे धोरण राज्य शासनाकडून राबविले जात आहे. मात्र या औद्योगिक वसाहतींच्या व त्यातील कारखानदारांच्या अडचणीतून वेळीच सोडविल्यामुळे असंख्य कारखाने बंद पडताहेत. अधिकृत सरकारी आकडेवारीनुसार आपल्या देशात खाजगी क्षेत्रातले अंदाजे चार लाख सदतीस हजार कारखाने बंद आहेत. होटगी रस्त्यावरील इंडस्ट्रियल इंस्टेटमधील १६ कारखाने सुरू होऊन बंद झालेले आहेत. हा 'मॅटिलिटी रेट' कमी करण्याची जबाबदारी कोणाची ? एकीकडे उद्योग वाढविण्यासाठी प्रोत्साहन देणारे शासन, औद्योगिक वसाहतीमधील छोटे कारखाने व त्यांच्या समस्यांविषयी मात्र पूर्णपणे उदासिन दिसते असे का ?

होटगी रस्त्यावरील औद्योगिक वसाहत पूर्वी मजरेवाडी ग्रामपंचायत हद्दीत होती ती शासकीय आदेशानुसार अलीकडेच सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आली. हद्दवाढीमुळे येथील लघुउद्योजकांसमोर जकात करविषयक अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. लघु व मध्यम स्वरूपाच्या उद्योजकांना भेडसवणाऱ्या इतर आर्थिक समस्यांमध्ये या नवीन समस्याची भर पडल्याने कांहीचे अस्तित्वच धोक्यात येईल की काय असे वाटू लागले आहे. येथील बहुतेक लघुउद्योगांतून पुणे, मुंबईसारख्या मोठ्या उद्योगांकडून काम, मजूरीवर केले जाते त्यांच्याकडून कच्चा माल आणून पक्का माल परत पाठविला जातो. या दोन्हीही प्रसंगी महानगरपालिकेकडून मालाच्या किंमतीवर कर आकारला जातो. मजूरीवर काम करणाऱ्या छोट्या कारखान्यांना हा कर परवडणार नाही. पुणे महानगरपालिकेने अशा मजूरीवर काम करणाऱ्या विशिष्ट उद्योगातील मालाची ने-आण करण्यासाठी 'फॉर्म वाय' ची सोय केलेली आहे. त्याच धर्तीवर सोलापूर महानगरपालिकेने सोय करावी अशी लघुउद्योजकांची मागणी आहे. त्याचप्रमाणे पितळ, ॲल्युमिनियम, जस्त, बीड, पिगआयर्न यासारख्या धातूपासून विविध वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यांना कास्टिंग बनविणाऱ्या फाऊंड्रीजना कच्चा माल बाहेरून आणावा लागतो. त्यावरील कराचा बोजाही उद्योजकांना असह्य होत आहे. यासाठी

नागपूर महानगरपालिकेच्या धर्तीवर अशा कच्चा मालावर जकात कराची आकारणी करावी. अशी मागणी आहे. सोलापूर महानगरपालिकेचे प्रचलित आयात करविषयक नियम १९६६ साली तत्कालिन परिस्थितीवर आधारीत बनविलेले आहेत म्हणून बदलेलेल्या परिस्थितीनुसार त्यामध्ये योग्य बदल झाले पाहिजेत. औद्योगिक वसाहतीतील जमीनीची पूर्ण मालकी शेडधारकाची नसते. ती संस्थेच्याच मालकीची म्हणजेच सोसायटीच्या मालकीची असते पर्यायाने शासनाची असते. शेडधारक हे भाडेकरी असतात त्यामुळे हद्दवाढीनंतर सोलापूर महानगरपालिकेने सर्वसाधारण घरपट्टीचे नियम वापरून कर आकारणी केल्यास ते लघुउद्योजकांना परवडणारे नाही. याचाही विचार व्हावा अशी मागणी आहे. पाणीपुरवठा, रस्त्यावरचे दिवे, डांबरी रस्ते, भूमिगत गटार योजना इ. आवश्यक सुविधा अद्यापही पुरेशा नाहीत. औद्योगिक विकासासाठी या सुविधा अतिशय महत्त्वाच्या असतात त्यांचा उद्योगांच्या प्रत्यक्ष नफ्यावर परिणाम होऊ शकतो म्हणून या सर्व सुविधा अतिशय महत्त्वाच्या असतात म्हणून या सर्व सुविधा अग्रक्रमाने देण्याची गरज आहे. अन्यथा नवीन उद्योजकांना उद्योग सुरू करण्याविषयी प्रोत्साहन मिळण्याऐवजी भितीच वाटेल.

ह्या उद्योजकांच्या समस्याच इतक्या तीव्र आहेत की त्यामुळे कामगारांच्या समस्यांकडे लक्ष द्यायला कोणीच तयार नाही. वसाहतीतील कित्येक कारखान्यातून अद्यापही किमान वेतन दिले जात नाही. नोकरीविषयक कायद्यांचे योग्य पालन केले जात नाही. सर्रास ले-ऑफ दिला जातो अशी एकंदरीत परिस्थिती असूनही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष आहे. बाजारपेठेतील स्पर्धा व इतर औद्योगिक समस्यांना तोंड देत कसेबसे उभे राहणाऱ्या लघु उद्योगांच्या स्वतःच्या समस्या आधी सुटल्या पाहिजेत हे उद्योग सशक्त झाले तरच त्यांना कामगारांकडे लक्ष देणे शक्य होईल त्यासाठी सोलापूर शहरातील तीनही ठिकाणच्या औद्योगिक वसाहतीमधील लघुउद्योगांच्या करविषयक समस्या, उत्पादनविषयक समस्या, आर्थिक समस्या व कायदेविषयक समस्या अभ्यासातून त्यावर शासकीय पातळीवर तातडीने उपाय योजना करण्याची गरज आहे. अन्यथा लघु उद्योगांची बंद पडण्याची प्रक्रिया झपाट्याने वाढेल. त्यांचे गंभीर परिणाम होतील.

औद्योगिक वसाहती पूर्णपणे सक्षम होण्यासाठी विशेष सवलती देणे

आवश्यक असते काही अंशी अशा सवलती दिल्याही जातात मात्र याविषयी व्यावहारीक अडचणी लक्षात घेतल्या जात नाहीत अशा अनेक उद्योजकांच्या तक्रारी आहेत त्या रास्त आहेत. शासकीय प्रतिनिधी व लोकप्रतिनिधींकडे यासंबंधी अनेक वेळा लेखी निवेदन देऊनही तात्पुरती डागडूजी केली जाते. कायमस्वरूपी उपाययोजना करून औद्योगिक वसाहती पूर्णपणे विकसित होण्याविषयी प्रामाणिक प्रयत्न केले जात नाहीत ही दुर्दैवाची बाब आहे. अक्कलकोट रोडवरील एम.आय.डी.सी. सोलापूर मध्ये देखील असंख्य तक्रारी लघुउद्योजकांनी वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांसमोर केल्या. तात्पुरते निराकरणही झालेले आहे मात्र कोट्यावधी रुपयांची उलाढाल करणाऱ्या उद्योगांना स्वबळावर विकसित करण्यासाठी कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे. ह्याविषयी सूत्रबद्ध नियोजन होत नाही. या गोष्टीची वेळीच दखल घेऊन लोकप्रतिनिधी व शासकीय प्रतिनिधींनी योग्य ती कार्यवाही केली पाहिजे तरच चौफेर औद्योगिक विकास साधला जाईल. सोलापूर शहराच्या तीनही दिशांना विकसित होत असलेल्या औद्योगिक वसाहती सर्वार्थाने फुलतील आणि उद्यमशील सोलापूर हे नाव सार्थक होईल.

दै. लोकमत - १/३/१९९४

# नवीन औद्योगिक वसाहती उभारणार, पण जुन्यांचे काय ?

आपल्या राज्यातील औद्योगिक वसाहती विकसित करण्याचे काम यापुढे खाजगी क्षेत्राकडे सोपविण्यात येणार असून या पद्धतीचा पहिला प्रयोग शिरुर तालुक्यातील रांजणगाव येथे उभारण्यात येईल अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी नुकतीच केली. आजपर्यंत औद्योगिक विकास महामंडळामार्फतच राज्यशासन ठिकठिकाणी औद्योगिक वसाहती उभारण्याचे काम करीत असे. तथापि आता सर्वच क्षेत्रात खुले धोरण स्विकारले जात असून, रस्ते, वीजनिर्मिती यासारख्या मुलभूत सेवासुविधा क्षेत्रांमध्येदेखील खाजगी क्षेत्राचे पदार्पण झालेले आहे. आता राज्य शासनाने औद्योगिक वसाहतीच्या विकास कार्यातून आपले अंग काढून घेण्याचे ठरविले आहे. म्हणजेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळावर (एम.आय.डी.सी.) यापुढे हे काम सोपविले जाणार नाही. या धर्तीवरील पहिली आंतरराष्ट्रीय दर्जाची औद्योगिक वसाहत रांजणगाव येथे उभारण्यात येणार असून तिचे काम 'ग्रीव्हज समूह' औद्योगिक वसाहती उभारणीच्या कामाचा अनुभव असलेल्या सिंगापूरच्या उद्योग समूहाकडे व 'सिकॉम' आणि अंशतः एम.आय.डी.सी.कडे संयुक्तपणे सोपविण्यात आले आहे. तीन हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करून ही औद्योगिक वसाहत विकसित केली जाणार असून राज्यातील ती अत्याधुनिक अशी वसाहत ठरेल. शासन फक्त या वसाहतीमधील कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्याची तसेच गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी घेईल. उद्योगधंद्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधा पुरविण्याचे काम खाजगी क्षेत्रांकडेच सोपविले जाईल. उद्योगांसाठी अत्याधुनिक सोई-सुविधा देण्याबरोबरच निवासस्थानेही पुरविण्यात येणार आहेत. हा पहिलाच प्रयोग असून तो यशस्वी ठरताच राज्यात सर्व ठिकाणी राबविण्याचा शासनाचा विचार आहे.

**नव्या औद्योगिक वसाहतींचे स्वरूप**

विशिष्ट भागातून होत असलेले औद्योगिक केंद्रीकरण थांबविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या नवीन धोरणानुसार एका ठिकाणी सुमारे १८ ते २० हजार कामगारांना रोजगार मिळू शकेल इतक्याच आकाराच्या वसाहतीची उभारणी करायची, अपेक्षित गुंतवणूक व रोजगांराचे उद्दिष्ट पूर्ण झाल्यावर हे काम थांबवून अन्यत्र ते सुरू करायचे असे शासनाने ठरविले आहे. त्याचप्रमाणे एका औद्योगिक वसाहतीमध्ये २०० ते ३०० युनिट्स राहतील त्यामुळे कामगारसंख्या मर्यादित राहून मुलभूत नागरी सुविधा सर्वांना चांगल्या प्रकारे उपलब्ध होऊ शकेल. त्याचप्रमाणे शेतीवरील अतिरिक्त बोजा कमी होण्यास हातभार लागून शेतीसाठी पूरक उद्योग निर्माण होण्यास मदत होईल. थोडक्यात विकेंद्रित कारखानदारी व गुंतवणूक यासाठी राज्य सरकार प्रोत्साहन देईल. औद्योगिक प्रगतीसाठी दळणवळण सुविधा हव्यात, त्यासाठी चांगले रस्ते हवेत, पुरेसा वीज पुरवठा हवा. त्यादृष्टिनेही शासनाने महत्त्वाची पाऊले उचलली आहेत. हे जरी खरे असले तरी या नवीन औद्योगिक वसाहतींच्या खाजगीकरणातून काही मुलभूत प्रश्न निर्माण होणार आहेत. आज राज्यामधील अस्तित्वात असलेल्या 'एम.आय.डी.सी.' चे भवितव्य काय? जवळजवळ प्रत्येक ठिकाणी अद्यापही पाणी, रस्ते, वीजपुरवठा व दळणवळणाची साधने पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने तिथल्या उद्योगांच्या समस्या बिकट होत आहेत. नियमित बाजारपेठ उपलब्ध न होऊ शकल्याने, स्पर्धा वाढल्याने, उत्पादित मालाला उठाव नसल्याने, अनेक लघुउद्योग आर्थिक संकटात आहेत. सर्व तऱ्हेची क्षमता असून योग्य शासकीय सहाय्य व धोरणांचा अभाव अल्याने लघुउद्योगांचे 'मॉर्टलिटी रेट' (बंद पडण्याची सरासरी संख्या) वाढत चाललेली आहे. एकीकडे उद्योग वाढविण्यासाठी नवनवीन योजना आखून प्रोत्साहन देणारे शासन औद्योगिक वसाहतीतील लघुउद्योगांच्या मुलभूत समस्यांविषयी उदासिन का ?

पुढील तीन ते चार वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात एका औद्योगिक केंद्र उभारण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते. त्याचप्रमाणे नव्या उद्योगांना प्रशिक्षित नोकरवर्ग स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हावा, यासाठी सर्व भागात औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येणार असून त्यात २० टक्के जागा मुलींसाठी राखून ठेवण्यात येणार आहेत. ही अतिशय चांगली

आहे मात्र त्याचबरोबरीने स्थानिक नैसर्गिक साधन सामुग्री, उद्योगांसाठी आवश्यक कच्चा माल, उपलब्ध कुशल श्रमिक वर्ग आणि उत्पादित मालासाठी बाजारपेठ इ. गोष्टींचा नीट अभ्यास करून आवश्यक त्याच योग्य उद्योगाची निर्मिती होण्यासाठी कसलीही व्यवस्था नाही. त्यामुळे लोक गरजा विचारात न घेता, बाजारपेठा व नफ्याभोवती केंद्रीत वस्तुंचेच उत्पादन होईल. उद्योग वाढतील. परंतु सामाजिक आर्थिक रचनेला पूरक असेच उत्पादन होईल. आज आपल्यासारख्या विकसनशील देशाला औद्योगिक विकासाची नितांत गरज आहे हे मान्य करूनही नेमके कशाचे उत्पादन कोणासाठी होणार आहे याचा विचार न करता उद्योग वाढले तर त्याचे सामाजिक सांस्कृतिक दुष्परिणाम घातकी ठरणार आहेत. एम.आय.डी.सी. च्या माध्यमातून राज्यभर पसरलेल्या छोट्या व मध्यम आकाराच्या उद्योगांच्या समस्या त्वरित सोडविल्या पाहिजेत अन्यथा खाजगी क्षेत्राद्वारे होत असणाऱ्या अत्याधुनिक औद्योगिक वसाहतीतील उद्योगांशी स्पर्धा करणे शक्य होणार नाही. पुढे त्यामुळे ह्या उद्योगांची समस्या नव्याने उभी राहील.

बारामती येथील औद्योगिक क्षेत्रातील जागा संपल्यावर इंदापूर, फलटण व सोलापूर परिसरात उद्योगांना जाण्यास सांगण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले परंतु सोलापूर शहराच्या तीनही दिशांनी अस्त्विात असलेल्या, अक्कलकोट रोडवरील एम.आय.डी.सी. होटगी रोडवरील इंडस्ट्रीयल इस्टेट व पुणे रस्त्यावरील कोंडी-चिंचोळी भागातील नवीन एम.आय.डी.सी. तील मुलभूत सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसलेल्या परिस्थितीमुळे जे उद्योग आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यांना स्वयंनिर्भर करण्यासाठी सरकारकडे भरीव योजना नाही. प्रथम त्यांना सशक्त केले पाहिजे. त्यांचे योग्य पद्धतीने पुनर्वसन झाले पाहिजे. तरच राज्य सरकारच्या नवीन औद्योगिक वसाहतीविषयक धोरणाला व्यावहारिक अर्थ प्राप्त होईल. अन्यथा हे चालू स्थितीतील उद्योग बंद पाडून नवीन खाजगी उद्योग विकसित करणे आपल्याला परवडणारे नाही. सध्या अस्तित्वात असणाऱ्या एम.आय.डी.सी.च्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देऊन नियोजनबद्ध पाऊले, उचलण्याची गरज आहे. तरच नवीन औद्योगिक वसाहती निर्माण करणे योग्यच ठरेल. दोन्हीही गोष्टी वेळीच झाल्या पाहिजेत. त्यांची अंतर्गत स्पर्धा सुरू होण्यापूर्वी या

गोष्टींचा विचार होण्याची आवश्यकता आहे. केवळ विचार होण्याची आवश्यकता आहे. केवळ खाजगी क्षेत्रातील केंद्रीत करणे, अस्तित्वात असाऱ्या एम.आय.डी.सी. तील उद्योगांवर अन्यायकार ठरेल.

दै. लोकमत - २२/११/१९९७

# पंचतारांकित औद्योगिक वसाहती

राज्यातील औद्योगिक केंद्रीकरणाला छेद देऊन समतोल विकासाच्या भूमिकेतून राज्य शासनाने १९९५ साली नवीन औद्योगिक व व्यापारविषयक धोरण जाहीर केले. ह्या धोरणाअंतर्गत राज्यातील नऊ ठिकाणी अद्ययावत अशा पंचतारांकित औद्योगिक वसाहती निर्माण करण्याचा संकल्प असून त्याठिकाणी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. ज्यामुळे विदेशी गुंतवणूकदारांना तसेच एतद्देशीय खाजगी उद्योजकांना आकर्षण वाटेल. नवनवे उद्योग सुरू होतील पर्यायाने रोजगारीचाही प्रश्न सुटेल अशी राज्य सरकारची अपेक्षा आहे.

सर्वार्थाने अद्ययावत असणाऱ्या नवीन पंचतारांकित औद्योगिक वसाहतीपैकी नागपूरपासून ३० किलोमीटर अंतरावरील बुटीबोरी औद्योगिक वसाहत (इंजिनिअरिंग उद्योग), औरंगाबाद मधील शेंद्र-वाळूज औद्योगिक वसाहत (ऑटोमोबाईल उद्योग), नाशिक मधील सिन्नर औद्योगिक वसाहत (पेपर व केमिकल्स उद्योग), त्याचप्रमाणे अमरावती जिल्ह्यातील नंदगाव पेठ, नांदेड मधील कुशनूर, कोल्हापुरातील हातकणंगले, कागल, रायगड मधील महाड, रत्नागिरीमधील निवळी फाटा व पुण्यातील इंदापूर इत्यादीचा समावेश आहे. प्रत्येक उद्योग वसाहतीसाठी २००० हेक्टरपासून ७००० हेक्टरपर्यंतची जागा निश्चित करण्यात आलेली आहे. 'गोल्डन ट्रँगल' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मुंबई-पुणे-ठाणे या भागातील उद्योगांचे केंद्रीकरण थांबवून राज्यातील इतर भागातून विकसित होणाऱ्या या नऊ पंचतारांकित औद्योगिक वसाहतींमध्ये कोणत्या प्रकारचे उद्योग असावेत याविषयी देखील शासनाने नवे धोरण आखले आहे.

महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिल (एमईडीसी) ने जून १९९७

मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार पुणे–औरंगाबाद भागामध्ये ऑटोमोबाईल्स उद्योग, रत्नागिरी भागामध्ये पेट्रोकेमिकल्स, प्लॅस्टिक व रबर उद्योग, धातू, लोखंडाचे उद्योग मुख्यत्वे रायगड व पुणे भागातून, केमिकल्स रायगडमध्ये, नागपूरमध्ये वस्त्रोद्योग, कोळसा व इतर खाणीचे चंद्रपूर, तसेच तेल वायू संबंधित रत्नागिरीमध्ये उद्योगनिर्मिती होईल अशी व्यवस्था करण्यात येणार आहे.

**भरपूर करविषयक सवलती**

महाराष्ट्राच्या समतोल औद्योगिक विकासासाठी खाजगी उद्योगांना तसेच मोठ्या प्रकल्पांना विशेष सवलती देण्यात येत आहेत. पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधून मोठे प्रकल्प प्राधान्याने आणण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत. त्यासाठी १००० कोटीपेक्षा जास्तीची गुंतवणूक असणाऱ्या प्रकल्पांना अमर्यादीत पद्धतीची विक्रीकराची सवलत १४ वर्षापर्यंत दिली जाईल. त्यासाठी दोन योजना आहेत. प्रत्यक्ष सवलत योजनेमधून उत्पादनांच्या विक्रीवर सरळ सूट मिळेल तर 'डिफरल एक्झंप्शन' पद्धतीनुसार उद्योगांनी ग्राहकांवर विक्रीकर लावावा. तो जमाही करावा. ही विक्रीकराची जमा झालेली रक्कम १४ वर्षांपर्यंत व्याजरहीत कर्ज म्हणून संबंधित उद्योगांना वापरण्याची मुभा राहील. त्यानंतर पाच समान वार्षिक हप्त्यांमधून सदरची रक्कम परतफेड होईल.

**इंटरनॅशनल कार्गो कॉम्प्लेक्स**

याशिवाय गडचिरोलीसारख्या मागासलेल्या भागांमध्ये उद्योजकांना एम.आय.डी.सी. भागातून अत्यल्प म्हणजे अवघ्या १ रुपयांच्या मुल्याने पाहिजे तेवढी जागा देण्याची व्यवस्था आहे. मार्च ९७ मध्ये सरकारने लघु व मध्यम उद्योगांसाठी ३० लाखापर्यंत रोख सवलतीच्या रूपाने मराठवाडा, विदर्भातील उद्योगांना मदत करीत आहे. स्टॅम्प ड्युटी नाही. राज्य सरकारने निर्यातवृद्धीसाठी राज्यामध्ये आणखीन पाच एक्स्पोर्ट प्रमोशन इंडस्ट्रियल पार्क उभारण्याची केंद्राकडे मागणी केली असून १ करोडपर्यंत जुनी यंत्रसामुग्री परदेशातून विनाकर आयात करण्याची विशेष परवानगीही देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पुणे, नासिक व नागपूर या ठिकाणी इंटरनॅशनल कार्गो कॉम्प्लेक्सची स्थापना होणार आहे. ज्यायोगे निर्यातदारांना सुविधा मिळेल.

राज्य शासनाने एम.आय.डी.सी. कडे अधिकार दिले असून त्यामार्फत

विविध योजनांच्या अंमल बजावणीतून नवीन औद्योगिक वसाहती विकसित व्हाव्यात अशी अपेक्षा आहे. केंद्र सरकारने १९८८ साली महाराष्ट्रातील अकोला, चंद्रपूर, धुळे, नांदेड व रत्नागिरी या पाच विकास केंद्रांची योजना आखली होती. मात्र दुर्दैवाने त्या दिशेने फारसे घडले नाही. ऊर्जानिर्मिती व खाजगी बंदराच्या विकासाची नवी योजना आखून त्याद्वारे ४८ छोटी बंदरे सुरुवातीला निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्राचा ७५० कि.मी. चा किनारी भाग देखील सर्वार्थाने समृद्ध असून त्यादृष्टिनेही औद्योगिक प्रयत्न करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमली आहे. १९९१ च्या नवीन आर्थिक व औद्योगिक धोरणानंतर महाराष्ट्रातील एकूण विदेशी गुंतवणुकीपैकी ३३ टक्के इतकी गुंतवणूक फक्त कोकण प्रदेशातून झाली तर विदर्भ व मराठवाडा दोन्ही मिळून फक्त २७ टक्के गुंतवणूक झालेली आहे. ह्याचाच अर्थ कोकणी किनारपट्टी भागातून उद्योग विकसित करण्यामध्ये विदेशी गुंतवणूकदार उत्सुक आहेत. मात्र शेजारील गुजरात, तामिळनाडू, तसेच ओरिसा राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात अपयशी ठरला आहे. असेच म्हणावे लागेल. त्याची नेमकी कारणमीमांसा सुरू आहे.

राज्य सरकारच्या समतोल औद्योगिक विकासाच्या प्रयत्नांना यशस्वी करण्यासाठी प्रचलित करविषयक धोरणांची पुनर्रचना करणे आवश्यक वाटते. सध्या अस्तित्वात असलेल्या एम.आय.डी.सी.ची अवस्था देखील वाईट आहे. तुलनेने कायदेही जाचक आहेत. त्यांच्यामध्येही बदल हवेत हे सर्व बदल्याशिवाय नव्या पंचातारांकित औद्योगिक वसाहतींना खरे यश मिळणार नाही. देशातील अग्रमानांकित उद्योग व्यापारासाठी प्रसिद्ध महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी हे आवश्यक आहे.

दै. लोकमत - २/१२/१९९७

# औद्योगिक वसाहतींना जाचक भुईभाडेवाढ

सोलापूर महानगरपालिका व महाराष्ट्र शासनाने मिळून उद्योग उद्ध्वस्त करण्याचे धोरण घेतलेले दिसते. अलकिडे घडलेल्या दोन धोरणात्मक घटनांमधून ही गोष्ट स्पष्ट होते. ग्रामीण भागातील औद्योगिक विकासाकरिता नवनवीन योजना जाहीर करणाऱ्या महाराष्ट्र शासनाने औद्योगिक वसाहतींना १५० ते २०० पट अधिक भुईभाडे आकारून लघुउद्योजकांचे कंबरडे मोडले आहे तर दुसरीकडे स्थानिक पातळीवर सोलापूर महानगरपालिकेने विविध प्रकारच्या ३०० वस्तूंवर १ ते १० टक्के जकातवाढ तसेच जकातीची प्रचलित पद्धत रद्द करून मालाच्या किमतीवर जकात लावण्याचे धोरण घेऊन उद्योजकांना संकटात आणले आहे. ह्या दुहेरी आघाताने सोलापुरातील लघु व मध्यम आकाराच्या उद्योगांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. जागतिक मंदीच्या परिणामी ह्या उद्योगांना तोटा सहन करावा लागत असून ह्या धोरणात्मक बदलांमुळे त्यांची आजारीकरणाची प्रक्रिया सुरू झाली असेच म्हणावे लागेल. प्रत्येक उद्योगांचे स्वतःचे व्यावहारीक प्रश्न आहेत त्यामध्ये ही भर पडल्याने आता दाद कोणाकडे मागावी हा प्रश्न आहे. विशेषतः होटगी रस्त्यावरील औद्योगिक वसाहतीतील लघुउद्योगांना महाराष्ट्र शासनाची भुईभाडे वाढ जाचक ठरत आहे.

### सोलापुरातील 'इंडस्ट्रीयल इस्टेट'

१९६१ साली दि सोलापूर इंडस्ट्रीयल को-ऑपरेटीव्ह सोसायटी लि. ही संस्था लघुउद्योजकांना स्वतंत्र उद्योग उभारण्याची संधी देण्याच्या उद्देशाने सहकारी तत्वावर सुरू करण्यात आली. इंडस्ट्रीयल इस्टेट म्हणून

ओळखल्या जाणाऱ्या ६५.१७ एकर जागेमधील १८९ प्लॉटपैकी १६५ प्लॉटस्‌मधून १५७ शेड्समध्ये १२० हून अधिक प्रकारचे कारखाने कार्यरत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने इंजिनिअरिंग, फॅब्रिकेशन, प्लॅस्टिक, अल्युमिनियम, हायड्रोलिक पंपस, आयुर्वेदिक औषधे, पेपरकोन्स, एअरकंडिशन्स सर्व्हिसिंग, पल्वरायजर्स, अॅटो अन्सिलरीज, फेटलिंग, इलेक्ट्रोप्लेटिंग, यंत्रमाग, पॅकेजिंग सारख्या विविध उद्योगांचा समावेश आहे. ही औद्योगिक वसाहत पूर्वी मजरेवाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये होती. ती १९९२ च्या शासकीय आदेशानुसार सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झाल्याने जकातीच्या समस्या निर्माण झाल्या. येथील बहुतेक लघुउद्योगांतून पुणे मुंबईसारख्या मोठ्या शहरामधील बड्या उद्योगांकडून काम मजुरीवर केले जाते. त्यांच्याकडून कच्चा माल आणून उत्पादित पक्का माल परत पाठविला जातो. यामध्ये दोनहीही माल परत पाठविला जातो. यामध्ये दोन्हीही प्रसंगी (काही मालावर) कर आकारला जातो. त्याबाबत उद्योजकांची तक्रार आहे. ह्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या भुईभाडे वाढीने भर पडली अहो. औद्योगिक वसाहतीतील जमिनीची पूर्ण मालकी शेडधारकांची नसते. ती संस्थेच्या म्हणजेच सोसायटीच्या मालकीची असते. पर्यायाने शासनाची असते. शेडधारक भाडेकरी असतात. शासनाच्या नव्या भुईभाडे आकारणीत सहा ते आठ गुंठे (६००० ते १०००० चौ. फूट) जमिनीवर उभ्या असणाऱ्या छोट्या उद्योगाला २ ते ४ लाखाचे भुईभाडे भरावे लागणार असल्याने हे उद्योजक उद्‌ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत.

**औद्योगिक वसाहतींचे योगदान**

ग्रामीण भागात औद्योगिकीकरणाला चालना मिळावी म्हणून १९६० साली महाराष्ट्र औद्योगिक वसाहती सुरू झाल्या. त्यामध्ये सहकारी तत्वावर उभारण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतींची संख्या मोठी आहे. स्थानिक उद्योजकतेला वाव देणाऱ्या महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या १२२ सहकारी औद्योगिक वसाहतींचे जाळे असून त्याद्वारे ४७६३ उद्योगांमधून ८०,३५७ रोजगारविषयक संधी प्राप्त झाल्या आहेत. गेल्या ३८ वर्षात या वसाहतींनी भरीव योगदान दिलेले आहे. तथापि या वसाहतीमधील उद्योगांना सक्षम करण्यासाठी पुरेसे सहाय्य शासनाकडून झाले नाही. सहकारी औद्योगिक

वसाहतींसाठी इमारत उभारण्यासाठी एकूण प्रकल्पाच्या २० टक्के समभाग शासन, २० टक्के उद्योजक तर ६० टक्के एलआयसी मार्फत अल्प व्याजदाराने कर्ज अशी योजना असूनही शासन दरबारी २२ प्रकरणे मंजुरीसाठी अद्यापही पडून आहेत. परदेशी गुंतवणुकदारांना अधिकाधिक सवलती देण्यामध्ये पुढाकार घेणाऱ्या शासनाला या छोटेखानी उद्योगांकडे लक्ष देण्यास वेळ नाही. त्यांच्या अन्य समस्या प्रलंबित असतानास भुईभाडे वाढीची नव्याने भर पडली आहे.

सोलापूर औद्योगिक वसाहतीचे २६.१७ हेक्टर जागेचे पूर्वीचे भुईभाडे ७,१५५.२० रु. होते. ते आता २३,२०,७८६ रु. ठरविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आता भाडेपट्यांचा कालावधी ९० वर्षावरुन ३० वर्षावर आणला असून भुईभाडे सुधारित करण्याचा पूर्वीचा कालावधी ३० वर्षाहून १० वर्षे केला आहे. सुधारित भुईभाडे ठरविताना जमिनीची किंमत अधिक सुधारित बिगर शेती कराच्या १६ पट असा विचार होणेऐवजी बाजारभावाने आणलेली किंमत आकारणीची पद्धत अन्यायकारक आहे. वास्तविक वसाहतीतील जमिनी ताब्यात घेतल्यानंतर संस्था व उद्योजकांनी मिळून त्या विकसित केल्या. त्यामुळे एका अर्थाने शासनाची कोट्यावधींची गुंतवणूक वाचली आहे. याउलट आय.एम.आय.डी.सी. मधील उद्योजकांकडे प्लॉट क्षेत्र कितीही मोठे असेल तरीही त्यांना फक्त १/- रुपया नाममात्र भाडे करावे लागते. असा भेदभाव कशासाठी ? असाही प्रश्न आहे.

**लोकप्रतिनिधींकडे इच्छाशक्ती नाही**

एकीकडे पंचतारांकित औद्योगिक वसाहती तसेच इंटरनॅशनल कार्गो कॉम्प्लेक्स सारख्या योजना करणाऱ्या शासनाकडे सध्या अस्तित्वात असणाऱ्या औद्योगिक वसाहतींसाठी ठोस योजना नाही. उलट त्यांना अडचणीत आणण्याचे चालल्याने उद्योजकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. नव्याने औद्योगिक वसाहती उभारण्याच्या घोषणा होतात, परंतु त्यासाठी पुरेसा निधी, कार्यात्मक योजना नाही. प्रचलित औद्योगिक वसाहतींमध्ये रस्ते, पाणी, वीज वाहतूक, दिवाबत्ती व सांडपाण्याची पुरेशी व्यवस्था नाही. जकातीचे भरमसाठ दरामुळे स्पर्धा करण्यामध्ये अडचणी येणारे अनेक उद्योग स्थलांतरीत होत आहेत.

महाराष्ट्राच्या उद्योगमंत्र्यांनी नुकत्याच बोलाविलेल्या बैठकीमध्ये

उद्योजक, शासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधींसमोर उद्योगवाढीच्या दृष्टीने उद्योजकांच्या अडचणी सोडविण्याचे आश्वासन दिले. आमचे उद्योजक मंत्र्यांच्या आश्वासनांसह सोलापुरात पोहोचतात तोवर भरमसाठ जकातवाढीची घोषणा झाली. महाराष्ट्र शासनाची भुईभाडे वाढ आहेच. अशा परस्परविरोधी घटनांचा उद्योजकांनी कोणता अर्थ लावायचा? असा संभ्रम आहे. महाराष्ट्र शासन तसेच महानगरपालिकेने आपल्या धोरणांचा पुनर्विचार करून उद्योजकांशी विचारविनिमय करून योग्य भूमिका घेतल्याशिवाय हे संकट टळणार नाही. अशा विधायक इच्छाशक्तीची राज्यकर्त्यांकडून अपेक्षा करावी काय ?

दै. लोकमत – १३/८/१९९८

# चिंचोली औद्योगिक वसाहतीच्या समस्यांचा अभ्यास

**सोलापूर हे 'गिरणगाव' म्हणून एकेकाळी प्रसिद्ध होते. आज ह्या उद्यमशील शहराची सार्वत्रिक पडझड होत आहे. नवे उद्योग येण्याऐवजी, आहे ते उद्योग बंद पडताहेत. मग ह्या शहराचे औद्योगिक भवितव्य काय? नव्याने उदयाला आलेल्या चिंचोली औद्योगिक वसाहतींमध्ये अद्ययावत उद्योग येतील अशी अपेक्षा होती. मात्र तसे घडले नाही याची कारणे काय आहेत याचा शोध घेण्याचा प्रयत्न हिराचंद नेमचंद महाविद्यालयातील एम.बी.ए.च्या विद्यार्थ्यांनी केला. त्यांच्या अहवालावर आधारित माहिती या स्तंभातून क्रमशः देत आहोत.**

सोलापूरच्या औद्योगिक वाढीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान असणाऱ्या चिंचोली औद्योगिक वसाहतींचा सर्वांगीण विकास होण्यामध्ये नेमक्या अडचणी व आधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर असणाऱ्या उद्योगांना एम.आय.डी.सी.कडून पायाभूत सुविधा खऱ्या अर्थाने मिळत आहेत की नाही त्यांच्या सद्य स्थितीतील समस्या कोणत्या आहेत याविषयीचा छोटेखानी अभ्यास हिराचंद नेमचंद महाविद्यालयातील एम.बी.ए.च्या व्यवस्थापनशास्त्र अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांनी नुकताच पूर्ण केला. ह्या अभ्यासातील निष्कर्ष व सूचना योग्य उपाययोजनांसाठी शासनाकडे पाठविण्याचा विचार आहे. एम.बी.ए. साठीच्या अभ्यासक्रमांचा अंगभूत भाग म्हणून अल्पावधीतच हा अभ्यास पूर्ण केला असला तरीही त्यातून अनेक विधायक सूचना पुढे आल्या आहेत. त्यांचा सर्व संबंधितांनी विचारकरून योग्य हालचाली केल्यास 'गिरणगाव' समाजल्या जाणाऱ्या ह्या उद्यमशील सोलापूरच्या औद्योगिक विकासाला निश्चित दिशा मिळेल. जुनी

गिरणी, त्यानंतर लक्ष्मी-विष्णु यासारख्या सुप्रसिद्ध वस्त्रोद्योगांच्या दुर्दैवी अस्तानंतर, शिवाजी वर्क्स, नरसिंग गिरजी व सहकारी सूत गिरण्यांना लागलेली घरघर चिंताजनक आहे. यंत्रमागांना मंदीच्या सावटांमुळे कुंठीतावस्था आलेली आहे. अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. व होटगी रस्त्यावरील इंडस्ट्रीयल इस्टेटमध्येदेखील अनेक उद्योग आजारी पडत आहेत. त्यामुळे शहरातील रोजगाराची संधी दिवसेंदिवस कमी होत आहे. या पार्श्वभूमीवर उद्योगवाढीसाठी एकमेव आशेचा किरण असलेल्या चिंचोली एम.आय.डी.सी. कडून सोलापूरकरांच्या खूप मोठ्या आशा आहेत.

## चिंचोली वसाहत निर्मितीची पार्श्वभूमी

सोलापूरपासून १६ कि.मी. अंतरावर राष्ट्रीय महामार्गावरील चिंचोली परिसरात वसलेल्या औद्योगिक वसाहतीसाठी १९८९ साली भूसंपादन करण्यात आले. प्रत्यक्षात व्यावसायिक उत्पादन १९९२ मध्ये सुरू झाले. एकंदरीत १०५८ हेक्टर संपादित जमिनीमध्ये १०२२ हेक्टर जागेमध्ये अद्ययावत सोयीसुविधांसह औद्योगिक विकास वसाहत उभारण्याची ही महत्त्वाकांक्षी योजना आहे. यापूर्वी अक्कलकोट रोडवरील २१६.४८ हेक्टर जागेवर वसलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये ६०० उद्योगांची सोय करण्यात आली. परंतु त्यामध्ये बहुतांशी टेक्सटाईल संबंधित उद्योग सुरू झाले. नवीन तंत्रज्ञान व आधुनिक उत्पादने सुरू झाले नाहीत. १९७६ पासून व औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योगांना आपले प्रश्न अद्यापही सोडविता आले नाही. त्यामध्ये आजही रस्ते, वीज, पाणी, वाहतुकीची व्यवस्था यासारख्या पायाभूत सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे केमिकल्स, औषधी, इंजिनिअरिंग, विशेषतः (रेडिमेड) तयार कपडे यासारख्या सोलापुरातील उपलब्ध कच्च्या मालाचा वापर करून नवीन उद्योग सुरू करण्याकडे विशेष लक्ष दिले गेले नाही. म्हणून चिंचोली परिसरामध्ये राष्ट्रीय महामार्गावर, अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध असणारी औद्योगिक वसाहत उभारण्यात आली. गेल्या सहा वर्षामध्ये या वसाहतींचा देखील अपेक्षेप्रमाणे विकास होऊ शकलेला नाही. त्यामध्ये उद्योजकांचे स्वतंत्र प्रश्न जसे अहोत तसेच एम.आय.डी.सी. कडून आवश्यक सोयीसुविधा मिळण्यामध्ये देखील अडचणी आहेत. अगदी साध्या पाणी, वीज यासारख्या सुविधांचा

अभाव असल्याने उद्योजक इथे येऊ शकत नाही. साहजिकच कोट्यावधींचा खर्च करून वसाहत उभी राहिली, मात्र उद्योग नाहीत अशी परिस्थिती आहे.

**एकंदरीत सद्यःस्थिती अशी आहे.**

१९८८-८९ साली चिंचोली परिसरातील शेतकऱ्यांकडून औद्योगिक वसाहतीसाठी भूमी संपादित करण्यात आली. १९९० मध्ये रितसर प्लॉटस् पाडण्यात आले. १९९१ मध्ये उद्योजकांना प्लॉटस् देण्यात आले. त्यामध्ये ए, बी, सी व डी ह्या भागांमध्ये सर्वसाधारपणे कोणत्याही प्रकारच्या उद्योगांना प्लॉटस् देण्याचे ठरले तर 'के' ब्लॉकमध्ये होजियरी व तयार कपड्यांसाठी, 'एल'मध्ये चर्मोद्योगांसाठी व 'पी' विभागामध्ये विशेष सेवा, हॉटेल, बँका, पोलीस स्टेशन, फायर स्टेशन व पब्लिक युटिलीजसाठी प्लॉटस् राखीव ठेवण्यात आले. एम.आय.डी.सी.चे कार्यालय व कॉमन फॅसिलीटी सेंटर सध्या 'पी' ब्लॉकमध्ये अद्ययावतपणे बांधण्यात आले.

एकंदरीत 'अे' भागामध्ये २०२, बी मध्ये १२, सी मध्ये २२१, डी मध्ये ४, के मध्ये ५६, तर एल मध्ये ४६ प्लॉटस्ची विभागणी केलेली आहे. त्यापैकी चर्मोद्योग (एल) व निटवेअर (के) हे दोन्हीही उद्योग स्वतंत्र एफ्लुअंट ट्रिटमेंट प्लॅट' शिवाय चालविणे शक्य नसलेले त्यांच्यासाठी स्वतंत्र जागा ठेवून त्याभध्ये ईटीपी साठी जागा राखीव ठेवण्यात आले. निटवेअरपैकी काही उद्योग सुरू झाले तरीही त्यांच्यासाठी ईटीपी ची अद्यापही व्यवस्था नसल्याने त्यांना प्रक्रिया झालेले पाणी (दूषित) उघड्यावर सोडावे लागते. चर्मोद्योगांसाठी राखून ठेवलेले ४६ प्लॉटस् पूर्णपणे रिकामे आहेत. त्यांच्या प्रश्नांचा स्वतंत्रपणे विचार करू या.

अगदी सुरुवातीला १९९२ मध्ये जेव्हा व्यावसायिक उत्पादनाची सुरुवात झाली. त्यावेळी संपूर्ण निर्याताभिमुख समजली जाणारी सिमको स्पिनर्स, वामसी फॉर्माज, नवकॉम ऑईल्स, वेस्टर्न हॅचरीज, यासारख्या नवीन उत्पादनांची चांगली सुरूवात झाली. परंतु त्यानंतर मात्र गेल्या सहा वर्षात विशेष असे उद्योग आले नाहीत. ढोबळ मानाने सद्यःस्थितीत फक्त ५२ उद्योग कार्यरत असून ५ उद्योग आजारी व ८ उद्योगांचे बांधकाम चालू आहे. ह्याचा अर्थ अद्यापही मोठ्या प्रमाणात औद्योगिक वसाहतीतील प्लॉटस् रिकामे आहेत.

त्यापैकी बहुतेकांचे वाटपही झालेले आहे. ते उद्योजक उद्योग का सुरू करीत नाहीत? ज्या नवउद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी जागा हवीय त्यांचेसाठी आता योग्य प्लॉटस् शिल्लक नाहीत, अशी एकंदरीत परिस्थिती आहे.

### योग्य कृतीची गरज

ह्या परिस्थितीचा खरे तर सखोल अभ्यास करून योग्य उपाययोजना करावी लागणार आहे. त्यासाठी एम.बी.ए. (हिराचंद नेमचंद महाविद्यालय) विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासक्रमाच्या मर्यादेत राहून का होईना पुढाकार घेतला. त्यांनी नॉर्थ सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन व एम.आय.डी.सी. अधिकाऱ्यांच्या सहकार्याने प्रत्यक्ष उद्योजक व व्यवस्थापकांच्या मुलाखती घेऊन समस्या शोधल्या. त्यांचेकडून व्यवहार्य सूचनाही घेतल्या. अर्थात विधायक विकासाच्या भूमिकेतून अहवाल लिहीला. तो अहवाल सलगपणे जनतेच्या, विशेषतः लोकप्रतिनिधी व उद्योग विकासाची भूमिका असणाऱ्यांच्या माहितीस्तव कृतिसाठी क्रमशः देत आहे. याविषयी विचार मंथनाची व योग्य उपायाची अपेक्षा आहे.

दै. लोकमत - ३/१२/१९९८

# चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील समस्यांचा अभ्यास अहवाल

हिरांचद नेमचंद महाविद्यालयातील एम.बी.ए. च्या विद्यार्थ्यांनी चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांच्या समस्या अभ्यासताना, एकूण उद्योगांचे चार प्रकारे विभागणी केली. त्यामध्ये प्रत्यक्षात उत्पादन चालू असणारे, नव्याने येऊ घातलेले, बांधकाम चालू असणारे, सध्या चालू असून आजारीकरणाच्या फेऱ्यात अडकलेले व रिकाम्या जागेचे प्लॉटधारक अशा चार विविध प्रकारच्या उद्योजकांचा समावेश आहे. त्यातील प्रत्येकांचे प्रश्न वेगळे आहेत. सध्या कार्यरत असणाऱ्या एकूण ५२ उद्योगांपैकी ३४ उद्योजकांशी वा व्यवस्थापकांशी प्रत्यक्ष भेटून समस्या जाणून घेतल्या. त्यापैकी संपूर्ण उद्योगांची यंत्रशक्ती वापरणारे फक्त १० उद्योग आढळून आले. उर्वरित उद्योगांची उपलब्ध यांत्रिक क्षमतादेखील पूर्णपणे वापरली जात नाही. त्यासाठी काही स्वतःचे प्रश्न असले तरीही सामुहिक समस्यांचाही निश्चितपणे परिणाम असल्याचे आढळून आले. वरचेवर वीज पुरवठा खंडित होणे, पाण्याचा अपुरा पुरवठा, अवाजवी ऑक्ट्राय आकारणी, बँकिंग सेवेचा अभाव, यासारख्या अडचणी उद्योजकांनी सांगितल्या. उद्योग सुरू करण्याच्या तयारीत असलेले, बांधकाम चालू असणाऱ्या उद्योजकांनी तांत्रिक अडचणी प्रामुख्याने सांगितल्या. आजारीकरणाच्या फेऱ्यात अडकलेल्या ५ पैकी फक्त एका उद्योजकांशी प्रत्यक्ष संपर्क होऊ शकला. त्यामध्ये त्यांनी उद्योगनिहाय कारणे सांगितली. मात्र चिंचोली औद्योगिक वसाहतीतील सद्यःस्थितीमध्ये २५१ रिकामे प्लॉटस् आहेत. त्यांची विक्रीही झालेली आहे. मात्र त्याठिकाणी प्लॉटधारकांनी उद्योग सुरू केलेले नाहीत. त्यापैकी बहुतेकांना संपर्काचा प्रयत्न केला. तरीही फक्त ३० प्लॉटधारकांशी प्रत्यक्ष भेटून संपर्क होऊ शकला. त्यामध्ये १२

लोकांनी आपले पूर्वनियोजित उत्पादन बदलून अन्य प्रकारच्या उत्पादनाकडे वळणार असल्याचे सांगितले. तर काहींनी केवळ इन्व्हेस्टमेंट म्हणूनच हे प्लॉटस् विकत घेऊन ठेवले आहेत. बहुतेकांनी (६०%) प्लॉटधारकांनी उद्योग सुरू करण्यासाठी कोणतेच प्रयत्न केले नाहीत व सध्यातरी करण्याची इच्छा नाही. अशा प्लॉटधारकांबाबत मात्र एम.आय.डी.सी. ची भूमिका कोणती ? नवीन उद्योग सुरू करण्यासाठी आज एखादा उद्योजक प्लॉट मागणीसाठी गेल्यास 'हाऊसफुल्ल' बोर्ड दाखविला जातो. त्याला मात्र अधिक किमतीने (दलालामार्फत) 'सेकंडरी' मार्केटमधून विकत घ्यावा लागता. अशी एकंदरीत परिस्थिती आहे.

## जनतेचेही सहकार्य हवे

यावरून असे चित्र दिसते की, एकूणच चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील उद्योगांच्या समस्यांचे निराकरण दोन मार्गांनी करता येणे शक्य आहे. राज्य शासन, वित्तिय संस्था, एम.आय.डी.सी. चे उच्च पातळीवरील व्यवस्थापन यासारख्या मोठ्या पातळीवरील प्रश्नांचा आय.डी.सी. अधिकारी वर्ग, महानगरपालिका, वीज मंडळ वा तत्सम लोकांकडून सोडविण्याजोग्या प्रश्नांवर उद्योजक, अधिकारी वर्ग व लोकप्रतिनिधींनी योग्य विचारविनिमय करून परस्पर सामंजस्याने ते प्रश्न सोडवावेत. 'डो' झोनमुळे मिळणारे फायदे उद्योजकांना व्यवस्थितपणे पदरात पडतील अशी व्यवस्था हवी. उद्योगांसमोरील रोजच्या व्यवहारातील प्रश्न स्थानिक अधिकारी वर्गाच्या सहाय्याने सोडविण्यासाठी एखादी यंत्रणा उभारता येणे शक्य आहे. त्यानंतर वरच्या पातळीवरील प्रश्न, सामुहिक भूमिकेतून सोडविण्यासाठी एकट्या उद्योजकांचा रेटा कमी पडतो. त्यांना जनतेची व लोकप्रतिनिधींची समर्थ साथ हवी.

## अगदी किरकोळ गोष्टी नाहीत

अभ्यासाअंती प्रामुख्याने, उद्योजकांनी मांडलेल्या समस्या म्हणजे एम.आय.डी.सी.मध्ये कायमस्वरूपी पुरेशा पाण्याची व्यवस्था व्हावी. वीजपुरवठा खंडित न होता योग्य पद्धतीने पुरेसा होण्यासाठी २२० के.व्ही. चे एम.एस.ई.बी. सब स्टेशन लवकरात लवकर कार्यान्वित करावी. ही आद्योगिक वसाहत

शहरापासून १६ कि.मी. अंतरावर असलेने, त्या परिसरामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस स्टेशन सुरू करावे. केमिकल्स, औषधी, टेक्स्टईल्ससारख्या उद्योगांमध्ये अपघातप्रसंगी सहाय्य करणारी 'फायर फायटिंग' व्यवस्था असणारे फायर स्टेशन निर्माण करावे. हॉस्पिटल, पोस्ट सर्व्हिस, वेअर हाऊस, बॅंका, चांगले हॉटेल, राहण्यासाठी गेस्ट हाऊस यासारख्या गोष्टींची देखील गरज आहे. अर्थात यासाठी उद्योजकांनी देखील एकत्रित येवून आपले प्रश्न सोडविण्यासाठी संघटितरित्या प्रयत्नशील राहिले पाहिजे. याच भूमिकेतून चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांनी एकत्रित येवून १९९५ मध्ये नॉर्थ सोलापूर इंडस्ट्रीजची स्थापना केली.

**नॉर्थ सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन**

नॉर्थ सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षामध्ये बऱ्याच अंशी स्थानिक पातळीवरील प्रश्न सोडविण्यात उद्योजक यशस्वी झालेले दिसतात. सिटी बसची व्यवस्था, टेलिफोन सेवेमध्ये सुधारणा, टॅंकरने पाण्याचा पुरवठा, ट्रॅक टर्मिनस, दिवाबत्ती, रस्ते इ. गोष्टी मिळाल्या. मुख्य म्हणजे एम.एस.ई.बी., एम.आय.डी.सी., जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर महानगरपालिका, प्राधिकारण मंडळे इ. उद्योजकांच्या समस्या सामूहिकपणे मांडल्या जात आहेत. त्यावर उपायही सामूहिक भूमिकेतून योजले जात आहेत. सभासद उद्योजकांसाठी रिक्रिएशन क्लब बांधण्यासाठी अत्यल्प दराने एक एकर जमीनही असोसिएशनने मिळविली. मिटींग घेण्यासाठी जागाही मिळाली. एम.आय.डी.सी. चे अधिकारी आठवड्यातून दोन दिवस त्या भागामध्ये कार्यरत आहेत. पूर्वीपेक्षा परिस्थितीमध्ये बदल झालेला आहे, हे खरे आहे.

मात्र हे पुरेसे नाही. चिंचोली औद्योगिक वसाहतीमध्ये उपलब्ध प्लॉटस्‌पैकी 'ए' मध्ये २०२, 'बी' मध्ये १२, 'सी' मध्ये २२१, 'डी'मध्ये ४, 'के' मध्ये ५६, 'एल'मध्ये ४६ असे एकंदरीत ५४१ प्लॉटस्‌पैकी फक्त ५२ उद्योग कार्यरत आहेत. त्यातही सर्वजण नॉर्थ सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनमध्ये सक्रीय सहभासग देत नाहीत अशी परिस्थिती आहे. एकूण चिंचोली एम.आय.डी.सी उद्योगांनी फुलली पाहिजे. नवे उद्योग सुरू झाले पाहिजेत.

त्यातून रोजगार उपलब्ध होईल. शहराचा आर्थिक विकास होईल. त्यासाठी नियोजनबद्धपणे कृति योजना आखून ती कार्यान्वित करण्यासाठी सर्वांगीण प्रयत्न व्हायला हवेत. 'के' व 'एल' भागातील बहुसंख्य राखीव प्लॉटस् अद्यापही मागणी असूनही विक्रीस गेले नाहीत. त्यामध्ये उद्योजकांच्या काही अडचणी आहेत. एम.आय.डी.सी. च्या नियमांचा व प्रत्यक्ष व्यवहाराचा ताळमेळ बसत नाही. परिणामी जागा आहे, उद्योजक तयार आहेत. राबणारे हातही आहेत, तरीही उद्योग सुरू होवू शकत नाहीत. अशी परिस्थिती आहे. कोट्यावधींचा खर्च करून एम.आय.डी.सी. ची उभारणी केली. मात्र त्याचा योग्य वापर होत नाही, हे दुष्टचक्र कसे थांबणार हा खरा प्रश्न आहे.

दै. लोकमत - १७/१२/१९९८

# चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील समस्यांचा अभ्यास अहवाल

चिंचोली औद्योगिक वसाहतीमधील 'के' ब्लॉकमधील ५६ प्लॉटस् 'निटवेअर' म्हणजेच होजिअरी वा तत्सम उद्योगांसाठी राखीव आहेत. त्यासाठी आवश्यक सोयीसुविधांचा अभाव असल्याने उद्योग सुरू होऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे 'एल' ब्लॉकमध्ये ४६ प्लॉटस् पूर्णपणे चर्मोद्योगांसाठी राखीव असून अद्याप एकही उद्योग सुरू होऊ शकलेला नाही. ह्या दोन प्रकारच्या उद्योगांचा विकास का होत नाही याचा शोध घेण्याचा अभ्यासामध्ये प्रयत्न झाला. प्रत्यक्ष चर्मोद्योगांशी व निटवेअरशी संबंधित प्लॉटधारक, त्यांच्या संघटना पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून अडचणींविषयी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**चर्मोद्योगासाठी पोषक परिस्थिती**

सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सातारा परिसरातील हवामान शेळी, मेंढी व गोपालन करण्यासाठी उपयुक्त असल्याने मोठ्या प्रमाणात इथे चमड्याचा व्यवसाय आहे. प्रामुख्याने सोलापूर शहरातून हैद्राबाद, चेन्नईपासून ते देशाच्या दुसऱ्या टोकापर्यंत 'हाईड' विकली जाते. त्यावर 'साफ्ट' लावून व अन्य प्रक्रिया करून मोठ्या टॅनरीजना विकून ही व्यापारी मंडळी कोट्यवधींचा नफा कमवितात. ह्या टॅनरीजमधून प्रक्रिया करून चांगली, वापर योग्य चामडी चप्पल, बूट, बॅगा, पर्सेससह अनेक उत्पादनासाठी विशेषतः निर्यातीसाठी देखील मोठ्या प्रमाणात उपयोगी पडते. सोलापुरामध्ये 'हाईड' मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. तर त्यापासून प्रक्रियेसाठी टॅनरीज व इतर अनुषंगिक उपक्रम का सुरू होत नाहीत? एम.आय.डी.सी. चिंचोलीमध्ये ह्या सर्व जमेच्या गोष्टी

लक्षात घेऊन ४६ प्लॉटस् चर्मोद्योगांसाठी स्वतंत्रपणे राखून ठेवण्यात आले. मात्र अद्याप त्याठिकाणी एकही उद्योग सुरू झालेला नाही. सोलापुरातील डेक्कन हाईडस् अँड स्किन मर्चंटस् असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, चिंचोली एम.आय.डी.सी. मधील प्लॉटस्‌ची किंमत खूप असून ती आम्हाला परवडणारी नाही. याविषयी अधिकाऱ्यांना आम्ही आधीच सांगितले आहे की, ३५ ते ४० रुपये प्रत्येकी चौरस मीटरसाठी दर निश्चित केल्यास सर्वच्या सर्व प्लॉटस् आम्ही त्वरीत खरेदी करू, उद्योगही सुरू करू. एम.आय.डी.सी. च्या प्रचलित दरापेक्षा ही मागणी खूप कमी असल्याने त्यावर आजपर्यंत विचार होऊ शकलेला नाही, अस कळते. कोट्यावधी रुपये खर्च करून नवे उद्योग सुरू करण्यासाठी एम.आय.डी.सी. उभी केली. मात्र ती पूर्णपणे रिकामी आहे. त्यामुळे होणारे नुकसान तुलनेने अधिक आहे. शासकीय नियम व उद्योजकांच्या व्यावहारिक अडचणी यांची योग्य सांगड घालून हा प्रश्न सोडविण्याची गरज आहे. त्यासाठी विशेषत्वाने एम.आय.डी.सी., नॉर्थ सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन व लोकप्रतिनिधी पुढाकार घेवून चर्मोद्योगासाठी उत्सुक उद्योजकांनी अडचणीवर मात करून हा ४६ प्लॉटस् चा रिकामा विभाग उद्योगांनी फुलविला पाहिजे.

### निटवेअरसाठी पुरेसे पाणी हवे

निटवेअर उद्योगांसाठी ‘के’ ब्लॉकमध्ये ५६ प्लॉटस् राखीव आहेत. त्यांचीही हीच गत आहे. सध्या निटवेअर कॉम्प्लेक्समध्ये काही उद्योग सुरू आहेत. परंतु अद्यापही ८०% हून अधिक प्लॉटस् रिकामे आहेत. धाडस करून उद्योग सुरू केलेल्यांच्या पाणी, वीज यासारख्या निटवेअरसाठी लागणाऱ्या मूलभूत सुविधांविषयीच्या अडचणी लक्षात घेवून नवीन उद्योजक चिंचोली एम.आय.डी.सी.मध्ये येण्याचे धाडस करीत नाहीत. सध्या चालू असलेल्या उद्योजकांशी सक्षम भेटून चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, उद्योग सुरू करण्यापूर्वी एम.आय.डी.सी. कडून भरपूर पाणी, वीज पुरवठा, ड्रेनेज, रस्ते व वाहतुकीच्या सुविधा देण्याविषयीचे आश्वासन दिले गेले. प्रत्यक्षात मात्र इथे १९९५ ते १९९८ या वर्षी प्रचंड पाण्याचा तुटवडा, सहन करावा लागला. निटवेअर उद्योग पाण्याशिवाय चालूच शकत नाही. नाईलाजाने हे पाणी

टँकर्समधून अधिक पैसे देवून विकत घ्यावे लागते. मुख्य म्हणजे या उद्योगांतून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचे देखील नियोजन नाही. त्यावर योग्य प्रक्रिया करून, त्यातील आरोग्यास, पर्यावरणात अपायकारक गोष्टींचे निर्मूलन करणारी कोणतीही व्यवस्था नाही. ड्रेनेजची व्यवस्था नाही. जी वॉटर ट्रीटमेंटची व्यवस्था उपलब्ध आहे. त्यामध्ये क्लोरिनचा वापर अधिक झाल्याने त्या पाण्याने रंगणी केल्यामुळे प्रक्रिया बिघडते. कापड खराब होते ही वस्तुस्थिती आहे.

## दूषित पाण्याची नियोजनबद्ध व्यवस्था

प्रामुख्याने चर्मोद्योग व निटवेअर दोन्हीही उद्योगांसाठी भरपूर पाणी लागते. त्या उद्योगातील सांडपाणी, प्रक्रियेतून वापरले जाणारे पाणी यांची विल्हेवाट लावण्यापूर्वी त्याचा जमीन व पर्यावरणाला धोका होवू नये म्हणून 'एफ्लुअंट ट्रिटमेंट' करण्यासाठी जी व्यवस्था लागते. त्याचीही पुरेशी व्यवस्था केली पाहिजे. या दोन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी झाल्याशिवाय हे उद्योग खऱ्या अर्थाने कसे विकसित होतील?

सोलापूर हे कापड उद्योगांसाठी प्रसिद्ध असलेलं गिरणगाव. त्यामुळे 'निटवेअर' साठी आवश्यक कच्चा माल, मनुष्यबळ, यांत्रिक व तांत्रिक सहाय्य सहजपणे मिळू शकते. तसेच चर्मोद्योगांसाठी लागणारे 'हाईड' देखील इथून मोठ्या प्रमाणात बाहेर जाते. त्यांचा कच्चा माल म्हणून टॅनरीज वा तत्सम उद्योगांसाठी गरज असते. त्यामुळे चर्मोद्योगही मोठ्या प्रमाणात सुरू होवू शकतात. स्थानिक कच्चा माल वापरून किफायतशीर चालू शकणाऱ्या ह्या उद्योगांना फक्त गरज आहे ती मूलभूत सोयीसुविधांची. मुबलक पाणी व ड्रेनेज सिस्टीमची. अर्थात ह्या उद्योगांसाठी एम.आय.डी.सी. ने प्लॉटस् राखीव ठेवून सुरुवातीपासूनच काळजी घेतली आहे. काही नियम व उद्योजकांच्या अडचणींचा ताळमेळ बसत नसेल तर त्यातून मार्ग काढायला हवा.

पर्यावरण रक्षण, प्रदुषणनियंत्रण, दूषीत पाण्याचे नियोजन ही एम.आय.डी.सी.ची प्रमुख जबाबदारी आहे. तशी उद्योजकांचीही आहे. त्यांनीही त्यासाठी सक्रीयपणे प्रयत्न करायला हवे. एम.आय.डी.सी. ने ९० एकर आरक्षित जागेमध्ये वृक्षसंवर्धन करण्याचे ठरविले. त्यासाठी लागणारे

पाणी, एका मोठ्या प्रोसेसिंग युनिटमधून प्रक्रिया करून शुद्ध झालेले पाणी देण्याचे ठरले. त्यासाठी ६०० मीटर लांब पाईपलाईन टाकून मोठे कलेक्शन टँकही बांधण्यात आले. त्या टँकमधून पाणी पंपने बाहेर काढून सर्वत्र झाडांना द्यावयाचे आहे. त्याप्रमाणे ९० एकर जागेमध्ये एम.आय.डी.सी. ने वृक्षारोपणही केले. टँकही बांधण्यात आले. मात्र पंपची व्यवस्था नाही. पाणी सर्वत्र पोचविण्यासाठी व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे हा ९० एकरांचा सुंदर वनराईने सजणारा भाग जंगलमय बनल्याचे दिसते.

### हे उद्योग त्वरित सुरू व्हावेत

विशेषतः अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त अशी एम.आय.डी.सी. ची चिंचोली परिसरामध्ये निर्माण करण्याची भूमिका घेवून १९९२ पासून टेक्सटाईल, यंत्रमाग वा तत्सम उद्योगांपेक्षा नवीन तंत्रज्ञान व आधुनिक उपकरणांचा वापर करून, उत्पादन करणारे प्रगतशील उद्योग उभारण्याची ही योजना आहे. त्यामध्ये प्रामुख्याने स्थानिक कच्चा माल, मनुष्यबळ, कौशल्य व सोयीसुविधांचा उपयोग करून 'लेदर' व 'निटवेअर' उद्योग विकासासाठी विचार होवून त्याविषयीची तरतूद असून, उद्योजक तयार असून ही परिस्थिती यावी हे योग्य नव्हे. त्यातील व्यावहारिक अडचणी दूर होऊ शकतात. त्याविषयी त्वरित पाऊले उचलली जावीत.

दै. लोकमत - २८/१२/१९९४

# चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील समस्यांचा अभ्यास अहवाल

चिंचोली औद्योगिक वसाहतीच्या समस्या अभ्यासल्यानंतर, हिराचंद नेमचंद महाविद्यालयातील एम.बी.ए. विद्यार्थ्यांनी काही उपयुक्त सूचनाही केल्या आहेत. त्यांची व्यावहारिकता तपासून जर विधायक भूमिकेतून सर्वांच्या प्रयत्नातून अंमलात आणल्या तरी परिस्थिती निश्चितपणे सुधारेल. अक्कलकोट रोडवरील एम.आय.डी.सी. मधील उद्योजकांना वाटणाऱ्या असुविधा लक्षात घेऊनच चिंचोली औद्योगिक वसाहत सर्व सोयी सुविधांनी युक्त अशी अद्ययावत करण्याची योजना बनविण्यात आली. त्यानुसार मोठी जागाही संपादन करण्यात आली. उद्योगासाठी लागणारे सर्वात महत्वाचे पाणी. त्यासाठी एम.आय.डी.सी. ने स्वतंत्र पाणी शुद्धीकरण योजना केली. पाकणी येथून जॅकवेलच्या माध्यमाने पाणी चिंचोलीमध्ये आणले जाते. दररोज २७ एमएलडी क्षमतेची ही योजना असून विशेषत: निटवेअर, टेक्स्टाईल्स, फार्मासिटीकल्स उद्योगांना पाणीपुरवठा करण्यास अपुरी आहे. सध्याची वॉटर ट्रीटमेंट प्लँटदेखील व्यवस्थित नाही. वॉटर फिल्टरेशन सिस्टम सुस्थितीत नसते. प्रसंगी क्लोरीनचे प्रमाण अधिक झाल्याने पाणी प्रोसेसिंग युनिटस्‌मध्ये रंगणी कामासाठी वापरण्यायोग्य नसल्यामुळे नुकसानी होत असल्याची उद्योजकांनी तक्रार केली. याशिवाय पुरेशी क्षमता नसलेने पाणी टँकरने विकत घ्यावे लागते. पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी त्वरित उपाययोजना केली पाहिजे. त्यासाठी सोलापूर महानगरपालिकेची देखील मदत घेता येईल. परंतु त्यामध्ये अडचण अशी येऊ शकेल की, ग्रीष्म ऋतूत, पाण्याचा तुटवडा भासेल तेव्हा चिंचोली उद्योगांचे पाणी कमी करून सोलापूरकरांना प्राधान्याने पिण्याचे पाणी पुरविले जाईल. दुसरे म्हणजे सध्या असलेल्या पाण्याच्या दरापेक्षा सोलापूर महानगरपालिकेच्या

पाण्याचे दर दुप्पट होतील. यासाठी उद्योजकांची मागणी अशी आहे की, चिंचोली औद्योगिक वसाहतीसाठी स्वतंत्र पाईप टाकून उजनी जलाशयामधून अथवा एकरुख तलावातून पाण्याची व्यवस्था करावी.

**नियमित वीज पुरवठा अत्यावश्यक**

दुसरी मुख्य अडचण म्हणजे अनियमित व खंडित वीज पुरवठा. एमआयडीसी सुरू करतानाच एम.एस.ई.बी. ला २०,००० चौरस मीटर्सइतकी जागा १३२ केव्हीए सबस्टेशन बांधण्यासाठी देण्यात आली. त्याप्रमाणे एमआयडीसीने कार्यवाही सुरू केली. परंतु त्या जागेसंबंधी वाद उपस्थित होऊन सदर प्रकरण न्यायप्रविष्ट झाले. याचा अर्थ सुरुवातीला योग्य सर्वेक्षण वा तत्सम खबरदारी घेण्यात आली नाही. परिणामी हे काम रखडले. त्यामुळे अद्ययावत समजल्या जाणाऱ्या चिंचोली औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांना खंडित वीज पुरवठा, अनियमित, अपुरा वीज पुरवठा या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. मुख्य म्हणजे ज्या उद्योगांची उत्पादन प्रक्रिया सतत (कन्टिन्युअस प्रोसेस) असते. त्यांना मात्र याचा जबरदस्त फटका बसतो. आजही निम्मे प्लॉटस् रिकामे आहेत, तर ही अवस्था आहे. जर सर्व प्लॉटस्‌मधून उद्योग सुरू झाले तर काय होईल? असा प्रश्न आहे. मात्र या प्रकरणी नॉर्थ सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनने पुढाकार घेऊन स्थगिती उठविण्यासाठी एमआयडीसी, भूसंपादन खाते व सरकारी खात्यातील वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा केला. त्यामध्ये यश आले व दि. १२ ऑगस्ट ९८ रोजी स्थगिती उठली व १३२ के.व्ही. क्षमतेच्या या केंद्राची पुनर्बांधणी सुरू झाली. परंतु हे त्वरित पूर्ण झाले तर येत्या ग्रीष्म ऋतूमध्ये होणारा संभाव्य विजेचा तुटवडा टाळता येणे शक्य आहे. त्यासाठी एमआयडीसी व एमएसईबी दोन्हीही स्वायत्त महामंडळांनी एकत्रित येऊन ही अडचण दूर करावी. म्हणजे खंडित वीजपुरवठ्याची समस्या राहणार नाही.

**रिकाम्या प्लॉटधारकांचे काय ?**

ह्या औद्योगिक वसाहतीतील रिकामे प्लॉटस् ज्या उद्योजकांनी विकत घेतले आहेत. परंतु अद्याप उपयोग सुरू केलेले नाहीत. अशांची बैठक बोलावून लोकप्रतिनिधी, एमआयडीसी, डीआयसी, अधिकारी व नॉर्थ सोलापूर

इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या प्रयत्नांमधून त्यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न झाला तर उद्योग सुरू होतील. चर्मोद्योगांसाठी राखीव प्लॉटस् रिकामे ठेवून नुकसान सोसण्यापेक्षा व्यावहारिक तोडगा काढणे सोयीस्कर ठरेल. निटवेअर व अन्य उद्योजकांच्या सोयी व सुविधांविषयीच्या नेमक्या अडचणी जाणून घेऊन स्थानिक एमआयडीसी व डीआयसी पातळीवरील गोष्टी अग्रक्रमाने द्याव्यात अन्यथा हे प्लॉटस् संबंधितांकडून परत मिळवावेत व ते नवीन उद्योजकांना द्यावेत. साधे बिल्डींग कंप्लीशन सर्टिफिकेटस् मिळविण्यासाठी देखील उद्योजकांना अडचणी आहेत. डीआयसी ऑफिसमधूनदेखील नवउद्योजकांना प्रोत्साहनपर वागणूक मिळण्याऐवजी निरुत्साही बनविले जात असल्याच्या भावना उद्योजकांनी व्यक्त केल्या. एमआयडीसीचे कार्यालय अक्कलकोट रोडवरील ठिकाणी असल्याने चिंचोली उद्योजकांना अडचणी येतात. असोसिएशनने उच्चपातळीवर प्रयत्न करून आठवड्यातून दोन दिवस चिंचोली येथील सीएफसी बिल्डींगमध्ये हे कार्यालय कार्यरत केले. परंतु हे पुरेसे नाही. जर चिंचोली औद्योगिक वसाहत खऱ्या अर्थाने सर्वांगाने फुलवायची असेल तर पूर्णवेळ, पूर्ण लक्ष घालणारे, परिपूर्ण कार्यालय हवे.

**विधायक सामूहिक प्रयत्न हवेत**

याशिवाय ऑक्ट्रॉय रिफण्ड, डी झोनच्या सवलती, टेलिफोन सेवा, सेल्स टॅक्स यासारखे न्याय अधिकार मिळविण्यामध्येदेखील उद्योजकांना अडचणी येत असल्याचे सांगण्यात आले. त्याविषयी संबंधितांना योग्य उपाय त्वरित करण्याची गरज आहे. औद्योगिक वसाहतीच्या सर्वांगीण विकासामध्ये अत्यावश्यक अशा अंतर्गत रस्ते, ड्रेनेजची व्यवस्था, फायर स्टेशन, पोलीस स्टेशन, बँका, पोस्टल सेवा, शहरापासून नियमित व पुरेशी बससेवा, आरोग्यविषयक सुविधा, चांगली भोजनाची उपहारगृहे, ग्राहक व्यापाऱ्यांसाठी उत्तम राहण्याची व्यवस्था, पुरेशी टेलिफोनची सुविधा इ. गोष्टींची सोय झाल्याशिवाय नवे उद्योग येणार नाहीत. ह्या गोष्टी तातडीने होण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

चर्मोद्योग, केमिकल्स, फार्मासिटीकल्स व प्रोसेसिंग युनिटसारख्या दूषित पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र शासनाच्या योजनेनुसार 'कॉमन एफ्लुअंट

ट्रिटमेंट प्लँट' निर्माण करण्यासाठी संबंधित उद्योगांनी ९०% इतका खर्च द्यावा. २५% रक्कम एमआयडीसीने भरावी व राज्य तथा केंद्र शासनाच्या सहाय्याने पूर्ण करावे. त्या दृष्टीनेही प्रयत्न व्हावेत, अशी एक सूचना अभ्यासकांनी केली आहे.

एकंदरीत अभ्यासाअंती लक्षात आलेल्या समस्यांच्या निराकरणामध्ये स्थानिक एमआयडीसी, डीआयसी कार्यालयांतर्गत, त्यांच्या अधिकार कक्षेतील प्रश्न त्वरित सोडवावेत. त्यानंतर राज्य तथा एमआयडीसी, एमएसईबीसारख्या महामंडळ पातळीवरील प्रश्न सोडविण्यासाठी नॉर्थ सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींच्या सहाय्याने सोडवावेत. यामध्ये प्रसंगी उद्योजकांनी देखील अर्थसहाय्याची विधायक भूमिका घेतली पाहिजे, तरच ही चिंचोली औद्योगिक वसाहत वाढेल, खऱ्या अर्थाने फुलेल. १९९९ वर्षारंभी असे सामूहिक प्रयत्न होतील ह्या अपेक्षेसह लेखमाला संपवित आहोत.

दै. लोकमत - ३१/१२/१९९८

## औषधनिर्मिती क्षेत्रातील 'स्मृती ऑरगॅनिक्स'ची विस्तार योजना

सोलापुरातील स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेड ही औषध उत्पादनासाठी आग्रमानांकित कंपनी अवघ्या पाच वर्षात ७ कोटी गुंतवणुकीची विस्तारिकरणाची योजना घेऊन येत आहे. येत्या ४ डिसेंबरपासून १८ लाख ८८ हजार ५५० समभागाची विक्री खुल्या बाजारातून होणार आहे. विस्तारीकरणासाठी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ म्हणजे 'एम.एच.एफ.सी.' ने १८० 'लक्ष्मी' व 'सिकॉम' ने १३८ लक्ष रुपयांचे कर्ज मंजूर करून योजनेच्या यशावर आधीच शिक्कामोर्तब केले आहे. उर्वरित निधी खुल्या बाजारातील समभाग विक्रीतून जमा करण्याचा कंपनीचा मानस आहे. दहा रुपये दर्शनी किंमतीच्या उर्वरित १८,८८,५५० समभागापैकी २ लाख अनिवासी भारतीय, परकीय गुंतवणूकदार व वित्तिय संस्थांना ५ रुपये अधिमूल्याने दिले जातील. २ लाख समभाग ५ रुपये अधिमूल्याने महाराष्ट्र राज्य वित्तिय महामंडळाला देण्यात येणार असून १२ हजार समभाग दर्शनी मूल्याने कंपनीतील नोकरवर्गासाठी देण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आले आहेत. अल्पावधीतच आपल्या दर्जेदार उत्पादनामुळे देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर विजय मिळविणाऱ्या ह्या उद्योगाला विस्तारिकरणाची योजना अवघ्या पाच वर्षात करावी लागली. ह्याचे कारण, बाजारपेठेतील मागणी तसेच दिवसेंदिवस वाढत चाललेली कंपनीची निर्यात पूर्ण करण्याची क्षमता नाही. ही क्षमत वाढविण्यासाठी वित्तिय संस्थांनी भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी स्वतःहून पुढे आल्या. तसेच गुंतवणुकदारांनी देखील उत्साह दाखविला. त्यामुळे एकूण ७१५.५२ लक्ष रुपयांची कंपनीची नवी विस्तारिकरणाची योजना निश्चितपणे यशस्वी होईल यात शंका नाही.

खरे तर आपले सोलापूर शहर वस्त्रोद्योग, चादरी, टॉवेल्ससारख्या

उत्पादनासाठी सुपरिचित आहे. अन्य उत्पादने जवळ जवळ नाहीतच असा गैरसमज आहे. स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेडसारख्या इतर तीन-चार औषधी उत्पादन करणाऱ्या उद्योगांव्यतिरिक्त अन्य वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनेही चालू आहेत. मात्र 'स्मृती'ने अत्यंत कमी वेळेत अक्षरशः गरुडझेप घेतली आहे. याचे श्रेय ह्या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालकपदी असलेले ई. पुरुषोत्तम यांना द्यावे लागेल. रसायनशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण घेऊन त्यांनी हैद्राबाद व इतर ठिकाणी औषध निर्मिती क्षेत्रात कार्यानुभव घेतला. मुळातच उद्यमशील असल्याने नोकरीवर ते कधीच समाधानी राहू शकणार नव्हते. आपली नोकरी व सुरक्षित जीणं सोडून, त्यांनी सोलापुरासारख्या नवख्या ठिकाणी विशेषतः औषध निर्मितीसाठी कसलेही वातावरण नसलेल्या जागी १९८९ साली स्मृती ऑरगॉनिक्स लि. ही कंपनी सुरू केली. अक्कलकोट रोडवरील एम.आय.डी.सी. भागातील जागा, प्रकल्प, अहवाल, यंत्रसामुग्री, कारखाना उभारणी व त्यास अनुषंगिक सर्व कामे त्यांनी स्वानुभवाच्या बळावर एकट्याने केली. सुरुवातीला अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले. कच्चा माल, यंत्रसामुग्री साऱ्यासाठीच बाहेरगावी जावे लागे. कारखान्यातून काम करण्यासाठी कुशल कारागिरदेखील उपलब्ध नव्हते. एकूणच औषधी उत्पादनाविषयी सारेच अनिभज्ञ अशा विपरीत परिस्थितीवर अखंड परिश्रम आणि आंतरिक प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी मात केली. कारखाना उभारणीच्या कामाला सुरुवात केल्यानंतर नऊ महिन्यात प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात केली. १९९१ पासून कंपनीने डायलोक्झिनाईड फ्युरोएटसारख्या अमेबिक, डायेरीयासाठी रुग्णांना उपयोगी अॅन्टीअमेबिक मूलभूत औषधाचे उत्पादन करीत आहे. या उत्पादनासाठी कंपनी सुपरिचित आहे. सिप्ला, बुट्स, टाटा फार्मा, वॉकहार्ड, कॅडीला, अॅल्केम, अॅरिस्टोसारख्या मान्यवर कंपन्यांना नियमितपणे औषधी पुरवठा करणाऱ्या 'स्मृती' उद्योगाने देशांतर्गत बाजाराबरोबरच विदेशातही नाव कमविले. ब्रिटन, बांगलादेश, सिंगापूर, फिलिपाईन्ससारख्या देशांना कंपनीची उत्पादने निर्यात केली जातात. मागील वर्षी १९९४-९५ मध्ये कंपनीने ४०.४१ लक्ष रुपयांची निर्यात केली असून विस्तारीकरणानंतर ही निर्यात चौपट होईल अशी कंपनीला खात्री आहे.

**महाराष्ट्र शासनाकडून गौरविलेली संस्था**

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग संचालनालयातर्फे दरवर्षी सर्वोत्कृष्ट लघु उद्योजकास जिल्हा पातळीवर पुरस्कार देण्यात येतो. १९९३ साली सोलापूर जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट उद्योजकांचे प्रथम पारितोषिक कंपनीचे कार्यकारी संचालक इ. पुरुषोत्तम यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले. सर्वोत्कृष्ट व दर्जेदार उत्पादन, त्यामध्ये सातत्य राखणे, चोख अर्थव्यवहार इ. गुणांमुळे माझे एकट्याचे नसून कारखान्यातून काम करणाऱ्या प्रत्येकांच्याच सक्रीय सहकार्याशिवाय काहीही शक्य नाही असे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणारे पुरुषोत्तम यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या बळावरच कंपनीची विस्तारीकरणाची महत्त्वाकांक्षी योजना आखली आहे. १९९३-९४ मध्ये कंपनीचे भाग भांडवल ४९.५२ लाख रुपयांइतके होते. तर त्यावर कंपनीने १३.९४ लाख रुपयांचा नफा कमविल. १९९४-९५ मध्ये कंपनीने भाग भांडवल वाढून ५९.४२ लाख रुपयांचे झाले तर नफा १६.०९ लक्ष इतका झाला. अशारितीने अगदी सुरुवातीपासून कंपनीने विकासाचा चढता क्रम राखला आहे. कंपनीने सतत नवनवे संशोधन करून नवीन उत्पादनावर भर दिल्यने तिला बाजारपेठेचा प्रश्नच नाही. सध्या कंपनी क्यूरॉईक ॲसिड, नॉरफ्लेक्झासीन सारख्या औषधांचे उत्पादन देखील करीत असून नव्या जागेतील विस्तारित कारखान्यातून सिप्रोफ्लोक्झासीन, रानीटीडीन एच.सी.एल. सारख्या औषधींचे उत्पादन होणार आहे. त्यासाठी फार मोठी बाजारपेठ आहे.

कंपनीने २८ फेब्रुवारी ९५ रोजी पब्लिक लिमिटेड कंपनी म्हणून नोंदणी करून मान्यता मिळविली आहे. त्याद्वारेच विस्तारीकरणाची योजना कार्यान्वित होणार आहे. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या अर्थव्यवहारविषयक छाननीतून कंपनीची १९९५-९६ मध्ये ७१४ लाखाची उलाढाल अपेक्षित असून त्यावर कर पश्चात नफा रु. ९३.१३ लाख अपेक्षित आहे. दुसऱ्या वर्षी म्हणजे १९९६-९७ मध्ये १७०४ लाखांची उलाढाल तर कर पश्चात नफा १७१.६९ लाख अपेक्षित आहे. १९९७-९८ मध्ये १९३५ लाखांची उलाढाल, १९९.८० लाख रुपयाचा करपश्चात नफा अपेक्षित आहे.१९९५-९६, १९९६-९७ व १९९७-९८ मध्ये पुस्तकी मूल्य अनुक्रमे १३.१२, १७.०२ व २०.९५ कोटी अपेक्षित असून १९९६-९७ व १९९७-९८ मध्ये अनुक्रमे

१० व २० टक्के लाभांश दिला जाईल असे छाननी तज्ञांचे मत आहे. विस्तारिकरणासाठी चिंचोली एम.आय.डी.सी. मध्ये जागा संपादित करून कारखाना इमारतीचे बांधकाम सुरू आहे.

जानेवारी ९६ पर्यंत यंत्रसामुग्री येणार असून एप्रिल १९९६ पर्यंत प्रत्यक्ष औषधी उत्पादनाला सुरूवात होईल. त्यासाठी कंपनीचे सर्वतोपरी प्रयत्न चालू आहेत. येत्या ४ डिसेंबरपासून कंपनी खुल्या बाजारातून १४,७६,५५० समभागांची दर्शनी किंमतीस म्हणजेच प्रत्येकी १० रुपयास केवळ भारतीय नागरिकांसाठी विक्री होणार आहे.

शिवाजी वर्क्स लि., जाम मिल्स, नवकॉम आईल, निवास स्पिनिंग, सोलापूर बिझिनेस फॉर्म्स, सद्गुरू ऑईल, अरिहंत टर्नेसॉल, टॉवेल्स इंडिया, एक्सपोर्टस् ॲपटेक बिझनेस मशिन्स, बालाजी अमाईन्स इ. कंपन्यानंतर स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेड ही कंपनी भांडवल बाजारात उतरत आहे. इतराबरोबर ह्या कंपनीला गुंतवणुकदारांची निश्चित साथ मिळेल. सोलापूरचे औद्योगिकरण अधिक झपाट्याने होण्यासाठी अशा कर्तबगार उद्योग संस्थांच्या पाठीशी सहाय्यभूतपणे उभे राहायला हवे. तरच सोलापूरची औद्योगिक संस्कृती विकासाभिमुख होईल. यानिमित्ताने स्मृती ऑरगॅनिक्स लि. च्या महत्त्वाकांक्षी विस्तारीकरण योजनेस सुशय चिंतू या!

दै. लोकमत - २९/११/१९९५

## राष्ट्रीय औद्योगिक नकाशावर 'लक्ष्मी हैड्रॉलिक्स' झळकले !

यंदा सोलापुरातील लक्ष्मी हैड्रोलिक्स कंपनीला लघु, मध्यम व मोठ्या क्षेत्रातील उद्योगांसाठी असलेल्या देशपातळीवरील राजीव गांधी राष्ट्रीय गुणवत्ता पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यामुळे आमच्या उद्यमशील शहराचे नाव पुन्हा एकदा राष्ट्रीय औद्योगिक नकाशावर झळकले. सर्वत्र लघुउद्योगांमध्ये भवितव्याविषयी चिंताजनक परिस्थिती असताना, आपली गुणवत्ता सिद्ध करून आर्थिकदृष्ट्या सक्षम ठरलेल्या 'लक्ष्मी हैड्रोलिक्स' मुळे इथल्या उद्योजकांचे तसेच श्रमिकांचे मनोबल वाढले. सोलापूरच्या औद्योगिक विकासाबाबतीत सदैव नकारार्थी भूमिका घेणाऱ्यांना, विशेषतः इथल्या श्रमिकांमध्ये केवळ दोष पाहणाऱ्यांना लक्ष्मी हैड्रोलिक्सच्या यशस्वी उद्योजकांनी व श्रमिकांनी चोख उत्तर दिले आहे.

हा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार प्राप्त करण्यासाठी प्रचंड स्पर्धा असते. देशभरातील अनेक मान्यवर कंपन्या प्रयत्नशील असतात. या सर्वांमध्ये केवळ आपल्या सचोटीच्या व्यवहारातून'लक्ष्मी हैड्रोलिक्स' ने यश संपादन केले हीअभिमानाची गोष्ट आहे. प्राथमिक छाननीनंतर उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे पथक पाहणीसाठी सोलापूरला आले. त्यांनी इथला लक्ष्मी हैड्रोलिक्सचा कारभार पाहिला. परीक्षकांच्या भूमिकेतून नियत केलेल्या मापदंडातून सर्व पाहणी झाली. मात्र त्याचबरोबरीने या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना लक्ष्मी हैड्रोलिक्सच्या व्यवस्थापनाचे जे वेगळेपण जाणवले ते पाहून ही मंडळी प्रभावित झाली. ह्या यशस्वी व्यवस्थापनांकडून आम्हालाही खूप काही शिकण्यासारखे आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. यातच इथल्या मातीचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. देशातील अन्य प्रगत औद्योगिक शहरांच्या तुलनेत

सोलापुरामध्ये कोणत्याही आधुनिक सुविधा नसतानाही केवळ स्वबळावर लक्ष्मी हैड्रोलिक्सने हे यश मिळविले. मनुष्यबळांचे यशस्वी व्यवस्थापन व सचोटीचा व्यवहार यातूनच हे शक्य झाले. यचा अर्थ विधायक भूमिकेतून गुणवत्ताप्रधान प्रयत्न केल्यास राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील यश संपादन करणे शक्य आहे. गरजा आहे ती फक्त प्रामाणिक प्रयत्नांची, हा राष्ट्रीय पुरस्कार देण्यासाठी उद्योगांची निवड करताना त्यातील नेतृत्व, धोरणात्मक कामकाज, मनुष्यबळ विकास व्यवस्थापन, मानव संसाधानी भूमिका व प्रयत्न, उत्पादन प्रक्रिय, ग्राहक व कर्मचाऱ्यांचे समाधान, व्यवसायाच्या प्रगतीची आकडेवारी, सामाजिक कार्यातील सहभाग, वातावरणातील प्रभाव यासारख्या निकषावर तपासणी होते. या सर्व निकषांमध्ये 'लक्ष्मी हैड्रोलिक्स' पूर्णपणे उतरले.

## आय.एस.ओ. बरोबरच गुणवत्ता पुरस्कार

लक्ष्मी इंडस्ट्रिज ग्रुप्सच्या वतीने १९८१ साली लक्ष्मी हैड्रॉलिक्सची सुरुवात झाली. गेली सोळा वर्षामध्ये कंपनीने अनेक यशाची शिखरे गाठली. मुख्यत्वे १९९५ मध्ये कंपनीने 'आय.एस.ओ. ९००१' प्रमाणपत्र मिळविले तर यंदा राष्ट्रीय पातळीवरील गुणवत्ता पुरस्कारप्राप्त केला. अशा प्रकारचे दोन्हीही किताब मिळविणारी ही देशातील पहिलीच कंपनी आहे. आय.एस.ओ. हे आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र केवळ निर्यातदारांनीच मिळवायचे असते. हा गैरसमज दूर करणे गरजेचे आहे. गुणवत्ताप्रधान आंतरराष्ट्रीय पातळीवरील दर्जेदार उत्पादन करणाऱ्या संस्थासाठी हे प्रमाणपत्र दिले जाते. त्यातून उद्योगांच्या व्यावसायिक दर्जा वाढतो. हे लक्ष्मी हैड्रोलिक्सने ओळखले. विद्युत मोटारी, घरगुती पंप, जेट पंप, ओपनवेल सबमर्सिबल पंप व मोनोब्लॉकचे पंपसेट यासारखे उत्पादन करणाऱ्या या लघुउद्योगांची धुरा सांभाळणाऱ्या पाटील कुटुंबिय तसेच कार्यकारी संचालक शरद ठाकरे यांच्यावर मुळातच सचोटी व व्यवहार कुशलतेचे उत्तम संस्कार आहेत. विधायक दृष्टिकोन आहे. त्यामुळेच लघुउद्योगांना सार्वत्रिक मंदीचा शाप असतानाही त्यांनी वार्षिक उलाढाल २३ कोटींच्या घरात नेली. व्यावसायिक पारदर्शिकतेबरोबर गुणवत्तेचा व सर्वोत्तमतेचा आग्रह हेच त्यांच्या यशाचे गमक मानले जाते.

## देशातील पहिला बहुमान आमचा

ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्डस् संस्थेच्यावतीने, देशातील लघु, मध्यम व मोठ्या क्षेत्रातील उद्योगांसाठी राजीव गांधी राष्ट्रीय गुणवत्ता पुरस्कार देण्याचा उपक्रम १९९१ पासून सुरू करण्यात आला. परंतु सुरुवातीच्या वर्षातच या पुरस्कारासाठी कोणाचीही निवड होऊ शकली नाही. कारण या निवडीसाठी निश्चित करण्यात आलेले निकष अवघड आहेत. केवळ आर्थिक उलाढाल जास्त करून नफा कमविणाऱ्या कंपन्याकडे गुणवत्ता, न्याय उत्पादन प्रक्रिया, नेमकी ग्राहक सेवा यासारख्या गोष्टींचा अभाव असतो. त्यामुळे उपरोक्त संस्थेने, बदलत्या जागतिक परिस्थितीमध्ये गुणवत्तेचे महत्त्व ओळखून गुणवत्ता चळवळीत अग्रेसर असलेल्याच कंपन्यांना या माध्यमातून विशेष मान्यता देण्याचे ठरविले. सोलापुरातील लक्ष्मी हैड्रोलिक्स, लघुउद्योग क्षेत्रात हा पुरस्कार मिळविलेली पहिली लघुउद्योग कंपनी ठरली. ही आम्हा सोलापुरकरांच्या दृष्टीने अभिनंदनीय गोष्ट आहे.

## 'कार्यसंस्कृती' बदलली पाहिजे

'लक्ष्मी-विष्णू' च्या आघातानंतर 'शिवशाही' च्या बंदने सोलापूरच्या श्रमिकांच्या, उद्योजकांचा आत्मविश्वास गमविल्यासारखी सर्वहारा परिस्थिती होती. त्यावर मात करून दिवाळीच्या चैतन्यदायी वातावरणात ही यश संपदा आम्हा सर्वांनाच पुन्हा उभारी देणारी ठरली. त्याबद्दल लक्ष्मी हैड्रोलिक्सच्या व्यवस्थापनाने व त्यांना सर्वतोपरी सहकार्य करून यशाची भागीदारी करणाऱ्या सर्व कामगार, कर्मचाऱ्यांचे मनस्वी अभिनंदन. गुणवत्तेची ही खाण, सोलापूरसारख्या हुतात्म्यांच्या बलिदानान पुनित झालेल्या क्रांतिकारी शहरातच असू शकते. इथल्या उद्योजकांमध्ये जशी कर्तृत्व दाखविण्याची उर्मी आहे. तशीच श्रमिकांमध्ये गुणवत्तापूजनाची क्षमता आहे. तिला फक्त हळूवार हाताच्या स्पर्शाने फुलविण्याची गरज आहे. लक्ष्मी हैड्रोलिक्सच्या व्यवस्थापनाने हे यशस्वीपणे करवून दाखविले. त्यांचा आदर्श घेवून इतरांनीही गुणवत्तेचा आग्रह धरला पाहिजे. केवळ राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय सन्मान मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यानिमित्ताने सुरू झालेली ही यशस्वी वाटचाल अधिक वेगाने व्हायला हवी. तरच सोलापूरच्या वैभवशाली औद्योगिक परंपरेला पुढे

नेता येईल. त्यासाठी मनुष्यबळ विकासावर भर द्यायला हवा. श्रमिकांना प्रशिक्षित करून गुणवत्ताप्रधान दर्जेदार उत्पादन करूनच यापुढे उद्योग टिकू शकतील. आपली पारंपरिक कार्यपद्धती बदलून रिजेक्शन कमी करण्याबरोबरच उपलब्ध यंत्रशक्तीचा पर्याप्त वापर करून उत्पादन खर्च कमी करण्यसाठी प्रयत्नशील रहिले पाहिजे. एकंदरित कार्यसंस्कृतीच बदलण्याचा हा प्रश्न आहे. त्याविषयी 'लक्ष्मी हैड्रोलिक्स' ने आदर्श घालून दिला आहे. त्याबद्दल पुनश्च अभिनंदन !

दै. लोकमत - २८/१०/१९९७

# प्रिसिझन कॅमशाफ्टस्‌मधील शुभ वर्तमान

सोलापुरातील प्रिसिझन कॅमशाप्टस् व वाहन उद्योगातील अग्रगण्य कोरियन कंपनी ह्युंदाई मोटर्स (इंडिया) लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच '१०० पीपीएम' या गुणवत्ता संकल्प कार्यान्वित करणाऱ्या कार्यपद्धतीचा शुभारंभ करण्यात आला. '१०० पार्टस् पर मिलियन' म्हणजेच दहा लाख उत्पादित पार्टस्‌मध्ये जास्तीत जास्त फक्त १०० रिजेक्शन अथवा बाद होण्याचे प्रमाण ठेवणारी कार्यपद्धती होय. रिजेक्शनचे प्रमाण अत्यल्प ठेवून ग्राहकांना कमीत कमी किमतीत वेळेवर दर्जेदार मालाचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवले तरच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपण टिकू शकतो. ही जाणीव ठेवून प्रिसिझन ग्रुपने '१०० पीपीएम' सारखे अवघड आव्हान स्वीकारले. दहा लाखामध्ये पाच हजाराइतके रिजेक्शनचे प्रमाण सर्वमान्य असतानास अवघ्या १०० पार्टस्‌चे रिजेक्शन हे उद्दिष्ट ठेवून ह्युंदाई मोटर्स व प्रिसिझन ग्रुपने नवीन कार्यसंस्कृती आणण्याचा संकल्प केला आहे.

अगदी नेटक्या अनौपचारिक पद्धतीच्या शुभारंभाच्या कार्यक्रमासाठी ह्युंदाई मोटार्सचे कार्यकारी संचालक बी. ओली तसेच ह्युंदाईचे एच.एम. लॉ. बी.सी.पार्क व बी. सुब्रहण्यम हे अधिकारी उपस्थित होते. प्रिसिझन ग्रुपचे अध्यक्ष सुभाष शहा तसेच व्यवस्थापकीय संचालक यतिन शहा यांच्या कुशल नेतृत्वाखाली ही गुणवत्ता प्रधान कार्यपद्धती अंमलात आणण्यासाठी नियुक्त कामगार समितीने प्रतिज्ञा केली. त्यांना प्रशस्तिपत्रक व जॅकेटस् देण्यात आले. अत्यंत शिस्तबद्धरित्या आयोजित आटोपशीर कार्यक्रमावरून येणाऱ्या काळात होणारे बदल कसे असतील याची जाणीव होत होती. सोलापुरातील औद्योगिक क्षेत्राच्या निराशाजनक पार्श्वभूमीवर, एकविसाव्या शतकाला पेलण्यासाठी

होत असलेला हा संकल्प म्हणजे 'ओएसिस' म्हणावे लागले. सोलापूरकरांसाठी शुभ वर्तमानच म्हणता येईल.

## प्रिसिझनशी अल्पावधीत भरारी

कॅमशाफ्ट हा मोटार किंवा फोर स्ट्रोक इंजिनमधला अतिशय महत्त्वाचा भाग असतो. त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण उत्पादन करणाऱ्या प्रिसिझन ग्रुपने आयएसओ ९००२ आणि क्यूएस ९००० ही दोन्ही गुणवत्ता प्रमाणपत्रे मिळवून वाहन उद्योगातील प्रमुख उत्पादन कंपनी असा नावलौकीक अल्पावधीतच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मिळविला आहे. इंडो-ब्रिटिश कोलॅबरेशनमध्ये ब्रिटनच्या वाहन उद्योगातील अग्रमानांकित कंपनी क्लान्सी बरोबर सहकार्य करून सोलापूरातील पहिला बहुराष्ट्रीय प्रकल्प साकारण्याचा बहुमान मिळविला. टेल्को, फियाट, हिंदुस्थान मोटर्स, महिंद्रा, सिम्पसन, बिर्ला, मारुती, ह्युंदाई, आयशर, फोर्डसारख्या देशी तसेच जनरल मोटर्स (युरोप) मोटिव्ह कंपोनन्टस् (इंग्लंड) व ॲरो इंजिन्स (अमेरिका) यासारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या वाहनाना कॅमशाफ्टस् पुरविणारी ही संस्था सोलापूरची आहे. याचा आम्ही रास्त अभिमान बाळगायला हवा. ह्युंदाई मोटार्सच्या सँट्रो, ॲक्सेंट मोटारींना लागणाऱ्या कॅमशाफ्टचा संपूर्ण पुरवठा प्रिसिझनतर्फे केला जातो. प्रिसिझनच्या दर्जेदार उत्पादनामुळे ह्युंदाईतर्फे सर्टिफिकेट ऑफ अप्रेसिएशन २०००, बेस्ट कॉन्ट्रीब्युशन ॲवॉर्ड २००१, बेस्ट मेरिट ॲवॉर्ड २००१ देवून गौरव करण्यात आला. जागतिक बाजारपेठेत सोलापूरचे नाव गुणवत्तेसाठी, दर्जेदार उत्पादन तसेच कार्यसंस्कृतीसाठी नेणारे प्रिसिझन ग्रुपचे हे कार्य, गिरणगावची बदनामी धुवून काढणारी ठरणार आहे. कुशल नेतृत्व व योग्य मार्गदर्शन असेल तर इथला कामगार कर्मचारी गुणात्मक उत्पादन देवू शकतो याची प्रचिती देणारी ही घटना आहे.

## सोलापूरची बदनामी

सोलापूरचा कामगार आळशी असतो. त्यांची गैरहजेरी खूप आहे. बहुतांशी कामगारांमध्ये व्यसनांचे प्रमाण खूप आहे. नवीन गुणवत्ताप्रधान कार्यसंस्कृती इथे रुजविणे कठीण आहे, अशी सर्रास टीका होते. बहुतांशी कापड गिरण्या व सूत गिरण्यांमधील अधिक कामगार संख्येमुळे कार्य संस्कृती

मागासलेली राहिलेली आहे, हे मान्य करून देखील अलीकडील काळातील इथल्या इंजिनिअरिंग, फार्मासिट्युकल्स, तसेच छोट्या व मध्यम आकाराच्या उद्योगातून आयएसओ तसेच इतर गुणवत्ता प्रमाण संकल्पनेचा पाठपुरावा त्यातील यश पाहता कामगारांना सर्वस्वी दोष देता येणार नाही, असे म्हणावे लागेल. वर्षानुवर्षे एका विशिष्ट पद्धतीच्या कार्यसंस्कृतीत वाढलेल्या इथल्या श्रमिकांकडे दोष असतील. परंतु ते बदलूच शकणार नाहीत, असे गृहित धरणे व काहीच प्रयत्न न करता टीका करणे कामगारावर अन्याय करणारे ठरेल. अर्थात एकाएकी परिस्थिती बदलणे अवघड असते. कामगारांचा विरोध होईल. त्यांच्या पाठीराख्या युनियनचा पाठिंबा मिळणार नाही. हे सर्व घडणार आहे. परंतु ही परिस्थिती बदलण्याची जबाबदारी आपली आहे हे ओळखून मालक तसेच व्यवस्थापनांनी प्रिसिझनसारखा पुढाकार घ्यायला हवा.

**कालानुरूप बदल हवेत**

२००४ नंतर जगातील बाजारपेठ पूर्णपणे मुक्त होईल, तेव्हाची परिस्थिती याहूनही गंभीर असणार आहे. आता स्पर्धा अटळ आहे. आपण सर्वांनीच कंबर असली पाहिजे. अर्थात हे करीत असताना विनाकारण कामगार कपात अथवा टाळेबंदी होवू नये. कामगारांना बदलत्या परिस्थितीची जाणीव करून द्यावी. त्यांची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न करावा. त्याआधी आपली कामगारविरोधी मानसिकता बदलून सकारात्मक भूमिकेतून जागतिक बदल आत्मसात करणे गरजेचे आहे. मध्यंतरी चीनचे पंतप्रधान झू रोंगजी यांच्या मुंबई भेटीत उपलब्ध माहितीनुसार चीनमधील प्रत्येक कामगाराची उत्पादन क्षमता भारतीय कामगारापेक्षा अनेक पटीने जास्त असल्याने चिनी उद्योगजकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपला माल अधिक स्वस्तात विकणे शक्य झाले आहे. त्याचप्रमाणे मध्यंतरी अमेरिकन श्रमिक व भारतीय श्रमिकांच्या कार्यपद्धतीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. त्यातून आलेले निष्कर्ष देखील विचार करायला लावणारे आहेत. सर्वसाधारण अमेरिकन श्रमिक भारतीयांपेक्षा अडीच पटीने अधिक उत्पादक असतो. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या अभ्यासानुसार अमेरिकन श्रमिक सरासरी वार्षिक १९७९ तास काम करतो. वार्षिक सुट्ट्यांचे प्रमाण देखील कमी असते. कामाच्या वेळेत कामचुकारपणा

न करता आपले काम व्यवस्थितपणे वेळेत पूर्ण करणारा अशी त्यांची वैशिष्ट्ये सांगताना भारतीय कामगारांविषयी बेशिस्त, नियोजन नसलेला, ठेविले अंनंते तैसेचि राहवे या मनोवृत्तीचा, कामचुकारपणा करणारा गुणवत्तेचा आग्रह नसलेला अशी प्रतिमा पुढे येत आहे. ही परिस्थिती बदलल्याशिवाय जागतिक बाजारपेठेत आपला टिकाव लागू शकणार नाही. आपली मानसिकता बदलली पाहिजे. स्पर्धकांची सामर्थ्य स्थळे ओळखून आपली कार्यपद्धती दोषविरहीत करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न व्हायला हवेत. एकीकडे सार्वत्रिक पडझडीतून उद्ध्वस्ततेच्या मार्गावर असणाऱ्या सोलापूरच्या गिरण्या, प्रचंड मंदी, तसेच सर्वांगीण उदासिनच्या पार्श्वभूमीवर प्रिसिझन ग्रुपचा १०० पीपीएम चे शुभ वर्तमान आमच्या आशा पल्लवित करणारे ठरेल, यात शंका नाही.

दै. लोकमत – २२/२/२००२

# 'इन्फोटेक पार्क'मुळे सोलापूर जागतिक नकाशावर झळकणार

सोलापूर-पुणे महामार्गावरील चिंचोळी एम.आय.डी.सी. मध्ये नुकतेच राज्याचे उद्योगमंत्री पतंगराव कदम यांच्या हस्ते माहिती तंत्रज्ञान संकुल म्हणजेच इन्फोटेक पार्कचा शुभारंभ झाला. 'गिरणगाव'मधल्या गिरण्यांच्या पडझडीमुळे जवळजवळ अस्तित्वच संपले असे वाटत असतानाच 'इन्फोटेक'मुळे पुनःश्च सोलापूर जागतिक औद्योगिक नकाशावर आपले स्थान बळकटपणे निर्माण करेल अशी आशादायी परिस्थिती निर्माण झाली आहे. तिसरे सहस्त्रक व विसावे शतक माहिती व तंत्रज्ञानाचे युग असल्याने चिंचोली एम.आय.डी.सी. मधील सर्व उद्योजकांनी एम.आय.डी.सी. अधिकारी वर्गाच्या सहकार्याने सतत या गोष्टीचा पाठपुरावा राज्य शासन व सत्ताधाऱ्यांकडे केल्यामुळेच हे शक्य झाले. वास्तविक 'इन्फोटेक'साठी लागणारी सुसज्ज इमारत उभी असून, तशी रितसर मागणी असून देखील नाशिक, औरंगाबाद, सांगली, कोल्हापूर आणि लातूर या पाच शहरापुरती घोषणा करून सुरुवातीला राज्य मंत्रिमंडळाने सोलापूरचा पत्ता कट केला होता. एक सीमावर्ती जिल्हा व राज्यकर्त्यांच्या इच्छाशक्तीचा दबाव नसल्याने शासनाचे सोलापूरकडे सातत्याने दुर्लक्ष झाले आहे. परंतु उद्योजकांनी प्रबळ इच्छाशक्ती दाखवून राज्यकर्त्यांना 'इन्फोटेक' सोलापूरला देण्यास भाग पाडले असे म्हणावे लागेल. समारंभप्रसंगी बोलताना उद्योगमंत्र्यांनी शहरामध्ये एखादी अन्य जागा उपलब्ध झाल्यास आणखीन एक संकुल सोलापूरसाठी मंजूर करण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे आमची स्थिती 'आंधळा मागतो एक डोळा, मंत्री देतात दोन डोळे' अशी झाली.

**सोलापूर एक पाऊल पुढे**

नुकत्याच इतरत्र देण्यात आलेल्याचे भूमिपूजन झाले असेल तर सोलापूर एक पाऊल पुढे आहे. प्रत्यक्ष 'इन्फोटेक पार्क'च्या इमारतीचा शुभारंभ करण्यात आला. चिंचोली औद्योगिक वसाहतीच्या २५०० एकर असलेल्या क्षेत्रामध्ये अगदी सुरुवातीलाच चर्मोद्योगासाठी ६७ व नीटवेअरसाठी ५६ भूखंड राखून ठेवण्यात आली होती. त्याचप्रमाणे होजिअरी उद्योग वाढीस लागावा या हेतूने एम.आय.डी.सी. ने ४ कोटी २५ लाख रुपये खर्चून १०,००० चौ. मीटर (२.५ एकर) इतक्या भूखंडावर नीटवेअर कॉम्प्लेक्सचे संपूर्ण बांधकाम केले. गेली काही वर्षे ही इमारत उद्योजकांच्या प्रतिक्षेत होती. त्यामुळे ही प्रचंड गुंतवणूक कामी आणण्यासाठी नॉर्थ सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनने पुढाकार घेऊन ही इमारत 'इन्फोटेक पार्क'साठी वापरण्याची सूचना केली. त्याविषयी सतत पाठपुरावा करून एम.आय.डी.सी.च्या अधिकाऱ्यांना देखील कल्पना स्विकारण्यास भाग पाडले. त्याचबरोबरीने मंत्रीमहोदयांशी पाठपुरावा करून योजना मंजूर करण्याचे आश्वासन मिळविले.

केवळ सुसज्ज इमारत नव्हे तर 'इन्फोटेक पार्क'च्या निर्मितीसाठी आवश्यक असणारी दूरध्वनी यंत्रणा व ऑप्टिकल फायबर यंत्रणा जोडण्यासाठी व ऑडिओ, व्हिडिओ कॉन्फरसिंग सेवा सुरू करण्यासाठी दूरसंचार कार्यालयाकडे पाठपुरावा उद्योजकांनी केल्यामुळे ही संपूर्ण यंत्रणा आज कार्यरत आहे. त्याचप्रमाणे उद्योजकांच्या नेमक्या मागणीनुसार १००, ५०० व २५०० चौ.फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यासाठी सर्वांगीण प्रयत्न सुरू आहेत. किमान १०० युनिट सुरू व्हावेत. असे प्रयत्न होत आहेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यवसाय करण्यासाठी सर्वांगीण अनुकूल परिस्थिती सोलापुरामध्ये आज निर्माण झाली आहे. अत्यंत माफक दरात सदनिका, उद्योजकांसाठी सर्व सुविधा व करसवलती, अनुदान या सर्व गोष्टी फायदेशीर आहेत. फक्त शहरांमध्ये सुमारे एक हजाराहून अधिक इंटरनेटच्या कनेक्शन्स असून अंदोजे २००० हून अधिक संगणक तज्ज्ञ देशविदेशातून माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांमध्ये यशस्वी योगदान देत आहेत. संगणकाचे प्रशिक्षण देणाऱ्या मान्यवर संस्थांसह वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीसारखी अग्रमानांकित संस्था आहे. गेल्या दहा-बारा वर्षामध्ये वस्त्रोद्योग व इतर उद्योग तसेच व्यवसायांच्या दुरवस्थेमुळे

नोकरीच्या निमित्ताने इथला मूळचा रहिवासी कर्मचारी मध्यम वर्ग मोठ्या प्रमाणात देशातील अन्य शहरात याच क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे. या सर्व भूमीपुत्रांना परत येऊन स्वतंत्रपणे औद्योगिक संधी या 'इन्फोटेक पार्क'च्या माध्यमातून मिळणार आहे.

**'आयटी'चा वाढता प्रभाव**

इंटरनेटवरून व्यापार व प्रशासनास मान्यता देणारा 'माहिती तंत्रज्ञान कायदा २०००' अंमलात आलेला असल्याने असा स्वतंत्र कायदा असणाऱ्या जगभरातील डझनभर देशांमध्ये भारताचा समावेश झाला. देशांमध्ये भारताचा समावेश झाला. त्याद्वारे पारदर्शक प्रशासनाची कल्पना सत्यात उतरणार आहे. २००१ हे वर्ष 'ई-प्रशासन' वर्ष म्हणून साजरे करण्याविषयी देखील, मंत्र्यापासून प्रशासकीय अधिकाऱ्यांची भावना आहे. अगदी ब्लॉक पातळीवर 'समाज माहिती केंद्रे' स्थापन करण्याची योजना राज्यामध्ये येत आहे. त्यामुळे गावपातळीवर इंटरनेट जोडले जाईल. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या वाढत्या व्यापारांमुळे भारतात ५० बिलियन डॉलरची उलाढाल अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासनदेखील या क्षेत्रांकडे अधिक लक्ष पुरवित असून, राज्यात सर्वत्र अशी इन्फोटेक पार्कस् उभारली जाणार आहेत. मुंबई-पुण्यासारखी शहरे 'सायबर सिटी' म्हणून प्रगतिपथावर आहेत. महाराष्ट्र नॉलेज डॉटकॉमबरोबरच राज्य सरकार दूरसंचार, प्रसारण आणि जैविक तंत्रज्ञानामध्ये पुढाकार घेणार आहे. इन्फॉर्मेशन बायोटेक्नॉलॉजीसाठी राज्याने १०० कोटीची तरतूद केली आहे. राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्गत येणारी सर्व महाविद्यालये, तंत्रनिकेतने आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पदवी; पदविका तसेच प्रमाणपत्र अभ्यासक्रमाबरोबर माहिती तंत्रज्ञान अभ्यासक्रम चालू करण्याचा निर्णय देखील राज्य मंत्रिमंडळाने घेतला असून; येत्या काळात अधिकाधिक संगणक साक्षरतेवर भर देण्यात येणार आहे.

**आमच्या जिल्ह्यातबी 'आयटी' द्या की !**

'आयटी' म्हणजे पैसा असे समीकरण रूढ होत आहे. केंद्रीय माहिती प्रसारण मंत्री प्रमोद महाजन यांनी सांगितले की, आजकाल महाराष्ट्रात

कोणत्याही जिल्ह्यात एखाद्या कार्यक्रमांसाठी गेलो तर तिथे भेटणारे लोकप्रतिनिधी आणि इतर मंडळी एकच सांगतात. आमच्या जिल्ह्यातबी ते काय आयटी पार्क का काय ते करा की सुरू!' अशी फर्माईश केली जाते. काही वर्षापूर्वी साखर कारखाने आल्यामुळे गावांची भरभराट व्हायची आता त्यांची जागा आयटी पार्कने घ्यायला सुरुवात केली आहे. दूरसंचार विभागाने अशा पार्कसाठी DAP=ITI म्हणजेच डायरेक्ट ॲक्सेस प्रोव्हाईडर्सचा दर्जा देण्यासंबंधी पुढाकार घेतला असल्याचे सॉफ्टवेअर उद्योजकांना मोठा फायदा होणार आहे. अशा पद्धतीने सर्वांगीण विकासाची संधी देणारे हे एकमेव 'आयटी'चे क्षेत्र नव्या शतकांमध्ये प्रगतीचे नवे मार्ग दाखविणार यांत शंका नाही.

### तरुणांना मार्गदर्शनाची गरज

या संकुलात कोणते व्यवसाय करता येतील. त्यासाठी कोणत्या गोष्टींची पूर्तता करावी लागेल व कर सवलतीबरोबरच अन्य फायदे व जागतिक बाजारपेठेविषयीची जागरूकता सोलापुरातील तरूणांमध्ये निर्माण करावी लागणार आहे. या पार्कविषयीचा नेमका प्रचार व प्रसार सर्व संबंधितांमध्ये करण्याविषयी देखील उद्योजक व शासनाकडून प्रयत्न व्हायला हवेत. उद्योजक व व्यवसायिकांनी या संकुलामध्ये असलेल्या सुविधांचा कसा वापर करावा. बेरोजगारांनी या संकुलात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रोजगार मिळण्यासाठी संगणकाचे कोणते शिक्षण घेतले तर त्यांना कोणता रोजगार मिळू शकेल याबाबत मार्गदर्शन होण्याची गरज आहे. शासन, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी माध्यमातून असे प्रयत्न व्हायला हवेत. परंतु तसे प्रयत्न त्वरित झाले नाहीत तर मात्र उद्योजकांनाच या कामी पुढाकार घ्यावा लागणार आहे. 'इन्फोटेक पार्क' हे एक नवे दालन इथल्या तमाम तरुणांना त्याकडे आकर्षिक करीत असतानाच गिरण्या बंद पडल्यामुळे विस्थापित झालेल्या सक्षम तरुणांना देखील पात्रतावृद्धीची संधी देऊन या उपक्रमामध्ये सहभागी करून घेण्याची गरज आहे. तरच तिसऱ्या सहस्त्रकांची आणि विसाव्या शतकांची आव्हाने स्वीकारणे शक्य होईल. अर्थात उद्योजकांच्या प्रबळ इच्छाशक्तीमुळेच केवळ 'इन्फोटेक'च्या सर्व संधींसह सोलापूर शहर पुनःश्च जागतिक नकाशावर जाणार आहे हे निश्चित.

दै. लोकमत - १७/२/२००१

# सांगोले सूत गिरणीला देशातील सर्वोत्कृष्ट गिरणीचे सुवर्णपदक

सोलापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये अलीकडच्या काळातील महत्त्वपूर्ण घटना म्हणजे शेतकरी सहकारी सूतगिरणी मु.सांगोले या सहकारी तत्त्वानुसार सुरू करण्यात आलेल्या आदर्श गिरणीची निर्मिती मानली जाते. कै.वैकुंठभाई मेहतानी सहकारी चळवळीच्या संस्थापकांनी घालून दिलेला ध्येयवाद प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्याचा ठोस प्रयत्न करणाऱ्या या गिरणीला अगदी सुरुवातीपासून आजतागायत उत्तम प्रशासन, उत्कृष्ट कार्यक्षमता, उत्पादकता, निव्वळ नफा इ. गोष्टीसाठी राज्य पातळीवर व राष्ट्रीय पातळीवर अनेक पारितोषिके मिळाली. समस्त सोलापूरकरांच्या दृष्टिने ही सन्मानाची गोष्ट आहे. कुशल नेतृत्व आणि प्रामाणिकपणे राबणारे हात असले की, उजाड माळरानावरही नंदनवन फुलविता येते याची प्रचिती देणारी ही कर्तबगारी उद्योजकांना दिशा देणारीच आहे. सोलापूरच्या औद्योगिक विकास संदर्भात, नवीन उद्योग निर्माण न होण्याची कारणमीमांसा देताना, सोलापूरचा कामगार आळशी, जास्त गैरहजेरी आणि व्यसनाचे प्रमाण जास्त असल्याने उत्पादनाचे प्रमाण कमी आणि दर्जाही चांगला नसतो. त्यामुळे नवीन उद्योगासाठी कोणी धाडस करीत नाहीत. अशा प्रकारचे गंभीर परंतु निराधार आरोप केले जातात. याविषयी शास्त्रशुद्ध चिकित्सा देऊन आरोपांचे खंडनही करता येईल. परंतु प्रस्तुत लेखाचा हा विषय नाही. तथापि या निराधार एकांगी आरोपाला सांगोले गिरणीतील व्यवस्थापन आणि कामगारांनी दिलेले हे चोख व्यावहारिक उत्तरच आहे. या गिरणीच्या सुरुवातीपासून सातत्याने मिळालेल्या विविध प्रकारच्या

पारितोषिकांचा तपशील सोलापूरकरांची मान उंचावणाराच आहे.

या गिरणीच्या कार्यकुशलतेचा हा चढता क्रम इथल्या कष्टकऱ्यांच्या गुणवत्तेचा बोलका आलेखच म्हणावा लागेल. सोलापूर जिल्ह्यातील सांगोले हे तालुक्याचे गाव. परंतु एकही मोठा उद्योग नसल्याने रोजगारीचा प्रश्न. त्यातून कमी पावसाचा दुष्काळ भाग. एकंदरीत औद्योगिकदृष्ट्या मागसलेलाच भाग. सुदैवाने या भागातील आमदार गणपतराव देशमुखसारखे द्रष्टे नेतृत्व लाभले आणि ही 'सर्वोत्कृष्ट गिरणी' उदयाला आली. १४ सप्टेंबर १९८४ साली गिरणीच्या उत्पादनाला प्रारंभ करून पहिल्याच वर्षी म्हणजे १९८५/ ८६ साली गिरणीने उत्कृष्ट कार्यक्षमतेचा बहुमान मिळविला. सुरुवातीपासून २५०५६ चात्यांची ही गिरणी आपल्या उत्तम दर्जेदार उत्पादनामुळे स्थानिक व परदेशीय बाजारपेठेत इतरांपेक्षा किलोमागे एक-दोन रुपये जास्त किंमत घेऊन मालाची विक्री केल्याने निव्वळ नफा करू शकलो. इचलकरंजी, सोलापूर, विटा, भिवंडी, मुंबई व दक्षिणेतल्या तिरुपूर प्रमाणेच मॉरिशस, दक्षिण कोरीया, जपान, हाँगकाँग, टर्की सारख्या देशातून मालाची निर्यात करू लागली. गिरणीतील मालाचा उत्तम दर्जा लक्षात घेऊन टेक्सटाईल कमिटीने 'सेल्फ सर्टिफिकेशन' ची सवलतही त्यांना देऊ केली. दर्जेदार उत्पादनाची ही पावतीच नव्हे काय ?

सहकारी तत्वावर चालविलेल्या या गिरणीचे वैशिष्ट्य असे सांगता येईल की, गिरणीचे खरे मालक म्हणजे भागधारक, गिरणीमध्ये राबणारे कष्टकरी कामगार आणि समाज या तिघांच्या कल्याणकारी भूमिकेतूनच प्रत्येक निर्णय घेतला जातो. कामगार कल्याणाच्या बरोबरीनेच भागधारकांच्या सर्वांगीण विकासाच्या योजनाही राबविले जातात. एकूण ७०७९ भागधारक असलेल्या या गिरणीने भागधारक शेतकऱ्यांनी कापूस पिकवावा म्हणून कापूस विकास योजना आखली आहे. गेल्या वर्षी संस्थेने १७ टन एल.आर.ए. ५१६६ बियाणांचे उत्पादक सभासदांना वाटप केले. सुमारे २४००० क्विंटल कापूस उत्पादक सभासदांकडून खरेदी केला. त्यासाठी गिरणीने शासनाने जाहीर केलेला दर व मार्केटमध्ये असलेला दर या दोन्ही दरापेक्षा जास्त म्हणजे रुपये १३०० प्रति क्विंटल दराने सभासदाकडून कापूस खरेदी केला. अशा पद्धतीने सभासदांना उत्पादक कार्यात गुंतवून उद्यमशील बनविण्याचे मूळ सहकारी तत्त्व

अंमलात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. याशिवाय तालुक्याच्या कार्यक्षेत्रातील भागाचा विकास होण्याच्या दृष्टिने प्रायोगिक तत्त्वावर काही योजना राबवित आहे. खादी ग्रामोद्योग मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली गिरणीच्या कोरडवाहू जमिनीत सुमारे एक एकर जागेत तुरीची लागवड केली आहे. ''नोराड'' योजनेअंतर्गत ५० महिलांना रेशीम उद्योगाचे प्रशिक्षण महिना २५०/- रु. प्रमाणे विद्यावेतन देऊन पूर्ण करण्यात आले. अशा प्रकारचे प्रशिक्षण वर्ग पुरूषांसाठीही देण्याचा प्रयत्न चालू आहे. यामुळे इथले रेशीम उद्योग निर्मितीत दिवसेंदिवस वाढ होतानास दिसते. पारंपरिक शेळीपालन पद्धतीचे धोके टाळण्यासाठी स्टॉलफिडींग व सेमी स्टॉल फिंडीग फार्मचा विचार चालू आहे. गिरणीतील कामगारांनी कुणाचीही, विशेष म्हणजे सरकारी रिबेट व सबसिडीसारख्या गोष्टी न मागता, ५० उस्मानाबादी शेळ्यांचा फार्म चालू केला. एका वर्षात २२ हजारांचा नफा झाला. खरेदीची रक्कम परत मिळाली. गिरणीच्या एकूण १२५ एकर जमिनीपैकी बोर, डाळींब, आंबा यांची लागवड करून फलोत्पादन सुमारे १० ते १२ कोटीवर नेण्यामुळे इथला शेतकरी प्रगत शेतीपद्धतीकडे वळू लागला. याशिवाय शासनाच्या सामाजिक वनीकरण योजनेचा प्रकल्प ५६ एकर जमिनीत उत्कृष्टपणे राबविला जात आहे. उजाड माळरानावर पाण्याची सोय नसताना २ ते ३ हजार सागाच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे. गरीब कामगार आणि भागधारकाकडून विवाहावर होणारा अनावश्यक खर्च टाळून त्यांना कर्जबारीपणापासून वाचविण्याच्या उद्देशाने गिरणी सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून दरवर्षी सामुदायिक विवाह आयोजित करते. अशा रितीने केवळ सूत उत्पादनाच्या मर्यादित परिघात न राहत 'सहकार' तत्वज्ञानांतून कामगार कर्मचाऱ्यांबरोबर भागधारक आणि समाजातील गरजू घटक केंद्रस्थानी मानून कल्याणकारी योजना राबविणे हेच या गिरणीचे वैशिष्ट्य मानावे लागेल.

गिरणीत सुमारे १००० कामगार असून त्यांचेसाठी प्रशस्त विश्रामगृह बांधले असून त्यामध्ये सर्व सुविधा उपलब्ध आहेत. कामगारांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी व त्यांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी सकस आहार योजने अंतर्गत कामगारांना १७० ग्रॅम शेंगदाणे व दोन अंडी केवळ दीड रुपया किंमतीमध्ये दिले जाते. प्रत्येक कामगाराची संपूर्ण वैद्यकीय तपासणी करून

प्रत्येकाची माहिती स्वतंत्रपणे ठेवली जाते. ज्यायोगे त्यांना आरोग्यविषयक सल्ला अथवा मार्गदर्शन केले जाते. कामगारांच्या मदतीने तीन वर्षापूर्वी गिरणीने सहकारी तत्वावर ग्राहक भांडाराची सुरूवात केली व आज अद्ययावत अशा नवीन दुमजली इमारतीमध्ये भांडाराचे कामकाज चालू असून त्याचा फायदा कामगाराबरोबरच सभासद व ग्राहकांना होत आहे. कामगारांच्या व सेवकांच्या अत्यावश्यक आर्थिक गरजा भागविण्यासाठी व सावकारांच्या तावडीतून सुटका करण्यासाठी कामगारांची पतसंस्था कार्यान्वित आहे. जनता ॲक्सिडेंट पॉलिसीद्वारे कामगारास अपघात झाल्यास १५,०००/- रु. दिले जातात. या विमा पॉलिसीचा हप्ता गिरणीकडून दिला जातो. गिरणीने एक ट्रस्ट रजिस्टर करून घेतला आहे व गिरणी ट्रस्टच्या नावाने कामगारांच्या ग्रुप गॅज्युइटी योजने अंतर्गत ग्रॅज्युइटीचे पैसे दरवर्षी जिवन विमा निगम यांचेकडे भरते. या योजनेखाली एखादा कामगार निवृत्तीच्या अगोदरच मरण पावला तर तो निवृत्त झाल्यानंतर जेवढी ग्रॅज्युटी त्याला मिळाली असती तेवढी रक्कम कामगाराला उपलब्ध होऊ शकेल. गिरणीचे कामगारांमध्ये शिस्त लागावी. कामगारांमध्ये गैरहजेरीचे प्रमाण कमी व्हावे व उत्पादनक्षमता वाढवी म्हणून गिरणीमार्फत दरवर्षी ज्यांचे एकूण वर्षात २९० पेक्षा जास्त दिवस हजेरीचे भरतात अशा कामगारांचा गौरव म्हणून त्यांना 'ॲटेडंस ॲवॉर्डस' दिले जातात. त्यामुळे १९९२ अखेर गिरणीतील कामगारांचे गैरहजेरीचे सरासरी प्रमाण केवळ ८.५२ टक्के झाले आहे. या उलट सोलापुरातील कापड गिरणीतील गैरहजेरीचे प्रमाण प्रचंड असून अनेकदा कामगार उपलब्ध होऊ न शकल्याने यंत्र सामुग्री बंद ठेवावी लागते ही वस्तुस्थिती आहे. सुरूवातीपासूनच या गिरणीने हजेरीवर नियंत्रण ठेवून ॲवॉर्डसद्वारे उत्तेजन देऊन खूप मोलाचे कार्य केले आहे. त्यामुळे शाश्वत श्रमशक्तिद्वारे दर्जेदार आणि भरपूर उत्पादन होऊन उपलब्ध यंत्रसामुग्री व श्रमशक्तिचा पर्याप्त उपयोग होतो. उत्पादनाचा म्हणता येईल. अर्थात शहरातील गिरण्यांचे व्यवस्थापकीय प्रश्न खूप वेगळे आहेत. औद्योगिक कामगार हा केवळ श्रम विकून मोबदल्यात वेतन मिळविणारा वस्तुरूप असतो असे नव्हे तर आपल्या श्रमातून निर्मिती करणारा संपूर्ण कल्याणकारी योजना राबवून खऱ्या अर्थाने विश्वस्तांची वागणूक देणे हीच व्यवस्थापनाची जबाबदारी असते हे सांगोलेकरांनी जाणले. तसे वागलेही

असे एकंदरीत व्यवस्थापकीय भूमिकेतून स्पष्ट व्हायला हरकत नाही. वेळोवेळी खातेनिहाय बैठका घेऊन, तक्रारी सूचनांचे मनःपूर्वक स्वागत करणे, योग्य सूचना शक्य तितक्या लवकर अंमलात आणणे अशी निकोप लोकशाहीची व्यवस्थापन पद्धती गिरणीने स्वीकारलेली आहे. कामगारांचा व्यवस्थापनातील सहभाग मिळविण्याचे सर्व प्रयत्न केल जातात. व्यवस्थापक, व्यवस्थापन, कामगार कर्मचाऱ्यांचे मिळून बनलेले जणू एकत्रित कुटुंब अशी भावना जोपासली गेल्याने कामगारांना आपण दुसऱ्यांसाठी वा केवळ वेतनासाठी नव्हे तर या सहकारी परिवाराच्या सर्वांगी विकासामध्ये योगदान देत आहोत अशी धारणा बनते. खरे तर सहकारातून हेच साध्य करावयाचे असते. यापुढे जाऊन गिरणीने सुसज्ज औद्योगिक वसाहतीची महत्वाकांक्षी योजना आखली असून एकूण ३०० घरांपैकी पहिल्या टप्प्यातील १०८ घरांचे उद्घाटन नुकतेच राज्यपाल पी.सी. अलेक्झांडर यांचे शुभहस्ते करण्यात आले. उर्वरित घरांचेही काम लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजेच यंदा गिरणीतील कामगारांना २० टक्के बोनस आणि ३ टक्के सानुग्रह अनुदान असे एकूण २३ टक्के दिवाळी भेट देण्यात आले. याशिवाय ज्या सभासदांनी ५०० रुपयाचे भागधारण केले आहे त्यांना २५० रुपयाचे कापूस विकासासाठी अनुदानही देऊ करण्यात आले.

एकंदरीत शेतकरी सहकारी सूत गिरणीने आघाडीवर आपले अद्वितीय कार्य दाखविल्याने गेली तीन वर्षे सातत्याने ऑल इंडिया फेडरेशन ऑफ को-ऑपरेटीव्ह स्पिनिंग मिल्स लि. मुंबई या देश पातळीवरील शिखर संस्थेकडून देशातील सर्व सहकारी सूत गिरण्यांमधील 'सर्वोत्कृष्ट गिरणी' म्हणून निवड होऊन सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले. सोलापूरच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करण्याजोगी ही घटना आहे.

आज सहकार म्हणजे स्वाहाकार आणि सहकारी संस्था म्हणजे संचालक मंडळांची खाजगी मालकीची जहागिरी बनली आहे. काही सहकारी संस्था तर भ्रष्टाचारांचे आगर बनत चालली आहेत. राजकीय शक्ति प्रदर्शनाचे शक्तिस्थल बनू पहात आहेत. परिणामी खरा लाभार्थी भागधारक आणि कामगार कर्मचारी सहकारी फायद्यापासून वंचित राहू लागला आहे. या दुर्दैवी पार्श्वभूमीवर आमदार गणपतराव देशमुख, संस्थापक चेअरमन वसंतराव पाटील

त्याचप्रमाणे त्यांच्या कार्यात सक्रियपणे सहभागी असलेल्या समस्त कार्यकर्त्यांचे हे कार्य खूप मोलाचे ठरते. या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करणे आमचे कर्तव्य ठरते. गिरणीने २४ कोटी रुपये खर्चाचा १२५०० चात्यांचा विस्तारीत प्रकल्प व त्याच बरोबरीने कामगार कल्याण्याच्या अनेक योजना हाती घेतलेल्या आहेत. त्यांच्या कार्यातील सर्वांगीण यशासाठी मनस्वी शुभेच्छा!

दै. लोकमत - १६/११/१९९३

# सोलापूर सहकारी सूत गिरणी कथित भ्रष्टाचाराच्या निमित्ताने

सोलापूरच्या सहकार क्षेत्रातील अग्रमानांकित औद्योगिक संस्था म्हणून नावाजलेली सोलापूर सहकारी सूत गिरणी गेल्या संपूर्ण महिन्याभरातून, विद्यमान संचालक मंडळाच्या सूत विक्री व कापूस खरेदीमधील कथित भ्रष्टचारामुळे गाजली. कष्टकरी विणकारांच्या उत्कर्षासाठी उभारलेल्या सहकारी उद्योगामध्ये असे गैरप्रकार घडावेत ही शरमेची बाब म्हणावी लागेल. गरीब विणकर सदस्यांच्या हितरक्षणाचे जबाबदारी असणाऱ्याकडून ही अपेक्षा नक्कीच नाही. कुंपणच जर शेत खाऊ लागले तर जाब तरी कुणाला विचारायचा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. विद्यमान संचालकाकडून आणि सहकारी क्षेत्राची धुरा वाहणाऱ्या नेते मंडळीकडून (पेंद्दमनसुलू) कथित भ्रष्टाचारावरून, केलेल्या आरोपांमध्ये काहीच तथ्य नाही असेही म्हणता येणार नाही. खरे खोटे देव जाणो. जे घडले असल्याची वदंता आहे ते योग्य घडले नाही. असे प्रकार यापुढे घडता कामा नये याची जबाबदारी घेण्याची आवश्यकता तर आहेच परंतु त्याचबरोबरीने जे घडले त्याची त्रयस्थपणाने चौकशी होऊन दोषी व्यक्तींना शासन झाले पाहिजे अशी जनतेकडून मागणी होत आहे. परंतु या तथाकथित भ्रष्टाचार नाट्यातील सुरुवातीपासूनचा घटनाक्रम लक्षात घेता घडेलसे वाटत नाही. ज्यांच्यावर आरोप आहेत, त्यांच्या बरोबरीने 'विना सहकार नाही उद्धार' तत्त्वानुसार आजवर समकुलीनांकडून आरोप होत असल्यामुळे त्यांची दखल घेणे जरुरीचे आहे. केवळ सबळ पुरावे नाहीत म्हणून कायद्यावर बोट ठेवून हा विषय बाजूला करता येणार नाही. आग असल्याशिवाय धूर

निघणार नाही. तर या प्रकरणी आरोपांच्या मुळाशी जाऊन सहकारी सदस्यांच्या हितरक्षणाच्या भूमिकेतून योग्य पाऊले उचलण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे अग्रणी कै. वैकुंठभाई मेहतांच्या पुतळ्याला साक्षीला ठेवून त्यांच्याच नावाने उभारण्यात आलेल्या सभागृहामध्ये सत्ताधारी संचालक मंडळानी बैठक (विशेष सर्वसाधारण सभा) घेऊन कथित आरोपाचे कै. रामकृष्णपंत बेत व मेहता या दोन्हीही सहकार महर्षींना पुतळ्याच्या रूपाने साक्षीला ठेवून सहकार क्षेत्रातील गैरव्यवहाराविषयी आरोप-प्रत्यारोप 'नाट्य' घडवावे हा दैवदुर्विलास म्हणावा लागेल.

सोलापूर सहकारी सूत गिरणीच्या काही विद्यमान संचालकांनी गेल्या वर्ष-दीड वर्षाच्या काळात कापूस खरेदी, सूत विक्री व अन्य व्यवहारातून १ कोटी ६५ लाख रुपयांचा गैरव्यवहार केलेला असल्याने गिरणीच्या एकूण कारभाराची चौकशी झाली पाहिजे अशी एकमुखी मागणी चैतन्य सहकारी संघटना हातमाग संरक्षण समिती आणि पश्चिम महाराष्ट्र उत्पादक आसामी संघ सभासदांच्या बैठकीत घेण्यात आला. ह्या आरोपाविषयी चर्चा घडवून आणण्यासाठी गिरणीच्या एकूण १६९ सदस्यांपैकी ८० सदस्यांच्या सह्यानिशी विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्याची मागणी करण्यात आली. तरीही सहकारी कायद्यानुसार नाईलाजाने का होईना २४ जुलै १९९४ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि विशेष सर्वसाधारण सभा अशा दोन्हीही सभा थोड्या वेळेच्या अंतराने घेण्यात आल्या. सत्ताधाऱ्याच्या आक्रमक भूमिकेमुळे आणि नेते मंडळीचे अभयदान मिळाल्यामुळे विशेष सर्वसाधारण सभेमध्ये विद्यमान संचालकाविरुद्धच्या कथित भ्रष्टाचारांचा आरोप सबळ पुराव्याअभावी ३१ विरुद्ध ११० मतांनी फेटाळून लावण्यात आला. याउलट गिरणीचा कारभार प्रथमपासूनच उत्तमरित्या चाललेला असून मार्च १९९४ पर्यंतच्या संपलेल्या वर्षात गिरणीला १ कोटी २५ लाख रुपयांचा नफा झालेला असून मार्च १९९४ पासून दरमहा गिरणीस सरासरी ३० लाखांचा नफा होत आहे. त्यामुळे अल्प सहानुभूती व अल्पमतात असलेले विशिष्ट व्यक्ती सत्तेच्या अभिलाषेने सभासदांची दिशाभूल करून बुद्धिभेद करीत आहेत. असे आग्रही प्रतिपादन करण्यात आले. या बैठकीला खास निमंत्रित म्हणून उपस्थित असलेल्या सहकार क्षेत्रातील नेते मंडळींनी (पेद्दमनसुलू) देखील विद्यमान संचालक

मंडळाची बाजू घेऊन, त्याच्या कार्यपद्धतीचे जोरदार समर्थन केले. त्यामुळे हे पेल्यातील वादळ अखेर शमले.

मात्र या पेल्यातील वादळाच्या निमित्ताने, सहकार क्षेत्राशी संबंधित विविध थरातील व्यक्तिंनी व्यक्तविलेली मते फारच गंभीर असून त्यांची गंभीर दखल घेण्याची गरज वाटते. भ्रष्टाचार करणारे, भ्रष्टाचारांचा आरोप करणारे आणि ह्या दोघांमध्ये मध्यस्थी करणारे नेते मंडळी (पेद्दमनसुलू) ह्या सर्वांचीच जनमानसातील प्रतिमा स्पष्ट झाली. सारे एकाच माळेतले मणी असून कोणावरही विश्वास ठेवण्यासारखे नाही असे बहुतेकाचे मत आहे. आरोप-प्रत्यारोपाचे हे उपहास नाट्य 'मी मारल्यासारखे करतो, तू रडल्यासारखे कर' अशा पद्धतीचेच होते अशी चर्चा सगळीकडे ऐकू येते. 'खाणारे' आणि ओरडणारे' समकुलीन असल्याने दोघांवरही जनतेचा विश्वास नाही. अशीच एकंदरीत परिस्थिती आहे. आरोप करणाऱ्या निवेदनावर सुरूवातीला सह्या करणारे ८० सदस्य नंतर विरोधी मतदान कसे करतात? त्यांना देण्यात आलेल्या आमिषाबद्दल उलट सुलट चर्चा खाजगीत ऐकून येते. हे प्रकरण मिटविण्यासाठी नेते मंडळीनी (पेद्दमसुलू) घेतलेल्या भूमिकेच्या पाठीमागे भलतेच 'अर्थ'पूर्ण नाट्य घडले असेही उघडपणे बोलले जाते खरे खोटे देव जाणो. एकूणच जे घडले, ज्या पद्धतीने घडले. त्यावरून 'सहकारी उद्योगांच्या भविष्याविषयी' मात्र चिंता निर्माण झालेली आहे. संपूर्ण जगभर आपल्या कार्यकुशलतेसाठी सुप्रसिद्ध असलेल्या सोलापूरच्या गरीब विणकर वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी सहकारी चळवळीची गंगोत्री सोलापूरात आणणाऱ्या अनेक दिवंगत मान्यवरांच्यानंतर महत्त्वपूर्ण सामाजिक बांधिलकी असलेल्या विद्यमान नेत्यंनी असे वागावे ही खेदाची बाब आहे. गेल्या पंचवीस वर्षामध्ये कोट्यवधी रुपयांचे रिबेट वा तत्सम शासकीय अनुदान गरीब विणकरांच्या कल्याणासाठी सोलापुरला (सोसायट्यांना) मिळाले. त्याचा योग्य वापर करून विणकर वर्गाचे कल्याण करण्याऐवजी संपूर्ण सहकारी चळवळ फक्त विशिष्ट दहा पंधरा कुटुंबांच्या, त्यांच्या आप्तेष्टांच्या, जावई, व्याही व सूनांच्याच भोवती फिरते आहे असे एका जाणकाराकडून सांगण्यात आले. शासकीय भागभांडवल व वित्तिय संस्थाच्या आर्थिक मदतीवर म्हणजेच जनतेच्या पैशावर चालू असणाऱ्या ह्या सहकारी उद्योगांच्या सत्तास्थानी असणाऱ्यांना हे उद्योग स्वतःच्या मालकीचे

वाटते. सार्वजनिक पैशावर स्वतःची मालकी सांगणारे हे 'सहकारी' नेते अशी जनतेची लुबाडणूक करीत असतील त्यांना आवरण्यासाठी सहकारी कायदा अपुरा पडतो. ही वस्तुस्थिती आहे. मग ह्यावर उपाय काय? हा खरा प्रश्न आहे. सहकारी चळवळीच्या माध्यमातून उदयाला आलेल्या ह्या नवश्रीमंत वर्गाचे, राजकीय आश्रयाखाली चालू असलेले हे उन्मत्त वागणे आत्मघातकी ठरेल, गरीब विणकर वर्ग, गिरणीचे संस्था सदस्य, त्याचप्रमाणे केवळ गिरणीवर उपजिविका अवलंबून असणाऱ्या असंख्य कामगार कर्मचारी जनतेच्या हित रक्षणाची जबाबदारी असणाऱ्या ह्या सत्ताधारी वर्गाला आपल्या मूलभूत सामाजिक जबाबदारीचा विसर पडत असेल तर त्यांना जाब विचारला पाहिजे. सहकार कायद्यांतर्गत हे शक्य नसेल तर त्यासाठी लोक चळवळ उभारावी लागेल. खरे तर जनतेनी एकत्र येऊन स्वतःच पर्यायाने संपूर्ण समाजाचा विकास साधण्यासाठी लोकशाही प्रकियेतील उभय साधन म्हणून सहकाराची संकल्पना उदयाला आली. परंतु दुर्दैवाने या सहकारी चळवळीला भ्रष्ट नेतृत्वाचेच ग्रहण लागले. विविध प्रकारच्या अपप्रवृत्तीमुळे बहुसंख्य सहकारी साखर कारखान्यांची जी गत झाली आहे, ती पाळी सहकारी सूत गिरण्यावर येऊ नये. वैयक्तिक स्वार्थासाठी सभासदांच्या हक्कांची, जनतेच्या पैशांची अशी उधळपट्टी होऊ लागली तर लवकरच थांबवावे लागतील अन्यथा अनर्थ घडेल म्हणून गैरप्रकार वेळीच थांबले पाहिजे. म्हणून भ्रष्टाचाराचा आरोप असणारे विद्यमान संचालक मंडळ, आरोप करणारे 'खैरनारी' प्रक्रियातले अध्वर्यु आणि समस्त विणकर वर्गाच्या कल्याणाची धुरा वाहणारे नेते मंडळी (पेद्दनमसुलू) ह्या सर्वांनाच गिरणीतील कामगार वर्ग, विणकर वर्ग व सदस्यांच्या हितरक्षणाची सुबुद्धी मिळो हिच या निमित्ताने ईश्वर चरणी प्रार्थना !

दै. लोकमत - २/८/१९९४

## ‘सोलापूर’, ‘यशवंत’ सूतगिरण्या ; अर्थसहाय्य मिळाले, नियोजनाचे काय ?

जिल्हाधिकाऱ्यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळेच चेतन फाऊंड्रीची टाळेबंदी ज्यादिवशी उठविण्यात आली अगदी त्याच सुमारास सोलापूर व यशवंत सहकारी सूतगिरण्या वीज बिल थकल्यामुळे मंडळाकडून वीजेचा पुरवठा बंद होऊन बंद पडल्या. त्यातील योगायोगाचा भाग सोडला तरी वीज बिलाची थकबाकी ही गोष्ट ‘कॉमन’ आहे. यशवंत सूतगिरणीने वीज बिलाच्या थकबाकीपोटी दहा लाख रुपये त्वरित भरल्याने गिरणी पूर्ववत सुरू झाली तर सोलापूर सूतगिरणीने पैसे न भरल्याने ‘जैसे थे’ परिस्थिती राहिली. परिणामी १७०० कामगारांचा रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला. हातमाग, यंत्रमाग, सहकारी सोसायटी या सर्वांच्या माध्यमातून पूर्व भागांमध्ये वैभव निर्माण करणाऱ्या या दोन्हीही सूतगिरण्यांची ही दुरवस्था बदलण्यासाठी मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्याची गरज आहे. त्याचप्रमाणे नेतेमंडळी प्रयत्नशील राहिले. राज्य सरकार विशेषतः महाराष्ट्र राज्य (शिखर बँक) सहकारी बँकेतील सत्ताधारी नेत्यांकडे राजकीय वजन खर्च करून दोन्हीही गिरण्यांना मिळून ४४ कोटींचे कर्ज मंजूर करण्यात यशस्वी झाले. त्यामुळे या दोन्हीही गिरण्यांचे ठोस पुनर्वसन करण्याची चांगली संधी निर्माण झाली आहे. कामगारांमध्ये नवचैतन्य आले आहे. परंतु त्याच बरोबरीने काही ज्वलंत प्रश्नदेखील समोर आले आहेत.

### महत्त्वाच्या दोन अटी

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने कर्ज मंजूर करताना व्यवस्थापनापुढे दोन अटी घातल्या. सोलापूर सहकारी सूतगिरणीसाठी मध्यम मुदतीचे १२ कोटीचे तर खेळते भांडवल १३ कोटी रुपये असे एकूण २५ कोटी रुपये तसेच

यशवंत सहकारी सूतगिरणीला मध्यम मुदतीचे ११ कोटी व खेळते भांडवल ८ कोटी असे १९ कोटी रुपये म्हणजेच दोन्हीही सूतगिरण्यांना मिळून ४४ कोटींची भरीव मदत मंजूर कली. कर्जरुपाने हे अर्थसहाय्य प्रत्यक्षात गिरण्यांपर्यंत पोचण्यासाठी ज्या दोन प्रमुख अटी आहेत त्यानुसार कामगारांच्या सद्य वेतनांमध्ये २० टक्के कपात करावी तसेच व्यवस्थापनाने व्यवहारांमध्ये सार्वत्रिक काटकसर करून अवाजवी खर्च टाळल्यास गिरणी पूर्ववत चालू राहण्यास मदत होईल. या दोन्हीही अटींची पूर्तता केल्याशिवाय हे ४४ कोटींचे कर्ज मंजूर झाले असले तरीही देण्यात येणार नाही, असे स्पष्ट शब्दात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने सांगितले आहे.

**गिरण्यांच्या तोट्यात भर घालण्यासाठी कर्ज ?**

यशवंत सूतगिरणीमध्ये १८०० तर सोलापूर गिरणीमध्ये १७०० अशा ३५०० कामगारांना दोन्हीही गिरण्यांच्या व्यवस्थापनाने नुकतेच जाहीर आवाहन करून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अटीनुसार २० टक्के पगार कपात स्वीकारून सहकार्य मागितले. व्यवस्थापनानुसार आता कामगारांनी ८० टक्के वेतन स्वीकारले तर पुढे दरवर्षी ५ टक्क्याप्रमाणे ४ वर्षात पूर्ण पगार दिला जाईल. मात्र महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने मात्र ही वेतन कपात गिरणीला प्रत्यक्ष नफा झाल्याशिवाय परत करणार नाही असे कळते. त्यामुळे गिरणीला नफा मिळविणे ही सर्वांचीच जबाबदारी बनली आहे. मात्र आजमितीस यशवंत सहकारी सूतगिरणी सुमारे १४ कोटी रुपये तोट्यात असून, कर्जे व इतर देणी १९ कोटी, त्यावरील व्याज ७५ लाख आणि वीज मंडळाची थकबाकी ७७ लाख इतकी आहे. गिरणीची स्थावर मालमत्ता व जंगम मालमत्ता ९ कोटी ६३ लाख रुपयांची आहे. तर सोलापूर सूतगिरणी सुमारे २२ कोटी रुपये तोट्यात असून, गिरणीस कर्जे व देणी २० कोटी, त्यावरील व्याज २ कोटी तर वीज बिलाची थकबाकी १ कोटी ९५ लाख इतकी अहे. या गिरणीची स्थावर व जंगम मालमत्ता १३ कोटी ३६ लाख रुपयांची आहे. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, दोन्हीही गिरण्यांकडे असलेले कर्ज व देणी स्थावर व जंगम मालमत्तेपेक्षा अधिक आहे. आता परत ही मालमत्ता तारण ठेवून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून अधिक ४४ कोटींचे कर्ज घेतले जाणार आहे. तर मग या सर्व गोष्टींचा जमाखर्च

योग्य पद्धतीने करून काटकसर, नियोजण, वेस्टेज कमी, उत्पादन खर्चावर नियंत्रण, संचालक मंडळाच्या मुजोर खर्चावर नियंत्रण, भ्रष्टाचार व अन्य नुकसानदायी गोष्टींवर नियंत्रझ आणले तरच हे शक्य आहे, अन्यथा नाही !

## व्यवस्थापकीय काटकसरीविषयी काय?

या गोष्टींवर तथाकथित नेते व संचालक मंडळ तसेच कामगार संघटना काहीही बोलत नाही. एकतर्फी पद्धतीने कामगारांनी मात्र २० टक्के वेतन कपात स्वीकारावी अशी आग्रही अपेक्षा आहे. नाहीतर गिरण्या चालू होणे शक्य नाही. अशी धमकीवजा परिस्थिती असल्यामुळे नाईलाजाने अगदी इच्छेविरुद्ध कामगार ही परिस्थिती स्वीकारतील याची संचालक मंडळ व कामगार पुढारी दोघांनाही खात्री वाटते. कामगारांची प्रातिनिधिक संघटना राष्ट्रीय गिरणी कामगार संघाने पगार कपातीस विरोध दर्शविला आहे. परंतु व्यवस्थापनांकडून अपेक्षित काटकसरीविषयी कसलाही आग्रह धरताना दिसत नाहीत. गिरण्यांची सद्य स्थिती, मध्यम कर्जाचा वापर नेमका कसा करणार; त्याविषयीची कालबद्ध योजना, खेळत्या भांडवलाचा उपयोग फक्त मागील देणी व संचालक मंडळाच्य अनुत्पादक पद्धतीच्या खर्चासाठी न वापरता फक्त गिरण्या व्यवस्थित चालविण्यासाठीच कसा केला जाणार किंबहुना तो कसा करावा याविषयी तांत्रिक, यांत्रिक, भांडवली सर्वांगीण अभ्यास करून व्यवस्थापनावर अंकुश ठेवण्याची क्षमता कामगार नेतृत्वाकडे नाही. त्यामुळे वेतन कपात अपरिहार्यपणे का होईना स्वीकारून पुन्हा काही दिवसांनी ही गंगाजळी आटल्यानंतर या कामगारांना उदरनिर्वाहाची भ्रांत राहणारच आहे.

## नेते मंडळी सुंदोपसुंदीत मश्गुल

तर दुसरीकडे दोन्हीही गिरण्यांच्या सर्वसामान्य सभासदांनी गेली पस्तीस वर्षे परिश्रमातून असंख्य हातमाग, यंत्रमाग व त्यावर आधारित अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला. त्या सभासदांचे हित पाहण्याची जबाबदारी असणाऱ्या समाजधुरिणांनी आजवर केलेल्या भ्रष्टाचाराकडे डोळेझाक करून हे कर्जाचे नवीन ओझे स्वीकारावे, त्यातून गिरणी, त्यातील कामगार व सभासद या सर्वांचे हित साधण्याऐवजी काहींचे उखळ पांढरे होतील अशीच सर्वांची

मानसिकता आहे. १ कोटी ६७ लाखांचा भ्रष्टाचार त्याविषयीची सत्यासत्यता अद्यापही गुलदस्त्यातच आहे. नेतेमंडळी आपापसातील सुंदोपसुंदी, वैयक्तिक स्वार्थ यापलीकडे जाऊन या कामधेनू वाचविण्याकडे गांभीर्याने पाहताना दिसत नाहीत. नुकतेच एका वरिष्ठ नेत्यांनी याविषयीची खंत व्यक्त केली. आजपर्यंतचे तथाकथित 'तज्ज्ञ' आता अलिप्त आहेत. या पार्श्वभूमीवर दोन्हीही गिरण्यांना जीवदान मिळाल्याचा आनंददेखील व्यक्त करता येत नाही अशी सार्वत्रिक साशंकतेची परिस्थिती आहे. गेल्या पन्नास वर्षाच्या सहकारातून खरा विणकर कष्टकरी लाभार्थीच उपाशी राहिला. अगदी ठराविक लोकांचा लाभ झाला. हीच पुनरावृत्ती होऊ नये म्हणून प्रशासक नेमण्याची भाषाही बोलली जात आहे.

**आता ही सर्वांचीच जबाबदारी**

आंध्र तेलंगणामधून स्थलांतर करून गेल्या चार पिढ्यांनी कष्टाने उभे केलेल हे नंदनवन. आज सुजाण प्रामाणिक नेतृत्वाच्या प्रतीक्षेत आहे. असेच म्हणावे लागेल. १९६४ साली सोलापूर सूतगिरणी तर १९६७ साली यशवंत सूतगिरणी उदयाला आल्या. त्यापाठोपाठ अनेक सहकारी संस्था व उद्योग यांचे जाळे निर्माण झाले. संपूर्ण भारतात दुसरी असा लौकिक मिळविणारी उद्योग बँक याच समाजातील द्रष्ट्या नेतृत्वाने निर्माण केली. तिचीही अवस्था आज दयनीय झाली आहे. सुमारे एक लाख लोकांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष उदरभरण करणारी ही सहकारी संस्थांची कामधेनू जगली पाहिजे. त्यासाठी दोन्ही सूतगिरण्याच नफ्यात चालल्या पाहिजेत. त्यासाठी कोट्यवधींचे अर्थसहाय्य जसे गरजेचे आहे त्याहीपेक्षा महत्त्वाचे आर्थिक नियोजन हवे. कामगारांच्या वेतन कपातीपेक्षा जास्त काटकसर करून इथल्या नेत्यांनी, व्यवस्थापनांनी आदर्श घालून द्यायला हवा. कामगार पुढाऱ्यांनी देखील या संस्थांच्या कार्यपद्धतीचा नीट अभ्यास करून जरूर त्या ठिकाणी जाब विचारायला हवा. आता या दोन्हीही सूतगिरण्याची वाचविण्याची जबाबदारी सर्वांची आहे. आज बँकेच्या अटी मान्य करून योग्य नियोजन व नियंत्रणाशिवाय हे कर्ज स्वीकारेल तर गिरण्या तात्पुरत्या चालू होतील परंतु काही दिवसानंतर पुन्हा हीच परिस्थिती येणार नाही याची खात्री देता येणार नाही.

दै. लोकमत - ३१/८/२०००

# सहकारी उद्योग चालवण्याची जबाबदारी नेमकी कोणाची?

एकेकाळी सहकारी क्षेत्रांमध्ये अग्रमानांकित समजल्या जाणाऱ्या 'यशवंत' व 'सोलापूर' या दोन्हीही सूतगिरण्या दोन महिन्यापासून बंद आहेत. कामगारांना ऐन दसरा-दिवाळीच्या तोंडावर काम नाही, पगार नाही, बोनस नाही, पुढे काय होणार याविषयी खात्री नाही. शासन, कामगार नेते, गिरणीचे संचालक मंडळ, राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, कामगार आयुक्तालय, जिल्हाधिकाऱ्यांबरोबरच, गिरण्यांच्या भागधारक सभासदांपैकी गिरण्या नीटपणे पुन्हा चालू करण्याची नेमकी जबाबदारी कोणाची? कायदेशीर उत्तरदायित्व कोणाचे? याचे स्पष्ट उत्तर नसल्याने कामगारांची परिस्थिती चिंताजनक बनत चालली आहे.

या गिरण्या पुनश्च चालू करण्यासाठी राज्य सहकारी बँकेने ४२ कोटींचे कर्ज सशर्त मंजूर केले. त्यासाठी कामगारांना २० टक्के वेतन कपात स्वीकारावी लागणार आहे. ही वेतन कपात स्वीकारावयाची की नाही, कपात केलेली कामगारांची देय रक्कम ६ व्या व ७ व्या वर्षापासून परत द्यायला सुरुवात होईल मात्र ही परतफेड कोण करणार ? ज्यांच्या गैरप्रकारामुळे व भ्रष्टाचारामुळे गिरण्यांची ही दुरवस्था झाली त्यांच्याकडून परतफेडीची अपेक्षा कशी करता येईल असे कामगारांचे मत आहे. मुख्य म्हणजे ही कर्जाची रक्कम प्रामाणिक व काटकसरीने वापरून गिरण्यांनी नफा करावा व त्या नफ्यातून कामगारांची देय रक्कम परत करावयाची असल्याने ही जबाबदारी विद्यमान संचालक मंडळाला पेलवणार का? राज्य शिखर बँकेच्या दुसऱ्या अटीनुसार कर्जासाठी संचालकांकडून वैयक्तिक तारणाची मागणी करण्यात आल्याने काही संचालकांनी राजीनामे दिले. गिरण्यांची सत्ता उपभोगायची. भरपूर लाभ

घ्यायचा. जेव्हा गिरण्या जगविण्याची जबाबदारी येते तेव्हा राजीनामे द्यायचे. अशा संचालकांना सहकाराचे तत्त्वज्ञान मुळात समजले नाही. सहकारातून समृद्धी या भूमिकेतून गेल्या पन्नास वर्षांमध्ये सहकारी चळवळ वाढली. दुर्बल घटकांना आर्थिक स्थैर्य मिळण्यासाठी सामूहिक शक्ती म्हणून सहकार चळवळ पुढे आली. हातमाग यंत्रमाग धंद्यातील छोटेखानी व्यावसायिकांना एकत्रित करून त्यांच्या सामूहिक विकासासाठी कोट्यावधींचे भागभांडवल शासनाकडून गुंतवून अशा गिरण्या राज्यभर उभारण्यात आल्या. गेल्या तीस-पस्तीस वर्षांमध्ये मूठभर दुर्बल घटक 'सबल' झाले. सत्ताधीश झाले. जणू या सहकारी गिरण्यांचे पदसिद्ध मालक बनले. खरा लाभार्थी, दुर्बल घटक आजही उपेक्षितच आहे. हे तथाकथित मालक आता मात्र जबाबदारी झटकत आहेत. अशांकडून नैतिकतेची अपेक्षा करून उपयोग नाही. कायदेशीर तरतूद सक्षम नाही. गिरण्यांच्या व्यवहारातील गैरप्रकार ऑडिटरने स्पष्ट करूनही कारवाई होत नाही. राजाश्रय भक्कम मिळतो. एकीकडे गिरण्या दुर्बल होत असून ही मालक मंडळी 'सबल' होत आहेत. स्थावर जंगम मालमत्ता अगदी नजरेत भरेल अशी वाढतेय तरीही डोळ्यावर पट्टीच असल्याने न्यायदेवताही दुर्बल आहे. अशा परिस्थितीत गिरण्यांचे सभासद व संचालक मंडळांना जबाबदार धरून, गिरण्या जगविण्यासाठी आवश्यक ते सर्व करण्याविषयी आग्रह धरणारा ठोस कायदा नाही. तशी व्यवस्था नाही.

**भागधारक मालक नव्हेत काय ?**

गिरणीचे भागधारक सभासद फक्त लाभ घेण्यापुरतेच उरल्यामुळे गिरण्यांच्या दैनंदिन व्यवहारांवर अंकुश ठेवण्याची जबाबदारी लोकशाही पद्धतीने पार पाडण्याची सक्षम व्यवस्था निर्माण होऊ शकली नाही. वर्षातून एकदा जनरल मिटिंगपुरताच काय तो संबंध. शेअर्सच्या पटीने, लाभांश मिळविणे शेअर्सच्या प्रमाणात कमी दरामध्ये सूत उपलब्ध करून यापलीकडे जाऊन आपण भागधारक या नात्याने गिरण्यांचे खरे मालक आहोत. त्यामुळे नैतिक व कायदेशीर दोन्हीही बाजूने गिरण्यांच्या व्यवस्थापकीय उत्तरदायित्व स्वीकृतीचे शिक्षण दिले गेले नाही. याउलट यांना अज्ञानी ठेवून त्यांच्या जोरावर राजकारण करण्यावर अधिक भर दिला गेल्याने ही सहकाराची पवित्र

मंदिरे राजकारणाचे अड्डे बनली. सहकाराऐवजी स्वाहाकाराची संस्कृती पोसली गेली. सहकाराचे मूळ तत्वज्ञान व्यवहारामध्ये येऊ शकले नाही. अशी स्पष्ट कबुली सहकारातून समृद्ध झालेले बडे नेते मंडळीदेखील देत आहेत. जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे या सहकारी उद्योगांच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे काही सहकारी संस्थांच्याच मागणीवरून कंपनी कायद्यात सुधारणा करण्यात येत असून, त्यामुळे सहकारी संस्थेच्या कायद्यामध्ये बदल झाल्यामुळे कंपनीमध्ये रुपांतर करणे शक्य होईल अशी माहिती केंद्रीय कंपनी खात्याचे सचिव डॉ. पी.एल. संजीव रेड्डी यांनी नुकतेच सांगितले. त्याचबरोबर राज्यातील सहकारी सूत गिरण्यांना भागभांडवल देताना सत्ताधारी व विरोधी पक्ष असा भेदभाव केला जात असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणण्यात आल्याने पुढील आदेशापर्यंत सूतगिरण्यांना भागभांडवल देण्यास न्यायालयाने तूर्त स्थगिती दिली आहे. राज्य व केंद्र पातळीवर सहकारी उद्योगांच्या पातळीवर होत असलेले हे बदल कशाचे द्योतक म्हणता येईल.

## जिल्हाधिकाऱ्यांचा पुढाकार

सोलापूरातील सहकारी सूतगिरण्या पूर्ववत सुरू होण्यासाठी पालकमंत्री आर.आर. पाटील यांच्या सुचनेनुसार जिल्हाधिकारी दिपक कपूर यांनी पाठपुरावा केला असला तरी आज पर्यंतच्या पाच सहा बैठकांमध्ये अंतिम निर्णय होऊ शकला नाही. कधी कामगार संघटना अनुपस्थित तर कधी गिरणीच्या संचालकांच्या व्यक्तिगत अडचणीमुळे बैठका ठोस निर्णयाविनाच संपल्या. सहकार क्षेत्रातील समाजधुरीणांमध्ये मानापमानाचे नाटक तर कामगार संघटनांमध्ये प्रतिनिधित्वाचा कलगीतुरा या कात्रीमध्ये कायदेशीर निर्णय होण्यास विलंब होत आहे. कामगारांचा कोणीच वाली राहिला नाही. आता तर दोन्ही गिरण्यांसाठी कामगार कृती समिती स्थापून ठोक कृतीची भाषा केली जात आहे. ही समिती आता नेमकी कोणती कृती करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

लक्ष्मी-विष्णुची जखम अद्यापही ताजी आहे. त्यावेळेसचा घटनाक्रम लक्षात घेता या दोन्हीही गिरण्यांबाबतीत पडणारी पावले त्याच दिशेने पडताना दिसतात. खाजगी मालकांची स्पष्ट कायदेशीर जबाबदारी असताना माधवराव

आपटे हजारो कामगार कुटुंबियांना रस्त्यावर आणून नामनिराळे राहू शकतात तर सहकारी सूतगिरण्यांबद्दल अणखीन नवीन काय घडणार आहे. प्रातिनिधिक व मान्यताप्राप्त संघटनेमध्ये दुफळी, संचालक मंडळामधील राजकारण, कायद्यातील अडचणी यामुळे या प्रश्नी योग्य तोडगा निघेल याविषयी खात्री देणे अवघड आहे. एक गोष्ट मात्र जमेची म्हणावी लागेल की, वस्त्रोद्योगाची सद्यस्थिती लक्षात घेता सहकारी गिरण्यांच्या पुनरुज्जीवनासाठी कर्ज मिळण्याची शक्यता कमी ... राज्य सहकरी बँकेने ४४ कोटींचे कर्ज देण्याची तयारी दर्शविली. त्यासाठी ज्या महनीयांनी आपला 'शब्द' खर्च केला त्यांना श्रमजीवी धन्यवाद देतीलच; परंतु हे कर्ज प्रत्यक्ष पदरात पडून गिरण्या पूर्ववत चालू होतील तेव्हाच धन्यवादास पात्र ठरतील ना! म्हणून व्यवहारातील या अडचणी दूर करण्याची जबाबदारी साहजिकच या नेतेमंडळींवर येते. राज्य शिखर बँकेचे कर्ज ही एक चालून आलेली चांगली संधी मानून तिचा वापर करून गिरण्यांचे पुनरुज्जीवन करणे हेच सर्वांचे म्हणजेच शासन, कामगार नेते, गिरणीचे संचालक मंडळ, राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, कामगार आयुक्तालय, जिल्हाधिकारी, गिरण्यांचे संचालक मंडळ, राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, कामगार आयुक्तालय, जिल्हाधिकारी, गिरण्यांचे भागधारक सभासद व कामगारांची सामूहिक जबाबदारी ठरते. परंतु प्रत्यक्ष मांजराच्या गळ्यात घंटा कुणी बांधायच्या? आपसातील मतभेद खऱ्या अर्थाने बाजूला ठेवून गिरणी वाचविण्यासाठी व श्रमजीवांना रोजगार देण्यासाठी संबंधितांनी झटले पाहिजे. तसे नैतिक व कायदेशीर उत्तरदायित्व स्वीकारायला भाग पाडणारी सक्षम यंत्रणा आज उपलब्ध नाही असेच म्हणावे लागेल.

दै. लोकमत - ९/११/२०००

## 'यशवंत' 'सोलापूर'ची कोंडी कशी फुटणार?

सोलापुरातील 'यशवंत' 'सोलापूर' सहकारी सूत गिरण्यांची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत असून, ही कोंडी कशी फुटेल याविषयी शंकेचे वातावरण निर्माण झाले आहे. विजेचे बिल प्रचंड थकल्यामुळे दोन्हीही गिरण्यांचा वीज पुरवठा बंद करण्यात आला. 'यशवंत'ने धडपड करून काही रक्कम भरल्याने गिरणी सुरू झाली. 'सोलापूर'च्या तथाकथित नेते मंडळींनी 'किम कर्तव्यम्'ची भूमिका घेतल्याने अद्यापही गिरणी बंद आहे. दरम्यान, पूर्वभागातील नेते मंडळी आपले राजकीय वजन खर्च करून दोन्हीही गिरण्यांसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून ४४ कोटींचे कर्ज मंजूर करून घेण्यात यशस्वी झाले.

खरेतर अशा दयनीय परिस्थितीमध्ये 'सहकारी' गिरण्यांच्या पुनरुज्जीवनासाठी कर्जे मिळण्याची शक्यता कमी असते. तथापि, राज्य सहकारी बँकेने दोन अटींवर हे कर्ज मंजूर केले. त्यापैकी पहिली अट म्हणजे कामगारांच्या सद्य वेतनामध्ये २० टक्के कपातही होय. गिरण्यांवर ओढवलेल्या आर्थिक संकटाला सर्वस्वी व्यवस्थापन व संचालक मंडळच जबाबदार असून, कामगारांचा कोणताही दोष नसल्याने पगार कपात स्वीकारणे शक्य नाही, अशा भूमिका (वरकरणी का होईना) रा.गि.का. संघच्या मान्यताप्राप्त प्रातिनिधीक संघटनेने घेतली. दरम्यान, युनियनच्या प्रतिनिधीच्या एका शिष्टमंडळाने इचलकरंजी येथे जाऊन तिकडे अशाच दयनीय स्थितीतल्या 'डेक्कन' व 'आयको..' दोन गिरण्यांची पाहणी केली. तेथून परतल्यानंतर कामगारांसमोर निवेदन करून युनियनच्या प्रतिनिधींना पगार कपातीस संमती देऊन गिरणी सुरू करायची की पगार कपातीस विरोध करून गिरणी बंद ठेवायची, याचा निर्णय कामगारांनीच घ्यावा, असे सांगितले.

## 'नरसिंगगिरजी'ची आठवण

राज्य शिखर बँकेकडून कर्ज मिळण्यासाठी पगार कपात स्वीकारणे अपरिहार्य असून, त्याविषयी योग्य मार्गदर्शन व खबरदारी घेण्याची जबाबदारी असणाऱ्या नेतृत्वाकडून अशा प्रकारची 'नरो वा कुंजरो वा' भूमिका घेतली गेल्याने कामगार संभ्रमावस्थेत आहेत. सोलापुरातील कामगार नेत्यांची विधायक परंपरा आहे. जुन्या पिढीतील ज्ञानी नेत्यांची व त्यांना साथ देणाऱ्या समंजस कामगारांची याप्रसंगी आठवण येते. सोलापुरातील नरसिंगगिरजी मिल खाजगी मालकीची असताना आर्थिक नुकसानीमुळे बंद पडली होती. त्यावेळी गिरणीतील कामगारांची उपासमार होऊ नये. उद्योग जगले तरच कामगार आहेत, संघटना आहे. ह्या जाणिवेतून तत्कालीन 'इंटक', 'कम्युनिस्ट', 'समाजवादी' साऱ्याच नेत्यांनी, राजकारण बाजूला ठेवून कै. एस.एम. जोशी व कै.यशवंतराव चव्हाणसारख्या द्रष्ट्या नेतृत्वाखाली सर्वानुमते कामगारांच्या वेतनातून १/३ पगाराइतकी कपात सुचविली व स्वीकारण्यात आली. करारामध्ये ठरल्याप्रमाणे पुढे पंचवीस वर्षानंतर गिरणीने तीन कोटींचा नफा केल्यानंतर दिलेल्या शब्दाला जाणून कामगारांना कापलेले पैसे परत करण्यात आले. त्यामुळे गिरणी जगली. गेल्या ४० वर्षात अनेक कष्टकरी कुटुंबियांचे उदरभरण त्यातून शक्य झाले. याचे संपूर्ण श्रेय तत्कालीन समंजस नेतृत्व व कामगारांकडे जाते. अगदी याउलट आजची परिस्थिती असून, कामगारांना ह्या परिस्थितीत आत्मविश्वास देणारं द्रष्टं नेतृत्व नाही. कामगारांचा विश्वास असलेलं परिपूर्ण नेतृत्व नाही. त्यामुळे हा तिढा सुटत नाही.

## संचालकांचे राजीनामे

तर दुसरीकडे संचालक मंडळांची परिस्थिती त्याहून दयनीय झाली आहे. राज्य सहकारी बँकेने घातलेल्या दोन अटींपैकी दुसरी अट म्हणजे संचालक मंडळाने वैयक्तिक स्थावर/जंगम मालमत्तेचे तारण द्यावे, त्याची तयारी नाही. ह्या कारणासाठी 'यशवंत'च्या काही संचालकांनी राजीनामे दिल्याचे कळते, तर 'सोलापूर'मधील काहींची तयारी सुरू आहे. याउलट नरसिंगगिरजीचे खाजगी मालक धनराज गिरजी यांनी केवळ गिरणीतील कामगार व त्यांचे कुटुंबीय उपाशी राहू नयेत म्हणून संपूर्ण मालमत्ता सोडून दिली

सरकारला नाममात्र एक रूपया भाडेपट्ट्याने चालवावयास दिली. कोटीची मालमत्ता सोडणाऱ्या ह्या उदार खाजगी मालकांपुढे सहकारातून समृद्धी मिळविलेल्या ह्या संचालकांचे खुजेपण स्पष्ट होते. विद्यमान संचालकांच्या म्हणण्यानुसार हा घोटाळा पूर्वीच्या संचालकांनी केलेला असेल, तर आम्ही प्रॉपर्टी तारण का ठेवावे ? सोलापूर सहकारी सूत गिरणीच्या संचालक मंडळाने संगनमत करून १ कोटी ६७ लाख रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे प्रकरण मध्यंतरी गाजले. पेद्दमनसलंच्या यशस्वी मध्यस्थीनंतर रितसर पांघरूण पडले. शासकीय भागभांडवल, वित्तीय संस्थांचे सहाय्य व कष्टकऱ्यांच्या श्रमावर चालू असणाऱ्या ह्या 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' तत्त्ववरील सहकारी संस्थांच्या संचालकांना ह्या गिरण्या स्वतःच्या मालकीच्या वाटतात. राजकीय आश्रयाखाली ह्या नवश्रीमंत सहकारी नेत्याचे हे उन्मत्त वागणे आवरण्याची ताकद आजच्या नेतृत्वामध्ये नाही. कायदा निष्प्रभ ठरतो. त्यामुळे जेव्हा जबाबदारी घेण्याची वेळ आली तेव्हा सारेच मागे राहात आहेत. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या संकल्पनेनुसार ह्या मंडळींनी 'विश्वस्ता'ची भूमिका बजावयाला हवी. अगदी त्याउलट घडतंय. मालकांची भूमिका देखील 'पार्टनर्स इन सोशल चेंज' अशी असायला हवी.

**कामगारांना शाश्वती वाटत नाही**

अलीकडील काळातील ताज्या जखमांपैकी 'लक्ष्मी-विष्णू' व 'शिवशाही' या दोनहींची रक्तओघळ अद्याप थांबलेली नाही. शिवशाही अखेरीस किर्लोस्कर उद्योग समूहामध्ये विलीन झाल्यामुळे ६०० कामगार कुटुंबियांना दोनवेळची भाकर मिळणे शक्य झाले. त्यासाठी शेकडो कामगारांना बेरोजगार व्हावे लागले. चेतन फाऊंड्रीची समस्या अद्यापही अनुत्तरीतच आहे. अनेक लघुउद्योग मंदीच्या लाटेत संपले. नवीन उद्योग येऊ धजत नसलेने 'सोलापूर' व 'यशवंत'च्या कामगारांसमोर रोजगार टिकविण्यासाठी अन्य पर्याय नाही. परंतु ही वेतन कपात स्वीकारून देखील गिरणीचे नीट पुनरुज्जीवन होईल व नरसिंगगिरजीच्या कामगारांसारखे आमचे पैसे परत मिळतील व गिरण्या जगविण्याचे श्रेय मिळू शकेल याविषयी त्यांना खात्री नाही. यासाठी गिरणीच्या संचालक मंडळाचे, नेते मंडळींचे आजवरचे वागणे जबाबदार

आहे. आज राज्य सहकारी बँकेकडून येणाऱ्या ४४ कोटींचा विनियोग कोणत्या कारणासाठी व कसा होणार आहे, त्यामुळे गिरणीला नेमका कसा व केव्हा फायदा होऊ शकेल, याविषयी सारेच अधांतरी असून, कामगारांना त्याविषयीचे मार्गदर्शन गरजेचे आहे.

**आपण कुठे चुकतोय**

नेते मंडळींच्या सुंदोपसुंदीमुळे प्रशासक नेमण्याचीदेखील मागणी पुढे आली. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने कर्ज देण्यासाठी उपरोक्त दोन्हीही अटींबरोबरच व्यवस्थापकीय काटकसरीविषयी देखील आग्रह धरला आहे. परंतु महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे अग्रणी कै. वैकुंठभाई मेहता व कै. रामकृष्णपंत बेत यांच्या पुतळ्यांच्या साक्षीने सर्व सहकारी तत्त्वांची पायमल्ली होत असेल आणि 'धर्म-सत्य' त्यावर 'रत्न'रूपी उजेड पाडू शकत नसतील, तर ह्या अधोगतीला कोण रोखू शकणार? हा प्रश्न आहे. सोलापूर जिल्ह्याच्या तुलनेने अलीकडेच दुष्काळी भागातील सांगोले सूत गिरणी पारितोषिके मिळवू शकते. स्वामी समर्थ, वळसंग, अकलूजच्या शंकरराव मोहिते सूत गिरणीस फायदा होऊ शकतो, तर आम्ही कुठे चुकतोय, ह्याचा शोध घेण्याची गरज आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून ४४ कोटींचे कर्ज मिळविण्याचे नेमके श्रेय कोणी घ्यायचे? हा मुद्दा प्राप्त परिस्थितीत अप्रस्तुत ठरतो. गिरण्या पुनरज्जीवीत करून ह्या शहरांचे गतवैभव कसे प्राप्त करता येईल, ह्यासाठी नेते मंडळींनी ध्यास घ्यायला हवा. दुर्दैवाने त्याऐवजी परिस्थिती आणखीन कशी चिघळेल अशी वक्तव्ये व कृती करून जर गोंधळात भर पाडणार असू तर काळ आम्हाला कधीही क्षमा करणार नाही. जुनी गिरणी, लक्ष्मी-विष्णूनंतर ह्या सहकारी क्षेत्रातील अग्रगण्य गिरण्यांचा क्रम असेल आणि समस्त सोलापूरकर बघ्याची भूमिका घेत असतील, तर ह्या श्रमजीवी कुटुंबियांना कोण वाचवू शकेल.

दै. लोकमत - २९/९/२०००

# दोन्ही सूतगिरण्या त्वरित सुरू झाल्या तरच पालकमंत्र्यांची 'प्रतिष्ठा' वाढेल !

सोलापूरातील 'यशवंत' व 'सोलापूर' या सहकार क्षेत्रातील दोन सूतगिरण्या पुनश्च कार्यरत होण्यासाठी माझी प्रतिष्ठा पणाला लावीन, असे ठोस आश्वासन देणाऱ्या पालकमंत्री आर.आर. पाटील यांनी खरोखरीच आपली प्रतिष्ठा पणाला लावली. नकारात्मक भूमिका असणाऱ्या वस्त्रोद्योग मंत्र्यांपासून ते मुख्यमंत्र्यापर्यंत सर्वांना कामगार हितासाठी निर्णय बदलायला लावला. राज्य मंत्रिमंडळामध्ये या दोन्हीही सूत गिरण्यासाठी राज्य शिखर बँकेने मंजूर केलेल्या कर्जासाठी हमी देण्याचा आग्रह धरला. शासनाला स्वतःच्या मालकीच्या गिरण्या पैशाअभावी बंद कराव्या लागतात. अशा परिस्थितीत सरकारने तोट्यातल्या गिरण्यांना कर्जासाठी हमी द्यायला भाग पाडले. अर्थात त्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील अन्यमंत्र्यांनी देखील समर्थ साथ दिली. त्यामुळे गेल्या पाच महिन्यापासून बंद असणाऱ्या 'यशवंत' व 'सोलापूर' या दोन्ही सूत गिरण्यांना महाराष्ट्र राज्य शिखर बँकेने मंजूर केलेल्या ४४ कोटींपैकी १५ कोटीच्या कर्जास महाराष्ट्र शासनाच्यावतीने बँकेस हमी देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळामध्ये घेण्यात आला. साहजिकच सर्व कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

त्यानंतर लगेच महाराष्ट्र राज्य शिखर बँकेचे अध्यक्ष सुरेश देशमुख व उपाध्यक्ष आलुरे गुरुजी दोघेही सोलापुरात आले. त्यानिमित्त आयोजित सत्कार सभेत अध्यक्ष देशमुखांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने १५ कोटीच्या कर्जाला हमी दिली असली तरीही शिखर बँकेतून २४ कोटींचे कर्ज देण्यासंदर्भात येत्या आठ दिवसात निर्णय घेतला जाईल. स्वतः शिखर बँकेच्या अध्यक्षांनी

अशी भूमिका घेतली व राज्य शासनाची हमी देण्याची तयारी अशा दोन्हीही सकारात्मक घटनांमुळे लवकरच दोन्ही बंद गिरण्या चालू होतील. असे वातावरण सर्वत्र पसरले. मात्र या दोन्ही घटना घडून दहा दिवस उलटले. नेमके काय घडत आहे. गिरण्या कधी चालू होणार ? याविषयी प्रत्यक्ष कामगारांना व्यवस्थित समजावून सांगणारी यंत्रणा नाही. अर्थात अशी पारदर्शकत एकंदरीतच गिरण्यांच्या व्यवहारामध्ये कधीच दाखविली गेली नाही. मूठभर नेतेमंडळींनी बसून 'तज्ज्ञ' माणसांच्या सल्ल्याने निर्णय घेतल्यामुळेच गिरण्याची ही दूरवस्था झाली. असा सार्वत्रिक समज आहे. आजही पुन्हा तेच घडत आहे.

**मालमत्ता गहाण ठेवण्याचा नवीन प्रस्ताव**

दरम्यानच्या काळात विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार १५ कोटी कर्जाची रक्कम गिरण्यांच्या हातात देण्यास शिखर बँकेने नकार दिल्याचे कळते. तर दुसरीकडे घोषित केलेली १५ कोटींची रक्कम अपुरी व तुटपुंजी असल्यामुळे गिरण्या पूर्ववत होण्यासाठी आधी मंजूर झालेल्या ४४ कोटी रुपयांच्या कर्जास शासनाने हमी द्यावी. त्यासाठी 'यशवंत' व 'सोलापूर' दोन्हीही गिरण्यांची २३ कोटी इतकी संपूर्ण मालमत्ता गहाण ठेवण्याचा प्रस्ताव नव्याने शिखर बँकेकडे सादर करण्यात येणार असल्याचे वृत्त आहे. यासाठी शिष्टमंडळ देखील मुंबईकडे रवाना झाले. म्हणजे शासन, शिखर बँक व स्थानिक नेते मंडळींना नेमके काय हवे आहे. हे कामगारांना कळेनासे झाले आहे. पुरेसे कर्ज मिळाले नाही तर गिरण्या पूर्ववत होणार नाहीत याबद्दल वाद नाही. परंतु हा निधी प्रथम सोलापूर जिल्हा उद्योग बँकेकडेच जमा करावा. त्यामुळे बँकेचे गिरण्यांकडै अडकलेले २२ कोटी रुपये सुटतील व पुन्हा बँकेकडून गिरण्यांना यथावकाश कर्ज देण्यात येईल, अशी स्थानिक नेतेमंडळींची भूमिका असल्याचे कळते. त्यासाठी ४४ कोटींचे सूंपर्ण कर्ज द्या असा प्रस्ताव देण्यात आला. परंतु त्यामध्ये नेतेमंडळींचा स्वार्थ आहे. गिरण्यांचे पुनर्वसन व त्यातील कामगारांना रोजगार देण्याचा हेतू नाही म्हणून शिखर बँकेने कर्जाची रक्कम जिल्हा उद्योग बँकेमध्ये जमा न करता अन्य बँकेत करावी, अशी जाहीर मागणी 'इंटक' ने केली आहे. त्यामुळे नेमकी वस्तुस्थिती काय आहे, याविषयी कामगारांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे.

**आमच्या प्रश्नांची उत्तरे द्या ?**

राज्य शिखर बँकेने ४४ कोटींचे कर्ज मंजूर करीत असताना ज्या तांत्रिक बाबींची प्रथमतः पूर्तता करावयास सांगितले त्यापैकी कामगारांच्या वेतनकपातीचा करार झाला. गिरण्याची मालमत्ता गहाण ठेवण्याचा, संचालक मंडळाच्या वैयक्तिक मालमत्तेची हमी वा तत्सम गोष्टींबाबत अद्यापही संदिग्धता का पाळण्यात येत आहे ? असा प्रश्न कामगारांकडून विचारला जात आहे. जवळ जवळ दोन महिने या गिरणीतील कामगारांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण केले. त्यांचे ज्या कामगार नेत्यांनी नेतृत्व केले. त्यांची भूमिका वेगळी आहे. प्रतिनिधीत्व असणाऱ्या 'इंटक'च्या विद्यमान नेत्याचे म्हणणे वेगळे आहे. पूर्व भागातील नेते मंडळींमध्ये गटबाजी असून त्यांच्यामध्ये मानापमानाचे नाटक चालू आहे. आजपर्यंत 'तज्ज्ञ' म्हणून मिरविणारे मूग गिळून गप्प आहेत. अशा परिस्थितीमध्ये पालकमंत्र्यानी आपली प्रतिष्ठा पणाला लावून मंत्रिमंडळाचा निर्णय घेताना फक्त १५ कोटींसाठीच हमी का दिली. जर ४४ कोटी मिळाल्याशिवाय गिरण्या चालू करायच्याच नाहीत अशी स्थानिक नेते व संचालक मंडळाची भूमिका असेल तर शासनाने कामगारांच्या तोंडाला पाने का पुसावीत? शिखर बँकेने १५ कोटींचे कर्ज मंजूर करण्यास नकारघंटा का वाजवावी? असे सरळ आणि सोपे प्रश्न कामगार विचारत आहेत पण कोणाला ? या प्रश्नांची खरी उत्तरे देण्याची जबाबदारी नेमकी कुणावरही नाही काय ?

**सक्षम प्रशासक नेमण्याची मागणी**

राज्य शिखर बँकेने कर्ज दिले. शासनाने त्यास हमी दिली. तरीही गिरण्या योग्य पद्धतीने चालविण्यात येतील यावरही कामगारांचा विश्वास राहिलेला नाही. कारण ज्या संचालक मंडळाच्या व नेतेमंडळीच्या गैरव्यवहारामुळे हा तोटा झाला (दुर्दैवाने त्यामध्ये मंदीची भर पडली एवढेच!) त्यांच्याच हाती पुन्हा ४४ कोटी दिल्यास पुन्हा काय होणार? हे सांगण्यासाठी 'तज्ज्ञ' माणसाची गरज नाही म्हणून दोन्ही गिरण्यांचा कारभार पारदर्शी पद्धतीने होण्यासाठी विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करून सक्षम प्रशासक व प्रशासक मंडळाची नेमणूक करण्याची मागणी 'इंटक'ने केली आहे. अर्थात

शिखर बँकेने कर्ज मंजूर करताना व शासनाकडून हमी देताना, अशाप्रकारची प्रशासकीय व्यवस्था होणार असल्याविषयी ठरले असल्याचे कळते. त्यामुळे प्रशासक म्हणून वर्णी लावण्यासाठी पुन्हा सर्वच विद्यमान नेतेमंडळींचे प्रयत्न सुरू आहेत. थोडक्यात पुनश्च हरी ओम !

**प्रबळ इच्छाशक्तीचा अभाव**

वस्त्रोद्योगाला जागतिक मंदी आहे. यंत्रमाग हातमागाची वाताहत चालू आहे. चीनसारख्या देशाकडून स्पर्धात्मक आक्रमण सुरू आहे. येत्या एप्रिल २००१ पासून खुली व्यवस्था झाल्यानंतर आणखीन स्पर्धा वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर अत्यंत काटकसरीने व दर्जेदार उत्पादन केल्याशिवाय गत्यंतर नाही, हे करण्यासाठी अत्यंत कठोर निर्णय घ्यावे लागतील. केवळ वेतन कपात करून चालणार नाही. तर आणखीन खूप काही सोसावे लागणार आहे. त्याचबरोबरीने 'सहकार' (स्वाहाकार नव्हे!) तत्वप्रणाली प्रामाणिकपणे राबविण्यासाठी संचालक मंडळ व नेते मंडळींनी कंबर कसली पाहिजे, अशी इच्छाशक्ती आपल्यामध्ये आहे काय? एच जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी व मंत्रिमहोदयांनी पणाला लावलेली प्रतिष्ठा वाढेल अन्यथा नाही. जवळ जवळ ३००० कामगार कुटुंबियांचा रोजगार अवलंबून असणाऱ्या या गिरण्या त्वरित सुरू झाल्याच पाहिजेत. त्याविषयी दर वेळी नवीन तांत्रिक मुद्दे उपस्थित करून चालढकल करण्याची भूमिका सोलापूरकरांना अपरिचित नाही. 'लक्ष्मी-विष्णू' चा घटनाक्रम अद्याप आम्ही विसरलेलो नाहीत एवढेच !

दै. लोकमत - ९/२/२००१

## 'यशवंत' 'सोलापूर' गिरण्यांमध्ये पुनःश्च अंधार !

नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी 'सोलापूर' व यशवंत सूत गिरण्यांवर अंधाराचे साम्राज्य पसरले. वीज बिलाची थकबाकी न भरल्याने सोलापूर व यशवंत सहकारी सूत गिरण्यांचा वीज पुरवठा एम.एस.ई.बी. ने खंडित केला. यापूर्वी सप्टेंबर २००० ते परवा दिवाळीच्या पाडव्यापर्यंत देखील गिरण्या बंदच होत्या. राज्य सहकारी बँकेने २४ कोटींचे कर्ज मंजूर केल्यामुळे काहीतरी करून गिरण्या चालू करण्याच्या उद्देशाने दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर सायंकाळी दोन्ही गिरण्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. बंद मशिनरीला तेल-पाणी करून २०० गाठी कापूस खरेदी करून गिरण्यांचे भोंगे वाजले. हा कापूस किती दिवस पुरणार ? कापूस संपला, आता पुढे काय? हा प्रश्न असतानाच थकित कर्जापायी बंद वीज पुरवठ्यामुळे पुन्हा अंधाराचे साम्राज्य पसरले.

पंधरा दिवसात उपयायोजना करण्याची घोषणा करणारे पालकमंत्री, या गिरण्यांचे तथाकथित अर्ध्वयू 'धर्म-सत्य' कृती समितीचे 'मास्तर-गुरुजी', तसेच रस्त्यावर येऊ, आंदोलन करू व प्रसंगी आत्मदहनाची भाषा करणारे प्रातिनिधीक संघाचे नेते सारेच आता निवडणुकांमध्ये गुंतल्याने हा अंधार कोणाला दिसत नाही. अगदी त्याच दिवशी म्हणजे गिरण्यांचा वीज पुरवठा खंडित केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी जेव्हा गिरण्यांचा भोंगा थंड झाला, तेव्हा जाणता राजा शरद पवारही सोलापूरला आले होते. अगदी बारामतीपेक्षा सोलापूरने आपल्याला जादा प्रेम दिले आहे. त्यामुळे या शहराबद्दल आपल्याला आस्था आहे, असे म्हणत या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी राज्य सहकरात आणि महापालिकेत शहाणपणाची भूमिका मांडणारे लोक निवडून आले

पाहिजेत, असे प्रतिपादन केले. आता साहेबांना अभिप्रेत असणारे शहाणपणाची भूमिका घेणारे लोक कोण? ते निवडून येईपर्यंत 'यशवंत' 'सोलापूर'च्या कामगारांनी अंधारात खितपत पडायचे का?

### प्रशासकांनी तोंड उघडले

दरम्यान, गिरण्यांवर शासननियुक्त प्रशासकपदी असलेले एस.एस. पारसे पहिल्यांदाच जाहीरपणे बोलले. त्यांच्या मते गिरण्यांच्या थकित बिलामुळे वीज मंडळाने वीजपुरवठा खंडित केला आहे. यास जिल्हा औद्योगिक बँकेची ढासळलेली आर्थिक परिस्थितीतच कारणीभूत आहे. प्रशासक म्हणून पदभार स्वीकारल्यापासून आजपर्यंत औद्योगिक बँकेने अडवणुकीची आणि आडमुठेपणाचीच भूमिका घेवून वेळोवेळी अडथळे आणले आहेत. प्रशासकांनी गिरण्यांच्या कर्ज प्रकरणावर तारण खतावर सह्या केलेल्या आहेत. त्यामुळेच कर्ज मंजूर झाले आहे. मंजूर कर्जाची रक्कम गिरण्यांच्या खात्यावर जमा करून गिरण्या चालू करण्यासाठी न देता कर्ज रकमेची बँकेने परस्पर विल्हेवाट लावली, असा स्पष्ट आरोप प्रशासकांनी केला, तर मान्यताप्राप्त राष्ट्रीय गिरणी कामगार संघाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकामध्ये सोलापूरातील कामगारांच्या पुनर्वसनासाठी मंजूर केलेले २४ कोटी कर्ज मिलच्या पुनरुज्जीवनासाठी न वापरता पूर्वभागातील श्रेष्ठींच्या दबावामुळे प्रशासकांची हरकत असतानाही संपूर्ण रकमा परस्पर जमा करून घेतल्या व बँक वाचविली व या प्रकरणी चौकशीची मागणी केली. आता पूर्वभागातील हे श्रेष्ठी कोण आहेत, त्यांचा 'धर्म' काय आणि नेमके 'सत्य' काय एवढे सांगून प्राप्त परिस्थितीवर 'रत्न' रुपी उजेड कोण टाकू शकेल. ही मंडळी जर कामगारांची, शासनाची व सोलापूरकरांची चक्क फसवणूक करून जर इथल्या उद्योग क्षेत्रावर अंधार पसरविणार असतील, तर हा अंधार छेदण्याची शक्ती व तसे शहाणपण (पवार साहेबांना अभिप्रेत) असलेले नेतृत्व मिळण्याच्या प्रतिक्षेशिवाय कामगार काहीच करू शकणार नाही.

### 'सत्य' धर्माचे आचरण

गिरण्या चालू करण्यासाठी राज्य सहकारी बँकेने दिलेल्या २४ कोटीपैकी उद्योग बँकेने येणे रकमा वसूल केल्याने आता फक्त गिरण्यांच्या नावे केवळ २

कोटी २० लाख ८२ हजार शिल्लक आहेत, असे कळते, तर उद्योग बँकेच्या प्रतिनिधींनी यावर खुलासा केला की, २४ कोटीतून कामगारांच्या देय रकमा, कर्जावरील व्याज, शिखर बँकेची कपात, समभाग, शासकीय थकबाकी, हमी व इतर अनुत्पादक खर्च वगळता केवळ दोन कोटी वीस लाख रुपये शिल्लक आहेत. नागरी बँकांनी आपापल्या ठेवी उचलल्या. त्यामुळे गिरण्यांना खेळते भांडवल देण्यासाठी बँकांकडे पैसा उपलब्ध नाही. ही जर वस्तुस्थिती असेल, तर नजिकच्या काळात गिरण्यांमधील अंधार कसा दूर होईल. झालाच तर तो किती काळ टिकेल. गिरणीकडे आपली देणी यायची आहेत म्हणून दुसरीकडे प्रयत्न न करता आशेवर जगणारी अनेक मंडळी आहेत. उद्याची चिंता घेवून जगणाऱ्या या श्रमजीवींना 'सत्य' सांगण्याचा. आपला 'धर्म' नव्हे काय?

दै. लोकमत - ११/१/२००२

# चक्रव्युहात अडकलेली 'इंटक' संघटना

केंद्र सरकारच्या नवीन औद्योगिक धोरणानंतर देशातील औद्योगिक आघाडीवर विशेषत: कामगार चळवळीवर गंभीर परिणाम झाले. त्याचे दृश्य परिणाम आता दिसू लागले आहेत. उदरमतवादी धोरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढते अतिक्रमण, देशांतर्गत उद्योगांची आधुनिकरीकरणाच्या नावाखाली कामगार कपात, 'व्हायेबलिटी'च्या नावाखाली व स्ट्रक्चरल अॅड्जस्टमेंटच्या नावाखाली उद्योगांचा आकार कमी करण्यासाठी होणारे कामगार कायद्यांचे उल्लंघन ह्या साऱ्यांच्या परिणामी इथली कामगार चळवळ दबली जात आहे. देशांतर्गत तसेच जागतिक स्पर्धात्मक परिस्थितीमुळे उद्योगांमध्ये आलेली मंदीची परिस्थिती पेलणे अवघड होत असल्याने उत्पादन घटविण्यात येत आहे. साहजिकच ले-ऑफ दिले जाते. शेवटी लॉकआऊटही केले जाते. ही सारी पडझड हतबलतेने पाहण्यापलिकडे कामगार संघटना काहीही करू शकत नाहीत, अशी सर्वहारा परिस्थिती आलेली आहे.

'लक्ष्मी-विष्णु' मालकांचा प्रस्ताव

एकेकाळी सोलापूरची वैभव समजली जाणारी 'लक्ष्मी-विष्णू' गिरणी पूर्णपणे बंद पडून १० महिने झाले तरी शासन या प्रश्नी तोडगा काढू शकलेले नाही. इतरांचे सोडा, या कामगारांचे कायमचे प्रतिनिधीत्व करणारी राष्ट्रीय गिरणी कामगार संघ ही मान्यताप्राप्त कामगार संघटना देखील काही करून धजली नाही. कामगारांच्या बाजूने कोरडी सहानुभूती दाखविणे हे मान्यताप्राप्त कामगार संघटनेकडून अपेक्षित नाही. बी.आय.आर. कायद्यानुसार लाभलेले वैध अधिकार वापरून प्रत्यक्षात कामगारांच्या पदरात न्याय मिळेल अशी

सकारात्मक कृती व्हायला हवी. ती होताना दिसत नाही. त्यासाठी आवश्यक अभ्यासू व कार्यक्रम नेतृत्व इंटककडे नाही तर दुसरीकडे काही ठोस पाऊले उचलण्याजोगी परिस्थिती नाही. सर्वहारा मन:स्थितीतला कामगार लढायला सज्ज नाही. मालकांपासून ते राजकीय पुढाऱ्यापर्यंत सर्वांनीच हेळसांड केल्यामुळे नेमके काहीतरी विधायक घडेल याची शाश्वती नाही' अशा परिस्थितीत मिल मालक आपटे यांनी 'विष्णु' युनिट बंद करून 'लक्ष्मी' युनिटमधील कामगारांसह ५० हजार स्पिंडल्सद्वारे उत्पादन करण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे केवळ १४०० कामगारांना काम उपलब्ध होईल. सुल्झर व रुटी लुम्स चालवून प्लेन लुम्स मात्र गावखात्याच्या पद्धतीने चालविण्यात येतील. उर्वरित कामगारांना त्यांच्या देय रकमा १९९८ सालापर्यंत दिल्या जातील, अशा प्रकारचा प्रस्ताव 'इंटक'कडे पाठविण्यात आला. या प्रस्तावावर विचारविनिमय करण्यासाठी संघाने बोलाविलेल्या बैठकीमध्ये उपस्थित सर्व कामगारांनी प्रस्तावास विरोध केला. मिल मालकांवर कामगारांचा विश्वास राहिलेला नसल्याने शासनाने मिलची मालमत्ता जप्त करावी. शासनाने व इतर उद्योगपतींकडून गिरणी चालवावी, अशी कामगारांनी भूमिका घेतली, याचा स्पष्ट अर्थ आहे की, कामगार-मालक संबंध इतके दुरावलेत की, मालकांनी विश्वासार्हताच गमावलेली आहे. अशा परिस्थितीत मालकांकडून विरोधत 'इंटक' मान्य करू शकत नाही. नरसिंगजीची संभाव्य कामगार कपात त्याचप्रमाणे नरसिंगगिरजी मिल्सच्या पुरुज्जीवनासाठी १५५४ कामगारांची कपात करण्याची योजना मान्यताप्राप्त 'इंटक' कडे पाठविली आहे. बी.आय.एफ.आर. च्या सूचनेनुसार २६ मार्च ९६ पूर्वी मान्यताप्राप्त व प्रातिनिधिक संघटना या नात्याने तसा कामगार कपातीस स्वीकृती असणारा करार न केल्यास नरसिंगगिरजी मिल्स बंद करण्याची भीती व्यक्तविली जात आहे. साहजिकच 'इंटक' ने त्यास कडक विरोधही केला, परंतु त्याचवेळी मिलमधील कामगारांना मुंबईतील कामगारांप्रमाणे दरमहा ५५ रुपयांची पगारवाढही मागितली आहे. प्राप्त परिस्थितीत ही पगारवाढ देणे मिलला परवडणारे नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणात कामगार कपात करून ही गिरणी 'व्हायेबल' होणारच अशी कोण खात्री देऊ शकेल. प्रचंड प्रमाणात बेशिस्त आणि असंय कामगार समस्यांनी ग्रस्त नरसिंगगिरजीला शिस्त आणल्याशिवाय केवळ कामगार कपात करून काहीच उपयोग नाही.

हे करण्याचे धाडस कोणामध्ये नाही. तेवढा अभ्यास असलेले समंजस नेतृत्व हवे आहे. इंटकने तुर्तास करार करण्यास विरोध केलेला असला तरी हे संकट टाळण्यासाठी ठोस पर्याय त्यांच्याकडे नाही. 'लक्ष्मी-विष्णु' बाबतीत अशीच चालढकल झाली. म्हणून हे दिवस आले. त्याची पुनरावृती झाल्यास नरसिंगिरजीचीही तीच परिस्थिती होईल यात शंका नाही. नरसिंगगिरजी १९५८ साली बंद पडल्यानंतर तत्कालीन कामगारांनी पगार कपात सहन करून ही गिरणी वाचविली आहे. यातून मार्ग काढू शकणार कै. यशवंतराव चव्हाण, कै. एस.एम. जोशीसारखे द्रष्टे नेतृत्व आज नाही.

एकीकडे लक्ष्मी-विष्णू तर दुसरीकडे नरसिंगगिरजी अश दुधारी संकटात म्हणजे थोडक्यात चक्रव्युहात 'इंटक' सापडलेला आहे. कामगार कपात स्वीकारता येत नाही. तर त्याशिवाय अन्य पर्याय उपलब्ध नाही. यातून बाहेर पडण्यासाठी योग्य मार्गदर्शन नाही. कापड उद्योगातील सद्यस्थितीमुळे लढा देऊनही चालणार नाही अशी निराशाजनक परिस्थिती आहे. दुर्दैवाने कामगारांना कोणीच वाली ठरलेला नाही. संपूर्ण देशात थोड्याफार फरकाने कामगार चळवळीसमोर अशा प्रकारची गंभीर चक्रव्युहागत परिस्थिती आहे. औद्योगिक विकासाला कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही, परंतु कामगार कपातीशिवाय अन्य पर्यायच पुढे येत नाहीत. भारतासारख्या विकसनशील दशाला निश्रिच्तच परवडणार नाही आधुनिकीकरणाबरोबर उत्पादन क्षमता यांत्रिक क्षमता वाढविण्यासाठी सक्षम कामगारांना बेरोजगार होण्यापासून वाचविले पाहिजे, असे व्यवहार्य पर्याय ....... आल्यास कामगार संघटना निश्चित सहकार्य करतील. किंबहुना कामगारदेखील मदतीसाठी पुढे येतील. लक्ष्मी-विष्णुच्या वाटेवर नरसिंगगिरजीची वाटचाल रोखायला हवी. तिला शिस्त व योग्य नियोजनातून अधिक सक्षम बनविले पाहिजे अन्यथा ही नकारात्मक मालिका कधी थांबणार नाही.

दै. लोकमत - २९/२/१९९६

# लढाऊ कामगारांची समंजस चळवळ

ब्रिटिश राजवटीत जेव्हा कामगारांना संघटनेचे कायदेशीर अधिकार नव्हते. कसल्याही प्रकारचे संरक्षण नव्हते तेव्हापासून सोलापूरमधील गिरणी कामगारांची क्रांतिकारी लढ्याची यशस्वी परंपरा आहे. ट्रेड युनियन्स ॲक्ट हा १९२६ साली अंमलात आला. परंतु त्यापूर्वीच १९२० साली देशाच्या इतिहासात क्रांतिकारी लढा म्हणून नोंदल्या गेलेल्या गिरणी कामगारांचा 'भीमरावचा संप' या नावाने ओळखला जाणारा अभूतपूर्व संप झाला. विसाव्या शतकाच्या अगदी सुरुवातीपासून स्वातंत्र्य लढ्याच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक ब्रिटिशाविरोधी लढ्यामध्ये इथला कामगार अग्रभागी होता. १९०८ साली लोकमान्य टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली ६ वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली. त्याच्या निषेधार्थ इथल्या गिरणि कामगारांनी उत्स्फूर्तपणे काम बंद करून हारताळ पाळला. संपूर्ण देशभर स्वातंत्र्यासाठी विविध मार्गाने लढे चालू होते. तेव्हा राजकीय जाणीव तीव्र असणारा इथला कामगार आपापल्या परिने उत्स्फूर्त भागीदारी करीत होता. त्यामुळे म. गांधी, लोकमान्य टिळक, पंडित नेहरू यासारख्या अनेक स्वातंत्र्यसेनींनी सोलापुरातील श्रमिकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी मार्गदर्शन केले. सर्वात मोठी जुनी गिरणी, लक्ष्मी–विष्णू, नरसिंग गिरजी तसेच जाम मिल ह्या चार कापड गिरण्यांमधून काम करणाऱ्या कष्टकऱ्यांचे गिरणगाव असेच या शहराची ओळख होती.

'झाड पाला खावा, पण संप टिकवा'

देशभरातील स्वातंत्र्य संग्रामामुळे अस्मितेची जाणीव होऊ लागल्याने इथला गिरणी कामगार हळूहळू आत्मपरिक्षण करू लागला. कामगार म्हणजे दावणीला बांधलेली जणू गुरेच आहेत. किमान गुरांना संध्याकाळी गोठ्यात जायला

परवानगी असते. आम्हाला तीही नाही. दिवे लागून गेले तरी आम्हाला गिरणीतच कोंडून ठेवतात. त्यामुळे आमच्या मुलाबाळांचीही गाठ होत नाही. आम्हीही माणसं आहोत. आम्हाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार हवा. तो आम्ही मिळविणारच. त्या निर्धाराने १९२० साली कामगारांनी संप पुकारला. त्यावेळी संप ६ महिन्यपर्यंत लांबला. कामगारांची एकजूट टिकविण्यासाठी संपाचे नेते भीमराव कामगारांसमोर म्हणायचे की, 'झाडपाला खावा, पण संप टिकवा' त्यावेळी संपाला कामगारांच्या बोलीभाषेत 'अड्डा' केला म्हणायचे. सोलापूरच्या इतिहासात प्रथमतः या संपाच्या निमित्ताने मिलिटरीला पाचारण केले गेले. २६ जानेवारी १९२० संपकारी कामगारांवर गोळीबार होवून ७ कामगार जागीच ठार झाले. त्यानंतर तडजोड होवून संप मिटला. ह्या क्रांतिकारी घटनेचे त्याकाळी मुंबई, अहमदाबादसारख्या वस्त्रोद्योगांच्या मोठ्या केंद्रामधूनही तीव्र पडसाद उमटले.

## १९३० चा मार्शल लॉ चा इतिहास

त्या सुमारास देशभर क्रांतिकारी स्वातंत्र्य सैनिकांचा संचार असायचा. त्यांच्या सतत संपर्कातून इथले तरूण कामगार प्रसंगी भूमिगत राहून तर कधी उघडपणे ब्रिटिशविरोधी कारवाया करीत असत. 'गिरणगाव' जसे क्रांतिकारकांचे केंद्र बनले. तसेच त्यांना सक्रीय साथ देणाऱ्या गिरणी कामगारांचे शहर म्हणून ओळखले जाऊ लागले. ह्या लोकभोक्षाच्या परिस्थितीच्या परिणामी सोलापुरातील जनतेने आणखीन एक क्रांतिकारी इतिहास घडवून आणला. ब्रिटिशांची सत्ता नाकारून ९ मे १९३० ते ११ मे १९३० असे तीन दिवस स्वातंत्र्य उपभोगले. त्या तीनही दिवशी सोलापुरात जनतेचे राज्य होते. त्यातील क्रांतिकारी चार पुत्रांना १२ जानेवारी १९३१ रोजी येरवडा जेलमध्ये फाशी देण्यात आली. ह्या चार हुतात्म्यांच्या फाशींच्या निषेधार्थ सोलापुरातील साऱ्या गिरणी कामगारांनी स्वयंस्फूर्तीने संप केला. ही घटना देखील भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली. त्यामध्ये इथल्या श्रमिकांची मोलाची भागिदारी होती.

## हातमाग कामगारांचीच चळवळ

एकंदरीत सोलापुरातील कष्टकऱ्यांच्या क्रांतिकारी चळवळींचा अभ्यास

केल्यास असे दिसते की, स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये मुख्यत्वे कामगार चळवळ कम्युनिस्टांच्या प्रभावाखाली होती. त्यामध्ये नेतृत्वही साम्यवाद्याचेच होते. विशेषतः हातमाग विणकारांना संघटित करून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी ज्या नेत्यांनी (कॉम्रेडस्) पुढाकार घेतला. त्यामध्ये कॉ.व्यंकप्पा मड्डूर, कॉ. सिद्रामप्पा फलमारी, कॉ.विठ्ठलराव फलमारी, कॉ.गो.द. साने, कॉ.विठ्ठलराव फलमारी, कॉ. नारायणराव आडम इ. चा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. सोलापूर हे हातमागाचे मोठे केंद्र होते. हातमागांना युद्धकाळात सूत मिळेना. त्यासाठी मोहिम यशस्वी करून सुताचे रेशनिंग करून घेतले. हा संपूर्ण महाराष्ट्रातील पहिलाच प्रयोग होता. सूत वाटपाचे काम आसामी संघाकडे कलेक्टरांच्या माध्यमातून दिले गेले. कॉ.विठ्ठलराव फलमारी हे सूत वाटपाचे मुख्य व्यवस्थापक होते. १९३६ साली हातमागाला भयंकर मंदी आली. त्यामुळे विणकरांची उपासमार होऊ लागली. त्यांना संघटित करण्यासाठी कॉ. मड्डूर व इतर कॉम्रेडस्च्या नेतृत्वाखाली १५ ते २० हजार हातमाग विणकरांचा, प्रचंड मोर्चा आसामीचा कलेक्टर कचेरीवर नेला. तेव्हा संघटनेच्या गरजेतून कॉ. मड्डूर यांच्या नेतृत्वाखाली लालबावटा हातमाग कामगार युनियनची स्थापना करण्यात आली. गेल्या ६० वर्षामध्ये अनेक लढ्यामधून या युनियनचे हातमाग विणकर तसेच आसामींच्या हक्कांचे संरक्षण केले.

### कॉ. मीनाक्षी सानेंचा सोनेरी काळ

त्याच सुमारास सोलापुरामध्ये घरगुती स्वरुपाचा विडी वळण्याचा उद्योग विशेषतः महिला व बालकांकडून चालविला जायचा. आंध्रच्या दुष्काळामुळे स्थलांतरित झालेली तेलुगू भाषिक विणकर मंडळी हातमाग व्यवसायामध्ये होते. तर त्यांच्या कुटुंबिय महिला व मुली विड्या वळण्याचे काम करीत. शेजारील आंध्र, गुजरातमधून तेंदुची पाने व तंबाखू मुबलक उपलब्ध व्हायचे म्हणून घरबसल्या करता येण्याजोगा हा व्यवसाय वाढू लागला. मात्र या अशिक्षित सोशिक महिलांची लुबाडणूक चालायची. प्रचंड आर्थिक शोषण व्हायचे. परंतु अत्यंत पारंपरिक मागासलेल्या जातीतील या महिलांना (विशेषतः पद्मशाली) संघटित करणे अतिशय, अवघड होते. प्रचंड सामाजिक बंधने होती. त्यांना न्याय्य हक्कांसाठी संघटित करून लढण्याचे

बळ देणाऱ्या कॉ. मीनाक्षी साने यांचे कार्य बहुमोल आहे. १९३३ ते १९५८ अशा पंचवीस वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांनी तेलुगू भाषा बोलता येत नसताना, परंपरेने घराबाहेर पडून रस्त्यावर लढा देण्याची परिस्थिती नसताना, महत्प्रयासाने झोपडपट्ट्यांमध्ये जावून ह्या कष्टकरी महिलांशी जवळीक साधली. त्यांना लढायला शिकविले. २९ ऑक्टोबर १९३४ मध्ये इथल्या शिवकरण मागीलाल बिडी फॅक्टरीमध्ये महिलांनी संप केला. त्यानंतर १९३८ साली बिडी कामगार महिलांनी मीनाक्षी साने यांच्या नेतृत्वाखाली मजुरीवाढीसाठी संप केला. हा संप एक महिन्यापर्यंत चालला त्यानंतर ६ आण्याऐवजी साडे सहा आणे मजुरी देण्याचे मालकांनी मान्य केल्यावरून संप मिटला. कॉ.मीनाक्षी सानेबरोबर त्याकाळी इरम्मा संभारम, अंबव्वा चिप्पा यासारख्या पद्मशाली समाजातील महिला अग्रभागी होत्या. त्याकाळी इथे कॉ. मीनाक्षी साने यांनी कार्यकर्त्या महिलांसाठी 'एबीसी ऑफ कम्युनिझम' सारखे साम्यवाद समजावून सांगणारे अभ्यास वर्ग घेतले. सोलापुरात मार्क्सवादावरचा हा पहिलाच अभ्यास वर्ग असावा. त्याचबरोबरीने कॉ. जांभेकरांची 'उठाव झेंडा बंडाचा' अशी क्रांती गीते कामगारांना आकर्षित करीत असत. कॉ. कऱ्हाडकर, कॉ. श्रीनिवास सरदेसाई, कॉ.गो.द. साने या बरोबरच स्थानिक कम्युनिस्ट कार्यकर्ते आघाडीवर होते. बिडी महिला कामगारांचे संघटन त्याकाळी बऱ्यापैकी झाले. साहजिकच हातमाग, गिरणीतील पुरुष व त्यांचे कुटुंबिय महिला दोघेही कम्युनिस्टांच्या प्रभावाखाली बराच काळ राहिले. त्यातून कॉ.गो.द. सानेंसारखे कामगार नेते १९५२ साली विधानसभेवर निवडून येवू शकले. स्थानिक नगरपालिकामधून कॉ. फलमारीसारखी मातब्बर मंडळी कामगार भागांचे प्रतिनिधीत्व करू शकले. एकंदरीत राजकीय, सामाजिक जीवनविषयक दृष्टीकोन साम्यवादी बनण्याकडे या सर्व गोष्टींचा परिणाम झाला.

### भाई चंदेले, डॉ. अंत्रोळीकर

एकीकडे कम्युनिस्टांचा प्रभाव वाढत होता. त्याच वेळेला भाई छन्नुसिंग चंदेले व कै.कृ.भि. अंत्रोळीकर या दोन स्थानिक स्वातंत्र्यप्रेमी नेत्यांची पकड कामगार चळवळीवर वाढत होती. स्वातंत्र्य संग्रामाचे खंदे सैनिक म्हणून हे दोन्हीही नेते कार्य करीत असताना इथल्या कामगारांच्या समस्यांविषयी

सातत्याने आग्रही भूमिका घ्यायचे. १९३४ च्या गिरणी कामगारांच्या संपामध्ये नेते बेके, डॉ.बाटलीवाला, कॉ. कऱ्हाडकर, भाई एम.डी.विभुते यांच्याबरोबर डॉ. कृ.भि. अंत्रोळीकरांनाही शिक्षा झाली. १९३१ च्या संपामध्ये डॉक्टरांनी कामगारांचे नेतृत्व केले होते. १९४६ साली सोलापूरला काँग्रेसच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय गिरणी कामगार संघाची स्थापना झाली. त्यावेळी डॉ.अंत्रोळीकर संस्थापक सदस्यांपैकी होते. पुढे पहिली दोन वर्षे तेच या रा.गि.का. संघाचे अध्यक्ष होते. १९२८ साली पहिली गिरणी कामगार संघटना डॉ.कृ.भि. अंत्रोळीकर यांनी स्थापन केलेली होती. पुढे १९३५ पर्यंत ते या संघटनेचे अध्यक्ष होते. पुढे डॉक्टरांच्या अध्यक्षतेखालीच रेल्वे कामगारांची पहिली संघटना स्थापन करण्यात आली. १९२७ साली डॉक्टरांच्या नेतृत्वाखाली लक्ष्मी-विष्णू गिरणी कामगारांनी संप पुकारला. अगदी डॉक्टरांच्या शेवटच्या आजरातही त्यांना भेटायला आलेल्या महाराष्ट्राचे ऊर्जा मंत्री जयंतराव टिळकांना शेवटची इच्छा म्हणून इथल्या जुनी गिरणीतील कामगारांचे प्रॉव्हिडंट फंडाचे पैसे परत मिळवून द्यावेत. अशी विनंती केली.

त्याचप्रमाणे मूळचे साम्यवादी विचारसरणीचे असलेले भाई छन्नुसिंग चंदेले यांनी बऱ्याच काळांपर्यंत कॉ.डांगे, कॉ. बी.टी. रणदिवेंपासून ते नव्या पिढीच्या कामगार नेत्यांबरोबर इथल्या कामगार चळवळीचे नेतृत्व केले. पुढे इंटकच्या संघटनांमध्ये त्यांनी मौलिक कामगिरी केली. १९४८ मध्ये जुनी मिल बंद पडली. तेंव्हा ती गिरणी शासनाने ताब्यात घ्यावी. यासाठी जी घटनादुरुस्ती झाली, त्यामध्ये भाईजींचाच आग्रह होता. त्याचप्रमाणे १९५८ मध्ये बेकार निवारण योजनेखाली बंद पडलेली नरसिंग गिरजी मिल शासनाने ताब्यात घ्यावी म्हणून के.एस.एम जोशींबरोबर कै. यशवंत चव्हाण आग्रह धरणारे भाईजी होते. या दोन्हीही स्वातंत्र्यसेनींनी इथली कामगार चळवळ साम्यवादी मंडळींकडून काढून 'इंटक' म्हणजेच काँग्रेसवाल्यांकडे सुपूर्त केली.

दै. लोकमत - २३/१२/१९९९

# एकविसाव्या शतकाची हाक

स्वातंत्र्योत्तर काळातील देशभरातील कामगार चळवळ पूर्णपणे 'इंटक'मय झाली. त्यापाठीमागे महात्मा गांधींसारख्या राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वाची साथ होती. त्याचप्रमाणे मुंबई औद्योगिक संबंध कायदा १९४८ च्या मान्यताप्राप्त व प्रातिनिधीक कामगार संघटना ठरविण्याच्या कायदेशीर तरतुदीचा महत्त्वाचा आधार होता. साहजिकच इथल्या संघटित उद्योगांसाठी इंटकप्रणित रा.गि.का. संघाला मान्यता मिळाली. आजपर्यंतची रस्त्यावरची कामगार लढाई लढलेल्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांचे कायद्यानेच हात कापले. त्यांनी गिरणी कामगार युनियन संघटनेमार्फतच त्यांचे संघटित उद्योगातील अस्तित्व ठरले. त्यामध्ये कॉ.नरसय्या आडम, कॉ. भीमराव रोणे, कॉ. जगन्नाथ भोईटे, कॉ.विठ्ठल सनगर इ. चा समावेश होतो.

'इंटक' या माध्यमातून गेली ४० वर्षे संघटित वस्त्रोद्योगांतून जी कामगारांची चळवळ झाली, त्यापैकी बहुतेक वर्षे कै. आबासाहेब किल्लेदार यांच्याकडे नेतृत्व राहिले. १९५८ साली किल्लेदार रा.गि.का. संघाचे अध्यक्ष झाले. त्यांच्या कारकीर्दीत संघटित क्षेत्रातील वस्त्रोद्योग कामगारांचे अनेक लढे झाले. महाराष्ट्रातील इतर टेक्सटाईल सेंटरप्रमाणे इथल्या कामगारांना सुविधा देण्यामध्ये 'इंटक' यशस्वी झाली.

### यंत्रमाग कामगारांची चळवळ

हातमाग व्यवसाय पूर्णपणे मंदावला. त्याठिकाणी यंत्रमागाचा धंदा वधारला. यंत्रमाग क्षेत्र जसे वाढू लागले, तसे असंघटित क्षेत्रातील कामगारांमध्ये पूर्वीच्या 'आयटक' ची जागा 'सिटू'ने कॉ. नरसय्या आडम यांच्या नेतृत्वाने

घेतली. १९६२ साली जुनी गिरणी बंद पडल्यानंतर इथला असंघटित स्वरुपाचा घरगुती यंत्रमागउद्योग वाढला. १९६२ साली कॉ. व्यंकप्पा मड्डूर, कॉ. नारायण म्हैसूर यांनी 'आयटक' च्या नेतृत्वाखाली 'पॉवरलूम कामगार युनियन' (लालबावटा) स्थापन केली. पुढे कॉ. नरसय्या आडम यांच्या नेतृत्वाखाली ३० मे १९७० रोजी 'लालबावटा जनरल कामगार युनियन' ची स्थापना होऊन त्याद्वारे मुख्यत्वे असंघटित पॉवरलूम कामगारांचे संघटन होऊ लागले. १ ऑक्टोबर १९७१ साली किमान वेतन कायदा आणि १ जानेवारी १९७२ रोजी स्पेशल अलौन्सचा कायदा झाला. त्याच्या सोलापुरातील यंत्रमाग कामगारांसाठीच्या अंमलबजावणीसाठी २६ ऑगस्ट १९७२ रोजी १२००० कामगारांचा बेमुदत संप झाला. २२ दिवस चाललेल्या या संपामुळे सोलापूरच्या कामगार चळवळीच्या इतिहासामध्ये प्रथमतः मालकांना लेखी करार करावा लागला. ९ सप्टेंबर १९७२ रोजी हा लेखी करार तुरूंगामध्ये कामगार नेत्यांनी केला. त्यामुळे कामगारांना स्पेशल अलौन्सचा फरकही मिळाला. तेथून 'सिटू' चे वर्चस्व वाढले. तद्नंतर १९८१ साली ९ दिवसाचा संप, १९८४ साली २५ हजार कामगारांचा ५४ दिवसाचा संप, १९८९ साली ७९ दिवसांचा संप असे ठळक कामगार लढे वेतन, स्पेशल अलौन्स इ. साठी झाले. काही वेळेला अपयशही आले. परंतु कामगारांच्या समंजसपणामुळे इथली औद्योगिक शांतता टिकून राहिली.

**चळवळ 'अधोगती' च्या दिशेने**

सोलापूरच्या गिरणगावातील लढाऊ कामगारांची चळवळ गेल्या शतकामध्ये ज्या स्थित्यंतरामधून स्थिरावली, वाढली, त्याची चिकित्सा करताना प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्व काळातील कम्युनिस्टप्रणित चळवळ व स्वातंत्र्योत्तर काळातील 'इंटक' प्रणित संघटित क्षेत्रातील कामगार चळवळ अशा दोन महत्त्वाच्या टप्प्याचाच विचार करावा लागेल. मुख्यतः हातमाग, विडी, पुढे यंत्रमाग अशा असंघटित क्षेत्रातील कामगारांचे संघटन करण्याचे जिकिरीचे काम कम्युनिस्टांनी केले. त्यामध्ये कॉ.व्यंकप्पा मडुरांपासून ते अलीकडील काळातील 'सिटू', 'आयटक'च्या तरुण कामगार कार्यकर्त्यांचा समावेश होतो. तर कापड उद्योग, सूत गिरण्यांसारख्या संघटित क्षेत्रातील औद्योगिक

कामगारांचे प्रश्न प्रामुख्याने कायदेशीर मार्गाने सोडविण्याचे कार्य 'इंटक' ने केले. त्यामध्ये कै.आंबेकर, आठवलेपासून ते आजच्या 'इंटक' कार्यकर्त्यांचा समावेश होतो. या दोन्हीही कामगार संघटनांची कार्यपद्धती भिन्न आहे. प्रामुख्याने 'केडर' पद्धतीने राजकीय, वैचारिक प्रबोधनावर भर देणाऱ्या कम्युनिस्टप्रणित कामगार संघटना सुरुवातीचा कॉ.मीनाक्षी साने, कॉ.गो.द.साने, कॉ.मडूर व कॉ.आडम यांचा काळ वगळता पुढे प्रबोधन, अभ्यासवर्ग, वैचारिक धोरण, मुख्य म्हणजे वर्गीय पाया असलेले कामगारांचे राजकारण यापासून लांब गेले. कारण असंघटित क्षेत्रातील मजुराची सहनशक्ती व हातमाग, यंत्रमाग, विडी या व्यवसायाच्या मयादा होत्या. कामगार चळवळीमध्ये जो जिवंतपणा असायला हवा तो राहिला नाही. साहजिकच पूर्वीसारखे लोकमानसातील स्थान त्यांनी गमाविले.

'इंटक' ही संघटनाच मुळी राजाश्रयावर आणि कायद्याच्या भक्कम पाठिंब्यावर उभी असल्याने महात्मा गांधी, गुलझारीलाल नंदा यांच्यासरख्या द्रष्ट्या नेतृत्वाची कामगार चळवळीविषयी भूमिका सुरुवातीला कै.आंबेकर, कै.आठवले यांच्या पिढीला वगळता पुढील नेतृत्वाला आली नाही. ते एक सत्ताकेंद्र बनले. त्याचीच परिणीती अलीकडे 'इंटक' संघटनेचा ताबा आबासाहेब किल्लेदारसारख्या मातब्बर नेतृत्वाकडून दहशतीने काढून घेण्यात आला. त्यानंतर 'इंटक'च्या नेतृत्वपदी अभ्यासू व्यक्ती आल्याच नाहीत. 'बळी तो कान पिळी' च्या तत्वानुसार सत्ता हस्तगत करणारे राजकारण घडवू लागले. त्यामुळेच 'लक्ष्मी-विष्णू'सारख्या एका चांगल्या गिरणीची हत्या घडली. जर नेतृत्व खंदे असते, तर मालकांचे काय धाडस झाले असते, असे म्हटल्याशिवाय रहावत नाही. कारण जुनी मिलच्या बंदला काही कामगार नेत्यांनाच दोष दिला जातो. त्या अनुभवानंतर नरसिंग गिरजी मिल बंद पडल्यानंतर १९५८ मध्ये कै. चंदेले व तत्कालिन सर्व इंटकच्या नेत्यांनी व विशेषतः कामगारांनी भाई एस.एम.जोशींसारख्या प्रामाणिक नेतृत्वावर व कै. यशवंतराव चव्हाणांसारख्या शब्दाला जागणाऱ्या व्यक्तीवर विश्वास टाकला. त्यागही केला. म्हणूनच गिरणी जगली. १९०७ पासून १९९४ पर्यंत अनेक धक्के सहन करीत हे गिरणगाव घडविण्याच्या प्रत्येक प्रयत्नांमध्ये सक्रीय भागिदारी करणाऱ्या इथल्या लढाऊ कामगारांनी दाखविलेला हा समंजसपणा, म्हणूनच ऐतिहासिक ठरला.

## एकविसाव्या शतकाची हाक

विसावे शतक सरताना शतकातील नोंदी ज्या भूमिकेतून आपण घेत आहोत, त्याचा सर्व कामगार चळवळीतील घटकांनी विचार करण्याची गरज आहे. ह्या गिरणगावातील लढाऊ कामगारांनी योग्य नेतृत्व मिळाल्यास समंजसपणा दाखवून त्याग केल्याचा इतिहास आज आपण स्मरण करीत आहोत. एका पाठोपाठ गिरण्या बंद पडण्याला व्यावसायिक कारणे आहेत. धंद्याच्या स्थानिक तसेच आंतरराष्ट्रीय गोष्टी आहेत हे जरी असले तरी त्यासाठी इथल्या कामगारांना त्यांच्या चळवळींना, विशेषतः नेतृत्वाला दोष दिली जात आहे. त्याविषयी आपण भूमिका घेणार आहोत की नाहीत हा खरा प्रश्न आहे. एकविसाव्या शतकातील गिरणगाव, त्यातील कामगारांची चळवळ विधायक बनविण्यासाठी कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण व्हायला हवे. कायदा समजून घ्यायला हवा. उद्योग व तिच्याशी निगडीत व्यवहार तपासण्याची क्षमता विकसित करायला हवी. याउलट राजकीय सत्ता स्पर्धेमध्ये कम्युनिस्ट, काँगेस व भाजपा-सेना प्रणित सर्वच कामगार संघटना कामगारांना आपल्या दावणीला बांधणार असेल तर हे गिरणगाव घडविण्यासाठी ज्या कामगारांनी त्याग केला, हौतात्म्य पत्करले, नेतृत्वाने आयुष्य वेचले ते सारे व्यर्थ जाणार नाही काय ?

विडी उद्योग, यंत्रमाग दोन्हीही असंघटित क्षेत्रातील कामगार आजही किमान वेतनापासून वंचित आहेत, प्रॉ.फंड, ग्रॅच्युईटी सारख्या मुलभूत सुविधा मिळत नाहीत. नरसिंग गिरजी सहकारी सूत गिरण्यंमधून कामगार अस्थिरतेच्या भयगंडातून जगताहेत. विडी कामगारांना घरकुले देण्याविषयी तीन कामगार संघटनामध्ये अहमहमिका सुरू आहे. १०,००० घरकुले होणार ही चांगली गोष्ट आहे. परंतु त्याच वेळेला ह्या उपेक्षितांचे जीणे जगणाऱ्या श्रमिकाचे राहणीमान सुधारण्यासाठी देखील प्रयत्न व्हायला हवेत. इथल्या कामगार चळवळीला जशी लढाऊ क्रांतिकारी इतिहास आहे. तशीच विचारी समंजसपणाची परंपरा आहे. ही सृजनशील मनुष्यशक्ती विधायक मार्गाने गिरणगावच्या पुनस्थापनेसाठी करण्याची मोठी जबाबदारी इथल्या कामगार चळवळीवर मुख्यत्वे नेतृत्वावर आहे. एकविसाव्या शतकाची ही हाक आपल्या हृदयापर्यंत पोहोचेल अशी आशा आहे.

दै. लोकमत - २४/१२/१९९९

# प्रतिनिधित्त्व 'इंटक' चे तर लढा लालबावट्याचा !

यशवंत व सोलापूर सूतगिरणी त्वरित सुरू करावी या मागणीसह इतर प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी शहरातील विविध कामगार संघटनांच्या वतीने 'सोलापूर बंद' पुकारला होता. गेल्या तीन-चार महिन्यापासून दोन्हीही सूतगिरण्या बंद असून आर्थिक टंचाईतून बाहेर येण्यासाठी राज्य शिखर बँकेने काही अटीवर ४४ कोटींचे अर्थसाहाय्य कर्ज म्हणून देण्याची तयारी दर्शवून देखील कोंडी फुटण्याऐवजी दिवसेंदिवस तिढा वाढत चालला आहे. शिखर बँकेच्या अटीपैकी कामगारांचे २० टक्के वेतन कपात ही प्रमुख अट असून त्याविषयी मान्यताप्राप्त व प्रातिनिधिक श्रमिक संघटना इंटकप्रणित राष्ट्रीय गिरणी कामगार संघाने व्यवस्थापनाशी कराराही केल्याचे कळते. मात्र या गोष्टीला विरोध असणाऱ्या कामगारांना हाताशी धरून 'इंटक' मधून पदच्युत झालेले मेकालेंनी लालबावट्याचे आडम मास्तर यांच्या साहाय्याने कामगार कृती समिती स्थापून लढा सुरू केला आहे.

२० टक्के वेतन कपात कामगारांना असह्य असून ह्या कपातीच्या प्रमाणाचा फेरविचार व्हावा. वेतन कपात दहा टक्के व्हावी हे शक्य होत नसेल तर 'आयको' म्हणजे इचलकरंजी सहकारी सूतगिरणीच्या बाबतीत अंमलात आणलेले सूत्र लागू करावे अशी मागणी केली. 'आयको' सूतगिरणीमध्ये सर्व कामगारांना त्यांचे सर्व पैसे देवून कमी करण्यात आले. नंतर नव्याने कामगरांना ८० टक्के वेतनावर घेण्यात आले. अर्थात ही पद्धत यशवंत व सोलापूर सूतगिरण्यांना लागू करायला विद्यमान पदाधिकारी रागिका संघांनी विरोध

केला. ह्याविषयी मुख्यमंत्री विलासराव देशमुख, मजूरमंत्री हेमंत देशमुखांपासून ते राष्ट्रवादी नेते शरद पवारापर्यंत सर्वांची भेट घेवून कामगारांची बाजू कृती समितीच्या नेत्यांनी मांडली. परिणामी शरद पवारांनी दहा टक्के वेतन कपात एक वर्षभर प्रायोगिक तत्त्वावर करण्याच्या दृष्टीने आठवड्याभरात निर्णय देवू असे आश्वासन दिले. त्या गोष्टीला तीन आठवडे होत असून अद्याप निर्णय नाही. त्यामुळे प्रश्न तसाच आहे. एकीकडे कायदेशीर मान्यता व प्रतिनिधित्व असणारे 'इंटक' तर दुसरीकडे कामगारांची बाजू घेवून रस्त्यावर संघर्ष करणारे लालबावट्याचे नेते अशा कामगार संघटनांच्या कचाट्यात कामगार अडकले आहेत. व्यवस्थापनही हतबल आहे. 'आई भीक मागू देईना, बाप जेवू घालिना' अशी कामगारांची दयनीय स्थिती आहे.

## 'बीआयआर' मुळे अडचण

मुंबई औद्योगिक संबंध कायदा म्हणजे बीआयआर ॲक्ट अन्वये मान्यताप्राप्त व प्रातिनिधिक कामगार संघटनेशीच बोलणी वाटाघाटी व अंतिम करार करावा लागतो. तरच त्यास कायदेशीर मान्यता मिळते. लालबावट्याचा म्हणजेच कामगारकृती समितीचा संघर्ष व करार मात्र 'इंटक'च्या विद्यमान पदाधिकाऱ्यांशी असा प्रकार आहे. त्यामुळे हा तिढा कसा सुटणार हा प्रश्न आहे. मुंबईतील वस्त्रोद्योगाचा ऐतिहासिक संप डॉ. दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली झाला. जवळजवळ दोन लाख कापड गिरण्यातील कामगारांनी एकजुटीने मान्यताप्राप्त व प्रातिनिधिक कामगार संघटना म्हणजे राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे नेतृत्व नाकारून दत्ता सामंताच्या बाजूने ठाम उभे राहिले. सुमारे पाच वर्षे संघर्ष चालला. न्यायालयाची दारे ठोठावली. राज्याबरोबर केंद्र सरकाराकडेही सर्वपक्षीय आवाज उठविण्यात आला. हौतात्म्य पत्करून, परंतु आता माघार नाही, अशी टोकांची भूमिका कामगारांनी घेवून नेटाने लढा केला. शेवटी जेव्हा प्रतिनिधित्वाचा प्रश्न आला, तेव्हा 'इंटक'कडे जाण्याशिवाय पर्याय राहिला नाही. कामगारांचा अत्यल्प पाठिंबा असूनही केवळ कायद्याची ढाल करून नेतृत्व करणारी 'इंटक' मालकांशी व व्यवस्थापनाशी करार करून आपले अस्तित्व टिकवून ठेवू शकली. मुंबईच्या वस्त्रोद्योगांची शोकांतिका जशी 'इंटक' च्या नेमस्त कार्यपद्धतीत आहे तशी लढाऊ कामगार संघटनांना असलेली बीआयआर ॲक्टची मर्यादा देखील

कारणीभूत ठरली. त्यामुळे 'काळा कायदा' म्हणून ओळखला जाणारा हा कायदा बदलण्याविषयी भाजपा-सेना युती सरकारने प्रयत्न केले. परंतु कामगार संघटनांच्या नेत्यांमध्ये एकवाक्यता न होऊ शकल्याने बदल होऊ शकला नाही. परिणामी हा कायदा अजूनही मुंबईसह महाराष्ट्र व गुजरातमधील साखर कारखाने, सहकारी बँका, वस्त्रोद्योग आदी निवडक उद्योगासाठी लागू आहे.

**घोडे कुठे पेंड खातंय !**

कायदे कामगार व उद्योगांच्या विकासासाठीच असायला हवेत या उलट जर या कायद्यांमुळे मालक मजूर संबंधामध्ये तणाव येत असतील किंवा दोन्हींच्या विकासाविरोधी असतील तर असे कायदे बदलणेच योग्य होईल. मुंबईतील कापड गिरण्यांची वाताहत झाली. सोलापुरातही लक्ष्मी-विष्णुच्या प्रश्नी कामगार संघटनांची परस्परविरोधी मते त्याला मिळालेले कायदेशीर पाठबळ हे सारे अगदी विघातक आहेत हे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे सोलापूर व यशवंतमधील घटनाक्रम चिंतेची बाब वाटते. या दोन्ही गिरण्या सहकारी क्षेत्रातील असल्याने त्याविषयी नेमका जाब कुणाला विचारायचा? एकीकडे पूर्व विभागातील अध्वर्यू नेते बोल्ली, कुचन, सादूल यांच्यामध्ये एकवाक्यता नाही तर दुसरीकडे कामगार नेत्यांमध्ये स्पष्टता नाही. अशा परिस्थितीत कामगारांना कोणीच वाली उरलेला नाही.

गेल्या तीन महिन्यातील घटनाक्रम तपासता मा. जिल्हाधिकाऱ्यांपासून ते मजूर मंत्र्यांकडे बैठका झाल्या. चर्चेचे गुऱ्हाळ चालू राहिले. परंतु फलनिष्पत्ती काहीच नाही. सन्माननीय तोडगा काढण्याचे आश्वासन नेत्यापासून अधिकाऱ्यापर्यंत सर्वांनी दिले. परंतु व्यवहारामध्ये मांजराच्या गळ्यात घंटा नेमकी कोणी बांधायची? त्यासाठी आवश्यक यंत्रणा नसल्याने कामगार हवालदिल झाले असून त्यांनी लक्ष्मी-विष्णुतील कामगारांचे हाल उघड्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले असल्यामुळे भविष्याविषयी चिंतेत आहेत. वास्तविक राज्य शिखर बँकेने ४४ कोटींचे कर्ज देण्याचे मान्य केले असल्याने व्यवस्थापन, मजूर व सर्व संबंधित नेतेमंडळींनी एकत्रित येऊन आधी गिरण्या कशा चालू होतील याचा विचार केला पाहिजे. याउलट ज्यांना कायदेशीर मान्यता आहे, प्रतिनिधित्वाची जबाबदारी आहे असे नेते कामगार संघटनेच्या वतीने २० टक्के कपातीचा करार करून मोकळे झाले. त्या

बदल्यात व्यवस्थापनानी दिलेल्या बोनस व वेतन देण्याच्या दिलेल्या अभिवचनाचा भंग केला म्हणून फौजदारी दावे देखील दाखल केले. म्हणजेच भैय्या चौकातून ही मंडळी कायदेशीर लढाई करीत आहेत, तर ज्यांना कायदेशीर प्रतिनिधित्वाचा अधिकार नाही, ज्यांना रितसर करार करता येत नाही अशा लढाऊ कामगार नेत्यांनी संघर्ष करायचा. रस्त्यावर यायचे, बंद पाळायचा, दोघांनाही कामगारांचेच हित साधायचे असेल (असे गृहीत धरूया) तर मग अडतंय कुठे?

## 'लक्ष्मी-विष्णु' च्या वाटेने...

कामगारांच्या वेतन कपातीबरोबरच सहकारी सूतगिरण्यांच्या संचालक मंडळांचा गैरव्यवहार व खाबुगिरीमुळे गिरण्या तोट्यात आल्या. त्यांच्या गैरकारभारविषयी उच्चस्तरीय चौकशीचे आश्वासन मा. जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. शरद पवारांनी देखील या नेतेमंडळींना योग्य समज दिली. कामगार कृती समितीने दोन्ही गिरण्यांवर प्रशासक नेमण्याची मागणी केली. परंतु त्यांच्या अनाठायी खर्चावर बंधने आणण्यासाठी कोणतीच यंत्रणा सद्यस्थिती नसल्याने राज्यशिखर बँकेकडून मिळालेल्या कर्जाचा योग्य विनियोग होईल याची खात्री देता येणार नाही. प्राप्त परिस्थितीत दोन्हीही गिरण्या पूर्ववत सुरू होऊन चार हजार कामगार कुटुंबियांना उपासमारीपासून वाचविण्याची गरज आहे. त्यासाठी कायदा व व्यवहार यांची सांगड घालणारी समंजस भूमिका सर्व संबंधितांनी घेतली पाहिजे, हे अगदी लवकरात लवकर व्हायला हवे. जेवढा अधिक वेळ जाईल, तेवढे प्रश्न अधिक तीव्र बनतील. गुंता अधिक वाढेल. शेवटी लक्ष्मी-विष्णुसारखीच ह्या दोन्ही गिरण्यांची परिस्थिती होईल. बघता बघता आपल्या सर्वांच्या डोळ्यादेखत या दोन्हीही गिरण्या बुडतील. सर्व तथाकथित कामगार हिताचे कैवारी 'मी नाही त्यातली'ची भूमिका घेवून आपली बाजू मांडतील, परंतु काळ कोणालाही क्षमा करणार नाही, हे नक्की.

दै. लोकमत - ७/१२/२०००

## कामगारांची मान्यता नसलेल्या मान्यताप्राप्त कामगार संघटना

मालक व मजुरांच्या द्विपक्षीय वाटाघाटीमध्ये श्रमिकांची बाजू मांडून त्यांचे कायदेशीर प्रतिनिधीत्व करण्यासाठी मान्यताप्राप्त व प्रातिनिधीक कामगार संघटनांची तरतूद असते. त्यासाठी कायदेशीर अधिकार प्रदान करण्यात येतात. स्वतंत्र शासकीय यंत्रणेद्वारे सर्व कायदेशीर तरतुदी व प्रक्रिया पूर्ण करणाऱ्या बहुमतसंपन्न कामगार संघटनांस अशी मान्यता दिली जाते. उद्योगांमध्ये होणारे बदल मान्यताप्राप्त कामगार संघटनांच्या संमतीशिवाय मालकांना एकतर्फी करता येत नाहीत. त्यास कायद्याने बंदी असते. एखाद्या संघटनेला कायद्याने बहुसंख्य कामगारांचा पाठिंबा लक्षात घेवूनच अशी मान्यता दिली जाते. जेव्हा कालांतराने ह्या संघटनेला असलेला कामगारांचा पाठिंबा कमी होतो, तेव्हा इतर कामगार संघटनेकडे कामगार वळतात. अशा परिस्थितीत उद्योगातील पेच सोडविताना वाटाघाटी कोणाशी कराव्यात? ही समस्या अलीकडे बहुतेक उद्योगांमध्ये भेडसावत आहे.

सोलापुरातील बंद असलेल्या चेतन फौंड्रीमध्ये व सोलापूर, यशवंत सहकारी सूत गिरण्यांमध्ये असाच पेच निर्माण झाला आहे. चेतनमधील टाळेबंदी उठविण्यासाठी मालकांच्या व व्यवस्थापनाच्या अटीबाबत चर्चा, वाटाघाटी करून करार करण्याचा अधिकार भारतीय मजदूर संघ ह्या मान्यताप्राप्त युनियनचा आहे. परंतु कामगारांचे बहुमत त्यांच्या पाठिशी नाही. बहुसंख्य कामगार 'सिटू' संघटनेच्या पाठिशी आहेत. मालक अधिकृत मान्यताप्राप्त संघटनेशीच चर्चा करण्याची भाषा करीत आहेत. कामगार आयुक्तालयदेखील कायद्याच्या कक्षेबाहेर जावू शकत नाही. त्यामुळे प्रचलित कायद्यांतर्गत हा पेच सुटू शकत नाही. त्याचप्रमाणे 'सोलापूर व 'यशवंत' सहकारी सूत

गिरण्यांमधील कामगारांना जिल्हाधिकारी कार्यालयात ठरल्याप्रमाणे ले-ऑफ तसेच पंधरा दिवसांच्या वेतनाची रक्कम कामगारांना देण्यासाठी मान्यताप्राप्त राष्ट्रीय गिरणी कामगार संघांशी लेखी करार करावा लागेल. बहुसंख्य कामगार मिल बचाव कृति समितीच्या पाठिशी असल्याने 'इंटक' करारावर सही करावयास तयार नाही. अलीकडेच 'इंटक'मध्ये झालेल्या नेतृत्व बदलामुळे हे प्रकरण अधिक चिघळेल असे वाटते. परिणामी महाराष्ट्र राज्य शिखर बँकेकडून कर्ज मिळूनदेखील व्यवस्थापन पैसे देण्याच्या तयारीत असताना मान्यताप्राप्त युनियनचा हा घोळ असल्याने कामगार वंचित राहतो. पुढे गिरण्या चालू करण्यासाठी देखील मान्यताप्राप्त संघटनेशी वाटाघाटी करून योग्य बदलांसह संमती मिळण्याची गरज आहे. त्यामुळे कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी लढण्याचा अधिकार कायद्याने मिळालेले मान्यताप्राप्त व प्रातिनिधीक संघटनाच जर उद्योग चालू होण्यामध्ये व कामगारांना सवलती मिळण्यामध्ये अडसर ठरणार असतील तर कामगारांनी काय करावे, हा प्रश्न आहे.

**ही कोंडी कशामुळे**

ही परिस्थिती एकट्या सोलापुरातील नव्हे तर संपूर्ण देशभर अशीच स्थिती आहे. ट्रेड युनियन्स ॲक्ट १९२६ अन्वये कोणाही सात कामगारांना एकत्रित येवून आपल्या न्याय्य हक्कासाठी संघटना करण्याचा अधिकार असल्याने एकेका उद्योगांमध्ये अनेक संघटना कार्यरत असतात त्यातून बहुविध संघटना म्हणजे मल्टिप्लिसिटी ऑफ युनियन्समुळे औद्योगिक प्रश्न सुटण्यामध्ये अडचणी निर्माण होताना दिसतात. विविध कायद्यांतर्गत कामगार संघटनेची मान्यता मिळाल्यानंतर कामगारांच्या बहुमतांवर आधारित प्रातिनिधीक, मान्यताप्राप्त व क्वॉलिफाईड असा स्वतंत्र कायदेशीर दर्जा दिला जातो. ज्यायोगे वर्गणी गोळा करणे, वाटाघाटी करणे, लेखी करार करणे, न्यायालयांमध्ये व व्यवस्थापनांबरोबर कामगारांचे प्रतिनिधीत्व करण्याचे अधिकार संघटनेला मिळतात. ह्या सर्व अधिकारांचा कामगार हितासाठी वापर न करता वैयक्तिक स्वार्थ, प्रतिष्ठा, राजकारणासाठी झाला तर साहजिकच कामगार संघटनेपासून दूर जावू लागतात. अन्य कामगार संघटनांकडे जातात. त्यामुळे कायदेशीर अधिकार एका संघटनेकडे तर बहुसंख्य कामगार दुसऱ्या संघटनेकडे अशी कोंडी होते.

## 'मुंबई'च्या संपात नेमके हेच घडले

१९८२ साली डॉ. दत्ता सामंतांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मुंबईतील कापड गिरण्यांच्या संपामध्ये नेमकी हीच स्थिती होती. दोघांनीही प्रतिष्ठेचा प्रश्न केला. मालकांनीही ह्या कोंडीचा फायदा घेतला. न्यायालये व प्रशासन कायद्यासमोर हतबल होते. परिणामी ३ लाख कामगार देशोधडीला लागले. जागतिक कीर्ती संपन्न मुंबईचे गिरणगाव संपुष्टात आले. मान्यताप्राप्त व प्रातिनिधीक 'इंटक'च्या संघटनेला कामगारांचा पाठिंबा नव्हता. डॉ. दत्ता सामंतांनी कामगारांची मानसिकता पोसणारी भरमसाठ पगारवाढीची मागणी केली. 'इंटक'ला कंटाळलेल्या कामगारांनी आत्मघातकी लढा दिला. वस्त्रोद्योग संपला. मुंबईची लढाऊ कामगार चळवळ थंडावली. मुंबई औद्योगिक संबंध कायद्यांतर्गत असलेली 'इंटक' ची मान्यता म्हणजे जणू अढळपद ठरले. मान्यता काढून घेण्यासाठी असलेली कायदेअंतर्गत तरतूद व प्रक्रिया फारच कठीण असल्याने कामगरांचा पाठिंबा नसला तरीही सहजासहजी मान्यता काढून घेता येत नाही. हा कायदा अस्तित्वात येवू नये म्हणून कॉ. डांगेंनी 'काळा कायदा' असे संबोधून कडाडून विरोध केला होता. पन्नास वर्षानंतरही इतके गंभीर दुष्परिणाम अनुभवास येवूनसुद्धा हा कायदा बदलण्यासाठी संघटनांमध्ये एकमत होवू शकत नाही. त्याला व्यवहार्य पर्याय पुढे येत नाही ही दुर्दैवाची बाब आहे.

जागतिकीकरण व वाढत्या उदारीकरणामुळे औद्योगिक परिस्थिती खूपच बदलली आहे. औद्योगिक विवादांचे स्वरुपही बदलते आहे. केंद्र सरकार प्रस्तावित कामगार कायद्यातील बदल जर अमलात आले. तर जवळ जवळ ९० टक्के उद्योगातून कामगार संघटना अस्तित्वात राहणार नाहीत. बहुराष्ट्रीय कंपन्यांची नवी व्यवस्थापकीय संस्कृती इथल्या उद्योजकांना पर्वणी वाटते. त्याचे गंभीर दुष्पपरिणाम इथल्या श्रम संस्कृतीत होत आहेत. याविषयी कामगार संघटनांना फक्त आरडाओरड करून उपयोग नाही. तर श्रमिकांच्या हितरक्षणासाठी आपल्या कार्यपद्धतीत बदल करावे लागतील. कामगारविरोधी मानसिकता सकारात्मक बनविण्यासाठी प्रयत्न व्हावे लागतील. औद्योगिक आघाडीवर होणारे कामगारविरोधी बदल संघटित शक्तींच्या जोरावर थोपविता येतील, याविषयीचा विश्वास श्रमिकांना द्यावा लागेल. मान्यताप्राप्त संघटनांनी

कामगार आपल्यापासून लांब का जातात याचा विचार करायला पाहिजे. तर बहुसंख्य कामगारांचा पाठिंबा असणाऱ्या कामगार संघटनांनी केवळ कामगार आपल्या पाठिशी रहावेत यासाठी सवंग पद्धतीची भाषणबाजी व अनाठायी आक्रमकता दाखवू नये. त्यामुळे औद्योगिक संबंध बिघडतील. आधीच आरिष्ट चक्रात असणाऱ्या उद्योगाला आणखी आजारीकरणाकडे मार्गक्रमण करावे लागेल. मालक संघटनांतर्गत दुफळीचा फायदा घेणार नाही याचे भान ठेवून व्यवहार्य भूमिकेतून कामगार चळवळ पुढे नेण्याची गरज आहे. औद्योगिक आघाडीवरील सद्यस्थितीत काळाची पावले ओळखून कामगार संघटनांनी भूमिका घेतली तरच त्यांना कायद्यांची, कामगारांची पर्यायाने समाजाची मान्यता मिळेल.

दै. लोकमत - १/६/२००१

# यंत्रमागावरील उत्पादनाचा दर्जा सुधारण्यासाठी 'बिट्रा' ची सेवा

सोलापूर शहर चादरीसाठी प्रसिद्ध आहे. आकर्षक डिझाईन्स आणि दीर्घकाळ टिकाऊ दर्जेदार उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या चादरीच्या व्यवसायाने सोलापूर शहराला जागतिक व देशी बाजारपेठेत मानाचे स्थान मिळवून दिले. आजही बाहेरगावी सोलापूरचे गाव उच्चारताच चादरीची आठवण काढली जाते. खेडोपाडी सामांन्यापासून ते श्रीमंत माणूस आपल्या चादरीची ऊब घेताना पाहिले की, सोलापूरकरांना धन्यता वाटते. गेल्या पन्नास वर्षात ह्या व्यवसायाने अनेक चढउतार पाहिले. तेजीमंदी पाहिली तरीही आपल्या कष्टाच्या बळावर हा उद्योग अजूनही तग धरून आहे. परंतु आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये या उद्योगाचे भवितव्य काय ? असा प्रश्न उभा राहिला आहे. आधुनिक जगातील जागतिक अर्थकारणाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष चटके ह्या धंद्यालाही बसायला सुरुवात झाली आहे; म्हणून वेळीच अंतर्मुख होऊन आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक वाटते. स्वातंत्र्यपूर्व काळात वस्त्रनिर्मितीसाठी प्रसिद्ध असलेल्या तेलुगु भाषिक पद्मशाली समाजाने कुटीरोद्योगाच्या स्वरूपात हातमाग व्यवसायाला सुरूवात केली. अगदी घरगुती स्वरूपातील प्राथमिक अवस्थेतला हातमाग व्यवसाय साड्यांच्या उत्पादनांशी निगडित होता हळूहळू बदलत्या परिस्थितीचे आव्हान स्वीकारून हातमाग व्यवसाय मागे पडू लागला. त्याजागी आधुनिक यंत्रमागावर प्लेन कापडाचे उत्पादन सुरू झाले. सोलापूरच्या हवामानाला पूरक असे जेकॉर्ड चादरीचे उत्पादनही होऊ लागले. अल्पावधीतच जेकार्ड चादरीच्या धंद्याचा जम बसू

लागल्याचे दिसताच मोठ्या प्रमाणात यंत्रमागाकडे लोक वळू लागले. सुरुवातीला उत्पादनाचे प्रमाण अत्यल्प असल्याने बाजारातील प्रचंड मागणीमुळे खूप नफा व्हायचा. पुढेपुढे यंत्रमागाची संख्या वाढली. उत्पादनही वाढले. स्पर्धा वाढली, परिणामी नफ्याचे प्रमाणही कमी होऊ लागले. खरंतर ह्या विशिष्ट औद्योगिक विकासाच्या टप्प्यावर सोलापूरातील यंत्रमाग धंद्याच्या अडचणी लक्षात घेऊन भविष्यासाठी शास्त्रशुद्ध योजना आखण्याची गरज होती. तसे कांही प्रयत्नही झाले. परंतु यंत्रमागधारक वर्ग संघटित नव्हता त्यामुळे सामूहिक विचारविनिमयाच्या आधारे एकंदरीत यंत्रमाग उद्योगाच्या विकासाच्या दृष्टीने ठोस पाऊले उचलली गेली नाहीत.

सोलापुरातील हातमागधारकांनी सुरुवातीच्या काळात यंत्रमाग उद्योग सुरू करताना एकंदरीत तंत्रज्ञानाचा रितसर अभ्यास करून किंबहुना ते ज्ञान आत्मसात करून स्वव्यवसायाला सुरूवात केली असे नाही. हातमाग हा कुटीरोद्योग, निव्वळ घरगुती पिढीजात चालत आलेला व्यवसाय होता. त्याला शिस्तबद्ध नियोजन आर्थिक सुसंगती नव्हती त्याच परंपरागत कार्यपद्धतीच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीत यंत्रमाग उद्योगाचा जन्म झाला. परिणामी यंत्रमाग धंदाही सुरूवातीला पूर्वीच्याचप्रमाणे 'ट्रायल अँड एरर' पद्धतीने करण्यात येऊ लागला. मुख्य म्हणजे सोलापुरातील जुनी गिरणी बंद पडल्यानंतर तेथील बंद पडलेले जुने यंत्रमाग घेऊन या धंद्याला सुरूवात झाली. पुढे देखील नवीन यंत्रमाग आणून उत्तम दर्जाचे उत्पादन काढता येईल हा विचार होण्याऐवजी अहमदाबाद, सूरत, भिवंडी, मालेगावसारख्या इतर भागातून जुन्या व टाकाऊ यंत्रमागाची आयात करून यंत्रमाग व्यवसाय करण्याची प्रथा पडू लागली. परंतु एकंदरीत बहुतेक यंत्रमाग जुने असल्याने सुरुवातीपासूनच कार्यक्षमता, मालाचा दर्जा, उत्पादनाचे प्रमाण, कॉस्ट बेनेफिट प्रमाण इत्यादी सारख्या आवश्यक गोष्टींकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले. याचे प्रमुख कारण असे की, यंत्रमागावरील एकूण उत्पादनाचे प्रमाण कमी असल्याने आणि विशेष म्हणजे संघटीत वस्त्रोद्योगातील उत्पादनाव्यतिरिक्त बरेचसे उत्पादन यंत्रमागावर होत असल्याने प्रचंड मागणी असायची आणि पूर्वीच्या म्हणजेच हातमागाच्या तुलनेने भरपूर नफाही मिळू लागला. त्यामुळे ह्या गोष्टींकडे लक्ष देण्याची उद्योजकांना गरज वाटली नाही. त्याचप्रमाणे यंत्रमागावर काम करणारा कामागारदेखील असाच

अप्रशिक्षित असल्याने केवळ अनुभवातून शिकून तयार झालेलाच असल्यामुळे मालक व मजूर दोघांनाही तंत्रशिक्षणाची गरजच वाटली नाही. अर्थात अनुभवाच्या संपन्नतेवर इथला मजूर व मालकांनी अनेक नवनवे बदल घडवून एकंदरीत चादर उत्पादनांमध्ये बाजारपेठेत आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले हे नमूद करावेच लागेल. फक्त हा धंदा सुरुवातीपासून पिढीजात घरगुती स्वरूपाचा राहिला आहे. त्यामुळे औद्योगिक विकासाची मूलतत्वे या उद्योगात रुजू शकली नाही. जुनी यंत्रसामुग्री, अप्रशिक्षीत कामगारवर्ग, व्यवस्थापनाची जाणीव नसलेला उद्योजक या त्रिकूटाने केवळ कष्ट केले, भरपूर उत्पादन केले त्यातून यंत्रमाग उद्योग टिकला. स्थिरावला, मात्र वाढला नाही. औद्योगिक प्रगती या अर्थाने विकसित झाला नाही. यंत्रमाग धंद्यातील कार्यरत असणारी मालक व मजुरांची ही तिसरी पिढी मागील दोन्हीही पिढ्यांच्या कष्टातून उभा राहिलेला यंत्रमाग उद्योग आज ज्या पिढीच्या हातात आहे त्या पिढीला मात्र बाजारपेठेतील स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे आज यंत्रमाग धंद्याची कासवगती प्रकर्षाने जाणवू लागली आहे. यंत्रमाग धंद्यामध्ये मुख्यत्वे पद्मशाली समाजातील मजूर व मालकवर्ग असल्याने हा समाज मूळात अशिक्षीत आणि कष्टकरी, फक्त कष्ट करणे, दिवसरात्र राबणे एवढेच काय ते त्यांना माहित. त्यांच्याकडे व्यापारी वृत्ती नसल्याने, त्यांनी उत्पादित केलेला माल योग्य नफ्यानिशी बाजारात विकून फायदा कमवावा. त्यातून उद्योग वाढवावा अशा प्रकारचे कौशल्य नव्हते. अलिकडे स्पर्धेतून अस्तित्व टिकविण्याच्या धडपडीतून तोही शिकतोय. परंतु गेली चाळीस ते पन्नास वर्षे मात्र ह्यांनी कष्ट करून उत्पादित केलेला कमाल विकून नफा कमविणारा मधला 'वर्ग' मोठ्या प्रमाणात तयार झाला हा मोठा उद्यमशील वर्ग मात्र वंचित राहिला असे एकंदरीत चित्र दिसते. यंत्रमाग धंद्यातील छोटा मालक स्वतः त्यांचे संपूर्ण कुटुंब त्याचप्रमाणे सगेसोयरे सर्वांनी एकत्रितपणे दिवसरात्र राबून हा उद्योग टिकविला. एका अर्थाने जोपासलाही परंतु त्यांच्याकडे व्यवस्थापकीय कौशल्याचा पूर्णपणे अभाव असल्याने नफा कमविणे हा प्रधान हेतू लांब राहिला. परिणामी 'घरगुती व्यवसाय' एवढेच त्याचे महत्त्व उरले. जगण्यापुरते मिळते त्यातच हा वर्ग समाधानी राहिला. यंत्रमागातील छोट्या कारखानदारांपैकी (काही मध्यम व मोठेसुद्धा) बहुतेकजण आजही पूर्णपणे कर्जबाजारी आहेत. त्यांचा संपूर्ण

उद्योग, राहते घर, इतर सर्व स्थावरजंगम मालमत्ता, बँका वा दलाल सावकारांच्या, आजही ताब्यात आहे. हे सारे कशामुळे घडले? ह्याला कोण जबाबदार? जसे दोष इतरांमध्ये आहेत त्याहीपेक्षा अगदी महत्त्वाचे दोष ह्या वर्गाकडे आहेत त्यांचा डोळसपणे विचार करून हे दोष बाजूला सारण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजेत अन्यथा करोडो रुपयांची उलाढाल करण्याची क्षमता असलेल्या हजारो कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या ह्या कामधेनूला वांझ बनावे लागेल. त्या पापांचे धनी आपण होणार आहेत.

यंत्रमागधंद्याच्या सद्यस्थितीबद्दल काही कारखानदारांशी बोललो असता, प्रामुख्याने खालील दोष असल्याने बहुतेकांनी सांगितले. कच्चा माल आणि उत्पादन यांची शास्त्रशुद्ध सांगड घालून विक्रीची किंमत निर्धारित केली जात नाही. आपल्या वैयक्तीक गरजांनुसार, बाजाराचा पुरेसा विचार न करता, किंमती खाली आणणे. केवळ आत्मघातकी स्पर्धेसाठी उत्पादित किंमतीपेक्षा कमी किंमतीतही माल विकणे एकंदरीत औद्योगिक विकासासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण, ज्ञान, कौशल्य मिळविण्याबद्दल पूर्णपणे अनास्था दाखविणे. औद्योगिक विकासासाठी सामूहिक प्रयत्नातून काही चांगले घडवून आणणाऱ्यांच्या प्रयत्नांना खिळ घालणे मुख्य म्हणजे मालाचा दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक गोष्टी व प्रयत्न न करणे 'ठेविले अनंते तैसेची रहावे' सारखी संताची भूमिका घेणे यासारख्या गोष्टींमुळे जो उद्योजक स्वप्रयत्नातून योग्य ते तंत्रज्ञान अवगत करून मालाचा दर्जा राखतो, कुशल व्यवस्थापकीय पद्धतीने होणारी नुकसानी टाळतो. कॉस्ट बेनेफिट ॲनालिसिसच्याद्वारे नफ्याचा अर्थशास्त्रीय विचार करतो थोडक्यात बदलत्या परिस्थितीनुरूप उद्योग आणि स्वतःची कार्यपद्धती यामध्ये बदल करतो. आपला व उद्योगातील कामागारांचा विकास साधतो तोच पुढे जातो. एकंदरीत यंत्रमागउद्योग मात्र दिवसेंदिवस अडचणीत येतो आहे. हातमागापासून, प्लेन लूम्स, जेकार्ड लूम्स, डॉबी लूम्स, नंतर आता मोठ्या प्रमाणात टॉवेलचे उत्पादन करणारे लूम्स असो जे स्थित्यंतर झालेले आहे, ह्या सर्व स्थित्यंतरातूनही हा उद्योग अजूनही तग धरून आहे. याचे एकमेव कारण म्हणजे प्रचंड श्रमशक्ती आणि कमी खर्चात उपलब्ध होणारी श्रमशक्ती. मालकांपासून ते कुटुंबातील सर्व व्यक्तीची वापरात असलेली श्रमशक्ती. वास्तविक 'अ' आणि 'ब' दोघेही यंत्रमागधारक दोघांकडेही दहा

यंत्रमाग, दोघेही त्याच प्रकारच्या कच्चा माल वापरतात. दोघेही मनःपूर्वक कष्ट करतात. परंतु 'अ' मात्र भरपूर नफा कमवितो. जास्तीचे उत्पादन करतो. 'ब' मात्र नफा कमी येतो. उत्पादनही कमीच असते. यांची कारणमीमांसा करून आपले नेमके काय चुकते असा अंतर्मूख होऊन कधीही 'ब' विचार करीत नाही उलट 'अ' शी स्पर्धा करण्याच्या आसूरी हेतूने आणखीन गोत्यात येतो. अशी अनेक उदाहरणे असल्याचे एका कारखानदाराने सांगितले. दुसरीकडे आपल्या उद्योगाच्या विकासासाठी यंत्रसामुग्रीची निगा राखण्यासाठी, जास्त उत्पादन आणि दर्जेदार उत्पादन मिळविण्यासाठी काही खर्च (इन्व्हेस्टमेंट) करून औद्योगिक प्रगती साधण्याऐवजी एखाद्या वर्षी थोडासा फायदा झाला की, पुढचा मागचा विचार न करता टोलेजंग घर बांधणे, वगैरे अतिशय अनुत्पादक खर्च करून रोजच्या व्यवहारातील 'कॅशफ्लो' बाहेर इन्व्हेस्टमेंट करतात आणि पुनः गरज पडली की, बँकेकडून कर्ज काढून विनाकारण व्याजाचा बोजा वाढवितात. अशीही अनेक उदाहरणे असल्याचे सांगण्यात आले.

सोलापूरातील यंत्रमाग उद्योगाची एक बाजू अशी असली तरी दुसरीकडे असे दिसते की, व्यवस्थापनशास्त्रांची पूर्ण माहिती नसतानाही आपल्या कष्टकरी स्वभावामुळे हा उद्योजक अत्यंत कमी खर्चात गोरगरिबांना परवडेल अशा किंमतीमध्ये चादरी, बेडशीटस् वा तत्सम उत्पादन करून देशभरातील ग्राहकवर्गाला आकर्षित करण्यात यशस्वी ठरला. उत्तमोत्तम डिझाईन्स, आकर्षक रंगसंगती, दर्जेदार टिकाऊ उत्पादनासाठी सोलापुरी चादरीने आपले गौरवास्पद स्थान निर्माण केले. रेयॉन चादरींच्या वैविध्याने नटलेल्या डिझाईन्सनी तर आधुनिक वस्त्रोद्योगातील उत्पादनाशी सरळ स्पर्धा करून आपले 'इनएव्हिटेबल' अस्तित्व प्रस्थापित केले. कोणत्याही प्रकारचे शास्त्रीय प्रशिक्षण नसताना केवळ आपल्या एकनिष्ठतेच्या अनुभवातून अनेक तांत्रिक बदल केले. जुन्या यंत्रसामुग्रीतूनही मौल्यवान वस्त्रनिर्मिती केली. तथापि आधुनिक उद्योगांचा विकास व आपल्यातील आवश्यक बदलांचा अभ्यास करण्यात सतर्क राहिलो असतो तर योग्य मार्गदर्शनाच्या अभावी आपल्याला जे जमेल ते झेपेल त्या परंपरागत पद्धतीने उत्पादन करून संघर्षरत राहूनही इथला छोटेखानी यंत्रमागधारक आर्थिकदृष्ट्या मागे राहिला. ह्या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी ठोस पाऊले उचलणे

आवश्यक आहे. कच्च्या मालाचा प्रामुख्याने विचार करून, उत्पादनावरील खर्च कमी करावा. यंत्रसामुग्रीच्या नियमित मेन्टेनन्सकडे लक्ष पुरवावे जरूर तेथे बदल करून उत्पादनाचा दर्जा टिकविण्यासाठी सतत प्रयत्नशील रहावे तरच स्पर्धेच्या बाजारपेठेत आपला टिकाव लागू शकेल. शक्यतो नियमितपणे रिइनव्हेस्टमेंट करून कालबद्ध योजनेतून आपली जुनी यंत्रसामुग्री त्वरित अद्ययावत करावी उपलब्ध श्रमशक्तीचा पर्याप्त वापर कसा करता येईल यासाठी मानव्य व्यवस्थापन कौशल्य हस्तगत करावे. यंत्रमागासंबंधीचे नवनवे संशोधन आत्मसात करून प्रगत उद्योगाकडे वाटचाल करणेच इष्ट ठरेल बाजरपेठेचा व त्यातील अर्थकारणाचा नीट अभ्यास करून, 'ऑफ सिझन' सारख्या समस्येवर कसे मात करता येईल याविषयी संघटित प्रयत्न करावेत अद्यापही यंत्रमाग धंदा असंघटित आहे तिला संघटित स्वरूप देऊन सामूहिक प्रयत्नातून प्रश्नांची सोडवणूक करता येईल असा कृतीशील विश्वास उद्योजकांमध्ये निर्माण करणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे.

**बॉम्बे टेक्सटाईल रिसर्च असोसिएशन, मुंबई 'बिट्रा'ची मदत**

'बिट्रा' यंत्रमाग सेवा केंद्र हे सोलापूर येथे साखर पेठेत ऑक्टोबर १९९१ पासून कार्यरत असून, सोलापुरातील यंत्रमाग उद्योगाच्या विकासासाठी खालील प्रकारच्या सेवा त्याद्वारे विनामूल्य देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यंत्रमागाची देखभाल (मेन्टेनन्स) व त्याचप्रमाणे जोडणी-संबंधीचे प्रशिक्षण, यंत्रमागाची उत्पादकता व कपड्याच्या दर्जामध्ये सुधारणा घडविणे व सूत, कपडाविषयक चाचण्यासाठी एक प्रयोगशाळा इ. प्रकारच्या महत्त्वपूर्ण सेवा ही संस्था देत आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये संस्थेचे अधिकारी, श्री.भंडारी व गुजर यांनी स्वतःहून कारखान्यांना भेटी देऊन अडीअडचणी समजावून घेऊन, शक्य उपाययोजना सुचविलेल्या आहेत. त्याला यंत्रमागधारकांनीही प्रतिसाद दिलेला आहे. परंतु सोलापुरातील यंत्रमागाचे स्वरूप आणि कार्यपद्धती लक्षात घेता 'बिट्रा' ची सेवा मोठ्या प्रमाणात स्विकारायला हवी होती. यंत्रमागधारकांनी आता परंपरागत कार्यपद्धतीमध्ये बदल करून आवश्यक त्या उपाययोजनांकडे वेळीच लक्ष देण्याची गरज लक्षात घेऊन यंत्रमागाधारकांनी याकामी पुढाकार घ्यावा असे सुचवावेसे वाटते.

बॉम्बे टेक्सटाईल रिसर्च असोसिएशन (बिट्रा) ही संस्था घाटकोपर मुंबई येथे असून वस्त्र मंत्रालय, भारत सरकारच्या आधिपत्याखाली सोलापूर व इचलकरंजी याठिकाणी अशा प्रकारची यंत्रमाग सेवा केंद्राद्वारे कार्य करते वास्तविक ही संस्था १९५४ साली स्थापन करण्यात आली. आणि १९६० साली घाटकोपर येथील प्रशस्त परिसरात कार्यरत झाली. अटिरा, सिट्रा वगैरे सन्माननीय टेक्सटाईल रिसर्च संस्थाबरोबरच बिट्राने महाराष्ट्रातील सूत, कापडगिरण्या व यंत्रमाग व्यवसायाच्या वृद्धिसाठी मौलिक कामगिरी केलेली आहे. वस्त्रोद्योगासंबंधी धोरणात्मक निर्णयप्रसंगी केंद्र आणि राज्य सरकारदेखील 'बिट्रा'ची अभ्यासपूर्ण संशोधनावर मते आजही प्रमाण मानतात भारतभर १५० हून अधिक संस्था सभासद असलेल्या या संस्थेने कापड धंद्याशी निगडीत विविध विषयांवर संशोधन करून, बऱ्यापैकी उत्पादनप्रक्रिया स्टँडर्डाइज (दर्जात्मक) केले आहे. याशिवाय स्पिनिंग मिल्स, कंपोझिट मिल्स, मशिनरी, फायबर, ऑक्झिलियरी उत्पादक इ. संस्था सभासदांना अत्यंत अवघड अशा प्रश्नावर तांत्रिक मार्गदर्शन दिले जाते. आजपर्यंत संस्थेने निरनिराळे प्रकल्प हाती घेऊन त्यावर मौलिक संशोधन केलेले आहे. वस्त्रोद्योग मंत्रालय यू.एन.डी.पी.यू.एस.डी.ए., डी.इ.ओ. इत्यादी नामांकित संस्थांकडून संशोधनासाठी 'बिट्रा'कडे प्रोपोजलस् आलेले आहेत व त्यांची यशस्वी पूर्तताही करण्यात आली आहे. सध्या सुमारे ३० हून अधिक प्रकल्पावर संस्थेचे कार्य चालू आहे. या संस्थेमध्ये विविध विभाग आहेत. स्पिनिंग, विव्हिंग, प्रोसेसिंग, ऑपरेशन्स स्टडीज, कॉम्प्युटर अॅडेड डिझाईनींग, फिजिक्स इ. विविध उपयोगी विभागाव्यतिरिक्त अनेक प्रयोगशाळा व पायलट प्लँट्सही आहेत. प्रयोगशाळांमधून कापसापासून कापडापर्यंत विविध विभागातील चाचण्या घेण्याच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. सोलापुरातील यंत्रमागधारकांना लागणारा कच्चामाल म्हणजे सूत, त्याची क्वॉलिटी व तत्सम गोष्टी अंदाजे, अनुभवावर आधारित निर्णय घेण्यापेक्षा, ज्यामुळे हजारो रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. ती नुकसानी टाळण्याकरिता, वेस्टेज कमी करण्याकरिता, उत्पादनावरील खर्च कमी करण्याकरिता, कार्यपद्धती (वर्कींग) सुधारण्याकरिता व इतर अनेक फायद्याकरिता 'बिट्रा'च्या सुविधा वापरून टेस्टींग (चाचणी) करून घेता येऊ शकेल इतकी महत्त्वाची सेवा अत्यल्प खर्चामध्ये उपलब्ध

असूनही यंत्रमागधारकांची अनास्थाच जाणवते. इचलकरंजीच्या 'बिट्रा' यंत्रमाग सेवा केंद्राकडे महिन्याला शंभराहून अधिक सॅपल्स् टेस्टींगसाठी येतात तर दोन वर्षानंतर सोलापुरात अलिकडे दरमहा पंचवीसपर्यंत सॅम्पल्स येऊ लागले आहेत. यात सुधारणा झाली पाहिजे. तर अनावश्यक खर्च वाचवून यंत्रमाग उद्योग फायदेशीर ठरू शकतो.

सातव्या पंचवार्षिक योजनेत भारत सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार रिसर्च असोसिएशन म्हणजे संशोधन करणाऱ्या संस्थांना, विकेंद्रित क्षेत्रातील यंत्रमागधारकांना तांत्रिक सल्ला देण्यासाठी सेवा केंद्रे स्थापन करण्याचा आदेश दिला. त्यानुसार अटिरा, निट्रा, सिट्रा व बिट्रा या कापड उद्योगांशी निगडित अशा संशोधन संस्थांनी भारताच्या निरनिराळ्या विभागातून सेवा केंद्रे स्थापन झाली. बिट्राने असेच केंद्र प्रथमतः इचलकरंजी येथे १९८८ पासून कार्यरत केले आहे. गेल्या पाच वर्षामध्ये या केंद्राने इचलकरंजी व आजूबाजूच्या परिसरात उल्लेखनीय कामगिरी केली असून त्यांचा यंत्रमागधारकांना खूप फायदा झाला. या केंद्रामार्फत यंत्रमागधारकांना संपर्क भेटी दिल्या जातात त्यामध्ये काम करण्याच्या पद्धतीविषयी, कापडाचा दर्जा सुधारण्याविषयी स-प्रमाण चर्चा, विचारविनिमय होऊन उपाययोजना सुचविली जाते. ह्याशिवाय केंद्राचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे इथल्या यंत्रमागधारकांना सर्वसाधारणपणे भेडसविणाऱ्या प्रश्नांविषयी तांत्रिक सल्लाही विनामूल्य दिला जातो. संस्थेतील फोरमन प्रत्यक्ष कारखान्यामध्ये जावून यंत्रमागावरील कुठल्याही प्रकारचा तांत्रिक बिघाड दुरूस्त करू शकतो. स्थानिक भागधारकांना उपयुक्त अशा विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित करून ज्ञानाची देवाण-घेवाणही केली जाते. त्या माध्यमातून यंत्रमागावरील वस्त्रनिर्मितीविषयी विविध विषयांची सोप्या मराठीतून चर्चा करून लोकशिक्षणही केले जाते. संशोधन आणि प्रबोधनासाठी वाहून घेतलेल्या ह्या त्रैमासिकाची वर्गणी नाममात्र १५/- रूपये असूनही पुरेसे सभासद होऊ शकले नाहीत. ही मरगळ झटकून यंत्रमाग उद्योजकांनी 'बिट्रा'सारखा शास्त्रशुद्ध सल्ला/सेवा केंद्राचा वापर करून घेतल्यास खूपच फायदेशीर होणार आहे.

सोलापूरमध्ये एकूण यंत्रमाग किती? त्यापैकी प्लेन लूम्स, जेकॉर्ड व टर्किश टॉवेलचे व इतर उत्पादन करणारे यंत्रमाग किती आहेत याविषयी

अधिकृत माहिती सहजासहजी उपलब्ध होणे दुरापास्तच आहे. व्यक्तिगत यंत्रमागधारकांची, सोलापूर डिस्ट्रीक्स पॉवरलूम क्लॉथ प्रोड्यूसर्स असोसिएशन, यंत्रमाग सोसायट्या व हातमाग कन्व्हर्शन यंत्रमाग सोसायट्यांचे सदस्यत्व असलेली सोलापूर जिल्हा पॉवरलूम सोसायटी को-ऑपरेटिव्ह फेडरेशन याशिवाय समस्त यंत्रमागधारकांची सोलापूर जिल्हा यंत्रमागधारक संघ अशा तीन मान्यवर संस्था यंत्रमाग उद्योगांतर्गत कार्यरत आहेत. या सर्वांनी सोलापूरातील यंत्रमाग उद्योगाविषयी सर्वांगीण सोलापुरातील यंत्रमाग उद्योगविषयी सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने एकत्रितपणे पावले उचलण्याची गरज आहे. खासदार धर्मण्णा सादूल आणि या संघटनेच्या क्रियाशील पदाधिकाऱ्यांच्या प्रयत्नाने 'बिट्रा'सारखी संस्था सोलापूरातील यंत्रमागधारकांच्या सोयीसाठी उपलब्ध होऊ शकली. आपापातले मतभेद विसरून, एकूण यंत्रमाग उद्योगांच्या विकासासाठी 'बिट्रा' व तत्सम सर्व सरकारी, निमसरकारी, स्वयंसेवी संस्थांच्या सेवासुविधांचा वापर करून खऱ्या अर्थाने औद्योगिक क्रांती घडवून आणावी असे वाटते. गेल्या काही वर्षात आंतरराष्ट्रीय वस्त्र बाजारात अमूलाग्र बदल झाले आहेत. पाकिस्तान, चीन, कोरिया, तैवान, जपान यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर मालाचा पुरवठा होत असल्याने यापुढे आपल्या मालाचा दर्जा व किंमत स्पर्धात्मक असली पाहिजे. त्यासाठी पॉवरलूम उद्योगाने आधुनिक यंत्रसामुग्री वापरणे, उच्चप्रतीचा कच्चामाल घेणे, उत्पादन क्षमतेत वाढ करणे, उत्पादन खर्च कमी करणे, मालाचा दर्जा टिकविणे, तसेच उत्पादनाची विक्रीव्यवस्था आक्रमक आणि व्यवहार्य ठेवणे. फायदा मिळविण्याच्या दृष्टीने जरूरीचे आहे. एकंदरीत परिस्थितीत नीट विचार करून 'बिट्रा' पॉवरलूम सर्व्हिस सेंटरची मदत घेणे आपणा सर्वांच्याच हिताचे आहे. आजवर काहीही संशोधनात्मक सुविधा उपलब्ध नसताना सोलापुरातील यंत्रमाग उद्योगाने स्वबळावर नावलौकिक मिळविला तर अशा संस्थांची मदत घेऊन नावलौकिक बरोबरच योग्य मोबदलाही मिळवून यंत्रमाग 'उद्योग' विकसित करू शकू म्हणूनच हा लेखप्रपंच !

दै. लोकमत - ९/११/१९९३

# राज्यातील यंत्रमागासाठी किमान वेतनाची पुनर्रचना

भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त गेल्या पन्नास वर्षातील विकासाचा जमाखर्च मांडताना यंत्रमाग, विडी उद्योगासारख्या अनेक असंघटित स्वरूपातील उद्योगातील कामगारांना अद्यापही किमान वेतन मिळत नाही. त्यासाठी संघर्ष करावा लागतो. दुर्दैवाने सत्तेवर असणारे कल्याणकारी शासन देखील कामगारविरोधी भूमिकेतून दिलेले कमान वेतन (मुख्य म्हणजे शासनाने जाहीर केलेले तहकूब करते. अशी दुर्दैवी परिस्थिती आहे. मुळात यंत्रमागासारखे छोटेखानी उद्योग स्वयंपूर्ण, सशक्त नसल्याने कायद्याप्रमाणे किमान वेतन तर प्रत्यक्षात द्यायचे ठरले तर कारखाने बंद करावे लागतील. ही यंत्रमागाधारक मालकवर्गाची बाजू तीच बाजू विडी उद्योजकांची. किमान वेतन देणे न परवडणारे हे उद्योग चांगला नफा कमवितात. तेजीच्या काळात प्रचंड नफा कमविल्याची उदाहरणे आहेत. वास्तविक तेजीमंदीच्या दुष्टचक्रांमध्ये येणारा पडता काळदेखील योग्य नियोजनातून सुसह्य करणे हेच तर व्यवस्थापकीय कौशल्य असते. त्याउलट श्रमिकांना कामाचा योग्य मोबदला न देता त्यांचा पगार वाचवून नफा करण्यामध्ये संपूर्ण कौशल्य पणाला लावले जाते.

देशातील एकूण यंत्रमागापैकी महाराष्ट्रामध्ये ६५ टक्के इतके यंत्रमाग असून त्यातून देशाच्या एकूण कापड उत्पादनापैकी ४० टक्क्यापेक्षा अधिक कापडाचे उत्पादन होते. सोलापूर, इचलकरंजी, भिवंडी, मालेगाव, विटा ही राज्यातील प्रमुख कोट्यावधी रुपयांची उलाढाल असणारा हा उद्योग हळूहळू निर्याताभिमुख बनतो आहे. दरवर्षी कोट्यावधी रुपयांची निर्यात करून परकीय चलन मिळवून देण्यात सोलापूर अग्रेसर आहे. दुर्दैवाने शासन, मालक दोघांकडेही उद्योगांच्या दीर्घकालीन विकासाची ठोस योजना नाही. वस्त्रोद्योगासारख्या

संघटित क्षेत्राशी ह्या यंत्रमागासारख्या असंघटित उद्योगाला स्पर्धा करावी लागते. अनाठायी कर आकारणी, कच्च्या मालावर योग्य नियंत्रण नसल्याने, त्यावर यंत्रमाग मालकांचे नियंत्रण नाही. सूत, रंगरसायने, यासारखा कच्चा माल मिळेल या किंमतीत घ्यावा लागतो. फक्त नियंत्रण ठेवता येण्याजोगा उत्पादन खर्च म्हणजे श्रमिकांचे वेतन. त्यामुळे हे वेतन वाचविणे हेच जणू व्यवस्थपकीय सूत्र बनले आहे. मात्र यामुळे संपूर्ण उद्योग गेल्या अनेक वर्षाची यशस्वी परंपरा असूनही मागासलेलाच राहिला आहे.

**राज्यशासनाची असमर्थता**

महाराष्ट्र शासनाने यंत्रमाग कामगारांच्या किमान वेतनाच्या फेरविचारासाठी ९ जून १९८१ रोजी समिती नेमली. समितीने ३६ महिन्याच्या प्रदीर्घ अभ्यासानंतर शासनाकडे बहुमताने अहवाल सादर केला. (कारण मालक व कामगार प्रतिनिधींमध्ये एकमत कसे होणार?) त्यानुसार महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट १९८४ पासून किमान वेतन जाहीर केले. परंतु मालकवर्गाच्या प्रचंड दबावामुळे शासनाला आपलाच निर्णय १७ ऑगस्ट १९८४ रोजी स्थगित ठेवावा लागला. एकदा जाहीर केलेले किमान वेतन शासनालाच स्थगित करण्याची ऐतिहासिक घटना घडली. त्याचीच री ओढून सध्याचे युती सरकारने विडी उद्योगासाठी जाहीर झालेले किमान वेतन अद्यापही स्थगित ठेवून बेकायदेशीर ठरविले. त्यावर मालकवर्ग कसे गप्प राहतील. सरकारचे मूळ नोटीफिकेशन बेकायदेशीर आहे. या सबबीखाली परत मालक उच्च न्यायालयात गेले. हायकोर्टाने जाहीर केलेल्या नोटीफिकेशनच्या ७५ टक्के वेतन देवून नोटीफिकेशनमधील चुका दुरुस्त कराव्यात असा निर्णय दिला. त्यावर १५ जानेवारी १९८६ रोजी नवीन नोटीफिकेशन काढण्यात आले. मालकवर्गांनी त्याविरुद्धही न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने मूळ केसचा निकाल लागेपर्यंत निश्चित वेतनाच्या ७५ टक्के वेतन देण्याचा निर्णय दिला. ती स्थिती अद्यापही कायम आहे.

शासनाकडून १९८४ नंतर गेल्या १३ वर्षामध्ये यंत्रमाग कामगारांच्या किमान वेतनामध्ये पुनर्रचनेसाठी कोणतेही प्रयत्न झाले नाहीत. युती सरकारने नव्याने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग किमान वेतन समितीची रचना केली असून ही समिती राज्यातील सर्व यंत्रमाग केंद्रांना समक्ष भेटी देवून अभ्यास करीत आहे.

त्याप्रमाणे येत्या २० नोव्हेंबर ९७ रोजी समितीचा अभ्यास दौरा सोलापूरसाठी निश्चित असल्याचे कळते. त्यामुळे यंत्रमागधारक व कामगार प्रतिनिधींनी समितीला सोलापुरातील कार्यपद्धती, श्रमविभागणी, सध्याची वेतन पद्धती, वेतन निश्चितीचे निकष इ. विषयी वस्तुस्थिती समजावून दिली पाहिजे. तरच राज्यातील यंत्रमागासाठी वेतन निश्चिती होत असताना सोलापूरच्या वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीचा विचार होईल.

**सकारात्मक भूमिकेची गरज**

यंत्रमागांमध्ये साचेवाल्याबरोबरच, अनुषंगिक काम करणारे, वाईडिंग, वार्पिंग, रंगणी, घडीकाम यासारख्या लोकांना देखील त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला देण्यासाठी काही शास्त्रीय निकष निश्चित करावे लागतील. मूळ पगार (बेसिक वेज) हा प्रत्यक्ष श्रमावर आधारित असतो. त्यानुसार महागाई भत्ता मात्र निर्देशांकावर आधारलेला असतो. सध्याची स्पेशल अलाऊन्स देण्याची पद्धती देखील यानिमित्ताने तपासावी. अंगमेहनतीवर आधारित 'पीस रेट'पद्धतीचा मालकवर्ग आग्रह धरतात. तर किमान वेतन निश्चित स्वरूपात मिळण्याची श्रमिकांची मागणी आहे. याशिवाय प्रॉ.फंड, इ.एस.आय., ग्रॅच्युइटीसारख्या सामाजिक सुरक्षिततेच्या गोष्टींचाही यानिमित्ताने विचार होईलच. मालकवर्ग व कामगार प्रतिनिधींनी हा प्रतिष्ठेचा प्रश्न न करता, कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी त्याचप्रमाणे उत्पादनखर्च निश्चित करण्यासाठी व औद्योगिक शांततेसाठी हा प्रश्न सुटणे दोघांच्याही हिताचे आहे. उद्योगांच्या पुढील भवितव्यासाठी गरजेचे आहे. जागतिकीकरणांच्या परिणामी येणाऱ्या स्पर्धेसमोर यंत्रमागच नव्हे तर प्रत्येक असंघटित उद्योगांना यापुढे अशा प्रकारची सकारात्मक भूमिका घेतल्याशिवाय पर्याय नाही. जग जीवन वेतन (लिव्हिंग वेज) देण्याकडे वाटचाल करीत असताना आम्ही मात्र अजूनही किमान वेतनासाठी संघर्ष करण्यात वेळ घालवतोय. ही वस्तुस्थिती आहे. यंत्रमाग उद्योग स्वयंपूर्ण व सक्षम करण्यासाठी व तिच्या भावी वाटचालीसाठी वेतन निश्चिती व्यवहार्य तसेच न्यायाची व्हायची असेल तर किमान वेतन समितीसमोर आपली बाजू व्यवस्थितपणे मांडून, ठोस कृतीचा आग्रह धरला पाहिजे. मालक व श्रमिक दोघांचीही ही सामाजिक जबाबदारी ठरते.

दै. लोकमत – १८/११/१९९७

# यंत्रमागाच्या विकासासाठी 'टेक्सटाईल कमिटी' कटिबद्ध

१ जानेवारी २००५ पासून संपूर्ण जग मुक्त व्यापारासाठी खुले होणार आहे. त्यामुळे आज असणारे संरक्षण व व्यापारविषयक निर्बंध संपुष्टात येतील. साहजिकच स्पर्धा अधिक तीव्र होईल. ग्राहकाला गुणवत्ताप्रधान उत्पादने कमी किमतीत उपलब्ध करून देणाऱ्या आधुनिक उद्योग व देशांशी भारतीय वस्त्रोद्योगाला स्पर्धा करावी लागणार आहे. सोलापूरसारख्या शहरातील पारंपारिक पद्धतीने चालविल्या जाणाऱ्या यंत्रमाग उद्योगांसाठी अधिक खडतर स्पर्धेला सामोरे जावे लगेल. म्हणून या उद्योगाने आतापासूनच जागतिक स्पर्धा लक्षात घेवून स्वतःला सक्षम करण्यासाठी प्रयत्न करायला हवे. नेमकी हीच जागतिकीकरणाची अपरिहार्यता लक्षात घेवून केंद्र सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रलयांतर्गत कार्य करणारी 'टेक्सटाईल कमिटी' ने आपली कार्यपद्धती व भूमिका बदलली. आतापर्यंतच्या 'इन्स्पेक्टर राज' मध्ये मुख्यतः इन्स्पेक्शनद्वारे नियंत्रणात्मक भूमिका करणारी ही समिती देशातील वस्तोद्योगांच्या सर्वांगीण विकासाची भूमिका घेताना दिसते. इतके दिवस वस्त्रोद्योग समितीचे अस्तित्व देखील यंत्रमागधारकांना जाणवले नाही. परंतु अलीकडील काळामध्ये आर.सी.एम.रेड्डी यांची सचिवपदी नियुक्ती झाल्यापासून त्यांनी संपूर्ण मरगळ नाहीशी करून या देशपातळीवरील संस्थेमध्ये नवचैतन्य निर्माण केले आहे. मुंबई येथे समितीचे मुख्य कार्यालय असून देशातील २९ वस्त्रोद्योग केंद्राच्या ठिकाणी स्थानिक कार्यालये आहेत. त्यापैकी सोलापूर हे एक केंद्र आहे. समितीकडे देशभरातून उच्चशिक्षित, अनुभवी असे सक्षम तंत्रज्ञ ४०० ते अन्य ३०० कर्मचारी वर्ग कार्यरत असून सोलापुरातील विभागीय कार्यालयामध्ये अब्दुल रशद व क्यु.ए. सोमाणी हे दोघे क्वॉलिटी ॲश्युरन्स ऑफिसर आहेत.

ह्या दोघांचाही अलीकडील काळात स्थानिक यंत्रमाग कारखानदारांशी संपर्क वाढला असून इथल्या उद्योगांचे प्रश्न समजून घेवून त्यांना साहाय्य करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

## वस्त्रोद्योग समितीचे कार्य

वस्त्रोद्योग समितीचे चार प्रमुख विभाग असून निर्यातीसाठी प्रोत्साहन व गुणवत्ता परीक्षण, त्यासाठी आय.एस.ओ. ९००० व आय.एस.ओ. १४००० प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन, टेक्सटाईलसाठी करण्यात येणाऱ्या डाईज, केमिकल्सचे परीक्षण व मार्केट रिसर्चचा समावेश आहे. सोलापूरातील यंत्रमागाचा अभ्यास करून या समितीने विकासासाठी कृति कार्यक्रमही बनविला आहे. इथल्या यंत्रमागापैकी निवडक कारखान्यांचे तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सर्वेक्षण करण्यात आले. प्रामुख्याने गुणवत्ता वृद्धीसाठी कोणत्या गोष्टींची गरज आहे. याचा शोध घेण्यात आला. त्यानंतर १ जून २००१ रोजी आर.सी.एम. रेड्डी यांच्या उपस्थितीत एक्झक्युटिव्ह डेव्हलपमेंट प्रोग्रॅम अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. त्यामध्ये टेक्सटाईल डेव्हलपमेंट फाऊंडेशनने देखील पुढाकार घेतला होता. सर्वेक्षण व यंत्रमागधारक उद्योजकांशी चर्चा व निरीक्षणे करून वस्त्रोद्योग समितीने कृति आराखडा तयार केला. त्यातील निष्कर्षांतर्गत सोलापूरातील यंत्रमाग उद्योगातील प्रमुख त्रुटी दाखविण्यात आल्या. त्यामध्ये सूत रंग रसायने यासारख्या कच्च्या मालाची हलक्या प्रतीची गुणवत्ता, यंत्रमागाच्या आधुनिकीकरणाचा अभाव, चालू यंत्रमागांचा अयोग्य मेन्टेस, कालबाह्य कार्यपद्धती व तंत्र, पाणी व ऊर्जा बचतीसंबंधी अज्ञान, नवी उत्पादने शोधणे व उत्पादन बदलण्याचा अभाव, शास्त्रशुद्ध गुणवत्ता व्यवस्थापन पद्धतीकडे दुर्लक्ष, जागतिक बाजारपेठेविषयी अपुरे ज्ञान, सूत व रंग रसायनांच्या परीक्षणांसाठी लागणाऱ्या उपकरणांचा अभाव, प्रमाणापेक्षा कठीण पाण्याचा वापर आणि टेक्सटाईल अपग्रेडेशन फंड प्रस्तावांकडे बँकांची उदासिनता यांचा समावेश आहे.

## सोलापूरसाठी कृति योजना तयार

ह्या कृति अहवालाच्या आधारे वस्त्रोद्योग समितीने दि. १५ जून २००१ पासून कार्याला सुरुवात केली आहे. त्यामध्ये निर्यात वृद्धी करण्यासाठी

जागतिक पातळीवरील गुणवत्ता प्रमाणावर आधारित कार्यपद्धती विकसित करण्याची गरज असते. त्याशिवाय जागतिक बाजारपेठेत आपणास स्थान मिळू शकणार नाही. आय.एस.ओ. ९००० या गुणवत्ताप्रधान कार्यव्यवस्थेवर आधारित प्रमाणपत्र मिळविण्यासाठी वस्त्रोद्योग समितीने मार्गदर्शन द्यायला सुरुवात केली आहे. वस्त्रोद्योग समितीकडे आय.एस.ओ. विषयी संपूर्ण ज्ञान व अनुभव असणारे शंभरहून आधिक तंत्रज्ञांचा संच असून गेल्या वर्षभरात सातत्याने यंत्रमागधारकांशी संपर्क साधून इथल्या दोन्हीही अधिकाऱ्यांनी आय.एस.ओ. प्रमाणपत्राचे महत्त्व पटवून दिले. परिणामी गोसकी टेक्सटाईल्समध्ये आय.एस.ओ. नुसार कार्यपद्धती विकसित करायला सुरुवात झालेली आहे. वेंकटरंगा टेक्सटाईल्स, बंडा टेक्सटाईल्स व रापेल्ली एक्स्पोर्टस् या उद्योजकांनी देखील समितीकडे आय.एस.ओ. साठी साहाय्य मागितले आहे. शिवाय चाळीस यंत्रमागाधारकांनी तशी इच्छा व्यक्त केली. एकंदरीत जागतिक बाजारपेठेची नेमकी गरज लक्षात घेवून यंत्रमागधारकांनी आय.एस.ओ. संदर्भात पुढाकार घ्यायला सुरुवात केली आहे. हळुहळु इतरही कारखानदार गुणवत्ता वृद्धीच्या वस्त्रोद्योग समितीच्या प्रयत्नात सामील होतील, अशी खात्री वाटते.

## क्वॉलिटी चेकर्स ट्रेनिंग योजना

वस्त्रोद्योग समिती एवढ्यावर थांबणार नसून निर्यात करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्यांसाठी गुणवत्ता परीक्षण पद्धती (क्वॉलिटी चेकिंग सिस्टिम) विकसित करण्यासाठी तमाम संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची योजना देखील बनविली आहे. जागतिक बाजारपेठेतील ग्राहक सोलापुरातील यंत्रमागधारकांवरील टॉवेल्सच्या उत्पादनाला नाकारतो. याचे प्रमुख कारण म्हणजे 'क्वॉलिटी' विषयीची अशाश्वती होय. त्यासाठी इथल्या कर्मचाऱ्यांना ग्राहकांची क्वॉलिटी रिक्वायरमेंटविषयी शास्त्रशुद्ध ज्ञान असण्याची गरज असते. मायनर म्हणजे छोटे दोष, मेजर म्हणजे मोठे दोष कोणते, ज्यायोगे 'क्लेम्स' केले जाऊ शकतात. किंबहुना संपूर्ण गुणवत्ता प्रधान उत्पादने कोणती याविषयी कर्मचाऱ्यांना पुरेशी जाणीव नसते. त्यामुळे जागतिक बाजारपेठेत सोलापुरातील यंत्रमागधारकांना बदनामीला सामोरे जावे लागत आहे. २००५ सालापासून ही स्पर्धा अधिक तीव्र होणार आहे. त्यासाठी अद्यापही दोन वर्षाचा अवधी

असून या दरम्यान सर्व निर्याताभिमुख यंत्रमाग उद्योगातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देवून गुणवत्ता वाढविण्याचे प्रयत्न वस्त्रोद्योग समिती सोलापुरात करणार आहे. हा प्रशिक्षण कार्यक्रम लवकरच कार्यान्वित होणार आहे. यंत्रमागधारकांनी त्याचाही फायदा घ्यावा, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. आज शहरातील ४० टक्के यंत्रमाग पूर्णपणे बंद तर २० टक्के कारखाने अर्धा दिवस चालू आहेत. उरलेल्या बहुतेक उद्योगांना कर्जफेडीसाठी बँकांचा तगादा चालू आहे. अशा परिस्थितीत आय.ए.ओ. व कर्मचारी प्रशिक्षणावर खर्च करणे अवघड असले तरीही २००५ पासून होणाऱ्या मुक्त बाजारपेठेत टिकाव धरण्यासाठी असे सर्व प्रयत्न केल्याशिवाय गत्यंतर नाही. त्यासाठी वस्त्रोद्योग समितीच्या विकासाभिमुख योजनांचा फायदा घेणे देखील आवश्यक आहे. हीच काळाची गरज आहे.

दै. लोकमत – ३१/५/२००२

# परिस्थितीच्या रेट्याने यंत्रमागधारक संघटित

सोलापुरातील यंत्रमाग क्षेत्र लाक्षणिक संप, रॅली, धरणे, मशाल मोर्चा यासारख्या प्रामुख्याने मालक वर्गाकडून होत असलेल्या विविध गोष्टींमुळे पुन्हा एकदा चर्चेत येत आहे. सुताच्या भाववाढी विरोधात उपोषण, कर्जाच्या मुदतवाढीसाठी धरणे, तसेच बँका, वीज मंडळ व महानगरपालिकेकडून होत असलेल्या सक्तीच्या वसुली विरोधात मशाल मोर्चा अशी संघटित आंदोलने यंत्रमागधारक करीत आहेत. तर दुसरीकडे टॉवेल्सच्या निर्यातीच्या उत्पादनावर व स्थानिक बाजारपेठेतील चादर व टॉवेलच्या दरात दहा टक्के वाढ करण्याचा एकत्रित निर्णय घेऊन कार्यान्वित करताना दिसतात. एकंदरीत यंत्रमाग उद्योगांची सद्यःस्थिती अत्यंत बिकट असल्याने परिस्थितीच्या दबावाने का होईना मालकवर्ग एकत्रित येत आहे. उद्योग वाचविण्यासाठी ठोस उपाययोजना करीत आहे, ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट म्हणावी लागेल. एका यंत्रमागाधारकांनी सांगितले, की आता समस्या सोडविण्यासाठी यंत्रमागधारक एकत्रित आहेत. परंतु राजकीय पुढारी आमच्याकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. काही वर्षापूर्वी आमची परिस्थिती चांगली होती. तेव्हा राजकारणी मंडळी आमचे नेतृत्व करण्यासाठी धडपडत होते. तेव्हा आम्ही त्यांना भीक घातली नाही. आज परिस्थिती नेमकी उलटी आहे. हातमागे व्यवसायवाढीसाठी नेमण्यात आलेल्या समितीचे सचिव मुखर्जी काही दिवसांपूर्वी सोलापूरात आले होते. त्याच सुमारास राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे देखील सोलापुरात आले होते. त्या वेळी सचिव मुखर्जींच्या अंगात ताप असूनही किमान विणकर संस्थांच्या प्रतिनिधींचे निवेदन त्यांनी स्वीकारले, चर्चा केली. परंतु वस्त्रोद्योग मंत्र्यांनी परिस्थितीचा आढावा घेणे तर लांबच प्रतिनिधींना भेटण्याचेही नाकारले.

इथल्या यंत्रमाग क्षेत्राच्या समस्यांसाठी कोणत्याही पक्षांच्या राज्यकर्त्यांकडे वेळ नाही. इच्छा नाही ही सद्यःस्थिती आहे.

**आम्हाला वेगळा न्याय कशासाठी ?**

याउलट सतत तोट्यात चालणाऱ्या कापूस एकाधिकार योजनेद्वारे कापूस उत्पादकांना चुचकारण्यासाठी कापसाचे भाव २५०० रुपयापर्यंत वाढविण्याचा निर्णय राज्य सरकार घेते. त्यासाठी विदर्भातील राजकीय नेते पक्षभेद विसरून एकत्र येतात. राजीनाम्याची धमकी देतात. परिणामी राज्यातील आघाडी टिकविण्यासाठी मुख्यमंत्री भाववाढीची घोषणा करतात. दुर्दैवाने यंत्रमाग उद्योगसंबंधी आग्रह धरणारे कोणीच राजकीय नेते नाहीत. कापसाच्या भावाची राजकीय खेळी करणाऱ्या तमाम नेत्यांनी किमान ह्या योजनेविषयी वस्तुस्थिती जाणून घ्यावी. 'कापूस ते कापड' या योजनेखाली १९७२ मध्ये सुरू झालेल्या कापूस एकाधिकार योजनेचा तोटा सतत वाढत जाऊन पाच हजार कोटी रुपयांवर गेला आहे. सुमारे दोन कोटी लोकांच्या जगण्याशी संबंध असलेल्या या पिकाचे भाव जाहीर होतात. त्या दराने एकूण कापसापैकी जेमतेम तीन टक्के कापूस खरेदी केला जातो. उर्वरित कापूस विकताना होत असलेल्या शेतकऱ्यांच्या पिळवणुकीसाठी काहीच उपाय नाहीत. कापसावर फक्त दहा टक्के आयात कर असल्याने सुमारे २२ लाख गाठी दरवर्षी आयात होतात. साखरेवर ६० टक्के, गव्हावर ५० टक्के तर कापसावर दहा टक्के आयात कर असल्याने होणारी आयात वाढली. एकूण कापसाला खुली बाजारपेठ उपलब्ध केल्याने सुताची दरवाढ होते. शिवाय सुताची निर्यातही दरवाढीसाठी कारणीभूत आहे. परिणामी यंत्रमागधारकांना सुताच्या वाढीव किंमती असह्य होतात. पक्क्या मालाला तेवढी किंमत मिळत नसल्याने नुकसान होते. या संपूर्ण दुष्टचक्राचा विचार करून आवश्यक धोरणांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

**कर्जबाजारी यंत्रमागधारकांचा प्रश्न**

सोलापुरातील निम्म्याहून अधिक यंत्रमाग बंद आहेत. सतत वाढणाऱ्या सुताचे भाव लक्षात घेता पक्क्या मालाच्या किमती वाढणे अपरिहार्य आहे.

परंतु त्यासाठी उठाव नाही. अशी परिस्थिती असल्याने नव्वद टक्के यंत्रमागधारक मुद्दलावर किंवा नुकसानीत विक्री करून कसेबसे दिवस भागवीत आहेत. गेल्या तीन वर्षापासून सततच्या मंदीमुळे अनेक यंत्रमाग आजारी आहेत. बँकांचे व वित्तिय संस्थांची कर्ज फेडण्याची क्षमता नाही. अशा परिस्थितीत बँकांनी कर्ज वसुलीसाठी जप्तीच्या नोटिसा काढल्या. त्यांचा तगादा चालू आहे. वीज बिले थकीत आहेत. महापालिकेची देणी तटली आहेत. त्यामळे कर्जदार यंत्रमागाधारकांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी यंत्रमाग संरक्षण समितीच्या वतीने आंदोलने चालू आहेत. मालकांचीच ही दुरावस्था आहे तर कामगारांचा कोण वाली राहील? त्यामुळे कामगारदेखील आत्महत्या करीत असल्याची उदाहरणे आहेत. एकीकडे असंघटित क्षेत्रातील कामगारांना संरक्षण, वैद्यकीय सुविधा, वृद्धांना निवृत्ती वेतन व विमा अगदी प्रदान करण्यासाठी एकछत्री विधेयक आणले जात आहे. दुसरीकडे असंघटित यंत्रमाग कामगारांना साधा पुरेसा रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही, अशी दारुण अवस्था आहे. यंत्रमाग क्षेत्राचे तंत्रज्ञानाच्या दृष्टीने आधुनिकीकरण करण्यासाठी केंद्र सरकारने १९९९ मध्ये सुरू केलेल्या विशेष निधी योजनेला २००७ पर्यंत मुदतवाढ दिली. परंतु त्याचा आम्हाला काहीच उपयोग नाही. त्यातल्या तरतुदी कडक आहेत. इथला बहुतेक यंत्रमागधारक कर्जबाजारी आहे. त्या नियमानुसार पात्र नाही. परिणामी 'आई भीक मागू देईना बाप जेऊ घालेना' अशी मालकांची स्थिती आहे. मालक व कामगार दोघांचीही बिकट अवस्था आहे.

### आपले प्रश्न आपणच सोडवू या

या संपूर्ण पार्श्वभूमीवर यंत्रमागधारक संघटित होत आहेत. टेक्स्टाईल डेव्हलमेंट फाऊंडेशनच्या वतीने निर्यात करणाऱ्या कारखानदारांची स्वतंत्र बैठक बोलाविण्यात आली होती. त्यामध्ये निर्यातीमध्ये होणाऱ्या कारखानदारांवरील शोषणकारी गोष्टींची चर्चा झाली यावर उपाय म्हणून सोलापुरात एक्स्पोर्टस् असोसिएशनच्या धर्तीवर संघटना स्थापून त्याच्या माध्यमातून सामूहिक बाजारपेठेची संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्याचे एकमताने ठरले.

जे कारखानदार बैठकीसाठी अनुउपस्थित होते त्याचे मन वळविण्यासाठी प्रयत्न होणार आहेत. परिणामी आपले प्रश्न आपणच सोडवूया अशी भूमिका

घेऊन यंत्रमागाधारक संघटित होत आहेत.

अक्कलकोट रोडमधील बहुतांशी यंत्रमागधारक असणाऱ्या 'एमआयडीसी' चे टेक्स्टाईल वेलस्टर इन्फ्रोस्ट्रक्चरल डेव्हलपमेंट स्कीमच्या कामाचा प्रारंभ शनिवार दि. १५ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

या योजनेतर्गत पाणी, रस्ते, ड्रेनेज, सांडपाणी प्रक्रिया केंद्र आदी मूलभूत सुविधांसह प्रोसेस हाऊस, कामगारांच्या मुलांकरिता पाळणाघर, ट्रेनिंग सेंटर उभारण्यात येणार आहे. केंद्र शासनाने दोन वर्षांपूर्वी योजना मंजूर केली होती. त्यामध्ये राज्य सरकारचा निम्मा वाटा राहील. महापालिकेकडूनही काही निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. या योजनेचा योग्य फायदा घेतल्यास यंत्रमाग क्षेत्र विकसित होण्यास मदत होईल. त्यासाठी संघटित प्रयत्न व अभ्यासपूर्ण नियोजनाची गरज आहे. यंत्रमागधारक एकत्रित येऊन आपले प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. योजनांचा पुरेसा उपयोग करून यंत्रमाग क्षेत्राला ऊर्जितावस्था आणतील, अशी आशा करण्यात हरकत नाही.

दै. सकाळ - १४/११/२००३

# 'सिमको स्पिनर्स' मधील कामगारांचे आंदोलन

संपूर्णपणे निर्याताभिमुख 'सिमको स्पिनर्स' ह्या बिर्ला उद्योग समूहाच्या मालकीच्या उद्योगातील कामगारांनी कालपासून अप्पा गुंड ह्या कामगारास विनाकारण निलंबित केल्याच्या कारणावरून, कामबंदीचे आंदोलन सुरू केले आहे. कामगार प्रतिनिधींनी व्यवस्थापनास विनंती केली की, सदर कामगारास कामावर घेऊन रितसर चौकशी करावी व त्यानंतर निर्णय घ्यावा. परंतु व्यवस्थापनाने प्रतिनिधींची विनंती मान्य न केल्याने बुधवार दि. १० एप्रिल ९६ पासून सर्व कामगारांनी काम बंद केले. ह्या घटनेची खरी पार्श्वभूमी अशी की, गिरणीतील कामगारांना सध्या मिळत असलेले वेतन व त्याविषयीचा व्यवस्थापन व मजुरांमधील करार ३१ डिसेंबर ९५ रोजी संपुष्टात आला. वेतनवाढीविषयीचा नवीन करार अद्याप व्हायचा आहे. १ जानेवारी ९६ पासून व्यवस्थापन ह्या कामी चालढकल करीत असल्याने अलिकडे कामगारांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. त्यामध्ये व्यवस्थापनाने एकतर्फी कामवाढ केल्याने कामगाार बिथरले. वाढीव काम आम्ही करणार नाही, अशी भूमिका घेतली. परंतु व्यवस्थापनाच्या मते, सध्या असलेले काम प्रमाण, गिरणीतील अद्ययावत यंत्रसामुग्री लक्षात घेता खूपच कमी असल्याने, कामवाढ आवश्यक आहे. त्यास विरोध केल्याने अप्पा गुंड व आणखीन एका कामगाराविरुध्द व्यवस्थापनाने कारवाई केली. अप्पा गुंड यास आरोपपत्र दाखल करून चौकशीच्या मुदतीत कामावरून तहकूब केले. कामगार प्रतिनिधींचा न्याय्य आवाज दाबण्याच्या व्यवस्थापनाच्या दहशतवादाविरुद्ध कामगारांनी आंदोलन सुरू केले आहे. सकृतदर्शनी वरील घटना अतिशय किरकोळ वाटत असली तरीही व्यवस्थापन व कामगरांचे आपसातले संबंध तणावपूर्ण होण्याची पार्श्वभूमी नीटपणे अभ्यासल्यानंतर त्यातील

चिंताजनक गोष्ट लक्षात येईल.

जुनी गिरणीनंतर, लक्ष्मी-विष्णू आणि आता नरसिंग गिरजींची वाटचाल पाहता सिमको स्पिनर्ससारखी अत्याधुनिक गिरणी ही सोलापूरच्या औद्योगिक आघाडीवरील एकमेव आशेचा किरण मानली जाते. त्यालाही असे ग्रहण लागत असेल तर त्याविषयी गांभीर्याने विचार करणे गरजेचे ठरते. गेल्या पाच वर्षातील गिरणीची कार्यपद्धती, उत्पादन अतिशय समाधानकारक असल्याने, गिरणीच्या विकासात्मक स्थैर्याबद्दल कोणालाही शंका नाही. अलीकडेच आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आय.एस.ओ. सारखे प्रमाणपत्र, आपल्या दर्जेदार उत्पादनातून सिमकोने मिळविले. पारंपरिक आंतरराष्ट्रीय बाजारपेठ बदलून नवे बाजारपेठ उभारण्यात गिरणीने यश मिळविले आहे. गिरणीचे उत्पादन दिवसेंदिवस वाढते आहे. ह्या पार्श्वभूमीवर गिरणीतील कामगारांना भरीव पगारवाढीची अपेक्षा आहे. परंतु याउलट व्यवस्थापनाच्या मते गिरणीवर अद्यापही कोट्यवधीचे कर्ज आहे. फाईन काऊंटसाठी मागणी कमी होत असल्याने कोर्स काऊंटच्या उत्पादनासाठी करावे लागणारे यांत्रिक बदल नजिकच्या काळात अपेक्षित आहे. त्यासही खर्च येणार आहे. मुख्य घटक म्हणजे गिरणीतील कामगारांना इतरांच्या तुलनेने पगार समाधानकारक देत आहोत असे व्यवस्थापनाचे म्हणणे आहे. गिरणीची एकंदरीत परिस्थिती पाहता व्यवस्थापनाची बाजू कामगारांना अनाकलनीय वाटते. त्यामुळे व्यवस्थापन व कामगारांमध्ये परस्परांबद्दल आकस निर्माण झालेला आहे. हा गैरसमज दूर करण्यासाठी कामगारांना विश्वासात घेऊन नेमकी परिस्थिती त्यांना समजेल अशा भाषेत प्रामाणिकपणे समजावून सांगितली पाहिजे. गिरणीतील बहुतेक कामगार वयाने तिशीतले असल्याने, त्यांना वडिलकीच्या भूमिकेतून आपुलकीने समजविण्याची गरज आहे. त्याकामी व्यवस्थापन कमी पडत आहे. बहुतेक प्रमुख अधिकारी अस्थानिक व अमराठी असल्याने, मुख्यत: परस्पर संवादामध्ये अडचण होत आहे असे दिसते.

गिरणीतील कामगारांना वेतनविषयक नवा करार होणार आहे. त्यासाठी कामगार संघटनेने मूळ पगार, महागाई भत्ता, इतर भत्त्यासह सोलापुरातील इतर गिरण्यांमधील कामगारांप्रमाणे पगाराची मागणी केली आहे. ही पगारवाढ व्यवस्थापनाला अमान्य असेल तर तरुण कामगारांना त्याविषयी योग्य भाषेत

समजाविण्याऐवजी, एकतर्फी कामवाढ करून, कामगार प्रतिनिधींना बडतर्फ करणे हा उपाय नव्हे. त्यातून कलह वाढीस लगेल. गिरणीतील तरुण कामगार समंजस असून त्यांना कायदा, गिरणीची कार्यपद्धती विश्वासात घेऊन पटवून दिले पाहिजे. बौद्धिकच नव्हे तर व्यावहारीक पातळीवरही त्याविषयी समर्थनीय वागले पाहिजे. ही व्यवस्थापनाची जबाबदारी ठरते तर दुसऱ्या बाजूला सोलापूरच्या वैभवशाली औद्योगिक परंपरेला काळीमा फासणाऱ्या 'लक्ष्मी-विष्णू' सारख्या घटना घडत असताना एका विकसनशील उदयोन्मुख गिरणीच्या प्रगतीमध्ये खीळ घालू नये ही कामगार बांधवांची जबाबदारी ठरेल.

नवीन वेतनवाढीविषयीचा करार करण्यासाठी आवश्यक ज्ञान, कायदेविषयक माहिती अर्थातच कामगार व त्यांच्या प्रतिनिधींकडे नाही. त्यामुळे त्यांच्याकडून कोणताही अनर्थ घडण्याची शक्यता असते. बहुतांशी कामगार तरुण असल्याने, उसळत्या रक्ताला वाट फुटेल त्यादिशेने जाऊ न देता योग्य दिशेने वाटचाल करण्याविषयी मार्गदर्शन करू शकणारे नेतृत्व हवे आहे. बाहेरून कामगार संघटनेला आशा नेतृत्वाची साथ मिळत नसेल तर व्यवस्थापनाने त्यांचे नेतृत्व करून, त्यांना उद्योग व कामगार दोघांच्याही हितकारक भूमिकेतून मार्गदर्शन करणे आवश्यक असते. त्याऐवजी कामगारांच्या अज्ञानाचा व अर्धवट ज्ञानाचा गैरफायदा घेऊन, दहशतीने प्रश्न सोडविण्याची भूमिका आत्मघातकी ठरेल.

कोंडी-चिंचोली परिसरातील उदयोन्मुख एम.आय.डी.सी. मध्ये सर्वार्थाने परिपूर्ण अशा सिमको स्पिनर्सकडे इतरेजन आशेने पाहतात. एका अर्थाने सिमको स्पिनर्समधील औद्योगिक संबंधावर त्या परिसरातील इतर उद्योगांमधील मालक-मजूर संबंध अवलंबून आहेत. त्यामुळे सोलापूरच्या औद्योगिक विकासाला दूरवस्था आलेल्या ह्या ऐतिहासिक प्रसंगी, सिमको व्यवस्थापन व कामगारांनी समंजसणे वागले पाहिजे. उद्योग टिकले पाहिजेत. त्याचप्रमाणे श्रमिकांनाही श्रमाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. ही समन्वयवादी भूमिका घेऊन प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढला पाहिजे. अन्यथा ह्या प्रसंगी वाईट वळण लागेल. त्याचे गंभीर दुष्परिणाम एकूण उद्योगावर त्यातील कामगार कुटुंबियांवर होतील. यासाठी जबाबदार असणाऱ्यांना काळ कधीच क्षमा करणार नाही.

दै. लोकमत - १२/४/१९९६

# कोण जिंकलं, कोण हरलं !

राज्यातील विडी कामगारांच्या किमान वेतनाबाबत कामगार राज्यमंत्री डॉ. हेमंत देशमुख यांच्याकडे बैठक होवून प्रतिहजारी ४८ रुपये किमान वेतन व अन्य लाभासह ६४ रुपये ८० पैसे वेतन देण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. त्यामुळे गेल्या सात-आठ वर्षापासून प्रलंबित असलेला विडी कामगारांच्या किमान वेतनासंबंधीचा तिढा सुटला. ऐन दसरा-दिवाळीच्या तोंडावर विडी कामगार सुखावला. राज्यातील ६ लाख कामगार तर सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ७५ हजार विडी कामगारांना दिलासा मिळाला ही चांगली गोष्ट घडली. कामगार मंत्र्यांच्या आवाहनाला मालक व कामगार संघटनांनी संमती दिली, त्यामुळेच हा तिढा सुटला असे म्हणावे लागेल, ह्याचे श्रेय कुणाला ?

'कोण जिंकलं, कोण हरलं,' अशा पद्धतीने ह्या घटनेचं विश्लेषण करणं म्हणजे अपरिहार्य परिस्थितीमुळे पोटाला चिमटा देणारा हा निर्णय स्वीकारणाऱ्या गरजू महिला विडी कामगारांशी प्रतारणा ठरेल. हे युद्ध नव्हते. तर कल्याणकारी राज्यातल्या कायद्यानुसार व घटनेतील मार्गदर्शक तत्त्वानुसार मालक व मजुरांमधील सामूहिक सौदेबाजी होती, ज्याला आपण 'कलेक्टिव्ह बार्गेनिंग' असे म्हणतो. त्याचे नियम असतात. कायद्यांच्या चौकटीबरोबरच उद्योग व एकंदरीत आर्थिक स्थितीसाठीच्याही मर्यादा कामगारांवर असतात. त्यामुळे बहुतेकदा ही सौदेबाजी 'विन विन' म्हणजे दोघांच्याही विजयांची ठरत नाही. तरीही करार होतात. उद्योग चालवावे लागतात. कोणी दोन पावले मागे तर कोणी चार पावले पुढे जातात. शेवटी ही एक तडजोड असते. अशा तडजोडी करूनच कामगारांना औद्योगिक संबंध जपावे लागतात. ह्या करारानंतर सोलापूरच्या विडी उद्योजकांनी कामगारांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. तशीच

सहृदयता त्यांनी विडी कामगारांना, ठेकेदारी पद्धती टाकून, अधिकाधिक काम देण्यात दाखविली तरच ही 'विन विन' परिस्थिती येईल. उद्योगांवर संकट आले तर कामगारांनी मदतीला धावून आले पाहिजे, असा आग्रह धरताना कमविलेल्या नफ्यातून न्याय्य वाटा कामगारांनाही दिले पाहिजे, असाही मालकवर्गांनी आग्रह धरायला नको काय ?

**थोडीशी पार्श्वभूमी समजून घ्यावी**

भारतीय स्वातंत्र्याला ५५ वर्षे लोटल्यानंतरही देशातील कोट्यावधी असंघटित श्रमिकांना कमान वेतन मिळू शकत नाही. ह्या पार्श्वभूमीवर नेमकं कोण जिंकलं, कोण हरलं' हे तपासण्याची गरज आहे. कल्याणकारी राज्य संकल्पना स्वीकारून संविधानामध्ये मार्गदर्शक तत्त्वांमध्ये श्रमिकांच्या वेतनाविषयी न्याय्य गोष्टी समाविष्ट केल्या गेल्या. तथापि आजही देशातल्या एकूण श्रमिकांपैकी दहा टक्क्यापर्यंतच्या संघटित कामागारांचा अपवाद वगळता असंघटित क्षेत्रातील बहूतेकांना सरकारने ठरवून दिलेले किमान वेतनही मिळत नाही. त्यासाठी किमान वेतानाचा स्वतंत्र कायदा आहे. सरकारी कामगार अधिकाऱ्यांची प्रशासन यंत्रणा आहे. कामगार संघटना लढे देत आहेत. कामगार न्यायालयातून लाखो प्रकरणे प्रलंबित आहेत हे कसे काय ? आम्ही जिंकलो असे म्हणणाऱ्यांकडे ह्या दुर्दैवी प्रश्नांचे उत्तर नाही.

विडी उद्योगांच्या बाबतीत देखील हेच घडतेय. गेली अनेक वर्षे विडी कामगारांचा प्रश्न रेंगाळत पडलेला आहे. सप्टेंबर १९९० मध्ये तत्कालिन राज्यमंत्री संगमनेरचे बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली विडी कामगारांचे वेतन निश्चित करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. त्यांनी ३४ रु. १४ पैसे एवढे मूळ वेतन निश्चित केले होते. या वेतनाचा फेरआढावा घेऊन १९९७ साली ३९ रु. ४० पैसे दर निश्चित केला, त्याला राज्यातल्या विडी कारखानदारांनी कडाडून विरोध केला. राज्यकर्तेही त्यांच्यासमोर नेमले व हे वेतन ३३ रुपयांवर आणण्यात आले. तरीही तेवढे देखील वेतन कित्येक मालक देत नव्हते. ३३ रुपयांच्या वेतनाचा करार एप्रिल २००१ रोजी संपुष्टात आला. दरम्यान माजी आमदार व्यंकप्पा पत्की यांच्या अध्यक्षतेखाली समितीने अहवाल दिला. दोन भागातील ह्या अहवालातील पहिल्या भागामध्ये गुल्लाकट्टा,

छाट बिड्या, खराब पानपुडा, ठेकेदारी, नकली विड्या, मिनी सिगारेटबाबत सूचना केल्या. त्यापैकी काही गोष्टी मान्यही झाल्या. यात ९० रुपये घरभाडे भत्ता बंद करण्यात आला. महागाई भत्ता, ग्रॅच्युइटी, हक्क रजा, बोनस, बाळंतपणाची रजा यासाठी १६ रुपये ८० पैसे देण्यात येणार आहे. ही सर्व वाढ एप्रिल २००२ पासून लागू करण्यात आली. म्हणजे १ एप्रिल २००१ पासून वर्षभराचा फरक कामगारांना मिळणार नाही. त्याआधी जवळ जवळ कोट्यवधींचा वेतन फरक देखील कामगारांनी सोडून दिला आहे. ही सामंजस्याची भूमिका कामगारांनी परिस्थितीच्या दबावाखाली घेतली, ही वस्तुस्थिती आहे. त्यासाठी 'आम्हाला किमान वेतन नको, पुरेसे काम द्या' अशी कामगारांकडून जाहिरात सदृश्य गोष्टीदेखील करण्यात आल्या. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सर्वांनीच संयमाने वागण्याची गरज असताना 'कोण जिंकलं, कोण हरलं' अशी मांडणी करू नये.

## 'विन विन' परिस्थिती आणू या

राज्य शासनाच्या नव्या निर्णयानुसार १ ऑक्टोबर २००२ पासून कामगारांना किमान एक हजार विड्यांचे काम द्यावे. गुल्लाकट्टा पद्धत पूर्णपणे बंद करून छाट विड्यांचे प्रमाण कमी करण्यात यावे. ५० पेक्षा जास्त विड्या काढल्यास त्यास निम्मी मजुरी द्यावी, असा अध्यादेश लागू केल्याचे मजूरमंत्र्यांनी जाहीर केले आहे. कामगारांनी सोसले. मालकांनी वाढ मंजूर केली. हे समोपचाराचे वातावरण टिकवलं पाहिजे. गेल्या काही दिवसांपासून सोलापूर जिल्ह्यातील विडी उद्योगांमध्ये कमालीची अस्वस्थता होती. बंद उद्योग, यंत्रमाग, हातमागाच्या वाटेनेच उद्योग जाताना दिसल्यामुळे चिंता वाटत होती. मालकांनी स्थलांतराची भाषाही केली होती. आता प्रश्न मिटलेला आहे. बंद उद्योगामुळे घराघरातली पुरुष मंडळी बेकार झाली. केवळ मुली व महिलांच्या विड्या वळण्यातूनच कसेबसे उदरनिर्वाह करणाऱ्या श्रमजिवींच्या धास्तावलेल्या जीवाला दिलासा मिळाला. दसरा-दिवाळीच्या उत्साहात ही उमेद वाढविणारी गोष्ट ठरली म्हणून मालकांनी ठरल्याप्रमाणे ह्या महिलांना पुरेसे काम द्यावे, छाप विडी व गुल्लाकट्टा माध्यमातून होत असलेली लूट थांबवावी, ज्या गोष्टी ठरल्या, त्या खुलेपणाने स्वीकारून कामगारांनी दिलेल्या प्रतिसादाला साद

द्यावी. तरच हा सण उत्सवी उल्लोषात होईल. उद्योग टिकविणे ह्या एकाच भूमिकेतून सर्वांनी आपापल्या परीने जिंकण्याच्या मानसिकतेतून हा नवीन करार मान्य केला. तो नीटपणे कार्यान्वित करून मालक वर्गांनी साथ द्यावी. तर कामगारांनी चांगले काम करून उद्योग टिकविण्यासाठी हातभार लावा. तरच 'विन विन' परिस्थिती येईल, अशी अशा करायला हरकत नाही.

दै. लोकमत – ११/१०/२००२

# .......... शेवटची संधी संपणार..... ?

सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे, तंबाखू उत्पादनाच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जाहिराती करणे व तंबाखू व उत्पादनाच्या विक्रीकर निर्बंध घालताना, लहान मुलांना विकण्यावर घातलेल्या बंदीमुळे घरगुती स्वरूपात; परंतु कोट्यवधी लोकांना रोजगार पुरविणाऱ्या विडी उद्योगावर संकट कोसळले. ही बंदी 'सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने कायदा २००३' नुसार करण्यात आली असून, त्यानुसार रेस्टॉरंट, कार्यालये, रेल्वेचे प्रतीक्षागृह, बसेस, विमानतळ आदींचा सार्वजनिक ठिकाणच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. केंद्र सरकारने एक मेपासून धूम्रपानबंदी कायद्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यामुळे देशातील दीड ते दोन कोटी कुटुंबांचे; तसेच कोटीची आर्थिक उलाढाल असणाऱ्या विडी उद्योगाचे भवितव्य धोक्यात आले आहे.

**कोट्यवधींचा जीवनाधार**

विडी उद्योग हा घरगुती स्वरूपाचा असल्याने देशभरातून अनेक राज्यांतील ग्रामीण जनतेला उदरनिर्वाहाचे साधन बनले आहे. सोलापूरसह महाराष्ट्रात पुणे, नगर, संगमनेर, सिन्नर, नाशिक, जालना, औरंगाबाद, नागपूर, भंडारा, चिमूर, गडचिरोली, गोंदिया आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणात बिडी कारखाने असून, त्याद्वारे पाच लाख श्रमजीवी कुटुंबांचे अर्थार्जन होते. एकट्या सोलापूर शहरामध्ये १५ कारखान्यांतून ८० हजार लोकांना रोजगार मिळतो. नवीन धुम्रपानविरोधी कायद्यामुळे हा रोजगार संपुष्टात येणार आहे. विशेषतः गिरणगाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापुरातील गिरण्या एका पाठोपाठ एक बंद पडल्यानंतर श्रमजीवी कुटुंबे कसेबसे तग धरून असतील, तर केवळ

महिलांनी घरोघरी केलेल्या विड्या वळण्याच्या कामामुळे. आता तोही जीवनाधार संपला, तर कामगारांनी जगायचे कसे ?

### सोलापुरातील सद्य:स्थिती

धुम्रपानविरोधी कायद्यातून विडी उद्योग वगळण्याची मागणी घेऊन कामगार संघटनेने लढा देण्यास सुरवात केली आहे. त्यांना विडी उद्योजकांचाही पाठिंबा मिळत आहे. चर्चासत्रे, मोर्चे, निवेदने सुरू आहेत. आधीच या उद्योगावर मंदीचे सावट असून, २५ ते ३० टक्के उत्पादन घटले आहे. उर्वरित उत्पादनापैकी बरेचसे उत्पादन अन्य ठिकाणी कमी खर्चात केले जात आहे. पूर्वी दररोज पाच ते सहा कोटी विड्या सोलुपरात वळल्या जात होत्या. आज तेच प्रमाण दोन ते अडीच कोटीवर आले आहे. पूर्वी एका कार्डधारक महिला कामगारांला सरासरी दररोज १५०० विड्या वळण्याचे काम मिळत असे. त्यामुळे कुटुंबाला उदरनिर्वाहापुरता आर्थिक हातभार लागत होता. आता हे प्रमाण निम्म्यावर आल्यामुळे अर्थार्जन घटले. पुरुष मंडळी बेरोजगार आहेत, अशी श्रमजीवी कुटुंबे जगणार कशी, हा प्रश्न आहे. उद्योगातील वाढत्या मंदीमुळे नवीन कामगारभरतीही बंद आहे. त्यामुळे उपवर मुलींचे विवाह जमण्यातही अडचणी येत आहेत. अशिक्षित मुलींना विड्या वळण्याशिवाय दुसरा पर्याय इथे उपलब्ध नाही. यंत्रमाग निम्म्यावर चालू असल्याने, त्यातील अनुषंगिक, रिलिंग, कांडी, घडी घालणे, शिलाईकाम, सूत साफ करण्यासारखी महिलांची कामेदेखील कमी झाली. विड्या वळण्याचे काम घरीच चालत असल्यामुळे कुटुंबातील आबालवृद्धांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग असल्यामुळे श्रमिक कुटुंबे आजवर जगली.

### कामगार संघटनांना यश मिळेल ?

शहरातील कामगार संघटनांनी धूम्रपानविरोधी कायद्यातून विडी उद्योग वगळण्यासाठी संघर्षाचा पवित्रा घेतलेला आहे; परंतु जागतिकीकरणाच्या धोरणामुळे अन्य देशांशी झालेल्या व्यावहारिक करारांतर्गत सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हे पाऊल उचलण्यात आल्यामुळे त्यांना कितपत यश येईल, याविषयी शंका वाटते. प्रगत देशातून 'नो स्मोकिंग झोन्स' आहेत.

सार्वजनिक ठिकाणी खानपान; तसेच धूम्रपानाविषयीची जाणीव आहे. लोकही जागृत आहेत. विशेष म्हणजे आरोग्यविषयक सुविधा पूर्णपणे उपलब्ध आहेत. सार्वजनिक आरोग्यविषयी सरकारबरोबर सामाजिक संस्थाही जागरूक आहेत. आपल्या देशात धूम्रपान व तंबाखूजन्य उत्पादनावर एका रात्रीत कायद्याचा बडगा दाखून बंदी घालणे शक्य नाही. भारतात सुमारे ४१ किलो तंबाखू खपते. तिची उलाढाल सुमारे १५०० कोटींची आहे. कित्येक लाख कुटुंबांचा रोजगार त्यावर आधारित आहे. त्यांच्या पुनर्वसनचा प्रश्न आधी विचारात घ्यायला हवा. ज्याप्रमाणे अफूची शेती हळूहळू बंद करण्यात आली. त्याप्रमाणे तंबाखूचे उत्पादन, विक्री, प्रसार हळूहळू बंद करता येईल काय, असा विचार करू शकतो. केंद्र सरकारला तंबाखू, गुटखाच्या उत्पादनातून दीड ते दोन हजार कोटींचे उत्पन्न मिळते. त्यामुळे परकीय सिगारेट कंपन्यांच्या दबावाखाली सरकार छोटेखानी विडी उद्योगाची कोंडी करण्याचे तंत्र वापरताना दिसते. त्यातील अर्थकारण व बहुराष्ट्रीय राजकारणाविषयी सजग राहिले पाहिजे.

### शासनाचे एकांगी धोरण

खरे तर १९९४ मध्येच तंबाखू उत्पादनास, प्रसार, प्रचार व विक्री करण्यास मनाई करणारे विधेयक केंद्र सरकारने तयार केले होते; परंतु त्यावर जनमत तयार करणे व संबंधितांच्या पुनर्वसनाचे धोरण नसल्यामुळे विधेयक मागे पडले. पुन्हा बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व वैश्विक व्यापार धुरिणांच्या दबावाखाली धोरण घेतले जात आहे. कायदाही अस्तित्वात आला. सार्वजनिक आरोग्याच्या भूमिकेतून या धोरणांना कोणीही विरोध करणार नाही. असं असलं तरी या क्षेत्रातील शेतकरी, कामगार आणि उत्पादक यांना अन्य रोजगार मिळवून देण्यासाठी सरकारने त्यांना सवलती द्याव्यात. नुसते प्रतिबंधात्मक उपाय करून चालणार नाही, तर त्याविषयीची सामाजिक जागृतीही महत्त्वाची आहे. त्यामुळे एकतर्फी प्रतिबंधात्मक उपाय योजण्यापूर्वी त्याचे सामाजिक दुष्परिणाम तपासायला हवेत. कोटींच्या घरात बेरोजगारी निर्माण करणाऱ्या धोरणामुळे आपले सामाजिक स्वास्थ्य बिघडेल, याविषयी सरकारने भूमिका घ्यायला हवी; अन्यथा सरकारच्या चांगल्या धोरणाचे दुष्पपरिणाम अधिक होतील. संपूर्ण गिरणगाव उद्‌ध्वस्त झाले. आता विड्या वळण्याचाही जीवनाधार

संपला, तर त्यांनी कसे जगावे? त्यांना अन्य पर्याय उपलब्ध करून द्यायला हवेत. धूम्रपानविरोधी कायदा व त्याच्या अंमलबजावणीची जितकी तीव्रतेने गरज आहे. तेवढ्याच गांभीर्याने त्यामुळे उद्ध्वस्त होणाऱ्यांचे पुनर्वसन करणेही आवश्यक आहे. तरच सार्वजनिक आरोग्याबरोबरच सामाजिक स्वास्थ्य टिकेल.

# ‘शिवाजी वर्क्स’ ला आंतरराष्ट्रीय दर्जाचे आय.एस.ओ. ९००२ प्रमाणपत्र

सोलापुरातील शिवाजी वर्क्स लि., या किर्लोस्कर समूहातील अग्रमानांकित उद्योगाचा, कास्टिंग उत्पादनासाठी गुणवत्ता व्यवस्थापन पद्धतीची यशस्वी अंमलबजावणी केल्याबद्दल ब्यरो व्हेरीयज क्वॉलिटी इंटरनॅशनल, लंडन. या आंतरराष्ट्रीय किर्तीच्या संस्थेने आय.एस.ओ. ९००२ हे दर्जेदार उत्पादनासाठीचे गुणवत्तेचे प्रामणपत्र देऊन नुकताच गौरव केला. एका अर्थाने हा गौरव सोलापूरच्या संपूर्ण औद्योगिक क्षेत्रालाच नवा आत्मविश्वास देणारा ठरेल. याचे कारण सोलापूरत हे गिरणगाव म्हणूनच प्रसिद्ध आहे. अलिकडील काळातील सोलापूरातील चादरी, टॉवेल्स, व तसेच जिल्ह्यातून द्राक्षे, बोरे, डाळींब इ. सारख्या फळांच्या निर्यातीमुळे आमचे हे गाव विदेशातून हळूहळू परिचित होऊ लागले होते. या पार्श्वभूमीवर ‘शिवशाही’ मधील समस्त कामगार, कर्मचारी व अधिकाऱ्यांनी आपल्या सांघिक प्रयत्नातून घेतलेली ही गुणात्मक झेप आम्हा सोलापुरकरांच्या दृष्टिकोनातून खूपच महत्वाची ठरेल यात शंका नाही. दि इंटरनॅशनल ऑरगनाझेशन फॉर स्टॅण्डर्डायजेशन म्हणजेच आय.एस.ओ. या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या आय एस ओ ९००० मालिकेतील गुणवत्तेसाठीचे हे प्रमाणपत्र बी.व्ही.क्यू. आय म्हणजेच ब्युरो ऑफ व्हेरीयॅज क्वालिटी इंटरनॅशनल, लंडन या संस्थेचे मुख्य अधिकारी श्री. पी.बी. बॉरियर यांचे शुभहस्ते शिवाजी वर्क्सचे अध्यक्ष श्री. अतुल किर्लोस्कर यांना सन्मानपूर्वक देण्यता आले. आय.एस.ओ. ९००२ सारख्या गुणात्मकतेसाठीच्या प्रमाणपत्राचा जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेसाठी होणारा उपयोग व त्यातून होणारा आर्थिक व औद्योगिक विकास यापेक्षाही सोलापूरचे नांव दर्जेदार उत्पादन आणि संपूर्ण

गुणात्मक उत्पादनपद्धतीसाठी जगाच्या नकाशावर जाणार याचाच आम्हाला जास्त आनंद आहे याचे कारण किर्लोस्कर उद्योग समूहातील इरत उद्योगांना हे प्रमाणपत्र यापूर्वीच प्राप्त झालेले असून किर्लोस्करांची ही गुणात्मक व्यवस्थापनपद्धती सर्वश्रुत आहे. मात्र सोलापूरचा श्रमिकदेखिल योग्य नेतृत्व आणि पुरेसे मार्गदर्शन मिळाल्यास जागतिक किर्तीची कामगिरी करू शकतो हेच या घटनेतून सिद्ध झाले हे निश्चित या सर्वांचे श्रेय शिवाजी वर्क्स लि., चे मुख्य कार्यकारी संचालक श्री. एस.बी. देशपांडे व इतर संचालक व या संपूर्ण यशाचे प्रत्यक्ष मानकरी असणाऱ्या सर्व कामगार, कर्मचारी व अधिकारी वर्गाचे या निमित्ताने मन:पूर्वक अभिनंदन केले पाहिजे.

औद्यागिक उत्पादन दर्जेदार आणि ग्राहक उपभोक्त्यांच्या पूर्ण पसंतीस उतरल्याशिवाय आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपला टिकाव लागू शकणार नाही याची जाणीव उद्योजकांना अलिकडे होऊ लागली आहे. त्यामुळे दर्जेदार उत्पादनासाठी संपूर्ण गुणात्मक व्यवस्थापनाचा त्यांचे कडुन पुरस्कार होऊ लागला आहे. भारताप्रमाणेच बहूतेक विकसनशील राष्ट्रांतून उद्योजक आय.एस.ओ.चे उपरोक्त प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. मात्र हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी केवळ दर्जेदार उत्पादन अभिप्रेत नसून त्याबरोबर उत्पादनात सतत सुधारणा करणारी गुणात्मक कार्यपद्धती व ग्राहकांचे संपूर्ण समाधान अपेक्षित असते. दर्जेदार उत्पादनासाठी ग्राहक केंद्रित उत्पादन प्रक्रीया अंमलात आणावी लागेल. म्हणजेच ग्राहकांच्या गरजांचा संपूर्ण विचार करून त्यावर आधारीत उत्पादनाचे डिझाईन निश्चित करणे. तसे प्रमाणभूत उत्पादन होण्यासाठी उत्पादन प्रक्रियेवर संपूर्ण नियंत्रण ठेवण्यासारखी कार्यपद्धती आणावी लागणार आहे थोडक्यात उत्पादन प्रक्रियेतील प्रत्येक घटक एकूण उत्पादनाच्या गुणवत्तेसाठी महत्त्वाचा मानून सर्वांच्या सांघिक प्रयत्नांवर विशेष भर दिला जाणे आवश्यक आहे.

औद्योगिक आघाडीवरील गुणात्मक उत्पादनासाठी होत असलेले हे कार्यपद्धतीतील बदल स्वागतार्ह मानून आपले उत्पादन दर्जेदार करणे व त्यासाठी सर्वांनीच आग्रह धरणे ही काळाची गरज आहे कारण ग्राहकांचे संपूर्ण समाधान व उत्पादित वस्तूंची पर्याप्त उपयोगिता हेच आजच्या जगातील बाजारपेठतील महत्त्वाचे निकष बनले आहेत. शिवाजी वर्क्स लि., ने सांघिक

प्रयत्नांमधून मिळविलेले आ.एस.ओ. ९००२ चे प्रमाण पत्र ही एक सुरूवात आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपल्या उत्पादनाला मागणी व ग्राहक उपलब्ध होण्याची संधी निर्माण झाली आहे. प्रत्यक्ष कार्य पुढेच आहे.

शिवाजी वर्क्सने प्रत्यक्ष कार्यातून निर्माण केलेला हा गुणात्मक आदर्श आम्हा सोलापूरकरांचाच आहे असे मानून इतर उद्योगांतून व संस्थामधून संपूर्ण गुणात्मक व्यवस्थापन आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यातच सोलापूरचे औद्योगिक भवितव्य आहे. सोलापुरातील कापड सूत व यंत्रमागावरील कामगारांना देखील अशा प्रकारचे मार्गदर्शन झाल्यास त्यांचेकडूनही दर्जेदार उत्पादन नक्की होईल. यासाठी मालक, व्यवस्थापकीय अधिकारी, कामगार संघटना सर्वांनी मिळून एकदिलाने प्रयत्न केल्यास हे सहज शक्य आहे. सोलापूरच्या औद्योगिक आघाडीवरील चिंताजनक परिस्थिती बदलण्यासाठी हे आवश्यक आहे. शिवशाहीने पुढाकार घेऊन या कामी इतरांना योग्य मार्गदर्शन करावे आणि इतरांनीही ही गुणात्मक व्यवस्थापनपद्धती स्विकारुन आपापल्या त्रुटी दूर करण्याचे सर्वांगीण प्रयत्न करावेत तरच उद्यमशील सोलापूर हे स्वप्न साकार होईल.

भारताच्या बदललेल्या आयात निर्यात धोरणामुळे जागतिक बाजारपेठीतील संधी बरोबरच जागतिक बाजारपेठतील संधी बरोबरच स्पर्धाही निर्माण झाली आहे. ग्राहकांच्या गरजांची पूर्तता केल्यास स्पर्धेत टिकाव धरून उद्योगांचा विकास करणे शक्य आहे. उद्योगाच्या व पर्यायाने देशाच्या विकासासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याच्या सुप्त शक्तीवर लक्ष केंद्रीत करून ती वृद्धिंगत करणे आवश्यक आहे. त्यासाठी कर्मचाऱ्याच्या सहभागात बदल होण्याची गरज आहे. हा बदल सांस्कृतिक स्वरूपाचा असावा. त्यामुळे गुणवत्ता संस्कृतीची निर्मिती होईल संपूर्ण गुणवत्तेची कास धरणे तसे सोपे नाही ते करताना संस्थेत एका सांस्कृतिक बदलाची आवश्यकता आहे. आजचे संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन हे सतत सुधारणा करण्याच्या नीतीचे अवलंबन करते या गुणवत्तेचा विकास व सातत्य व सुधारण या बद्दल उद्योगाच्या प्रत्येक विभागाच्या प्रयत्नांनी ग्राहकांना समाधान देणारे उत्पादन व सेवा, कमीत कमी किमतीत उपलब्ध करून देण्याच्या तत्वज्ञानावर भर आहे. हे सर्वमान्य तत्वज्ञान स्वीकारून, आंतरराष्ट्रीय पातळीवर होत असलले व्यवस्थापकीय बदल लक्षात घेऊन,

आम्ही सर्वानीच स्वत:ला बदलले पाहिजे. तरच संस्थेला व त्यातील कार्यपद्धतीला बदलणे शक्य होईल.

सुदैवाने सोलापूर शहराचे औद्योगिक क्षेत्रातील आजवरचे योगदान ऐतिहासिक दृष्ट्या मोलाचे राहिले आहे. तथापि देशपातळीवर आर्थिक व औद्योगिक परिस्थितीच्या परिणामी आमचा औद्योगिक परिस्थितीच्या परिणाम आमचा औद्योगिक विकास थोडासा मंदावला. गेल्या काही वर्षात नविन (सुतगिरण्यांचा अपवाद वगळता) असलेल्या उद्योगाचीही परिस्थिती चिंताजनक आहे. या पार्श्वभूमिवर शिवाजी वर्क्सने आपल्या सांघिक परिश्रमातून मिळविलेल्या यशाच्या मार्गावर मार्ग क्रमण करून सोलापूरातील इतर औद्योगिक संस्थादेखिल असेच नावलौकीक मिळवितील यात शंका नाही.

दै. लोकमत - १८/१/१९९४

# शिवशाहीतील 'गुप्त मतदान'

सोलापूरातील अग्रमानांकित, दर्जेदार उत्पादनासाठीचे आंतरराष्ट्रीय किर्तीचे आय.एस.ओ. ९००२ प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या शिवाजी वर्क्स लि. म्हणजेच शिवशाहीमध्ये वेतनवाढीच्या नवीन करारपत्राच्या संदर्भात दोन कामगार संघटनांमध्ये वाद उत्पन्न झाल्याने गुप्त मतदान पद्धतीचा अवलंब करावा लागला. आगामी तीन वर्षासाठी वेतनवाढीच्या करारासाठी व्यवस्थापनाशी बोलणी करण्यासाठी कामगारांचे खरे प्रतिनिधीत्व करणारी कामगार संघटना कोणती? ह्या वादाचा विषय होता. औद्योगिक क्षेत्रात नावाजलेल्या शिवाजी वर्क लि.च्या कामगारांवर सुरुवातीला बरेच वर्षे इंटकचे वर्चस्व होते. मार्च १९८९ च्या कराराच्या वेळी भारतीय मजदूर संघाने प्रवेश केला आणि आपले वर्चस्व प्रस्थापित करून १९९२ ते १९९५ या तीन वर्षासाठीचा वेतन विषयक करारही केला. आत येत्या तीन वर्षासाठी नवीन करार करताना आपले मागणीपत्र सादर करण्यासाठी ६ एप्रिल ९५ रोजी कंपनीच्या गेटवर गेले असता नव्याने उदयाला आलेली शिवसेनाप्रणित श्रमिक सेनेच्या पुरस्कर्त्यांशी वादावादी होऊन गोंधळ झाला. अखेर पोलिसांनी वातावरण शांत केले. त्यामुळे या दोन्हीही युनियनाच्या बहुमताच्या परस्पराविरोधी दाव्यामुळे व्यवस्थापनासमोर पेच निर्माण झाला. उभय दोन्ही संघटनेशी करार करावा या संभ्रमात असलेल्या व्यवस्थापनाने त्यावर 'गुप्त मतदान' पद्धतीने बहुमतवाली प्रातिनिधीक कामगार संघटनास निवडण्याचे ठरविले. १५ एप्रिल रोजी निवडणूक अधिकारी निवृत्त सरकारी कामगार अधिकारी बी.जी. कसबे यांचे मार्गदर्शनाखाली निवडणूक शांततेने पार पाडली. शिवाजी वर्क्सच्या १८३४ कायम कामगारांपैकी १६४२ कामगारांनी मतदानात भाग घेतला. त्यात शिवसेनाप्रणित श्रमिक

सेनेला ११६९ मते तर भारतीय मजूदर संघला ४६१ मते पडली. त्यामुळे हा वाद आता तूर्तास मिटलेला असून आगामी तीन वर्षासाठी होऊ घातलेला वेतनवाढीच्या करारासाठी व्यवस्थापन श्रमिक सेनेला पाचरण करेल.

या गुप्त मतदान पद्धतीद्वारे निवडलेल्या श्रमिक सेनेला अगामी तीन वर्षासाठी व्यवस्थापनाची चर्चा करता येईल. हा अधिकार भारतीय मजदूर संघाला नसणार आहे. परंतु त्यामुळे एक तृतीयांश मते मिळविणाऱ्या भारतीय मजदूर संघाला इतर कामगार विषयक प्रश्नांवर त्यांचे प्रतिनिधीत्व करण्याचा अधिकार व्यवस्थापनाला नाकारता येणार नाही. वेतनवाढीविषयीच्या करारा व्यतिरिक्त इतर प्रश्नांवर चर्चेचा त्यांचा अधिकार कायद्याने मान्यच करावा लागेल. गुप्त मतदान पद्धतीने तात्पुरता हा प्रतिनिधीत्वाचा प्रश्न सोडविता येईल. मात्र शिवाजी वर्क्स मधील समस्त कामगारांचे प्रतिनिधित्व करणारी एकमेव खरी संघटना कोणती ? हा प्रश्न अद्यापही निरुत्तरच आहे. दैनंदिन व्यवहारामध्ये औद्योगिक संबंधाच्याविषयी व व्यवस्थापकीय कारभाराविषयी या उद्योगातून अस्तित्वात असलेल्या तीनही कामगार संघटना हस्तक्षेप करीत राहतील तसा त्यांना कायदेशीर अधिकार आहे. 'एक उद्योग, एक युनियन' हे तत्व व्यवहारात आणावयासाठी देशपातळीवरील सर्वच कामगार संघटनांमध्ये तत्वतः एकवाक्यता असली तरीही त्यासाठी कायदेशीर तरतूद करण्याविषयी सर्वांचीच चालढकल करण्याचीच भूमिका आहे.

### सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

केवळ आगामी तीन वर्षासाठी वेतनवाढीचा करार करण्यासाठी बहुमतवाल्या कामगार संघटनेची निवड करण्यापुरतीच गुप्त मतदान पद्धतीने झालेली निवडणूक असून दैनंदिन व्यवहारामध्ये श्रमिकांचे एकसूत्री प्रतिनिधित्व करण्याचा सर्वांगीण कायदेशीर अधिकार त्यातून मिळू शकत नाही म्हणून शिवशाहीतील व्यवस्थापनासमोरील प्रतिनिधित्व संघटनेचा गुंता पूर्णपणे सुटला असे म्हणता येणार नाही. अशीच परिस्थिती देशातील असंख्य उद्योगाची आहे. ट्रेड युनियन्स ॲक्ट १९२६ अन्वये हजेरीपटावरील कोणाही सात व्यक्तींना एकत्रित येऊन संघटना बांधण्याचा अधिकार असल्याने एकेका उद्योगात अनेक कामगार संघटना कोणती प्रतिनिधीक हे ठरल्याशिवाय निकोप

औद्योगिक संबंध प्रस्थापित होऊ शकत नाहीत. त्यातून प्रत्यक्ष कामगाराखेरीज बाहेरील व्यक्तीला संघटनेचे पदाधिकारी म्हणून नेतृत्व करण्याची मुभा प्रचलित कायद्यात असल्याने त्यांचे (राजकीय व वैयक्तिक स्वार्थापोटी) नियंत्रण वाढू लागते. कामगारहितापेक्षा इतर गोष्टींनाच महत्त्व येते. आज देशभरातील महत्त्वाच्या कामगार संघटना प्रत्यक्ष कामागारांऐवजी राजकीय नेत्यांच्याच हाती आहेत. शिवशाहीतील तीनही संघटनांचे नेतृत्व ब्रह्मदेव माने (इंटक), प्रकाश आळंदकर (भारतीय मजूदर सभा) आणि आता नवनिर्वाचित श्रमिक सेनेचे शिवशरण पाटील यांच्याकडे आहे.

भारतीय खाद्यनिगम म्हणजेच फूड कार्पोरेशन ऑफ इंडिया या देशव्यापी संस्थेमध्ये आठ वेगवेगळ्या संघटना आहेत. त्यामुळे व्यवस्थापनासमोर कायमचा पेच होता. हा गुंता सोडविण्यासाठी १९८३ मध्ये व्यवस्थापनाने अशी युक्ति केली की, त्या अंतर्गत प्रत्येक डेपो मॅनेजरकडे मुख्य व्यवस्थापकांनी छापिल फॉर्म्स पाठविले. प्रत्येक कामगारांनी या विहीत नमुन्यामध्ये आपले सदस्यत्व असलेल्या संघटनेचे नाव लिहून कोणत्या संघटनेकडे आपली सदस्यत्वाची फी पगारातून कापून द्यावयाची त्याविषयीची संमति स्पष्ट करावयाची असे आदेश देण्यात आले. त्यावरून 'चेक ऑफ' पद्धतीद्वारे खरे प्रतिनिधित्व कळेल अशी व्यवस्थापनाची अपेक्षा होती. परंतु त्याविरूद्ध स्टाफ युनियनने कोर्टात धाव घेतली. दहा वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर १७ फेब्रुवारी ९५ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या त्रीसदस्यीय खंडपीठाने निकाल दिला. हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने गुप्त मतदान पद्धतीने प्रतिनिधिक संघटना कशी निवडावी, निवडणुकीची जबाबदारी कोणाची, निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया कशी असावी, पात्रता इ. संदर्भात संपूर्ण खुलासा करून कामगार आयुक्तालयाला याविषयीची जबाबदारी दिली आहे. त्यामुळे ह्या निकालाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

मुंबई औद्योगिक संबंध कायदा म्हणजेच बी.आय.आर. ॲक्टनुसार मान्यताप्राप्त व प्रतिनिधिक कामगार संघटना निवडण्याची पद्धत आहे. परंतु ही निवड सहजासहजी लोकशाही मार्गाने बदलता येत नाही. एकदा निवडलेली संघटना तहह्यात प्रतिनिधिक राहते. म्हणूनच मुंबई आणि इतर महाराष्ट्रातील कापड उद्योगातील 'इंटक'चे तथाकथित प्रतिनिधित्व निर्धोक आहे. प्रत्यक्ष

कामगार त्यांचे प्रतिनिधित्व नाकारत असतानाही केवळ बी.आय.आर.च्या कुबड्या घेऊनही संघटना तगून राहिली, हे योग्य नव्हे. लोकशाहीला मारक आहे म्हणून सत्तांतरानंतर भाजपा-सेना युतीचे बी.आर.आर. ॲक्ट बदलण्याची घोषणा केली. कामगारांचा खरा प्रतिनिधि निवडण्यासाठी गुप्त मतदान पद्धतीचा अवलंब करावा हे सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निर्णयानुसार मान्य केले, परंतु त्यातून 'एक उद्योग, एक कामगार संघटना' हे तत्व अंमलात आणण्यात मदत होईल असे नाही. कारण प्रातिनिधिक व मान्यताप्राप्त कामगार संघटना निवडण्यासंदर्भात विविध कायदेशीर तरतुदींमुळे एकवाक्यता नाही म्हणून देशपातळीवर औद्योगिक स्थैर्य आणि शांततेसाठी लोकशाही पद्धतीने प्रातिनिधिक कामगार संघटना निवडण्याची प्रक्रिया स्पष्ट असणारा सर्वसमावेशक असा कायदा करणे हीच काळाची गरज आहे.

दै. लोकमत - २५/४/१९९५

# ‘शिवशाही’ वाचविण्यासाठी राज्यातील ‘शिवशाही’ला श्रमिकांचे साकडे

‘शिवशाही’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुप्रसिद्ध किर्लोस्कर उद्योग समूहाच्या शिवाजी वर्क्स लिमिटेड या फौन्ड्रीचे भवितव्य धोक्यत आले असून गेल्या दोन वर्षापासून ५८ कोटी रुपये तोटा झाल्याचे कारण दाखवून व्यवस्थापनाने कंपनी बी.आय.एफ.आर.कडे सोपविण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या सहा महिन्यातील या ‘शिवशाही’ तील विविध घटनांचा क्रम पाहता ही फौन्ड्री लक्ष्मी-विष्णुच्या दिशेनेच जाईल की काय अशी भीती व्यक्तविली जात आहे. चार वर्षापूर्वी आंतरराष्ट्रीय किर्तीचे आय.एस.ओ. ९००० प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या ‘शिवशाही’ची ही दुरवस्था कशी झाली, त्याची नेमकी कारणे कोणती यावर वेळीच उपाय योजले नाहीत तर दोन हजार कामगार कुटुंबियांवर उपासमारीची पाळी येईल. त्याच बरोबरीने सोलापूरच्या औद्योगिक विकासाचे मानबिंदू ठरलेल्या जुनी गिरणी, लक्ष्मी-विष्णुच्या पाठोपाठ, शिवाजी वर्क्स लि. ची हत्या अटळ आहे. ती टाळण्याच्या दृष्टिकोनातून शिवाजी वर्क्सविषयीची सद्यःस्थिती समोर ठेवून महाराष्ट्र शासनाने ‘मध्यस्थी’ करावी यासाठी मुख्यमंत्री मनोहर जोशींना, त्यांच्या सोलापूर भेटीत निवेदन देऊ इच्छिणाऱ्या शिवाजी वर्क्स कामगार व कर्मचारी संघटनेच्या कार्यकर्त्यांना विमानतळावर अटक करण्यात आली. यावरून ‘शिवशाही’ वाचविण्यासाठी शिवशाहींची धडपड व भूमिका लक्षात यायला हरकत नाही. लक्ष्मी-विष्णुच्या सार्वजनिक हत्येनंतर ‘शिवशाही’तील राज्यकर्ते, लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षाचे तसेच कामगार संघटनेचे मंडळीविषयीची जनसामान्यांच्या मनामध्ये जी प्रतिमा निर्माण झाली तिला छेद देण्यासाठी, खऱ्याखुऱ्या शिवरायांच्या राज्यकारभारांची आठवण

जनतेला करून देण्यासाठी मुख्यमंत्री व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी पुढाकार घेऊन त्वरित मध्यस्थी करावी आणि होणारा अनर्थ टाळावा ही सामान्य श्रमजीवींची भावना आहे.

खरे तर गिरणगाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सोलापूर शहरामध्ये इ.स. १९०० मध्ये कास्टिंगचे उत्पादन करणाऱ्या शिवाजी वर्क्स लि.ची स्थापना करून किर्लोस्कर उद्योग समूहाने शहराला औद्योगिक विकासाची नवी दिशा दिली. गेल्या ९० वर्षामध्ये अनेक स्थित्यंतरे झाली. शिवाजी वर्क्सच्या पुढाकारामुळे सोलापुरामध्ये फौन्ड्रीचा व्यवसाय वाढला. स्वतंत्र औद्योगिक वसाहत उभारण्यात आली. त्यामध्ये छोटे छोटे फौन्ड्री, कास्टिंगचे उत्पादन करणारे अनेक कारखाने वाढले. सूत व कापडासारख्या पारंपरिक वस्त्रोद्योगापेक्षा वेगळ्या पद्धतीचा उद्योग या सोलापूरमध्ये वाढण्यासाठी शिवाजी वर्क्स लि. कारणीभूत ठरले.

महाराष्ट्रातील उद्योगक्षेत्राची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या जगप्रसिद्ध किर्लोस्कर उद्योग समूहाची ही एक छोटीशी फौन्ड्री असली तरीही अंदाजे १७०० कोटीहून अधिक वार्षिक उलाढाल असणाऱ्या मोठ्या उद्योग समूहाला जर योग्य शासकीय पाठबळ मिळाले तर ही फौन्ड्री पुन्हा नफ्यात आणणे अवघड नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने याप्रश्नी त्वरित लक्ष घालून मध्यस्थी करावी अशी मागणी होत आहे.

## संपूर्ण घटनाक्रम 'लक्ष्मी–विष्णु'च्या दिशेने

शिवाजी वर्क्स लिमिटेड कंपनीने कामगारांना लेखी सुचना देवून कंपनीला प्रचंड आर्थिक नुकसानी झाल्यामुळे औद्योगिक व वित्तिय पुनर्रचना मंडळाकडे म्हणजेच बी.आय.एफ.आर. कडे सोपविण्याचा निर्णय कळविला आहे. २२ मे रोजी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डी.आर.स्वार यांनी कामगारांची सभा घेऊन कंपनीच्या दुरावस्थेबद्दल माहिती दिली. पूर्वी २२०० कामगार असताना जेवढे उत्पादन होत असे तेवढेच उत्पादन १५०० कामगारांकडून घेवूनही कंपनीची स्थिती सुधारली नाही. सरसकट चाळीस टक्क्यांपर्यंत उत्पादनवाढीसाठी श्रमिकांनी सहमती दिली. तरीही डिसें. ९६ मध्ये 'ए' फौन्ड्री बंद करण्यात आली. त्यातील कामगारांना 'बी' मध्ये सामावून घेण्याचा निर्णय

झाला परंतु अपुरे काम किती लोकांना कसे म्हणून वाटून देता येईल? त्यानंतरही १२ जानेवारी ९७ रोजी औद्योगिक विवाद अधिनियमातील तरतुदीनुसार मशिनशॉप बंद करण्याकरिता महाराष्ट्र शासनाकडे कंपनीने परवानगी मागितली. परंतु १३ मार्च ९७ रोजी शासनाने तो अर्ज फेटाळला. १६ एप्रिल ९७ रोजी कंपनीने फेरअर्ज दाखल केला. त्याविषयी निर्णयाची वाट न पाहता ११ मे ९७ पासून अचानकपणे मशिन शॉपमधील मशिनरी कंत्राटदारांकडे सोपविण्यात आली. परिणामी ७०० च्यावर कामगारांनी स्वेच्छेनी राजीनामे दिले. मागील वर्षी कामवाढीमुळे ई.पी.पी. ३०० कामगार कमी करण्यात आले. तद्नंतर नैमित्तिक ७६ कामगारांना कमी करण्यात आले. एकंदरीत १५०० कामगार बचावले. तथापि दि. २७ मे ४ जून पर्यंत 'ले-ऑफ' पुकारण्यात आला. राहिलेल्या कामगारांना नुसते बसून राहण्याची वेळ आली आहे. कामगारांचा दरमहा पगार ठरल्याप्रमाणे दहा जून रोजी होऊ शकला नाही. अशा एकंदरीत परिस्थितीमुळे शिवशाहीतील कामगार शिवशाहीचे राज्य असून खला आहे. बी.आय.एफ.आर. चा सार्वत्रिक अनुभव वेळ काढू तसाच दिरंगाईचा असून 'न्याय' वेळेवर मिळेल अशी परिस्थिती नसल्याने 'लक्ष्मी-विष्णू' तील कामगारांसारखे दुर्दैवाचा दशावतार अनुभवावे लागणार या भितीने कामगार चिंताग्रस्त आहे.

### महाराष्ट्र शासनाने 'मध्यस्थी' करावी

'लक्ष्मी-विष्णु' ची जखम अद्यापही ताजी असून त्यामुळे सोलापूरच्या औद्योगिक क्षेत्राची भरून न येऊ शकणारी नुकसानी झालेली आहे. या धक्क्यातून सावरतो न् सावरतो तोच 'शिवाशाही'सारख्या प्रगत उद्योगांची ही धक्कादायक परिस्थिती खरोखरीच असह्य आहे. त्यामुळे 'लक्ष्मी-विष्णु'ची पुनरावृत्ती टाळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने त्वरित याप्रश्नी लक्ष घालण्याची गरज आहे. किंबहुना ती काळाची गरज आहे. कामगारांच्या म्हणण्यानुसार 'शिवशाही'च्या या दुरावस्थेला व्यवस्थापन जबाबदार आहे. तर 'व्यवस्थापन' नुकसानीची 'व्यवस्थित' कारणे देते. दोघांच्या परस्परविरोधी दाव्यांपेक्षा दोघांनीही संयुक्त प्रयत्नांमधून उद्योग वाचविणे लोकहिताचे ठरणार आहे. दोहोंची आज होणारी बैठक याच भूमिकेतून फलदायी ठरेल ही अपेक्षा.

'लक्ष्मी-विष्णु'च्या संदर्भातील सर्व चुकांमधून 'शिवशाही'तील कामगार, त्यांचे नेते, लोकप्रतिनिधी तसेच समस्त संबंधितांनी धडे घ्यायला हवेत. त्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची खबरदारी घ्यायला हवी. आपल्या सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून सोलापूरच्या औद्योगिक विश्वाचे मानबिंदू ठरलेल्या शिवाजी वर्क्स लि. चे खरेखुरे पुनर्वसन करणे शक्य आहे. त्यासाठी राज्य शासनाचे सहकार्य मिळविण्यासाठी संघटित प्रयत्न व्हावेत. नरसिंगगिरजी मिल्स बंद पडल्यानंतर इथल्या कामगार व नेतृत्वांनी द्रष्टेपणाच्या भूमिकेतून जी पगार कपात स्वीकारून देशामध्ये इतिहास घडविला त्याची आठवण यानिमित्ताने होणे साहजिकच आहे. 'शिवाशाही'च्या बाबतीत तशी वेळ येणार नाही याची दक्षता घ्यावी. निदान 'शिवाशाही'मध्ये शिवशाही पुनप्रस्थापित होईल असा विश्वास बाळगायला हरकत नाही.

दै. लोकमत - १७/६/१९९७

# शिवशाही वाचविणारे समंजस कामगार

शिवाजी वर्क्स लि. म्हणजेच 'शिवशाही' तील तीनही कामगार संघटनांचे नेते, व्यवस्थापन यांच्यातील सहाय्यक कमगार आयुक्तांच्या नेतृत्वाखाली संपन्न झालेली बैठक यशस्वीपणे पार पडली. जुलै ९७ च्या पगारापोटी ठरल्याप्रमाणे एक हजार रूपयांचे प्रत्येकी ॲडव्हान्सही वाटण्यात आले. उर्वरित पगार २२ सप्टेबरपर्यंत देण्यात येणार आहे. शिवशाहीच्या पुनरुज्जीवनासाठी ६२८ कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती घ्यावी असा व्यवस्थापनांतर्फे मांडण्यात आलेला प्रस्ताव देखील व्यापक औद्योगिक हितासाठी कामगारांनी समंजसपणाने मान्य केला. कंपनीने स्वच्छोनिवृत्ती योजना जाहीर करून त्याची पूर्तता करावी. २० सप्टेंबरपर्यत शिवशही पूर्ववत चालू होईल अशी अपेक्षा आहे. गेल्या दोन महिन्यापासून काम नसल्याने उपासमारी भोगणाऱ्या श्रमिकांना यापुढे तरी अर्धी भाकर मिळेल. तीनही कामगार संघटनांच्या नेतेमंडळींनी आपले मतभेद बाजूला ठेवून केवळ उद्योग व श्रमिकांच्या हितासाठी ही सामंजस्याची भूमिका घेतली. आता व्यवस्थापनाची जबाबदारी अहे.

गेल्या दोन वर्षापासून ५८ कोटींचा तोटा झाल्याने शिवशाहीने दिवाळखोरी जाहीर केली. कंपनीच्या उत्पादनाची गुणवत्ता ढासळल्यामुळे नुकसानी झाल्याचे व्यवस्थापनाकडून सांगितले जाते. तर केवळ व्यवस्थापनाचा गैरकारभार, नियोजनाचा अभाव व अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार यामुळे तोटा झाल्याचे युनियनकडून बोलले जाते. अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक मालमत्तेची चौकशी करण्याची मागणी देखिल होत आहे. अधिकारी मंडळींच्या भ्रष्टाचाराविषयीच्या अनेक सुरस कथा ऐकू येतात. मात्र त्यांना कोण जाब विचारणार? त्यांनी दुसरीकडे चांगली नोकरी मिळवून आपली सहीसलामत

सुटका करून घेतली. कामगार मात्र उपाशी झाला. 'शिवशाही' मधील एकूण घटनाक्रम 'लक्ष्मी-विष्णूच्याच' दिशेने होताना दिसतो. सरकारी परवानगी नसतानास डिसें. ९६ मध्ये ए विभाग बंद करण्यात आला. १२-१-९७ रोजी औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या २५(ओ) कलमान्वये व्यवस्थापनाने मशिनशॉप बंद करण्याची परवानगी मागितली. महाराष्ट्र शासनाने त्वरित अगदी दुसऱ्या दिवशी म्हणजे १३-१-९७ रोजी ती परवानगी नाकारली. १६-१-९७ रोजी कंपनीने त्याच मागणीचा फेरअर्ज दाखल केला. त्याला कोणताही परवाना नसतानाही ११-५-९७ पासून अचानकपणे मशिन शॉपमधील कामे सब कॉन्ट्रॅक्टरकडे देण्यात आली. त्यानंतर २२ मे ९७ रोजी कंपनीने व्यवस्थापकीय बैठक घेऊन कंपनीच्या वाईट स्थितीबद्दल मुद्देसूद माहिती दिली. त्याचप्रमाणे २७ मे १४ जूनपर्यंत ले-ऑफची घोषणा केली. तेथून परिस्थिती दिवसेंदिवस खालावतच गेली.

सुरुवातीला असणाऱ्या २२०० कामगारांपैकी ७०० कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली व ३०० इ.पी.पी. ७६ नैमित्तिक कामगार कमी करण्यात आले. उरलेल्या १५०० कामगारांकडून सरासरी ४० टक्के कामवाढ करून पूर्वीच्या २२०० कामगारांइतकेच उत्पादन घेण्यात आले. तरीही तोटा कमी होईना. म्हणून रड सुरू झाली. दरम्यान २०० कामगारांनी भयग्रस्त मनःस्थितीत राजीनामे दिले. त्यानंतरही १३०० कामगारांपैकी २०० कामगार कमी करण्याची व्यवस्थापनांकडून मागणी आली ती मात्र संघटनेने नाकारली व कामगारांनी घाबरून राजीनामे देवू नयेत अशी जाहीर भूमिका घेतली तथापि एकंदरीत परिस्थितीचा विचार करून स्वेच्छानिवृत्तीच्या माध्यमातून ६२८ लोकांची कपात मान्य केली आणि व्यवस्थापनाकडून ५० टक्के कामगार कपात व ४० टक्के वेतन कपातीची मागणी आहे.

## नियंत्रणासाठी लोकाधिकार समिती हवी

सहाय्यक कामगार आयुक्तांच्या पुढाकाराने शहरातील तीनही कामगार संघटना एकत्रित आल्या समंजसपणा दाखवून व्यवस्थापनास सहकार्य देऊ केले असता खरी गरज आहे ती व्यवस्थापकांनी कामगार हितकारी भूमिका घेण्याची व्यवस्थापनातील गलथानपणा कमी करून योग्य नियोजन करून

अत्यंत काटकसरीने उद्योग पुनप्रस्थापित करण्यासाठी अगदी निःस्वार्थी भूमिकेतून काम केले पाहिजे. भ्रष्ट अधिकारी व गलथान व्यवस्थापनाची पापे कामगारांनी कपात सोसून धुवायची. हा कुठला न्याय आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, मजूर मंत्री, पालकमंत्र्यांना साकडे घालून देखील फारसे काही घडले नाही. उलट मुख्यमंत्र्यांच्या सोलापूर भेटीत त्यांना निवेदन देणाऱ्या कामगारांना अटक करून नंतर सुटका करण्यात आली. भाजपा-सेना युतीचे सरकार असूनही 'शिवशाही' वाचविण्यासाठी 'शिवशाही' काही करेल अशी आशा बाळगणे योग्य ठरणार आहे काय ? याचा गंभीरपणे विचार करून सोलापूरच्या औद्योगिक विकासासाठी कटीबद्ध असलेल्या तमाम सुजाण नागरिक व सर्वपक्षीय नेतेमंडळींनी एकत्रित येऊन लोकाधिकार समिती स्थापन करावी. शिवशाहीतील कामगारांनी त्यागाची भावना दाखविली, नेतेमंडळींनी आपसातले मतभेद बाजूला सारून केवळ उद्योग जगविण्यासाठी एकत्रित येण्याची इच्छा दर्शविली आता व्यवस्थापनाने देखील उद्योग व कामगारांच्या सर्वांगीण हितासाठी पुढे येण्याची गरज आहे तसे झाले नाही तर कामगारांच्या समंजसपणाला अर्थ उरणार नाही.

एकेकाळी शहरातील सुप्रसिद्ध नरसिंगगिरजी मिल बंद पडल्यानंतर तत्कालीन नेते मंडळींनी अशीच ध्येयवादी भूमिका घेऊन एकतृतीयांश पगार कपात स्वीकारून गिरणी जगविली एवढेच नव्हे तर संपूर्ण देशामध्ये इतिहास घडविणारा निर्णय राज्य शासनाला घेण्यास भाग पाडला. त्यामुळे गिरणी राज्य शासनाला ताब्यात घ्यावी लागली. वेळप्रसंगी उद्योग टिकविण्यासाठी त्याग करण्याची इथल्या कामगार व नेतेमंडळींची परंपरा आहे. दुर्दैवाने जुनी गिरणी व अगदी अलीकडे लक्ष्मी-विष्णूची झालेली वाताहत मात्र आम्ही थांबवू शकलो नाही त्याच दिशेने मार्गक्रमण करणाऱ्या 'शिवशाही' ला वाचविण्यासाठी कामगार व नेत्यांनी समंजसपणाची भूमिका घेऊन जो पुढाकार घेतला तो अभिनंदनीय आहे. तथापि त्यांना व त्यांच्या याविषयीच्या सर्व प्रयत्नांना यश येण्यासाठी सोलापूरकरांची साथ हवी. हा केवळ शिवाजी वर्क्स लि., मधील कामगारांचाच प्रश्न नसून सोलापूरच्या औद्योगिक विकासाचा प्रश्न आहे.

व्यवस्थापकीय गलथानपणा व भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे एकापाठोपाठ एक उद्योग बंद पडत असताना हुतात्म्यांचा वारसा सांगणाऱ्या या पुण्यनगरीतील

सुजाण नागरिक बघ्यांची भूमिका घेऊन गप्प बसणार आहेत काय? कामगार देशोधडीला लागताना पाहात राहणार आहेत काय? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे व्यवस्थापनाला अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने काम करून उद्योग फायद्यात आणण्यासाठी योग्य नियंत्रण ठेवणारी लोकाधिकार समिती तयार करून सर्व लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने 'शिवशाही' पुनरूजिवीत केली पाहिजे.

दै. लोकमत - ९/९/१९९७

# अखेरीस 'शिवशाही'चे विलिनीकरण

'शिवशाही म्हणजे शिवाजी वर्क्स लि. ह्या उद्योगाचे पुण्यातील किर्लोस्कर ऑईल कंपनीमध्ये लवकरच विलीनीकरण होणार आहे. त्यामुळे सध्या हजेरी पटावर असणाऱ्या ६०० कामगारांना रोजगारीची निश्चिती झाली. गेल्या तीन वर्षापासून ५२ कोटीहून अधिक नुकसानी असणारी ही औद्योगिक कंपनी आजारी घोषित करून तिच्या पुनर्वसनासाठी रितसर प्रस्ताव बी.आय.एफ.आर.कडे पाठविण्यात आला होता. दरम्यानच्या काळात किर्लोस्कर ऑईल कंपनीने ९० कोटी रुपयांची मदत देऊ करून उद्योगाचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला. तरीही प्रश्न सुटला नाही. स्वेच्छानिवृत्ती योजना लागू करून हजाराहून अधिक कामगारांना अकाली निवृत्ती दिली. कमीत-कमी कामगार संख्या ठेवूनही उत्पादन खर्च आटोक्यात येत नाही, असे लक्षात आल्यानंतर एकेक करीत विभागही बंद करण्यात आले. ले-ऑफ, कामगार कपात, पगार देण्यात दिरंगाई अशा सर्व मार्गांनी नाकेबंदी करूनही उपयोग होत नाही, असे दिसल्यानंतर व्यवस्थापनाने दिवाळखोरी जाहीर करून असमर्थता व्यक्त केली. बी.आय.एफ.आर.ने त्यावर योग्य तोडगा काढण्याविषयी हे प्रकरण आय.सी.आय.सी.आय.कडे सोपविले. त्यांनी कंपनी चालवू शकणाऱ्या उद्योगांकडून प्रस्ताव मागितले. त्यानुसार पुण्याच्या किर्लोस्कर ऑईल कंपनीने प्रस्ताव दिला. त्यानंतर विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू झाली.

किर्लोस्कर ऑईल कंपनी ही मूळ किर्लोस्कर उद्योग समूहापैकी नफा करणारी अग्रगण्य औद्योगिक संस्था असून त्यांच्याकडून आलेल्या प्रस्तावावर प्राधान्याने विचार झाल्याचे समजते. ह्या प्रस्तावावर विचार करण्यासाठी कंपनीचे व्यवस्थापन, युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, आय.डी.बी.आय., बँक ऑफ महाराष्ट्र,

युनायटेड वेस्टर्न बँक, शामराव विठ्ठल को-ऑप. बँक, महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी, किर्लोस्कर ऑईल इंजिनचे प्रतिनिधी व कामगार संघटनांची मिळून संयुक्त बैठक घेण्यात आली. १६ फेब्रुवारी झालेल्या ह्या बैठकीमध्ये सर्वांगीण चर्चा होऊन विलीनीकरणाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. अर्थात् विलिनीकरणाच्या प्रस्तावावर सध्याची देणी, विलिनीकरणानंतरची प्रत्यक्ष स्थिती यांचा सांगोपांग विचार होऊनच निर्णय झाला, हे स्पष्ट आहे.

**कामगरांचे हित जपले पाहिजे.**

आज शिवाजी वर्क्स लि. कंपनीमध्ये हजेरीपटावर असलेल्या ६०० कामगार कुटुंबियांना कायमस्वरूपी रोजगाराची संधी विलीनीकरणानंतर उपलब्ध होणार असल्यामुळे कामगार संघटनांनी मंजुरी दिली असल्याचे सांगण्यात आले. मात्र विलिनीकरणासाठी किर्लोस्कर ऑईल इंजिनकडून काही अटी ठेवण्यात आल्या. ह्या अटी कामगारहिताच्या विरोधी असल्यामुळे कामगार संघटनांनी त्यास विरोध केला. वास्तविक सप्टेंबर महिन्यामध्ये कामगार संघटनांशी विचारविनिमय करण्यासाठी व्यवस्थापनाने कामगारांशी प्रत्यक्ष करार करून मनमानी अटी लादल्या अशी संघटनांची तक्रार आहे. विलिनीकरणानंतर उत्पादन खर्च, विशेषतः मजूरी खर्च कमी करण्यासाठी सध्याच्या पगारापैकी १० टक्के कपात करण्याची व्यवस्थापनाची अट आहे. त्याविषयी पूर्वी झालेल्या कामगार संघटनांच्या बैठकीनुसार ही १० टक्के पगार कपात २४ महिन्यापर्यंत करावी. त्यानंतर कापलेली रक्कम व्याजासहीत कामगारांना परत करावी, अशी कामगार संघटनेची भूमिका आहे. ज्यायोगे दोन वर्षापर्यंत व्यवस्थापनाला अवधी मिळेल. उत्पादन खर्च सिमित ठेवून कंपनीची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वाव मिळेल. कामगार संघटना व कामगारांनी उद्योग चालविण्यासाठी दिलेले हे सहकार्य डावलून व्यवस्थापन प्रत्यक्ष कामगारांस उपासमारीची भीती दाखवून दहशतीच्या वातावरणामध्ये करार करू पाहतेय, अशी कामगार संघटनांची तक्रार आहे. त्यानुसार एप्रिल ९९ च्या पगारापासून १० टक्के पगार कपात करण्यात येईल. ती कापलेली रक्कम पाच वर्षांनी बिनव्याजी परत देण्यात येईल. त्याचबरोबरीने येत्या पाच वर्षाकरिता बोनस गोठविण्यात येणार आहे. ह्या दोन्ही अटींविषयी कामगार संघटनांची आग्रही भूमिका, असून रितसर चर्चेअंती निर्णय होईल, असे कळते.

वास्तविक 'शिवशाही'ची सद्यस्थिती लक्षात घेता. लक्ष्मी–विष्णूच्या पार्श्वभूमीवर उर्वरित ६०० कामगारांच्या व्यापक हिताच्या भूमिकेतून कामगार संघटनांना तडजोड करावी लागणार आहे. परंतु ही तडजोड कामगारविरोधी ठरणार असेल तर कसे? हा प्रश्न आहे.

## 'नरसिंग गिरजी'ची आठवण

सोलापुरातील नरसिंग गिरजी मिल खाजगी मालकीची असताना, अशाच पद्धतीने आर्थिक नुकसानीमुळे बंद पडली होती. हजारो कामगार कुटुंबियांवर उपासमारीची पाळी आलेली होती, गिरणीचे मालक कनवाहू असलेने केवळ कामगार उपाशी राहू नये या भूमिकेतून अक्षरशः एक रुपयाच्या नाममात्र किमतीमध्ये गिरणी सरकारकडे सुपूर्त केली. त्यावेळी आजच्यासारख्या विलीनीकरणासारखा नवव्यवस्थापकीय कौशल्ये नव्हती. तथापि गिरणी चांगल्या पद्धतीने चालण्यासाठी मजुरीमध्ये कपात करण्याचा प्रस्ताव आला. कै.एस.एम.जोशी, कै.यशवंतराव चव्हाण इ. सारखे दूरदर्शी नेतृत्व त्यावेळी पुढे आले. सर्वानुमते कामगारांच्या वेतनांमधून १/३ पगाराइतकी कपात सुचविण्यात आली. नफा कमवेल त्यावेळी पैसे परत करावेत, असे ठरले. त्याप्रमाणे सुदैवाने पंचवीस वर्षानंतर प्रथमतः गिरणीने कोटीहून अधिक नफा केल्यामुळे, दिलेल्या शब्दाला जागून कामगारांना कापलेले पैसे परत करण्यात आले. हा प्रयोग संपूर्ण भारतामध्ये पहिला व एकमेव ठरला.

ह्या इतिहासाची आठवण आज 'शिवशाही'च्या विलीनीकरणाप्रसंगी झाल्यावाचून रहात नाही. अर्थात् आजची परिस्थिती वेगळी आहे. संदर्भ बदललेले आहेत; परंतु 'कामगार हित' ही संकल्पना तीच आहे. विलिनीकरणानंतर उद्योगांचा कायदेशीर मालक वेगळा आज हजेरीपटावर असणाऱ्या ६०० लोकांची आजवरची सेवा सलग धरण्यात यावी, अशी आणखीन एक आग्रहाची मागणी कामगार संघटनांनी केली आहे. ही रास्त मागणी असून त्यांचा किर्लोस्कर ऑईल कंपनी व्यवस्थापनाने जरूर विचार करायला हवा.

## आपटेंनीही पुढाकार घ्यायला हवा

'शिवशाही'च्या शंभर वर्षाच्या यशस्वी कारकीर्दीचा शेवट अशा

पद्धतीने विलिनीकरणामध्ये झाला. ह्या पार्श्वभूमीवर आपटे अमालगमेशन ह्या उद्योग समुहांनी पुढाकार घेऊन लक्ष्मी-विष्णू वाचविली असती तर योग्य झाले असते. किर्लोस्कर उद्योग समुह पुढाकार घेऊन 'शिवशाही' कामगारांची उपासमार टाळण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्याचप्रमाणे माधवराव आपटेंनी देखील 'लक्ष्मी-विष्णू'च्या माध्यमातून त्यांच्या आपटे उद्योग समुहास नावलौकिक मिळवून देण्यामध्ये इथल्या श्रमिकांनी जो योगदान दिले. त्याची जाणीव ठेवून असे प्रयत्न करायला हवे होते, अशी अपेक्षा व्यक्त करणे निश्चितच गैर नाही. अगदी चारच वर्षापूर्वी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे आय.एस.ओ. ९००२ हे दर्जेदार उत्पादन वाढीसाठीचे गुणवत्तेचे प्रमाणपत्र प्राप्त करून गुणवत्तेचा आदर्श निर्माण करणाऱ्या 'शिवशाही'चे अखेरीस विलिनीकरण होत आहे. त्यातून नवा अध्याय सुरू होत आहे. अर्थात मूळ मालक किर्लोस्कर उद्योग समूहापैकीच असलेने सर्वांचे हितरक्षण अपेक्षित आहे. मुख्यतः उर्वरित ६०० कामगार कुटुंबियांचे पुनर्वसन या विलिनीकरणातून होणार आहे, हे सोलापूरकरांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल.

दै. लोकमत - ११/३/१९९९

## 'शिवशाही'मध्ये परस्पर सामंजस्याचे नवे पर्व

'शिवशाही' म्हणून सुपरिचित असलेल्या पूर्वीच्या शिवाजी वर्क्स लिमिटेड कंपनीचे किर्लोस्कर ऑइल इंजिन्समध्ये विलीनीकरण झाल्यानंतर प्रथमतः कामगार व व्यवस्थापनामध्ये चर्चेचे व परस्पर सामंज्याचे नवे पर्व सुरू झाले. प्रिसिजन उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा यांनी पुढाकार घेऊन ता. ३० ऑगस्टला चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील क्लॅन्सी प्रिसिजन कंपनीमध्ये शिवाजी वर्क्सचे व्यवस्थापन व भारतीय मजदूर संघाचे पदाधिकारी; तसेच कामगार प्रतिनिधींची बैठक बोलाविली. बैठकीमध्ये व्यवस्थापन व कामगार संघटनेने बाजू मांडली. यतीन शहांनीदेखील दोघांनी एकत्रित येऊन शिवशाही टिकवून गिरणगावच्या औद्योगिक लौकिकात भर टाकण्याचे आवाहन केले. परिणामी व्यवस्थापन व कामगार संघटनांमध्ये सुसंवाद घडण्याची प्रक्रिया सुरू झाली. एका उद्योगातील मालक-मजूर तंटा मिटविण्यासाठी दुसरा स्थानिक उद्योजक पुढाकार घेऊन परस्पर सामंजस्य घडवून आणण्याची यतीन शहांची ही सकारात्मक भूमिका आजच्या औद्योगिक पडझडीच्या काळात महत्त्वाची वाटते. असे प्रयत्न वाढण्याची गरज आहे. शेजारच्या उद्योगांमध्ये तणावाचे वातावरण असताना 'किंकर्तव्यम्'च्या भूमिकेतून मूग गिळून गप्प बसणे आता यापुढे चालणार नाही. स्पर्धेच्या गोष्टी सोडल्या तर कामगार व व्यवस्थापनातील संबंध सुधारण्यापासून ते गुणवत्तावृद्धीपर्यंत सर्वच गोष्टींमध्ये उद्योजकांनी आदान-प्रदानाबरोबरच 'एकमेका साह्य'ची भूमिका घेण्याची गरज आहे. 'शिवशाही'च्या बाबतीत हेच घडले. अशा गिरणगावातील अन्य छोट्या-मोठ्या उद्योगांतूनही घडले पाहिजे.

## 'शिवशाही'ची पूर्वपिठीका

१९९८ मध्ये शिवाजी वर्क्स हा कारखाना आर्थिक कारणांमुळे आजारी पडल्यानंतर किर्लोस्कर ऑइल इंजिन्सने पुढाकार घेऊन शिवाजी वर्क्सचे किर्लोस्कर ऑइल इंजिन्समध्ये विलीनीकरण करून कारखाना चालविला. त्यावेळी कारखाना जगविण्यासाठी मोठ्या प्रमाणात कामगार कपात, दहा टक्के वेतन कपात, बोनसचा त्याग आदी गोष्टी स्विकारून कामगारांनी महत्त्वाची भूमिका बजावली. रीतसर करारावर सर्व कामगारांनी सह्या दिल्या. हा करार ३१ मार्च २००३ ला संपुष्टात आला. गेल्या पाच वर्षांमध्ये 'शिवशाही'मध्ये व्यवस्थापनाकडून जे दबावतंत्र वापरून कामात वाढ, कंत्राटीकरण, इन्सेंटिव्हमध्ये कपात, साडेनऊ तासाची पाळी यासारख्या गोष्टी केल्या. त्यांना कंटाळून कामगारांनी भारतीय मजदूर संघाचे सदस्यत्व घेतले. त्यामुळे स्पटेंबर २००२ मध्ये पाच वर्षांचा कालावधी संपल्यानंतर भारतीय मजदूर संघप्रणीत सोलापूर जिल्हा मजदूर संघ ही युनियन सक्रिय झाली. बहुसंख्य कामगार युनियनचे सभासद असल्याने संघटनेने दोन महिने अगोदर नवीन करार करण्यासाठी व्यवस्थापनाकडे चार्टर ऑफ डिमांड्स म्हणजेच मागणीपत्र सादर केले. त्यावर चर्चा वाटाघाटी करणार नाही, अशी नकारार्थी भूमिका घेतली. कराराची मुदत संपून सहा महिने उलटले तरीही व्यवस्थापनाने नकारघंटा वाजविल्यामुळे भारतीय मजदूर संघाने 'शिवशाही'तील ५०० कामगारांचा मोर्चा किर्लोस्कर ऑइल इंजिन्सच्या पुण्यातील मुख्य कार्यालयावर नेला. एका महिन्याच्या आत वाटाघाटी सुरू केल्या नाहीत, तर स्वातंत्र्यदिनानंतर केव्हाही बेमुदत आंदोलनाची घोषणा केली. यामुळे परिस्थिती चिघळू नये म्हणून व्यवस्थापनाने भारतीय मजदूर संघाच्या प्रतिनिधींशी वाटाघाटीची तयारी दर्शविली. त्यासाठी यतीन शहांचे प्रयत्न कारणीभूत ठरले. आता कामगारांच्या मागण्यांवर चर्चा होईल, वाटाघाटी होतील व परस्पर सामंजस्याने प्रश्न सुटतील, असा आशावाद दिसतो.

## अनेक प्रश्नांपैकी प्राथमिकता कशाला ?

या परस्पर सामंजस्याच्या वाटाघाटींमध्ये व्यवस्थापन; तसेच कामगार संघटनेने व्यवहार तपासून जे शक्य आहे, ते त्वरित स्वीकारावे. प्रतिष्ठेचा प्रश्न करू नये. असे सुचविल्याशिवाय राहवत नाही. कारण १९८९ ते १९९५

दरम्यान पूर्वीच्या शिवाजी वर्क्समध्ये जी आंदोलने झाली, ज्या प्रकारच्या मालक-मजूर वाटाघाटी झाल्या, त्यामध्ये उद्योग टिकविण्याच्या भूमिकेचा दोन्हीही पक्षांकडून अभावच होता. परिणामी प्रकरण बी.आय.एफ.आर.कडे गेले. सुदैवाने किर्लोस्कर ऑईल इंजिन्समध्ये विलीनीकरण झाले. कामगारांनी त्याग केला. पाच वर्षांमध्ये कसेबसे तगलो मध्यंतरी आठ तासाऐवजी साडेनऊ तास काम करण्याची कायद्याविरोधी सक्ती करून व्यवस्थापनाने शोषणकारी भूमिका घेतली. प्रकरण उच्च न्यायालयपर्यंत गेले. त्याचाही निकाल लवकरच अपेक्षित आहे. खरेतर असे बेकायदेशीर प्रकार केल्याशिवाय उद्योग चालणारच नाहीत, अशी व्यवस्थापकाची भूमिका का आहे, हे अनाकलनीय आहे.

सध्याच्या ५७५ कामगारांपैकी ५२५ लोक डेली वेजेसवर आहेत. अनेक उत्पादनाची कामे कंत्राटी पद्धतीने होतात. दहा टक्के वेतन कपातीची मुदत मार्च २००३ अखेर संपूनदेखील व्यवस्थापनाने पगार पूर्ववत केलेला नाही. येत्या दिवाळीसाठी इतरांप्रमाणे कामगारांच्या बोनसचाही प्रश्न असणार आहे, असे प्रश्न सकारात्मक भूमिका घेतल्याशिवाय सुटणार नाहीत. गेल्या पाच वर्षांमध्ये कामगारांनी सहकार्याची भूमिका घेतली. त्याची पोच मिळावी, अशी अपेक्षा असणे गैर नाही; परंतु यासाठी कामगार संघटनेनेदेखील अतिरेकी भूमिका न घेणे सूज्ञपणाचे ठरेल.

### 'शिवशाही' टिकविण्यासाठी

एकंदरीत व्यवस्थापनाने चर्चेची तयारी दर्शविली. त्याला कामगार संघटनेने व प्रत्यक्ष कामगारांनीदेखील सकारात्मक भूमिकेतून व्यवहारांमध्ये शक्य असणाऱ्या गोष्टी स्वीकारून केवळ कायद्यांवर बोट न ठेवता एक नवीन आदर्श निर्माण करण्याची भूमिका घ्यावी, ही अपेक्षा आहे. आर्थिक मंदी संपलेली नाही; परंतु भविष्यातील सुवर्णकाळ जर उपभोगायचा असेल तर आज थोडेसे सोसावेच लागेल. तद्वतच व्यवस्थापनादेखील कामगारांच्या असहाय्य परिस्थितीचा फायदा घेऊन अनाठायी गोष्टी करू नयेत, तरच सहकाराचे हे नवे पर्व फलद्रुप होईल. 'शिवशाही' पुनश्च पूर्वपदावर येईल.

दै. सकाळ - ५/९/२००३

# फायनल जवाब... ताला लगा दिया जाय !

होटगी रोडवरील चेतन फौन्ड्रीच्या व्यवस्थापनाने गुरुवार, १० ऑगस्ट रोजी अचानक कामकाज बंद राहील, अशी नोटीस लावून कामगारांना कारखान्यात प्रवेश देण्यात मज्जाव केला. त्यामुळे पहिल्या पाळीतील कामगारांनी कारखान्याच्या गेटसमोर गर्दी केली होती. साहजिकच गेटसमोर गर्दी केली होती. साहजिकच रस्त्यावरून ये-जा करणारे थांबून नेमके काय घडले याविषयी उत्सुकतेने चौकशी करीत होते. त्याप्रसंगी एकाने दुसऱ्या गर्दीतल्या व्यक्तिला विचारले की, काय घडले. तेव्हा त्यांनी फिल्मी स्टाईलमध्ये गिरणी बंद केली. फायनल जवाब, ताला लगा दिया जाय. इतक्या सहजपणे त्यांनी टाळेबंदीविषयी मतप्रदर्शन केलेले पाहून मी तर अक्षरशः स्तिमित झालो. एकतर्फी टाळेबंदी करून व्यवस्थापनाने ५०० श्रमिक कुटुंबियांची रोजीरोटी संपविली. कारखाना पुन्हा कधी चालू होणार आहे? ह्या बंद दिवसांसाठी कायद्यानुसार नुकसान भरपाई मिळेल की नाही? मुख्य म्हणजे कायदा सुव्यवस्था अस्तित्वात आहे की नाही? असे असंख्य गंभीर प्रश्न निर्माण करणाऱ्या ह्या दुर्दैवी घटनेकडे अमिताभ स्टाईलने सहजपणे 'ताला लगा दिया जाय' म्हणणारा हा युवक नेमक्या कोणत्या मानसिकतेचे प्रतिनिधीत्व करतो हा प्रश्न आहे. 'कौन बनेगा करोडपती' ह्या सीरियलमुळे बहुचर्चित अमिताभ बच्चनचा हा खेळ. त्यामुळे 'ताला लगा दिया जाय' ही सुप्रसिद्ध डायलॉगबाजी चंगळवादाच्या दिशेने आपले मूलभूत प्रश्न इतक्या उदासिनतेने हाताळायला शिकविते ही चिंतेची बाब आहे.

## शांतता बिघडवणारी एकतर्फी टाळेबंदी

चेतन फाऊंड्रीच्या व्यवस्थापनाने कच्चा माल उपलब्ध नाही, वीज

बिल भरण्यासाठी पैसे नाहीत अशी कारणे देवून कारखान्याच्या गेटवर नोटीस लावली. काम बंद करून टाकले. सकाळी नेहमीप्रमाणे काम करण्यासाठी आलेले नियमित कामगार भयभीत झाले. त्यांना किमान मानवीय पातळीवर समजावून देण्याची जबाबदारी असणारे कोणीही व्यवस्थापकीय प्रतिनिधी त्याठिकाणी उपस्थित नव्हते. कामगारांमध्ये असंतोष पसरला. दरम्यान कारखान्याचे व्यवस्थापक शंकर दुधवाले हे सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास कोंडी येथील चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील कारखान्याकडे जात असतानास आडव्या नळाजवळ संतप्त कामगारांनी त्यांना अडवून मारहाण केल्याची घटना घडल्याची बातमी आली. वातावरण आणखीन तंग झाले. या प्रकरणी व्यवस्थापनाने रीतसर फिर्याद पोलिसांकडे दाखल केली. परिणामी पोलिसांनी काही कामगारांना अटकही केली. त्यामुळे सूंपर्ण शहरातील औद्योगिक शांतता धोक्यात आली. व्यवस्थापन व कामगारांमध्ये विनाकारण तणाव निर्माण झाला. मालकांच्या बेकायदेशीर टाळेबंदीविरुद्ध कामगार व उपआयुक्तांकडे रीतसर तक्रार दाखल झाली असून त्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल. तरी कामगारांनी चिथावणीला बळी पडू नये व शांतता राखून सहकार्य करावे, असे उपआयुक्त सलगर यांनी आवाहनही केले.

**कामगारांनास विश्वासात घ्यावे**

वास्तविक कारखान्यांसमोर निर्माण झालेली ही स्थिती आज एकाएकी आलेली नाही. इंजिनिअरिंग उद्योगात मंदीचे वातावरण असल्याने चेतन फौंड्री देखील अडचणीत आलेली आहे. याबद्दल दुमत नाही. आज कंपनीकडे वीज बिल भरण्यासाठी पैसे नसल्याने वीज मंडळाचीदेखील नोटीस आली आहे. खेळते भांडवलदेखील नसल्याने कोळसा व कच्चा माल विकत घेण्यासाठी पैसे नाहीत. एवढेच काय जुलै महिन्याचा पगार देण्यासाठी देखील मालकांकडे पैसे नाहीत. ही सर्व परिस्थिती एकाएकी उद्‌भवली नाही. गेल्या काही महिन्यापासून खालावत जाणाऱ्या या परिस्थितीविषयी पारदर्शक पद्धतीने कामगारांना विश्वासात घेतले असते. तर कामगारांना संभाव्य धोक्याची कल्पना आली असती. मागील महिन्यामध्ये अचानकपणे चेतन फौंड्रीचे मालक विमलकुमार शहा यांनी कामगारांची बैठक बोलावून कारखान्याची आर्थिक

परिस्थिती सुधारण्यासाठी कामगारांच्या पगारात १० टक्के कपात व त्याच बरोबरीने १० टक्के जादा काम असा प्रस्ताव मांडला होता. कामगारांनी कारखान्याची परिस्थिती पाहून पगार कपात व जादा कामाची तयारी दर्शविली होती, असे समजते. दरम्यान कामगारांची संघटना भारतीय मजदूर संघटनेने देखील वाटाघाटी करून प्रश्न सामंजस्याने सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे. या पार्श्वभूमीवर फौंड्री मालकांनी एकतर्फी टाळेबंदी लागू करून कामगारांच्या सामंजस्याच्या भूमिकेलाच तडा दिलेला आहे. ५०० श्रमिक कुटुंबियाच्या रोजीरोटीचा प्रश्न असणाऱ्या चेतन फौंड्रीचा प्रश्न असा 'ताला लगा दिया जाय'च्या पद्धतीने सोडवून कसे चालेल. यापूर्वी देखील १९९३ मध्ये चेतन फौंड्री अशीच आर्थिक अडचणीत आलेली होती. होटगी रोड परिसरातील औद्योगिक वसाहतीतील औद्योगिक शांतात त्यामुळे बिघडलेली होती. दोन कामगार संघटना परस्परविरोधी दंड थोपटून उभ्या होत्या. अखेरीस कामगारांनी व व्यवस्थापनाने समंजसपणा दाखविला व कारखाना पूर्ववत चालू झाला, हे ताजे उदाहरण समोर असताना व्यवस्थापनाने पुनश्च त्याच मार्गाने जावे याविषयी कामगारामध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

**ताज्या जखमांचा ओघळ**

शिवाजी वर्क्स, लक्ष्मी-विष्णू तसेच अनेक छोट्या उद्योगांच्या जखमा अद्यापही ओल्या आहेत. त्यामध्ये चेतन फौंड्रीची भर पडता कामा नये म्हणून व्यवस्थापनांनी कामगारांना विश्वासात घेवून प्रचलित कायदे व लोकशाही न्यायव्यवस्थेच्या चतुःसीमेत राहूनच हे प्रश्न सोडविण्याची गरज आहे. कामगारांचे सहकार्य सुसंवादातून मिळू शकते. कायद्यावर बोट ठेवून अथवा हम करे सो कायद्याच्या आक्रस्ताळी भूमिकेतून नव्हे कामगार संघटनांनीदेखील बदलत्या काळांची पाऊले ओळखून उद्योग जगविण्याचीच भूमिका घेतली पाहिजे. देशातील हजारो लघु मोठे उद्योग बंद पडले आहेत. अनेक उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत उद्योगांना पुरेसे संरक्षण देण्याऐवजी त्याला मारक ठरणारी सरकारी धोरणे येत आहेत. ह्या पार्श्वभूमीवर विसाव्या शतकात लढ्यातून मिळविलेले अधिकार गमविण्याची दुर्दैवी परिस्थिती श्रमिकांसमोर येऊन ठेपली आहे. त्याचा मुकाबला पूर्ण विचारपूर्वकच करावा लागणार आहे. भावनिकतेला व्यवहाराचीही जोड देण्याची गरज आहे.

**उद्योगपतीही लढण्याची भाषा करत आहेत**

परदेशी उद्योग व बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आक्रमण स्थानिक उद्योग नेस्तनाबूत करणार याची जाणीव उद्योगपतींना देखील व्हायला लागली आहे. स्वतःला वाचविण्यासाठी का होईना राहुलकुमार बजाजसारखे उद्योगपती देशहितासाठी लढण्याची भाषा करू लागलेले दिसतात. लोकमान्य टिळक पुरस्कार स्वीकारताना उद्योगपती बजाज यांनी केलेल्या भाषणांमध्ये अमेरिका, युरोपातील विकसित राष्ट्रे स्वतःच्या हितासाठी लढतात, आपण मात्र स्वतःच्या देशाच्या अस्तित्वासाठी काहीच करताना दिसत नाही. आपल्या देशापुढे असणाऱ्या संभाव्य धोक्याबाबत आपल्याला काहीच कसे वाटत नाही ? खुले आर्थिक धोरण व बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे येणाऱ्या संभाव्य संकटाची जाणीव झाल्यानंतरही आमच्यात लढण्याची ईर्षा कशी उत्पन्न होत नाही? असा जळजळीत सवाल केला. एक्सॉर्टसारख्या एका कंपनीच्या ऑर्डरीवर ८० टक्के अवलंबून असलेल्या चेतन फौंड्रीसारख्या छोटेखानी उद्योगांची ही अवस्था एकूण व्यापक आर्थिक औद्योगिक धोरणाशी जोडलेली आहे. हे नाकारून चालणार नाही. स्थानिक मालकांनी कमविलेला नफा औद्योगिक विकासासाठीच वापरला पाहिजे असा कायदा नाही. आक्रमक प्रशासकीय व्यवस्था तसेच लढाऊ कामगार चळवळही राहिलेली नाही. प्राप्त परिस्थितीत ह्या नव्या आर्थिक स्वातंत्र्याच्या लढाईमध्ये तुम्हा आम्हा सर्वांनाच सक्रीय व्हावे लागणार आहे. अन्यथा अशा प्रकारच्या 'ताला लगा दिया जाय' च्या घटना दिवसेंदिवस वाढायलाच लागतील. या घटनांकडे गंभीरपणे परंतु समंजस पद्धतीने पाहण्याची गरज आहे. चेतन फौंड्री पुनश्च कार्यरत होण्यासाठी अशा प्रकारची एकजूट हवी आहे.

दै. सकाळ - १८/८/२०००

# 'चेतन'चा प्रश्न सोडविण्यासाठी कृति समिती हवी

गेल्या तीस वर्षांपासून चालू असलेली चेतन फौंड्री सध्या बंद आहे. कामगारांनी बेकायदा बैठा संप सुरू केला असे मालकांचे म्हणणे आहे तर मालकांनीच बेकायदेशीर 'टाळेबंदी' सुरू केल्याचे कामगार संघटनेचे मत आहे. आता सर्व कामगारांनी योग्य ते हमीपत्र दिल्याशिवाय व पैशाची उपलब्धता झाल्याशिवाय १० जून २००१ पर्यंत फौंड्री बंद राहील, असे जाहीर निवेदन मालकांनी केले असून या सर्व 'बंद' फौंड्रीतील सर्व कामागारांना काम मिळाले पाहिजे, अशी कामगारांची मागणी आहे. मालक व मजूर दोघांच्याही मागण्या परस्परविरोधी तसेच व्यवहार्य न वाटणाऱ्या आहेत. बहुसंख्य कामगारांचा पाठिंबा असणाऱ्या 'सिटू' संघटनेने मोर्चा नेऊन जिल्हाधिकाऱ्यांना मध्यस्थीची विनंती केली तर अधिकृत कामगार संघटना असलेल्या भारतीय मजदूर युनियनकडे कामगार नसल्याने स्पष्ट भूमिका नाही. मालकांनी मात्र अधिकृत कामगार संघटनेशीच चर्चा करण्याची ठाम भूमिका घेतल्यामुळे कायदेशीर पेच निर्माण झाला आहे. सार्वत्रिक मंदी व एकंदरीत औद्योगिक आघाडीवर असणारी चिंताजनक परिस्थिती लक्षात घेऊन जी समंजसपणाची भूमिका घेण्याची गरज आहे ती पुढे येताना दिसत नाही. जाहीर निवेदन व वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध माहितीवरून मालक आक्रमक भूमिका घेताना दिसतात तर दोन कामगार संघटनांच्या पेचात कामगारदेखील हवालदिल झालेला दिसतो. परिणामी ५०० हून अधिक कामगार कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे.

## मालक–मजुरांचे दावे–प्रतिदावे

ऑगस्ट २००० मध्ये अशीच परिस्थिती आली होती. तत्कालीन जिल्हाधिकारी दीपक कपूर यांनी यशस्वी मध्यस्थी करून पेच सोडविला.

फौंड्री पुनश्च सुरू झाली. परंतु उद्योगधंद्यातील वाढती स्पर्धा व तोटा यामुळे कंपनी आर्थिक अरिष्टामध्ये आली. बदलत्या परिस्थितीची व संभाव्य धोक्याची व्यवस्थापनाने १५ मे २००१ रोजी कामगार प्रतिनिधींना कल्पना दिली, ती प्रतिनिधींनी बैठकीत मान्यही केल्याचे मालकांचे म्हणणे आहे. त्याप्रमाणे मालकांनी प्रत्यक्ष कारवाई सुरू केली. मात्र कामगारांनी १७ मे २००१ पासून उत्पादन प्रक्रिया बंद पाडून संप बेकायदेशीरपणे सुरू केला. कारखाना परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये. कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये म्हणून मग व्यवस्थापनाने २१ मे पासून फौंड्री बंद करून नाईलाजाने गेट बंद केल्याचे मालकाचे म्हणणे आहे.

याउलट मालकांनी बेकायदेशीर ले-ऑफ देऊन निम्म्याहून अधिक लोकांना घरी पाठविणे, ले-ऑफच्या पगाराविषयी काहीच उल्लेख नसलेली नोटीस लावणे, नंतर २१ मे पासून एकतर्फी टाळेबंदी जाहीर करणे. यामुळे कारखान्यतील कामगार बेकार झाले आहेत. व्यवस्थापनाने कुठल्याही कामगार संघटनेबरोबर अथवा कामगार प्रतिनिधींबरोबर याबाबत काहीही चर्चा केलेली नाही. त्यामुळे व्यवस्थापनाचे हे कृत्य बेकायदेशीर आहे. त्याबाबत सहाय्यक कामगार आयुक्तांकडे तक्रार केली असता त्याची दाखल घेतली गेली नाही. त्यामुळे या प्रकरणी लक्ष घालून ही टाळेबंदी उठवावी व कामगारांना काम मिळवून द्यावे, अशी मागणी 'सिटु'ने रस्त्यावर येऊन तर मालक गेटला कुलूप लावून हा प्रश्न सोडविण्याची भूमिका घेत आहेत. प्रशासन कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊ शकत नाही. या परिस्थितीत 'चेतन'चा पेच लवकर सुटू शकेल, असे वाटत नाही.

## समस्त सोलापूरकरांचा प्रश्न

सोलापूरातील औद्योगिक आघाडीवरील सद्यस्थिति लक्षात घेता हा प्रश्न एकट्या 'चेतन'पुरता मर्यादित नसून समस्त सोलापूरकरांच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाचा बनलेला आहे. राज्यकर्ते, शासन व कामगार नेत्यांनी याकडे गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे. सर्व राजकीय पक्षांच्या जाणकार नेत्यांनी लक्ष घालून हा प्रश्न सोडविण्याची भूमिका घ्यावी, असे आवाहनही करण्यात येत आहे. राजकीय पक्षांना राजकारणापलीकडे जाऊन उद्योग जगविणे महत्त्वाचे

वाटत नाही. स्थानिक लोकप्रतिनिधींकडे निवडणुका व मतांच्या राजकारणापेक्षा आपले उद्यमशील शहर सक्षम करण्याची तीव्र इच्छा दिसत नाही. औद्योगिक संघटना त्यांच्या उद्योगांच्या अस्तित्वाची लढाई लढत आहेत. एका पाठोपाठ असे उद्योग बंद पडू लागले तर या गिरणगावचे भवितव्य काय ? अशा कळकळीने सारे भूमिपुत्र एकत्र येताना दिसत नाहीत.

औद्योगिक मंदी, वाढती स्पर्धा व आर्थिक अरिष्ट कोणालाहि नाकारता येणार नाही. उत्पादनाचा सतत वाढणारा खर्च व उत्पादित मालाची सतत घसरत चाललेली किंमत व त्यामुळे सतत वाढणारा तोटा ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे नकारात्मक भूमिका घेण्याऐवजी उद्योग टिकला तरच रोजगार टिकेल. या सकारात्मक भूमिकेतून कामगारांनीही विचार करायला हवा. अर्थात मालकांनीदेखील अरिष्टांचा कायदा घेऊन कामगारांनास देशोधडीला लावण्याचे धोरण टाळले पाहिजे. उद्योग हा मालक व मजुरांच्या परस्पर सहकार्याशिवाय टिकू शकत नाही. याची जाणीव दोघांनीहि ठेवली पाहिजे. खरे तर दोघांच्याही दृष्टीने ही अस्तित्वाचीच लढाई आहे. त्यामुळे उद्योग वाचविण्यासाठी प्रसंगी दोघांनाही तडजोड करणे सर्वांच्याच हिताचे ठरेल. प्रतिष्ठा त्यातच आहे.

## लोकप्रतिनिधींची जबाबदारी

दुर्दैवाने राज्यकर्ते, राजकीय पक्ष व लोकप्रतिनिधींना उद्योगांचे प्रश्न आपले वाटत नाहीत. त्यामुळे सोलापुरातील वस्त्रोद्योग पार धुळीस मिळाला आहे. काही मोजक्या उद्योगामुळे कशीबशी रोजंदारी शक्य असताना तेहि बंद पडत असतील तर आपण 'किम्‌कर्तव्यम'ची भूमिका घेऊन कसे चालेल. ठाणे परिसरातील औद्योगिक वसाहतीमधील बंद पडलेले कारखाने सुरू व्हावेत आणि आजारी कारखाने बंद पडू नयेत यासाठी शिवसेनेतर्फे प्रयत्न सुरू झाल्याची माहिती खासदार सतीश प्रधानांनी नुकतीच दिली. वास्तविक स्थानिक पातळीवर जाणकारांच्या संयुक्त कृति समितीच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींनी असे प्रयत्न करण्याची गरज आहे. अर्थात राजकारण व मतांची समीकरणे बाजूला ठेवून केवळ उद्योग टिकविण्यासाठी व कामगारांच्या रोजगारासाठी निकोप भूमिकेतून हे प्रयत्न व्हायला हवेत तरच आमच्या गिरणगावचे अस्तित्व टिकेल अन्यथा नाही.

दै. लोकमत - २०/५/२००१

## चेतन फौंड्रीतील नव्या प्रयोगाची दिशा

जिल्हाधिकारी दीपक कपूर यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे चेतन फौंड्रीतील संकट तूर्तास तरी टळले आहे. १८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे झालेल्या बैठकीमध्ये मालक, कामगार प्रतिनिधी व शासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये टाळेबंदी उठविण्याचा निर्णय घेण्यात आला मात्र कारखाना पूर्ववत सुरू व्हायला वेळ लागेल. कंपनीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी वीज बिलाच्या थकबाकीविषयी हमी घेतली एवढेच नव्हे तर जकातीच्या रूपाने कंपनीने शासनाकडे भरलेली ६४ लाख रुपयाची येणेबाकी मिळवून देण्यासाठी स्वतः प्रयत्न करण्याची सकारात्मक भूमिका घेतली. जागतिक मंदीच्या परिस्थितीमध्ये अनेक उद्योगधंदे बंद पडत आहेत. त्यातून सोलापूरच्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये दारुण परिस्थिती निर्माण झाल्याने मालक व मजूर दोघांनीही अत्यंत संयमाने वागण्याचे आवाहन केले. सुदैवाने सर्वांनीच त्यास प्रतिसाद दिल्यामुळे चेतन फौंड्रीवरील टाळेबंदीचे ग्रहण सुटले. परंतु खरा प्रश्न यापुढेच येणार आहे.

### 'वॉच डॉग' ची भूमिका

जिल्हाधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे कंपनीमध्ये नवीन प्रयोग केला जाणार आहे. त्यानुसार कारखान्यातील सद्यस्थिती व होणाऱ्या बदलांविषयी प्रत्यक्ष कामगारांशी थेट चर्चा केली जाईल. या चर्चेच्यावेळी दोन्हीही वादातीत कामगार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहून 'वॉच डॉग'च्या भूमिकेतून देखरेख करतील. मालक व मजूर दोघांनीही सामोपचाराने उद्योग वाचविण्याच्या हेतूने चर्चा करून निर्णय घ्यावेत. त्यामध्ये

युनियनने ढवळाढवळ करू नये अशी अपेक्षा आहे. व्यापक कामगार व उद्योगांच्या हितासाठी कामगार संघटनांनी ही भूमिका मान्य करण्यात आली. वीज बिल थकबाकीपोटी पैसे भरून कच्च्या मालाची व्यवस्था करण्याची जबाबदारी मालकांनी स्वीकारली तरीही सुरळीतपणे कारखाना चालू होण्यासाठी काही काळ लागेल. दरम्यान, प्रत्यक्ष कामगारांशी व्यवस्थापन आपल्या मागण्यांसंदर्भात चर्चा करणार असून, या नवीन प्रयोगांचे यशापयश लवकरच स्पष्ट होईल.

### तथाकथित 'विघ्नसंतोषी'

उद्योग टिकला पाहिजे, कामगारांना रोजगार मिळायला हवा. याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. परंतु चर्चेअंती जे ठरेल त्याविषयी रितसर कायदेशीर करार करावा लागणार आहे. त्यासाठी प्रातिनिधिक कामगार संघटनेची मदत लागेल. कामगार कपात, वेतन कपात व काम वाढ अशी तिहेरी मागणी मालकांनी जाहीर प्रसिद्धीकरणातून केलेली असून, त्यासंदर्भात कामगारांनी सर्वांगीण अभ्यास करून निर्णय घ्यावयाचा आहे. मालकांनी २७ जुलै २००० रोजी समस्त कामागारांची बैठक घेऊन हा प्रस्ताव मांडला होता. त्यास ३०० कामगारांनी संमती दर्शवून रितसर सह्यादेखील केल्याचे सांगण्यात येते. परंतु त्यानंतर बाहेरील 'विघ्नसंतोषी' लोकांच्या चिथावणीमुळे कामगार फिरले. त्यामुळे टाळेबंदीचा दुर्दैवी प्रसंग ओढवला असल्याचे मालकांनी सांगितले. भारतीय मजदूर संघ या प्रातिनिधिक संघटनेने मालकांनी थेट कामगारांशी चर्चा करून सर्वमान्य तोडगा काढावा व शेवटी त्रयस्थ तज्ञांचा लवाद नेमावा अशी सूचना केली. त्यामध्ये युनियनला आवश्यकतेपेक्षा जास्त सहभागी करून घेऊ नये असे सुचविले. मात्र लाल बावटा युनियनची भूमिका वेगळी आहे. दोन्हीही युनियन्सच्या संदर्भात मालकांनी जाहीर प्रसिद्धीकरणाद्वारे खुलासा केला. त्यामध्ये काही आरोपही केले. या आरोपामध्ये तथ्य असेल तर या नवीन कामगारांशी थेट चर्चा करण्याच्या प्रयोगाला अंतिमतः दोन्ही संघटनांकडून कितपत सहकार्य मिळेल याविषयी शंका वाटते. थोडक्यात 'पुनश्च हरिओम'ची अवस्था असणार आहे.

**कामगारांचा व्यवस्थापनातील सहभाग**

कायदेशीर अधिकार प्राप्त झालेल्या प्रातिनिधिक स्वरुपाच्या दोन्हीही कामगार संघटनांना बाजूला ठेवून कामगारांशी थेट चर्चा करण्याची ही मागणी का आली? ही परिस्थिती येण्याची जबाबदारी नेमकी कोणाची ? नेमके कोणाचे चुकले ? असे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. परंतु हा प्रयोग यशस्वी होण्यासाठी व्यावहारीक अडचणी येण्याची शक्यता आहे. एरव्ही कामगारांना व्यवस्थापनामध्ये सहभाग नाकारून, कंपनीच्या व्यवस्थापकीय निर्णय प्रकियेमध्ये सामावून न घेता. आजच्या संकटसमयी कामागारांनी सकारात्मक भूमिकेतून वेतन कपात, कामगार कपात व कामवाढ या गोष्टी मान्य कराव्यात ही अपेक्षा कशी करता येईल. ही गोष्ट यशस्वी होईल काय ?

मालक व मजूर दोघांच्या परस्पर सहकार्यातून औद्योगिक विकास साधण्याच्या हेतूने या देशात 'कामागरांचा व्यवस्थापनातील सहभाग' ही योजना सुरू करण्यात आली. राज्य घटनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये अंतर्भाव करून त्याविषयी रितसर अधिनियमही करण्यात आले. परिणामी सहकारी संस्था व सार्वजनिक उपक्रमातून कामगार संचालक (नावापुरते) नेमून नवीन सत्तास्थाने निर्माण करण्यापलीकडे फारसे काही घडले नाही. उद्योगामध्ये लोकशाही निर्णय प्रक्रिया व पारदर्शकता येऊ शकलो नाही. याला मालक व कामगार संघटना दोघेही जबाबदार आहेत. उद्योजकांनी कामगारांना निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्याचा मोकळेपणा दाखविला नाही. वर्कर्स पार्टिसिपेशनपेक्षा केवळ वर्कर्सना 'कन्सल्टेशन'वर भर दिला. त्यामुळे कामगार व उद्योग यातील अंतर वाढतच गेले. कामगार संघटनांनीदेखील प्रत्यक्ष कामगारांना उत्पादन प्रक्रिया, व्यवस्थापन, अर्थकारण, कायदा याविषयी शास्त्रशुद्ध शिक्षण देऊन प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी सक्षम बनविण्याकडे जाणीवपूर्वक प्रयत्न केले नाहीत. वास्तविक या सर्व गोष्ओंचे शिक्षण देण्यासाठी 'कामगार प्रशिक्षण योजना' राबविण्यात आली. कामगारांमधून शिक्षक बनावेत, त्यांनी निरंतर कामगार शिक्षणाची जबाबदारी पार पाडावी ही अपेक्षा होती. त्याला संघटना व व्यवस्थापकाचे पुरेसे सहकार्य मिळाले नसल्यामुळे हे शिक्षक गुणवंत कामगार पुरस्कार मिळविण्यापलीकडे काही फारसे करू शकले नाहीत. परिणामी कामगारांमध्ये सुजाण नेतृत्व उभे राहू शकले नाही.

**एकविसाव्या शतकाचे आव्हान**

चेतन फौंड्रीच्या निमित्ताने होऊ घेतलेला हा नवीन प्रयोग औद्योगिक संबंधावर दूरगामी परिणाम करणारा ठरेल. या स्वनिर्मित परिस्थितीविषयी कामगार संघटनांनी अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे. जागतिक परिस्थिती झपाट्याने बदलते आहे. जपान व इतर युरोपीय देशांनी गुणवत्ता मंडळे व कामगारांच्या सहभागासाठी सर्वांगीण प्रयत्न करून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थान निर्माण केले आहे. त्यांच्याशी जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करायची जाणीव ठेवून भारतीय कामगार संघटना दोघांनीही प्रयत्न करण्याची गरज आहे. एकविसाव्या शतकाची आव्हाने समर्थपणे पेलू शकणारा 'नॉलेज वर्कर' घडविण्याची जबाबदारी दोघांचीही सामायिक आहे. बदलती श्रम-संस्कृती नीटपणे समजून घेऊन कामगार संघटनांनी आपले धोरण आखले पाहिजे. आततायीपणाने भावनिक आव्हाने करून चालणार नाही. मालकांनी देखील मनापासून कामगारांना पारदर्शक भूमिकेतून कंपनीचा व्यवहार समजविला पाहिजे. प्रामाणिकपणा व सचोटी दाखवायला हवी. अन्यथा अशा संकटसमयी कामगारांकडून एकतर्फी सहकार्याची मागणी केल्यास ते मिळू शकणार नाही. उद्योग जगविण्यासाठी दोघांनीही प्रामाणिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. उदारीकरण मुक्त अर्थव्यवस्था, जागतिकीकरण या सर्वांचे पाश आता बळकट होत आहेत. ही अपरिहार्य परिस्थिती दोघांच्याही परस्परपूरक भूमिकेतून टाळता येईल.

दै. लोकमत - २४/८/२००१

देशाने १९९१ साली नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. मिश्र अर्थव्यवस्था इथल्या मातीत रुजण्याआधीच तिला मुळासकट उखडून काढीत मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली गेली. सोलापूरातील औद्योगिक परिस्थिती गंभीर बनली. कापडगिरण्या बंद पडल्या. सूतगिरण्या संपुष्टात आल्या. जागतिक स्पर्धेत टिकू न शकल्यामुळे यंत्रमाग उद्योग मोडकळीस आला. महिलांना रोजगार देणारा बिडी उद्योग तसेच इतर छोटे उद्योगही संकटात सापडले. त्यामुळे असंघटित क्षेत्रातील रोजगारावरही घातक परिणाम झाले. एकंदरीत गिरणगाव उद्ध्वस्त होत गेले.

ही सर्वांगीण पडझड मुख्यतः 'लोकमत'मधील सदरातून नोंदवली गेली. याच काळातील काही आशादायक घटनाही या सदरातून नोंदविता आल्या. त्यातील निवडक लेखांचे 'पडझडीच्या नोंदी' हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. हा दस्तावेज अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी तसेच उद्याच्या पिढीसाठी उपयुक्त ठरेल. गिरणगाव नाकारणाऱ्या आजच्या नवशिक्षित स्थलांतरित पिढीला आपला ऐतिहासिक वारसा समजून घेता येईल.

परिवर्तन अकादमी
प्रकाशन,
सोलापूर

मूल्य : २४० रु. ISBN No. : 978-81-926776-7-5